**TEXT CROSS WITHIN THE BOOK ONLY**

UNIVERSAL
LIBRARY
OU_192118
UNIVERSAL
LIBRARY

# वाटचाल

रा. मि. जोशी

किंमत ३ रुपये

OUP—881—5-8-74—15,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M910 J83V  Accession No. PGM401

Author जोशी, र. भि.

Title वाट-चाल :

This book should be returned on or before the date last marked below

# वाटचाल

१२११४

रा. भि. जोशी

किंमत ३ रुपये

मौज प्रकाशन : १२ :

पहिली आवृत्ति : ११०० प्रति
२० डिसेंबर, १९५२

वेष्टन :
द. ग. गोडसे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगांव, मुंबई ४

Checked 1969

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन लि.
गिरगांव, मुंबई ४

वडिलांच्या स्मृतीस—

मीं आतांपर्यंत जे प्रवासलेख लिहिले त्यांपैकीं कांहींचा हा संग्रह आहे. सामान्यपणें ज्याला प्रवासवर्णन किंवा स्थलवर्णन म्हणतात तशा प्रकारचे हे लेख नाहींत. कारण मीं कोणत्या मार्गानें कोणत्या ठिकाणचा प्रवास केला, आणि प्रवासांत मला काय सोयी-गैरसोयी आढळल्या ह्यांचें, किंवा एखाद्या ठिकाणीं पाहण्यासारखीं कोणतीं स्थळें आहेत त्यांचें प्रवास करूं इच्छिणाऱ्यांना उपयोगीं पडूं शकेल असें वर्णन ह्या लेखांत नाहीं.

'दिल्ली—एक अजायबघर' हा माझा पहिला प्रवासलेख मीं 'यशवंत' मासिकासाठीं लिहिला, त्या वेळीं त्या लेखाचें स्वरूप काय होणार आहे ह्याची मला स्पष्ट कल्पना नव्हती. किंवा तशाच प्रकारचे लेख मी पुढें लिहीन असेंहि तेव्हां वाटलें नव्हतें. मी त्यावेळीं दिल्लींत होतों, त्याच्या आधीं दोन-तीनदां दिल्लीला गेलों होतों. ह्या भेटींत आणि मुक्कामांत दिल्लीसंबंधीं, तिथल्या लोकां-संबंधीं, तिथल्या वातावरणासंबधीं माझे जे कांहीं ग्रह झाले, त्यांचा माझ्या मनावर जो कांहीं ठसा उमटला, त्याच्या कांहीं छटा माझ्या त्या लेखांत व्यक्त झाल्या आहेत. आणि पुढें जेव्हां इतर स्थलांसंबंधीं किंवा प्रवासांसंबंधीं लेख लिहिले तेव्हांहि हीच भूमिका राहिली. एखादें ठिकाण पाहून, तिथें राहून, त्यासंबंधीं वाचून—ऐकून मला जें वाटलें तें ह्या लेखांतून देण्याचा प्रयत्न आहे. मला एखाद्या ठिकाणासंबंधीं जें वाटलें तेंच इतरांना वाटेल असें नाहीं. पण माझी भूमिका लक्षांत घेतली तर माझ्या लेखांसंबंधीं निदान गैरसमज होणार नाहीं!

माझे हे लेख पहिल्यांदा यशवंत, समीक्षक, सत्यकथा, साहित्य, मौज (दिवाळी अंक), नवशक्ति (दिवाळी अंक), नवयुग (दिवाळी अंक), धनुर्धारी (दिवाळी अंक), इत्यादि नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. ज्यांनीं ते त्या वेळीं प्रसिद्ध केले त्यांचा मी ऋणी आहें.

मुंबई २८,
२४–१०–५३

श्री. भि. जोशी

[library stamp]

# • १ •

# गाङ्गं वारि मनोहारि....

हिमालयाचीं गिरिकपाटें फोडून आर्यावर्ताच्या समप्रदेशात प्रवेश करणाऱ्या गंगेचें, ज्या ठिकाणीं उभें राहून ब्रह्मदेवानें सर्व देवांसमवेत स्वागत केलें, त्या ठिकाणीं, हरिकी पैडीजवळच्या ब्रह्मकुंडाच्या घाटावर, आम्ही उभे होतो, आणि आमच्या हातांतले दाणे-फुटाणे आम्ही खायला टाकूं ह्या आशेनें कुंडातले मासे आमच्या पायांच्या आसपास घिरट्या घालीत होते. आम्हीं चार-दोन दाणे टाकतांच माशांचे जथ्थेच्या जथ्थे गोळा होऊं लागले. दोन-दोन हात लांब, लठ्ठ बायकांच्या पोटऱ्यासारखे स्थूल, मळकट हिरवा रंग, कांचेचे वरून बसवल्या-सारखे दिसणारे बटबटीत डोळे, थबकडीं पसरट तोंड, आणि त्यांची हपापल्या-सारखी केविलवाणी उघडझाक. त्यांच्याकडे पाहून मला सदावर्ताच्या दाराशीं गर्दी करणाऱ्या भिकाऱ्यांची आठवण व्हायची, पण त्यांचे गलेलठ्ठ देह यात्रेकरूंच्या मागें लागणाऱ्या पंड्याची आठवण करून देऊं लागले. टाकलेल्या दाण्यासाटीं त्यांची इतकी चढाओढ चालली होती कीं, ते एकमेकांना ढुशा देत पुढें येत होते, आणि पाण्यात त्यांची इतकी दाटी झाली होती कीं, त्यांच्या पाठीवरून पाय देऊन कोणालाहि पलीकडे जातां आलें असतें.

त्यांचें तें बुळबुळीत, निर्बुद्ध रूप मला पाहवेना. पण तेवढ्यांत धडपडतां धडपडतां कांहीं मासे अंगावर वळले, त्याबरोबर सूर्याचे किरण पडून त्यांचीं अंगे रुपेरी शिंपल्यांसारखीं तेजानें झळकलीं, आणि त्यावर इंद्रधनुष्याच्या छटा उमटल्या. मग मात्र त्यांची ती धडपड सारखी चालू राहावी आणि त्यांचें तें चंचल अंगसौंदर्य सारखें दिसत राहावें असें मला वाटूं लागलें. पण हळूंहळूं आमची डाळ-दाण्यांची पुरचुंडी रिकामी होत चालली, आणि अखेर निर्धनाला

जसे त्याचे आश्रित सोडून जातात त्याप्रमाणें एकामागून एक ते मासे दुसरीकडे गेले.

मला एक प्रश्न पडला कीं ह्या इतक्या माशाचे होतें तरी काय? तिथें मासे मागायची परवानगी नाहीं. आणि त्यांच्या संख्येंत भर तर सारखी पडत असेल! लहान माशाना मोठे मासे खातात असें म्हणतात. इथें तर सगळेच मासे इतके लट्ठ आणि मोठे आहेत कीं, त्यांचीं फक्त शेंपटें आणि पंखच काय ते एकमेकाच्या तोंडात मावू शकतील. पण मासे खाणारा बुभुक्षितसुद्धा शेपूट आणि पंख खात नाहीं, तर मासे ते कसे खातील? मला वाटतें, गंगेच्या ह्या पुण्यजलात जन्म पावलेले हे मासे "त्वत्तीरे नरकान्तकारिणि वरं मत्स्योऽथवा कच्छपः।" अशी इच्छा आदल्या जन्मी व्यक्त केलेले पुण्यात्मे असावेत, आणि ह्या ठिकाणचें त्यांचे आयुर्मान पुरें झाल्यावर, रात्रींच्या वेळीं सर्व हरिद्वार निद्रावश झालें असताना, घाट निर्मनुष्य आहे अशी खात्री करून घेऊन ते सदेह स्वर्गाला जात असावेत. आकाशगंगेत जी तारकांची इतकी दाटी दिसते ती त्यांच्याच चमकणाऱ्या देहांची असावी.

ज्या पाण्यात पर्वकाळीं बुडी मारण्यासाठीं लक्षावधि लोक जीवहि साडायला तयार होतात, शें सवाशें वर्षांपूर्वी चार पाचशें लोकानीं अशाच एका सुमुहूर्ती इथें जीव गमावून मोक्ष मिळवला म्हणतात, त्या पाण्यात अहर्निश राहण्याची संधि मिळवलेल्या त्या योगभ्रष्ट जीवाना मनातल्या मनात धन्यवाद देऊन मी उठलो आणि आजूबाजूला पाहूं लागलो. डावीकडे एका मंदिरावर "गंगाजी का प्राचीन मंदिर यह है." अशी सूचना होती. सहज माझी दृष्टि आणखी पुढें गेली तो तिथें एका मंदिरावर "गंगाजीका पुरातन मंदिर यही है." असें लिहिलें होतें. पुरातन आणि प्राचीन यातलें आधींचें कोणतें, आणि कुठें पूजा केली असताना अधिक पुण्य पदरात पडेल ह्याचा विचार करण्याच्या भरीस न पडता दोन्हीकडे जावें, असें आमच्याबरोबर वऱ्हाडातले एक मारवाडी शेठजी—पन्नालालजी चांडक—होते, त्यांनीं ठरवलें. आणि त्यांच्याबरोबर मीहि पुढें झालो. पण मला आठवण झाली दिल्लीची. तिथें फुवाऱ्याजवळ दोन दंदान्-साजांचीं दुकानें आहेत, एक खाली रस्त्यावर आणि दुसरें शेजारीच माडीवर. खालच्या दुकानावर लिहिलें होतें : "दांतो का सच्चा और बडा अस्पताल यहा है." हें 'हॉस्पिटल' म्हणजे एका हेअर कटिंग सलूनच्या क्षेत्रफळाची जागा होती. आणि शेजारचें दार सांगत होतें : "धोकेसे बचो. दांतों का असली और

पुराना अस्पताल यहां ऊपर है.”

मीं मनात म्हटलें, प्राचीन आणि पुरातन अशा दोन्ही मंदिरांपेक्षाहि प्राचीनतर अशी गंगा बाराहि महिने शेजारी प्रत्यक्ष वाहत असताना तिची आणखी मंदिरें कशाला? पण गंगापुत्रांनीं जर गंगेचीं मंदिरें बांधलीं नाहींत आणि गंगाभक्तांनीं जर गंगेला अर्पण करायचें द्रव्य प्रत्यक्ष तिच्याच ओटींत टाकलें तर गंगापुत्राचें पोट कसें चालायचें?

पण त्याचें पोट देवळांतल्या देणग्यावरच चालतें असें नाहीं. आपल्या यजमानांच्या शोधात ते लाक्सरपर्यंत सामोरे येतात आणि तिथपासून त्याच्या मागे लागतात. तुमचे पिता, पितामह, प्रपितामह कोणी तरी केव्हा तरी हरिद्वारला गेले असतील. त्याची नोंद कोणा तरी पंड्याच्या वहींत असेलच. त्याच्याचकडे जाऊन आपली वंश-संतति अखंड असल्याची साक्ष नोंदणें बरें नाहीं का? तुम्हाला काहीं कृत्य करायचें असेल, त्याची ते व्यवस्था करून देतात. काही करायचें नसेल, नुसतें हरिद्वार पाहायचें असेल, तरी तुमच्या ऐपतीप्रमाणें तुमच्याकडून दक्षिणा घेऊन ते तुमची राहण्या जेवण्याची आणि सर्व ठिकाणें दाखवण्याची सोय करून देतात. ह्याहून अधिक काय हवें?

चाडकशेटजींना पितृश्राद्ध करायचें होतें. तें कुशावर्त घाटावर करतात. घाट अहल्याबाई होळकरणीनें बांधला आहे. त्याच्या शेजारींच गावातल्या सांडपाण्याचा नाला आणून सोडला आहे. पण गावींचा तो ओहोळ ‘गंगेसी मिळता गंगाजळ’ झाला आहे. शिवाय तीर्थाचें महत्त्व फार प्राचीन आणि थोर आहे. ह्या ठिकाणीं एका पायावर उभे राहून श्रीदत्तात्रेय दहा हजार वर्षें तपश्चर्या करीत होता. तेवढ्यांत गंगा हिमालयातून बाहेर पडून पुढें आली आणि प्रवाहाच्या झपाट्यांत दत्तात्रेयाचा दण्ड-कमण्डलु-कुशासन बरोबर घेऊन चालली. परंतु दत्तात्रेयाच्या तपप्रभावामुळें तिला पुढें जाता येईना. दत्ताचें तें साहित्य घेऊन ती तिथेंच घिरट्या घालीत राहिली. दत्तानें आपलें साहित्य भोवऱ्यात सापडलेलें पाहिलें तेव्हां त्याला संताप आला. आणि तो गंगेला जाळून भस्म करायला निघाला. पण त्यामुळें भगीरथाची मोठी पंचाईत झाली. आपल्या साठ हजार पितरांच्या उद्धारासाठीं मोठ्या प्रयासानें त्यानें गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणलें होतें. ती डोक्यावर झेलण्यासाठीं शंकराचें मन वळवलें होतें. आणि आता ती जर इथेंच हरिद्वारीं ‘हरि की पैडी’पाशींच घिरट्या घालीत राहिली, किंवा

जळून भस्म झाली, तर कपिलमुनींच्या आश्रमात पडून राहिलेल्या त्याच्या पितरांचें काय व्हायचें? आणि दण्ड-कमण्डलु-कुशासन घेऊन गंगा पुढें निघून गेली असती तर दत्ताचीच नव्हे तर त्याच्या भक्ताचीहि गैरसोय झाली असती. दण्ड-कमण्डलुविरहित अशा आपल्या इष्ट दैवताचें त्यानीं ध्यान करून पहावें, ध्यानात मूर्ति ठसणारच नाही! शिवाय त्यात दत्ताचा तेजोभंग होता तो वेगळाच. शेवटीं नेहमीच्या प्रघाताला अनुसरून भगीरथानें ब्रह्मदेवाजवळ गाऱ्हाणें नेलें. ब्रह्मदेवानें दत्ताची करुणा भाकली. दत्ताचा कोप शांत झाला. त्यानें सर्व देवाना सांगितलें, "तुम्ही इथेंच निरंतर वास करा. ज्या अर्थी माझें कुशासन इथें आवर्तात फिरलें त्या अर्थी ह्या तीर्थाला कुशावर्त नाव द्या. आणि इथें जो कोणी पितराना पिंडदान करील त्याला पुन्हा जन्म-मरणाच्या फेऱ्यांत पडावें लागणार नाहीं असें करा." आणि त्याप्रमाणें करण्यात आलें आहे.

चाडकशेटजी आपल्या जन्ममरणाचा फेरा चुकविण्याची तरतूद करीत होते, आणि मी एकदा गंगाप्रवाहाकडे आणि एकदा त्या प्रशस्त घाटावर सारखी जा-ये करीत असलेल्या जनप्रवाहाकडे पहात होतो. किती विविध प्रकार होते त्याचे! अंगावर तलम कपडे, गळ्यात सोन्याचे कंठे, डोळ्यांत सुरमा आणि डोक्यावर कंगणीदार पगडी घातलेले रंगेल छेलछबेले त्यात होते, तसे अंगाला राख आणि लाज झाकायला लंगोटी यापलीकडे अंगावर काहीहि नसलेले सर्वसंगत्यागी होते. राजकन्येसारखी सुंदर, सतेज आणि रसरशीत अशी एखादी वैष्णवी बैरागीण त्यात दिसे, तर मनोव्यथेनें खचलेली आणि रक्तक्षयानें फिकुटलेली एखादी राजकन्या कष्टानें पावलें टाकीत जातांना आढळे. शाळिग्रामासारख्या काळ्या, गुलाबासारख्या आरक्त, चंदनासारख्या पिंगट, आणि हस्तिदंतासारख्या फिकट अशा सर्व वर्णाच्या स्त्रिया तिथें होत्या. सदरा आणि शलवार घालणारी पंजाबी स्त्री, पदरावरून कासोटा कसणारी महाराष्ट्रीय स्त्री, स्त्रीच्या अंतःकरणासारखें गुंतागुंतीचें नेसण नेसणारी द्राविड स्त्री, किल्ल्याचा जुडगा डाव्या खांद्यावर टाकणारी बंगाली स्त्री, चांदीसोन्याच्या खोट्या किल्ल्या कमरेला लटकवणारी गुजराती स्त्री, पोटाची थैली परकराच्या नेफ्यावरून पुढें सोडून देणारी मारवाडी स्त्री, आणि जिची कंबर पाहून लावणीकारांना लवचिक कंबरेसाठीं विशेषण सापडलें ती मुलतानी स्त्री, लुंगी गुंडाळणारा अय्यर, पोकळ कासोट्याचा बंगाली, उजव्या सोग्याचा महाराष्ट्रीय, डाव्या सोग्याचा गुजराती, आणि पायजमा घालणारा पंजाबी—सबंध देशाचे प्रतिनिधी तिथें होते. किती

विविध वर्ण, विविध प्रकार, विविध वेषभूषा, विविध भाषा! पण त्या सगळ्याना एका श्रद्धेनें हरिद्वाराला आणलें होतें. हिमालयापासून निघून भिन्न भिन्न भूप्रदेशांतून वहात जाणारी गंगा जशी एक, तशा काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि ढाक्यापासून कराचीपर्यंत भिन्न भिन्न जनसमाजातून वाहणाऱ्या एका संस्कृतिनिष्ठेनें त्याना इथें आणलें होतें. गंगेत बुडी मारल्यानें पुण्य लाभतें ह्या भावनेनें 'हर गंगे' म्हणत ते स्नानें करीत होते. स्त्रियाच्या ओल्या वस्त्रातून त्यांचीं अंगप्रत्यंगें दिसत होतीं. स्पष्ट दिसत होतीं, अस्पष्ट दिसत होतीं. त्याचा त्यांना संकोच नव्हता. त्या केवळ गंगास्नानाच्या धुंदींत बेभान होत्या. आणि त्याना संकोच नव्हता म्हणूनच कांही अधाशी डोळे त्याच्याकडे पहात होते. पाप पत्करूनहि पहात राहावें असें काहींचें रूपसौष्ठव असतें हें कोण नाकारील? पण तसा जो पाहील त्याचें पाप त्याच्या मनांत. स्नान करणारीला त्याचा दोष नाहीं. तिच्या पदरात गंगास्नानाचें पुण्यच पडतें.

अशा एखाद्या रूपलतेंत तुमची दृष्टि गुरफटली असेल तरी ती तिथून काढून इतरत्र न्या. गंगेच्या प्रवाहात यात्रेकरूंनीं फुलाचे द्रोण सोडले आहेत ते पाहा. पांढरीं, पिवळीं, लाल, गुलाबी अशा फुलानीं भरलेले लहान-मोठे द्रोण प्रवाहांतून तरंगत जाताहेत, त्यांनीं पात्राची शोभा प्रसन्न झाली आहे. पलीकडल्या तीरावर कांहीं मंदिरें आहेत. भोंवताली गंगेचें दगडाळ वाळवंट पसरलें आहे. आणखी पलीकडे वृक्षराजीची हिरवी वेषभूषा केलेल्या हिमनगाच्या छोट्या कन्यका आहेत. आणि त्याच्या पाठीशीं गडद निळें आकाश आहे. वरच्या टेकड्या चढत गेल्या आहेत. खालच्या बाजूला ह्युएन्त्संग जिला मो-यू-लो म्हणतो ती प्राचीन—कदाचित् हरिद्वारपेक्षाहि प्राचीन—मायापुरी आहे. तिच्यापुढें गंगेच्या कालव्याचा आरंभ आहे. आणि याच्याहि पुढें, तुम्हांला दिसत नसेल, पण कनखल आहे.

मुख्य घाटापुढें एक बेट आहे. त्यावर राजा बलदेवाम बिडलानें बांधलेलें घंटाघर आहे, आणि ब्रह्मकुण्डाच्या वरच्या बाजूला कॉंक्रीटचा बांधलेला एक हत्तीसारखा बेढब पूल आहे. प्राचीन रमणीय स्थानांच्या प्राचीनत्वाशीं आणि रमणीयत्वाशीं विसदृश असें बांधकाम उभारण्यांत आमचा हातखंडा आहे, त्याचीं हीं प्रत्यंतरें आहेत. त्या दिवशींचें स्नान कुठं तरी केलेंच पाहिजे म्हणून मीं बेटावर जाऊन पलीकडल्या प्रवाहात स्नान केलें आणि परतलों. स्नानाचा खरा आनंद मीं हृषीकेशसाठीं राखून ठेवला होता.

धर्मशाळेंत येतांना वाटेंत दिवशीं दोन आणे भाड्यानें लोखंडी शेगडी घेतली, स्वयंपाकासाठीं शिधा घेतला, आणि धर्मशाळेंत येऊन हातानेंच जेवण केलें. जेवण उरकून विश्रांति घेऊन कनखलकडे निघण्यासाठीं म्हणून तयार झालों, तों ओवरींत ठेवलेल्या वहाणांपैकीं एक नाहींशी झालेली. कुणी नेली, कुठें गेली पहातां, तों गच्चीच्या मुंडेरीवर बसलेल्या एका लाल तोंडाच्या हुप्प्याच्या हातांत वहाण. ती त्याच्याकडून परत मिळवायची कशी? मीं हातांत एक काठी घेऊन ती उगारून त्याला भिवविण्याचा प्रयत्न केला. पण त्यानें दांत विचकून माझीच चेष्टा केली. आणि बेदरकारपणें तो वहाण कुरतडण्याच्या उद्योगाला लागला. सीतामाईनें मोठ्या प्रेमानें दिलेल्या माळेंतल्या मण्यांत राम आहे कीं नाहीं हे पाहण्यासाठीं प्रत्येक मणी फोडून पाहणाऱ्या भोळ्या हनुमंताच्या ह्या वेरड वंशजालाहि आमच्या वहाणेंत 'राम' नाहीं हें आढळून आलें असतें, पण तोंपर्यंत आमच्या वहाणेच्या चिंध्या झाल्या असत्या. माळेंतले मणी फुटल्यामुळें सीतामाईचें नुकसान झालें नसेल, पण एक वहाण गमावल्यानें प्रवासात आमची मात्र गैरसोय झाली असती. त्याच्याकडे फेकून मारण्यासाठीं मी एखादा दगड शोधीत होतों. पण चुनेगच्ची गिलाव्याच्या त्या धर्मशाळेंत मला दगडहि सापडेना. तेवढ्यांत मला तिथल्या एकानें सांगितलें कीं, "दगड फेकून माराल तर तो तुमच्या अंगावर तुटून पडेल." त्यानें हल्ला केला असता कीं नसता कोण जाणे, पण मीं दगड मारल्यावर तो वहाणेसकट पलीकडे बिकानेरवाल्याच्या धर्मशाळेंत गेला असता, म्हणजे वहाणेपरी वहाण जाऊन पदरीं फजितीच राहिली असती. शेवटीं चाडकशेठजींनीं युक्ति काढली. ते म्हणाले, "आपण कांही तरी खाण्यासारखी वस्तु त्याच्याकडे फेकूं, म्हणजे कदाचित् तो वहाण परत देईल." आणि तसेंच झालें. आमची ही सगळी धादल मजेंत पहात बसलेल्या त्या हुप्प्याकडे आम्हीं एक पुरी फेकली. त्याबरोबर त्यानें वहाण खालीं टाकून पुरी झेलून घेतली. अशा रीतीनें अर्ध्या तासाच्या खोळंब्यानंतर आम्ही बाहेर पडलो—

आणि टांगा करून 'पश्चाद् गच्छेरनुकनखलं' ह्या यक्षानें मेघाला केलेल्या मार्गदर्शनानुसार निघालो. हरिद्वार, मायापुरी, गंगेच्या कालव्याचा पूल, मागें पडून कनखल जवळ येत चाललें म्हणजे मोठमोठ्या बागा, वाड्या, मंदिरें आणि उदासी, निर्वाणी, निरंजनी, सत्नामी, दसनामी इत्यादि वेगवेगळ्या पंथांच्या गोसाव्यांचे मठ दिसूं लागतात. त्यांतले कांहीं इतके जुने, उदास

आणि भयाण दिसतात कीं सर्वसंगपरित्याग केलेले गोसावीच तिथें राहूं शकतील असें वाटतें. राखेनें माखलेलीं शरीरें, पिंगट केसाच्या रूक्ष जटा, गुंजे-सारखे लाल डोळे अशा त्याच्या कर्कश आणि उग्र रूपाकडे पाहिल्यानंतर इतर कोणते रिपु त्यांनीं जिकले असतील ते असोत, पण क्रोध जिंकला नसावा असें खास वाटतें. निदान सन सतराशें साठ साली जेव्हां त्यांची आपसांत भांडणें होऊन त्यांनीं आपल्यातल्याच अठरा हजार लोकांना जबरदस्तीनें मोक्षाचा मार्ग दाखवला तोंपर्यंत तरी तो जिंकला नव्हता असें म्हणायला हरकत नाही.

कनखलला महत्त्व आहे तें तिथें दक्ष प्रजापतीनें यज्ञ केला होता त्यामुळें. आजहि तिथें दक्षमंदिर ह्या नावाचें एक ठिकाण आहे आणि तिथेंच सतीकुंड आहे. त्या ठिकाणीं सतीनें, आपल्या पित्यानें आणि बहिणींनीं केलेला आपला आणि आपल्या पतीचा अपमान न साहून, योगाग्नीनें स्वतःचा देहान्त करून घेतला. सध्याचें सतीकुंड खरें असो कीं नसो, पण त्या मानी आणि तेजस्वी कन्यकेच्या नांवाशीं तें निगडित झालें आहे. आणि तिची सगळी कथा तें डोळ्यापुढें उभी करतें. मंदिराच्या पलीकडे सतीघाट आहे. खालून गंगेचा स्रोत वाहतो आहे. आणि त्याच्या पलीकडे गंगेचें दगडागोट्यांनीं भरलेलें विशाल पात्र आहे. गंगेच्या कालव्यामुळें जर पाण्याचें प्रमाण कमी झालें नसतें, आणि सगळें पात्र भरून वाहतें, तर देखावा किती भव्य दिसला असता त्याची कल्पना सहज करता येते.

परत येताना वाटेंतच ज्वालापूरचा रस्ता लागतो. तिथें जावें न जावें असा विचार करतां करता जाऊं नये असें ठरलें. कारण रात्रीं हरिद्वारला गंगेच्या घाटावरल्या देवळांत आरत्या होतात त्या पहायच्या होत्या. टांगेवाला म्हणाला, "ज्वालापुरांत तसं कांहीं पाहाण्यासारखं नाही. हरिद्वारमध्यें मुसलमान वस्ती नाहीं. मद्य-मांसाचीं दुकानेंहि नाहींत. तीं ज्वालापूरला आहेत. हरिद्वारच्या बऱ्याचशा पंड्यांचीं घरेंहि ज्वालापूरलाच आहेत." ही माहिती त्यानें आम्हाला का सांगितली, आणि ही माहितीपूर्ण विधानें अशीं त्यानें एकमेकाशेजारीं कां मांडलीं, तें कांहीं माझ्या लक्षांत आलें नाहीं. हरिद्वारचें पावित्र्य विशेषपणें मनावर ठसवण्याचा त्याचा उद्देश असावा असेंच मी समजतो.

* * *

सकाळपेक्षां संध्याकाळीं घाटावर गर्दी जास्त होती. सकाळीं लोक स्नान-श्राद्धें इत्यादिकांत गुंतलेले होते. संध्याकाळीं, रिकामपणीं, शोभा पाहण्यासाठीं जमले

होते. कुठें रामायणाचा पाठ चालला होता, कुठं गीतेवर प्रवचन, कुठें कबीराचे दोहे, तर कुठं मीराबाईचीं भजनें. हरिद्वार हें हरद्वारहि आहे. बदरीनारायणाकडे जसे इथून यात्रेकरू जातात, तसेच शंकराचें स्थान जे केदारनाथ तिकडेहि इथूनच जातात. म्हणून शैव आणि वैष्णव दोघानाहि हें स्थान पूज्य आहे. इतकेंच नाहीं तर सिखहि इथें यात्रेला येतात. आणि येतांना आपली लढण्याची खुमखुमी घेऊन येतात असें दिसतें. कारण पूर्वी एकदा काही सिखांनीं एका भाडणात, गंगास्नानासाठीं आलेल्या पाचशें लोकाना गंगेच्या काठावर कंठस्नान घालून स्वर्गाला पाठवले असें सागतात. सर्व प्रकारचीं आणि पंथाचीं भजनें आणि प्रवचनें इथें संध्याकाळच्या वेळीं चाललेली असतात.

अंधार पडू लागला तशा आकाशात तारका चमकूं लागल्या. लांबचीं दृश्यें दिसेनाशीं झालीं. लक्ष्य घाटावरल्या, मदिरातल्या दिव्याकडे वेधलें. गंगेच्या पात्रांतल्या बेटावरून घाटाकडे आणि तिथल्या जनसंमर्दाकडे पाहण्यांत लक्ष्य गुंतलें असतांनाच घंटा वाजू लागल्या. आरतीला आरंभ झाला होता. वेड्यावाकड्या वाजणाऱ्या विविध आकाराच्या आणि नादाच्या घंटा, टाळया आणि झाजा, आरतीचे संमिश्र स्वर, ह्यानीं वातावरण दुमदुमलें, भारून गेलें. इतर सर्व गोष्टींचा विसर पडला. काहीं वेळानें गंगेत दिव्यांचे द्रोण वाहताना दिसूं लागले. सकाळीं जसें गंगेची पूजा करण्यासाठीं तिच्या प्रवाहात नाना रंगांच्या फुलाचे द्रोण सोडायचे, तसें रात्रीं तिची आरती म्हणून दिव्याचे द्रोण! रात्रीच्या धूसर प्रकाशात अस्पष्ट दिसणाऱ्या काळसर गंगाप्रवाहावरून तरगत जाणाऱ्या त्या सोनेरी दीपज्योती सकाळच्यापेक्षा किती वेगळ्या प्रकारची शोभा दाखवीत होत्या! आकाशगंगेतल्या प्रकाशपुंजाशीं त्या स्पर्धा करीत होत्या काय? पण गंगेनें आकाशगंगेशीं स्पर्धा काय म्हणून करावी? आपल्या उद्धारासाठीं, आपल्यापैकीं एकानें, स्वर्गातून बळेंच पृथ्वीवर आणलेल्या गंगेला आपल्या माहेराचा विरह तीव्र वाटूं नये, स्वर्गातलें तेजोवैभव इथें आपल्याला नाहीं अशी तिला खंत वाटूं नये, म्हणून आपण यथाशक्ति तिच्या अंगावर हें प्रकाशाचें लेणें चढवीत असतों. आम्हीहि आमच्या वांटणीचें दीपलेणें गंगेला अर्पण केलें. इतर दिव्यांत आमचेहि दिवे मिसळले, आणि वहात चालले. कांहीं अंतरापर्यंत त्यांचें वेगळेपण ओळखूं येत होते. जसजसें अंतर वाढत चालले तसतशी ओळख पुसटत चालली. आणि पुढें तर पार लोपली. असंख्य दिवे प्रवाहावर हेलकावत, मागे-पुढें होत, गिरक्या घेत चालले होते. कांहीं निघाल्यापासून

लवकरच गंगेच्या पोटांत गडप होत. कांहीं पुढें जाऊन कुठे तरी तीराला लागत. कांही मध्येंच विझत, तर बरेचसे, जातां जाता लांब गेले म्हणजे दिसेनासे होत. मनांत आलें, अखंड जीवनाच्या अथाग प्रवाहावर तरंगणाऱ्या व्यक्तीव्यक्तींच्या प्राणदीपांसारखे हे दीप नव्हेत काय? कांहीं प्रवाहयात्रेला आरंभ होताच लोप पावतात, कांहीं मध्येंच कुठे तरी नष्ट होतात, आणि कांहीं थोडे मात्र आपल्या नियत मार्गानें लांबवर जातांना दिसतात. कांहीं वेळ अगदीं जवळ यावें, एकमेकांना चिकटून सलगीनें प्रवाहाबरोबर जावें, आणि मग—आणि मग त्या तिथें दिसणाऱ्या दिव्याप्रमाणें एकमेकापासून वेगवेगळें जाऊं लागावें किंवा बिलगून जात असतानाच एक नळीं जावा !...

त्या रात्रीं निजतानासुद्धा तो दीपप्रवाह डोळ्यासमोर दिसत होता. आणि मन कधीं जड तर कधीं प्रसन्न होऊन भावनांवर हेलकावत होतें.

* * *

दुसऱ्या दिवशीं हृषीकेशला जाताना वाटेंत सत्यनारायणाचें मंदिर लागलें. त्याच्या चारी बाजूंनीं पाण्याचा पाट जोगत वाहताना पाहून गंमत वाटली. आमची बस चालली होती. आम्ही भोंवतालची वनश्री पाहण्यात गुंगलो होतो. इतक्यात डाव्या बाजूला कोपऱ्यांत लांब अंतरावर हिमाच्छादित पर्वत-शिखरासारखें कांहीं तरी दिसलें. ह्या ठिकाणाहून हिमाच्छादित शिखर दिसतें कीं नाही, कुणाला ठाऊक. पण आमच्यापुरते तरी आम्ही तें एखादें हिमाच्छदित शिखरच असावें असें ठरवलें आणि आनंद मानला.

हृषीकेशमध्यें प्रवेश करतांना आधीं बाजारपेठ लागते. आणि मग सराई-सारख्या दिसणाऱ्या अड्डयावर जाऊन गाडी उभी राहते. आम्ही उतरून काली कमलीवाल्याच्या मठात एका दारानें प्रवेश केला आणि तिथें सदावर्तात साधुसंतांना आणि इतर गरजूंना अन्न वांटलें जातें तें पाहून दुसऱ्या दारानें बाहेर पडलों. आम्हाला त्रिवेणी घाटावर स्नान करायचें होतें. वाटेंत दुकानें लागली, त्यांपैकीं एकात अफू-गांजा इत्यादि मिळण्याची सोय होती. मालक 'अफियूनके लैसनदार' असल्याचें दारावरच जाहीर करण्यांत आलें होतें. शिवाय त्याच दुकानांत 'गीता-प्रेसकी पुस्तकें' विकायला ठेवलीं होतीं. मार्क्सनें धर्माला अफू म्हणून त्याचें आलंकारिक वर्णन केलें खरें, पण उपमान आणि उपमेय आपल्या स्वतंत्र पृथग्रूपांत पण एकाच ठिकाणीं वागत असतील ह्याची त्या द्रष्टयाला कल्पनाहि नसेल.

स्नानाचा खरा आनंद हृषीकेशसाठीं राखून ठेवायचा असें जें मीं ठरवलें तें अगदीं योग्य होतें अशी माझी त्रिवेणी घाटावर आल्यावर खात्री झाली. इथेंहि घाट आहेत, पण हरिद्वारसारखे नाहींत. माणसाच्या हातानीं गंगेला इथे जखडून टाकलें नाहीं. इथेंहि यात्रेकरू येतात, पण हरिद्वारइतकी गर्दी करीत नाहींत. गंगेचा खळाळत वाहणारा धनुराकार प्रवाह, त्यापलीकडले डोंगराचे चढउतार आणि त्याना आच्छादणारी हिरवीगार झाडी, भर उन्हाळ्यातहि अंगावर हलकासा कांटा आणणारें गंगेचें स्वच्छ, शीतल, सुखकर, 'गंधर्वामरसिद्धकिन्नरवधूतुंग-स्तनास्फालित' जल पाहिल्यानंतर चित्त प्रसन्न, विकल्परहित होतें आणि नेहमीं इथेंच रहायला मिळावें यापरती दुसरी इच्छा मनात रहात नाहीं.

हृषीकेशपर्यंत आल्यावर लछमन झूल्याला गेल्यावाचून कसें राहायचें? म्हणून आम्ही स्नान उरकून, ओढून काढल्यासारखे पाण्याबाहेर आलों. काली कमलीवाल्याच्या मठात गंगोत्रीच्या गंगेनें भरलेले गडू मिळतात ते घ्यायचे होते. गडूची किंमत म्हणून कांहीं घेत नाहींत. पण संस्थेला धर्मादाय म्हणून आपण यथा-सामर्थ्य काहीं तरी द्यावें अशी अपेक्षा असते. मीं दोन रुपये दिले. एक गडू घेतला. नंतर आणखी एक मागून घेतला. चांडकशेटजींनीं धर्मादाय म्हणून पांच रुपये दिले होते, आणि गडू एकच घेतला होता. मला दोन रुपयात दोन गडू मिळाले आणि आपल्याला पांच रुपयात एकच ह्याची त्यांना फारच चुटपुट लागून राहिली. एकच गडू हवा आहे असें सांगितलेलें असल्यामुळें दुसरा कसा मागावा तें त्याना कळेना. त्यामुळें आम्ही लछमन झूल्याचा टांगा ठरवायला बाहेर पडलों तेव्हां त्याचें चित्त बरेंच अस्वस्थ होतें.

"यहांसे लछमन झूला कितना लंबा गिरता है जी?" असें शेठजींनीं नाग-पुरी हिंदींत एकाला विचारलें. राष्ट्रभाषा हिंदीवर पुढें जे प्रादेशिक संस्कार होणार आहेत त्याची ह्या वेळीं मला थोडीशी कल्पना आली.

आपल्या हिंदींत मराठी शिरलें आहे ह्याचें शेठजींना भान नव्हतें. टांगा ठरवताना त्यानीं जो विजय मिळविला त्यामुळें त्यांचें चित्त धुंद होतें. टांगेवाला जातां-येताचे पांच रुपये मागत होता. चांडकशेटजी चारावरून साडेचारांवर येऊन तिथेंच चिकटून बसले होते. अखेर त्यांनीं टांगेवाल्याला साडेचार रुपये कबूल करायला लावलें तेव्हां त्यांना खरें समाधान वाटलें.

भरत मंदिर, चंद्रभागेच्या पुलावरून पलीकडे गेल्यावर धन्वंतरी मंदिर,

आद्य शंकराचार्यांचें मंदिर, शत्रुघ्न मंदिर अशीं मागे टाकीत टाकीत आम्ही लक्ष्मण मंदिरापर्यंत पोचलो आणि तिथें टांगा सोडला. वाटेनें अनेक ठिकाणीं लहान लहान झोंपड्या, छोटीं-मोटीं दुकानें लागलीं. आणि सबंध वाटेनें माकडांची साथ आणि पीडाहि होती. त्याना काही दिल्याग्नेरीज तीं पिच्छा सोडीत नाहीत आणि दिलें तर मुळींच सोडीत नाहीत. लक्ष्मण मंदिराकडून ध्रुव मंदिराजवळ पोचलो. तिथें गेल्यावर वाटलें कीं, खरोखरच गंगेत स्नान करायचें तर ध्रुव मंदिराच्या घाटावरच उतरून करावें. हरिद्वारपेक्षा हृषीकेश रमणीय असेल तर हें स्थान हृषीकेशपेक्षाहि रमणीय आहे. पण त्याबरोबरच थोडेंसें भीतिप्रदहि आहे. गंगेचें पात्र काठापासून बरेंच खाली आहे. प्रवाह अत्यंत वेगाचा, पाण्याचा रंग दुधाळ हिरवा, जिथें पाहावें तिथें दाट झाडी आणि उंच पर्वत. त्यासमोर माणसाची क्षुद्रता इतकी तीव्रपणें जाणवतें कीं मन क्षणभर दबून जातें. वृद्ध-तरुण, सशक्त-अशक्त, स्त्री-पुरुष, असे अनेक लोक संसाराचे पाश तोडून, किंवा तुटल्यामुळें विरक्त होऊन, इथें येऊन आयुष्य घालवतात. कोणी धर्मात्मा त्याना आवश्यक तें अन्नवस्त्र देतो. कोणी त्याचीहि क्षिति बाळगीत नाहींत. आज जिथें कॉंक्रीटचा लछमन झूल्याचा पूल आहे तिथें पूर्वी गवताच्या दोरखंडाचा होता. आजहि पुलावरून पाहिलें तर खाली नजर ठरूं न देणारा गंगेचा भरधांव वेगाचा फेसाळ प्रवाह, दोन बाजूंना दोन प्रचंड कडे आणि वरतीं आकाश. आजदेखील तें दृश्य पाहताना ऊर थोडेंसें थरथरतें. मग ज्या वेळीं दोरखंडाच्या पुलावरून जावें लागत असे त्या वेळीं काय वाटत असेल! पण त्या वेळीं त्या पुलावरून जाण्यात जी खुमारी असेल ती आजच्या अतिसुरक्षित ओलांडण्यात नाही. पण त्याच्याहि पूर्वी तसाच दोरखंडाचा पूल बांधून त्यावर बसून लक्ष्मणानें इंद्रजिताच्या वधामुळें झालेल्या ब्रह्महत्येच्या पातकाच्या क्षालनासाठीं घोर तपश्चर्या केली होती. म्हणूनच त्याला लछमन झूला म्हणतात!

लछमन झूल्याच्या पलीकडे बदरी विशालजीचें मंदिर लागतें. इथून डावी-कडला रस्ता पुढल्या हिमालयाच्या यात्रेचा आहे. उजवीकडला गंगाप्रवाहाशीं समांतर असा स्वर्गाश्रमातून, फलाहारी बाबाच्या मंदिरावरून आत्मप्रकाशजींच्या आश्रमाकडे जातो. वाटेच्या दोन्ही अंगांना नंबर घातलेल्या लहान-मोठ्या कुटी आहेत. कांहींच्या भोंवतीं जंगल मागे सारून पुष्पवाटिका केलेली आहे. कांहीं

ठिकाणीं जंगलानें अंगण आक्रमून टाकलें आहे. सगळी वाट छायाशीतल, प्रसन्न आणि सुखकर आहे. वाटेंत मधूनमधून गुलाबाचीं झाडें लागतात. आपण नेहमीं राहतो ते जग आणि हें स्वर्गाश्रमाचें जग ह्यात किती अंतर आहे! ह्याच भागांत राहून काका कालेलकरानीं साधना केली. इथलेंच रोटी-भाजीचें अन्न त्यांना बाधलें. आणि जिथें सगळे निःसंग-निःस्वार्थ साधू-महात्मेच असतील असें आपल्याला वाटतें, तिथेंच त्याना अन्नछत्राच्या अन्नाचाहि व्यापार करणारे क्षुद्रात्मे आढळले. ह्या गोष्टींची वाट चालत असतांना आठवण झाली. आमचें हिंडणें होईतो सूर्य कलला होता. आम्हाला होडीनें गंगा ओलांडून शत्रुघ्नजीच्या मंदिराजवळ टांगा घेऊन हृषीकेशला परतून हरिद्वारला जायचें होतें.

होडी उतारूंनीं भरली. पण नावाड्याचा पत्ताच नव्हता. इकडे सूर्यास्त होऊन दिशा काळवंडण्याची वेळ झाली. त्या दरींतलें गंगेचें तें खोल पात्र अधिकच भीषण दिसूं लागलें. आमच्या चित्ताची चलबिचल झाली. अखेर नावाडी आला, नावेनें तीर सोडलें, नाव मध्य धारेवर आली आणि वाऱ्याला जोर चढला. लाटा उंचावूं लागल्या. नाव हेलकावूं लागली. मनात वाटलें, घटकेपूर्वी स्वर्गाश्रमात होतों. इथेंच नाव उलटून गंगामाईच्या पोटात गेलों तर सरळ स्वर्गातच जाऊं. पण नावाडी निश्चल होता. त्यानें अशीं अनेक वादळें पाहिली असतील. आम्ही गंगेचें तें पात्र जन्मातून एकदा पहात होतों. तो तें दिवसातून दहादां ओलांडीत असेल. अखेर आम्ही जेव्हां परतीराला पोंचलों तेव्हां आम्हांला धीर आला. आणि सुटकेच्या श्वासानें ऊर भरून घेऊन आम्ही परत एकदां गंगेच्या त्या खोल, विशाल, भीतिप्रद पात्राकडे, त्यातल्या खळाळणाऱ्या प्रवाहाकडे, पलीकडल्या स्वर्गाश्रमाकडे शेवटला, दृश्य मनांत सांठवणारा दृष्टिक्षेप केला. आणि टांग्यांत चढून पुन्हां पुन्हां मागें वळून पहाणारी दृष्टि कष्टानें खेचून घेऊन हृषीकेशला परतलो.

* * *

हृषीकेशहून काली कमलीवाल्याच्या मठातून गडूंत कोंडून आणलेली गंगोत्रीची गंगा आता आटून गेली आहे. पण माझ्या टेबलावर गंगेतून आणलेले दोन चपटे, लाबटगोल, गुळगुळीत दगड आहेत. त्यांकडे मी जेव्हां जेव्हां पाहतों तेव्हां तेव्हां मला हृषीकेशच्या त्रिवेणी घाटाची आठवण होते; त्यांच्यावरच्या प्रवाही पांढुरक्या रेघांत मला त्रिवेणी घाटाजवळचा गंगेचा फेसाळ धनुराकार प्रवाह दिसूं लागतो; त्यांतल्या 'शंखेन्दुकुन्दोज्ज्वल' जलाचा खळाळ माझ्या

कानांत घुमूं लागतो; त्यांतल्या माशांचीं हिरवीं-रुपेरी अंगे दृष्टीसमोर नाचूं लागतात; माझ्या खोलीच्या चार भिंतींचा विसर पडून मी मनानें त्या गंगातटाकीं जातों, आणि "त्वत्तीरे तरुकोटरान्तरगतो गङ्गे विहगो वरम्" असें मनाशींच म्हणूं लागतों.

फेब्रुवारी, १९५०

· २ ·

# पळसाचीं फुलें

एप्रिलच्या आरंभीचे दिवस होते. बैसाखीचा सण जवळ येत चालला होता. आम्ही हरिद्वारहून अमृतसरच्या वाटेनें लाहोरकडे चाललों होतों. गाडीच्या दोहों बाजूंना मैलच्या मैल, क्षितिजाच्या रेषेपर्यंत, गव्हाचीं दाट आणि ताठ उभीं असलेलीं हिरवीं-पिवळीं शेतें अफाट पसरलीं होतीं. मधूनच वाऱ्याची एखादी झुळुक आली म्हणजे ह्या सस्यसागरावर लहरी उठत. एखादा लांबच लांब पट्टा खालीं वाके, आणि परत उभा राही. नंतर त्याच्या पुढला आणि मग त्याच्याहि पुढला. आणि पुन्हां पहिल्यापासून हें तरंगताडव सुरू होई. मध्येंच गदासारखीं उभीं असलेलीं आंब्याचीं किंवा इतर झाडें, आणि रहाटाच्या विहिरी, ह्यामुळेंच त्या एकंदर दृश्याचा तोचतोपणा काय मोडत असेल तेवढाच. नाहीं तर सगळें सपाट, बिलियर्ड टेबलासारखें दिसत होतें. मधूनच शेतें संपून जंगल लागायचें. रानोमाळ पळस फुललेला होता. आपल्या हजारोहजार अग्निजिव्हांनीं जणुं तीं पळसाचीं झाडें आसमंताला बजावीत होतीं कीं, "बाबांनो, वसंत संपत आला. ते सुखोष्ण सूर्यकिरण, आणि सर्वांगाला पुलकित करणारे वसंत-वायु आता हळूंहळूं विसरा. गहूं-हरभऱ्याचीं ताटें आतां कापलीं जातील. पायांत जातां येतां खुपणारे खुंट आणि उघडीं-वाघडीं मातीचीं ढेकळें तेवढींच शेतांत राहतील. आतां लवकरच चडप्रताप ग्रीष्माचें अधिराज्य येईल. तापलेल्या सळयांप्रमाणें कानांत शिरणारी 'लू' चालूं लागेल. दशदिशा धुंद करून सूर्याला कळकलेल्या ताटलीसारखें निस्तेज करून सोडणारी 'आंधी' येईल. माती फुपाट्यासारखी तापेल, आणि हवेची भट्टी पेटेल. पाण्यासाठीं तोंड वासून पक्षी झाडांवरून गळतील. अनेक जीव होरपळून मृत्युमुखीं पडतील. म्हणून सावध, बाबांनो सावध!"

पण इकडले लोक अशाहि वेळीं उत्सव करतात. बैसाखीचा उत्सव त्यातलाच आहे. जणु तेहि सगळे लोक पलाशपुष्पाच्या ह्या संदेशाचा अनुवाद करूनच म्हणत होते: "होय, माहीत आहे आम्हाला ग्रीष्म आता आक्रमण करणार आहे तें. वसंतीच्या दिवशीं आम्ही सरसोंच्या फुलाच्यासारखे पिवळेधमक फेटे आणि दुपट्टे ल्यालों, आणि उल्हासमय, हसऱ्या, खेळकर निसर्गाशीं समरस झालों. आतां आम्ही या उत्सवप्रसंगीं ही विविधरंगी वस्त्रे परिधान करून खदिरांगाराशीं स्पर्धा करणाऱ्या सूर्यकिरणाना वंदन करीत आहों. पण उन्हाळा प्रखर झाला कीं, मागोमाग वर्षा येणारच हेंहि आम्हाला माहीत आहे. आणि जन्माष्टमीला आम्ही घननील वसनें लेवून मेघाच्छादित नभाच्या वर्णाचा अनुवाद करूं ही आम्हाला उमेद आहे. पलाशपुष्पानो, तुमचा संदेश आम्ही ऐकला, पण त्यानें आम्ही हताश होत नाहीं. आम्ही बैसाखीचा उत्सव करतों. नद्यावर जाऊन यथेच्छ शीतस्नान करतों. देवळात जाऊन देवाचा जयघोष करतों. मेळा भरवून आनंदाची देवाण-घेवाण करतों. आम्ही ग्रीष्माचें स्वागत करतों."

फुललेल्या पळसाचीं जंगलें आणि गव्हाचीं शेतें ह्यांचीं आलटूनपालटून येणारीं दृश्यें पाहत आम्हीं लाहोरच्या भव्य स्टेशनात प्रवेश केला.

* * *

सर्वसाधारणपणें पंजाबी आपल्यापेक्षा अंगापिंडानें मोठा खरा, पण त्याच्या पोषाखामुळें आणि विशेषतः फेट्यामुळें एक प्रकारचा दृष्टिभ्रम होतो, आणि त्याची उंची वीत-दीड वितीनें तरी आपल्या नजरेंत वाढते. कबूतराच्या उभारलेल्या शेपटासारखे दिसणारे त्याच्या फेट्याचे ते तुरे तर ती उंची आणखीहि थोडीशी वाढवून दाखवतात. सर सिकंदरहयात खां, सर खिज़रहयात खां, सर फिरोज़खां नूं ह्यांच्यासारख्यांचे फोटो पाहून तर आपला हा ग्रह आणखी दृढ होतो. पण हे पोषाखी पंजाबी सोडले आणि देहाती पंजाब्याकडे पाहिलें म्हणजे पोषाखापेक्षा त्यांच्या आरोग्याचीच आपल्यावर अधिक छाप पडते. पोषाखी पंजाब्यांपेक्षां ते किती वेगळे दिसतात! लुंगीसारखे गुंडाळलेले तहमद किंवा शलवार, एक लांब सदरा, आणि डोक्यावर फेटा घातलेला पुरुष; तसेंच शलवार, कुर्ता आणि दुपट्टा एवढ्याच साध्या पोषाखानें नटलेली त्याच्याबरोबर चाललेली त्याची गृहिणी! बांधा पुरा उंच आणि रुंद, नजर तिखट, किंचित् उठून दिसणाऱ्या गालावर आरोग्याची तांबडी छटा, दूध-तूप, भाजी-पाला, फळफळावळ यांवर पोसलेली कसदार अंगयष्टि, असा हा करडा, कणखर पंजाबी भूमिजन पाहून, पोषाखी

पंजाबी आणि देहाती पजाबी हे दोन वेगळ्या जातींचे लोक तर नाहींत ना, असें वाटूं लागतं. नाही तरी पादरपेशे आणि काळीवर राबणारे हे सगळीकडेच वेगवेगळ्या जातींचे वाटतात नाहीं का?

ह्या लोकाचें ओझरतें दर्शन स्टेशनाच्या आवारांतच होऊं लागतें. पण त्यांच्या बायका-मुलांचें, म्हाताऱ्या-कोताऱ्यांचें, अडाण्याचें आणि त्यांतल्या जाणत्यांचें, सगळ्यांचें सावकाश आणि मनसोक्त दर्शन घ्यायचें तर लाहोरच्या म्यूझियममध्यें गेलें पाहिजे. खेड्यापाड्यातून लाहोर पाहायला म्हणून आलेल्या ह्या लोकाचे जथ्थे स्तिमित दृष्टीनें एकेका काचेच्या कपाटापुढें उभे असतात. त्यांतला एखादा जाणता आपल्या समजुतीप्रमाणें त्याना माहिती देत असतो. कुणाचें त्याच्याकडे लक्ष्य असतं, कुणाचें नसतं. एखादें मूल आईच्या दुपट्ट्याचें टोक धरून मिनतवारीनें उभे असतें, एखादें तिचें लक्ष्य दुसरीकडे वेधीत असतें, तर तिसऱ्या एखाद्या अवखळ मुलाला आवरण्यासाठीं सगळें सोडून आईला त्याच्या मागे धावावें लागतं. अतिशय अकृत्रिम अवस्थेंत त्यांच्याकडे इथें पाहायला मिळेल. पण प्रदर्शन पहायला येणाऱ्यांकडे पाहण्यासाठीं मला म्यूझियममध्यें जायचें नव्हतं. मला म्यूझियमच पहायचें होतें.

गांधार पद्धतीच्या शिल्पापासून तो गुप्तकालीन शिल्पापर्यंतच्या तिथें क्रमानें मांडून ठेवलेल्या त्या मूर्ती किंवा त्यांची शकलें पाहणें हें खरोखर शिक्षणच आहे, असें ते पाहात असताना वाटूं लागतें. आणि आपल्याच भूतकालीन कला आणि संस्कृतिविशेष ह्यासंबधीं आपलें शिक्षण कसें अपुरें आहे ह्याची तीव्र जाणीव होते. गांधार शिल्पातला जोम आणि स्वाभाविकपणा, पुढल्या कालांतला रेखीव व्यवस्थितपणा, गुप्तकालातला नाजुकपणा, अलंकारप्रचुरता आणि ढंगदारपणा ह्यांच्या निदर्शक अशा त्या कृती पाहताना जवळजवळ एक सहस्र वर्षांच्या कालावकाशातून आपण प्रवास करतो. कधीं आपलें मन आश्चर्यानें थक्क होतें, कधीं आनंदानें उचंबळून येतें, तर कधीं विचारात मग्न आणि स्तब्ध होतें. एक एक वस्तु पाहात आपण पुढें जातो. एखादी मूर्ति पाहून, पुन्हा मागें वळून मागल्या शिल्पावर आणखी एकदा नजर टाकावी असें वाटतें, तरी वेळ नाहीं म्हणून केवळ अनिच्छेनें आपण पुढें सरकत राहतो. पण गौतम बुद्धाच्या त्या आसनस्थ मूर्तीजवळ आल्यावर मात्र पाऊल लवकर उचलत नाहीं. तपश्चर्येनें आणि दीर्घ उपोषणानें अस्थिचर्मावशेष झालेल्या त्या देहाची बरगडीन् बरगडी

मूर्तीत स्पष्ट दाखवली आहे. अंगाखांद्याचीं हाडें सारीं बाहेर आलीं आहेत, गाल खोल गेले आहेत आणि त्यांचीं हाडें वर आलीं आहेत. देह अत्यंत क्षीण झाला आहे, पण आसन स्थिर, 'सम-काय-शिरो-ग्रीव' आहे आणि मुद्रा शांत, प्रसन्न आहे. हें देहदंडन त्या सिद्धार्थानें कशासाटीं केलें, असा प्रश्न मनात येऊन त्याचें उदात्त चरित्र आपल्या डोळ्यासमोर उभें राहतें न राहतें तोंच मागून-पुढून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यामुळें आपण लोटले जातो आणि पलीकडेच दालनाच्या मध्यभागीं गौतम बुद्धाच्या चरित्रातले इतर प्रसंग चित्रित करणारें मूर्तिशिल्प आहे तें पाहूं लागतो. चला, बरें झालें. जे मनानें पाहण्याचा आपण प्रयत्न करीत होतो तें प्रत्यक्षच पाहायला मिळालें असें वाटून समाधान पावतो.

लाहोरचा म्यूझियम पाहण्याची जशी मला इच्छा होती तशीच जवळच बाहेरच्या बाजूला ठेवलेली 'झमझमा' तोफ पाहण्याचीहि होती. किपलिंगच्या 'किम्' कादंबरीचा बालनायक किम्बल ओहारा ह्याच तोफेवर स्वार होऊन आपल्या 'नेटिव्ह' सोबत्यांना साध्या शिपायांसारखें वागवीत असे. असाच एक दिवस तो आपल्या सोबत्यावर रुबाब करीत असताना बौद्धग्रंथान्तरीं निर्देशि लेल्या दिव्य जलस्रोताचा शोध काढण्यासाटीं हिंदुस्थानात आलेला एक भोटिया लामा तिथें आला. त्या विचित्र पोषाखाच्या अपरिचित मनुष्याकडे किमनें एकदां खालपासून वरपर्यंत कुतूहलानें न्याहाळून पाहिलें. आणि त्याच क्षणापासून तो त्याचा चेला बनला. किपलिंगचा बाप लॉकवुड किपलिंग म्यूझियमचा मुख्याधिकारी आणि स्कूल ऑफ आर्टस्चा मुख्याध्यापक होता. किपलिंगच्या आयुष्याचे बरेच दिवस लाहोरमध्यें गेले होते. 'सिव्हिल ॲंड मिलिटरी गॅझेट'मध्यें पत्रकार आणि बातमीदार म्हणून लाहोरमध्येंच त्यानें काम केलें होतें. किपलिंगचें राजकारण कांहीहि असो, भारतीय जीवनाच्या ज्या अंगाशीं त्याचा संबंध आला होता त्याचें चित्रण त्याच्या कथा-कादंबऱ्यातून फार मनोवेधक उतरलें आहे. म्हणूनच 'किम्' कादंबरीचें आरंभींचें प्रकरण वाचतानाच वाटलें होतें कीं, कधीं लाहोरला जाण्याची संधि मिळाली तर ती 'झमझमा' तोफ पाहावी. तोफ अर्थात् इतर तोफांसारखीच आहे. चांगली मोठी आहे. दीड-दोनशें वर्षांची जुनी आहे. अहमदशहा दुराणीनें ती ओतवली, नंतर ती सिखांच्या भंगियांवाली मिसलच्या हातीं गेली, आणि शेवटीं सिखाच्या हातून इंग्रजाच्या हातीं आली, असा तिचा इतिहास आहे. ह्यापेक्षां अधिक तींत कांही नाहीं.

पण तिच्याबद्दल एक प्रकारचें कुतूहल निर्माण झालें होतें. तें पुरें झाल्याचें समाधान मिळालें.

* * *

लाहोरला गेल्यावर जसें म्यूझियम पाहायचें तसें अनारकलीची कबर पाहायची हीहि इच्छा मनात होती. अकबराच्या जनान्यातली, राजपुत्र सलीमच्या प्रेमाला पात्र झालेली ही दासी. एकदा त्यानें राणीवशात प्रवेश केल्याबरोबर त्याच्या दर्शनानें तिच्या मुखावर स्मित झळकलें. तें शहनशाह जलालुद्दीन अकबराच्या नजरेस पडलें. एका दासीनें राजपुत्राला पाहून स्मित करावें! केवढा अतिप्रसंग! केवढी गुस्ताखी! आपल्या पायरीचें केवढें अमर्याद उल्लंघन! अकबर उदार असला तरी सोळाव्या शतकातला मोगल सम्राट् होता! चंगीझखान आणि तैमूरलंग ह्यांचें रक्त त्याच्या धमन्यात वहात होतें. फत्तेपूर सिक्रीच्या राजवाड्यांत जशा मुलींसाठी शाळा, रोग्यासाठी रुग्णालय, ह्यांच्या जागा आहेत, तशीच गुन्हेगारांना हत्तीच्या पायीं देण्याचीं साधनेंहि आहेत. त्यानें अनारकलीला जिवंत पुरण्याची शिक्षा फर्मावली फर्मावली म्हणजे ती अमलातहि आली.

स्वतः तख्तनशीन झाल्यावर बादशहा जहांगीरनें त्या ठिकाणीं सुंदर कबर बांधली. विशुद्ध आरसपानाची समाधिशिला तिथें बसवली. त्यावर अत्यंत सुंदर अक्षरांनीं परमेश्वराचीं शंभर नांवें कोरवलीं. 'मजनू सलीम-अकबर' अशी स्वतःच्या तिजवरच्या प्रीतीची प्रत्यभिज्ञा उठवली. आणि सर्वांवर कळस म्हणून एक कवितांहि कोरून ठेवली: "जर मला पुन्हा माझ्या प्रेयसीचें मुख पाहण्याला मिळेल तर मी कल्पांतापर्यंत परमेश्वराचा ऋणी राहीन."

किती करुण, किती हृदयस्पर्शी कथा आहे! अनारकलीची ही कबर पंजाब सेक्रेटरिएटच्या आवाराच्या एका कोपऱ्यात उभी आहे. लाहोर सिखांच्या हातीं गेल्यानंतर रणजितसिंहाच्या एका मुलाचा तिथें रहिवास होता. त्यानंतर एका ज्यू इटालियन सेनापतीनें तिथें आपला जनाना ठेवला होता. सिखांकडून लाहोर घेतल्यावर ब्रिटिशांनी कबरीचें चर्च बनवलें. आज ह्या इमारतीत पंजाब सरकारच्या ऐतिहासिक कागदपत्रांचें ऑफिस आहे. आणि अत्यंत विशुद्ध अशा आरसपानाची तिची समाधिशिला मध्यवर्ती स्थानावरून उचलून एका बाजूच्या कोपऱ्यांत ठेवण्यात आली आहे!

अनारकलीची कबर पाहून अनारकलीच्या बाजारांत जाताना वाटेंत टाऊन हॉल लागतो. त्याच्या छोट्या बागेच्या एका कोपऱ्यात लाला लाजपतरायांचा

एक ब्रॉझचा पुतळा आहे. तो बडोद्याचे मूर्तिकार श्री. कोल्हटकर यांच्या हातचा आहे हें पाहून माझ्या मनाचा मराठी कोपरा क्षणभर अभिमानानें थरारल्यावाचून राहिला नाही. शिखांपासून आपलें रक्षण करण्यासाठीं लाहोरच्या एका मुसल्मान सुभेदारानें मराठ्यांना साहाय्याला बोलावलें होतें. त्याच लाहोरमध्यें एका पुढाऱ्याचा पुतळा मराठा कलावंताच्या हातचा असावा ह्याची मला मोठी मौज वाटली.

* * *

वऱ्हाडातल्या मोठ्या शहरासंबंधी असें सांगतात, निदान सांगत असत कीं, कुठेंहि खडा टाका, तो एखाद्या वकिलावर पडल्यावाचून राहणार नाही. तसेंच लाहोरसंबंधीं म्हणता येईल कीं, लाहोर शहराच्या अरुंद बोळांत, अनारकलीच्या गजबजलेल्या बाजारांत किंवा माल रोडच्या ऐसपैस रस्त्यावर कुठेंहि नजर टाका, ती एखाद्या सुंदर मुखावर पडल्यावाचून राहणार नाहीं.

पण अनारकलींत काय किंवा मालवर काय पंजाबी सौंदर्य दिसतें तें सुरम्य सौंदर्य. धुक्यासारखे तलम दुपट्टे, सारंगीची नरम झगझगीत शल्वार, पातळ रेशमी कुर्ता, आणि जरांचे चढाव किंवा उंच टाचेचे सॅण्डल्स्, असे सजलेले लावण्याचे फवारे अनारकलींत आणि मालवर उडताना दिसतात. पण अप्रसाधित सौंदर्याचे मनोहर निर्झर पाहायचे असतील तर त्यासाठीं लाहोरच्या गल्ल्या-बोळांतच गेलें पाहिजे. लोहारी दरवाजा, मोची दरवाजा, भाटी दरवाजा, शाहआल्मी दरवाजा, कोणत्याहि दरवाज्यानें आंत शिरा आणि मोठे रस्ते सोडून अरुंद वाटांनीं चालूं लागा---बाकी इथले मोठे रस्तेहि अरुंदच आहेत म्हणा--- रस्त्यावर जाळीदार सज्जे डोकावून आले आहेत. रस्त्यांना अनंत वळणें आहेत. दुतर्फा नाना प्रकारचीं लहानमोठीं दुकानें आहेत. एखादी बल्वन्त कौर किंवा जसवन्ती आपला दुपट्टा फल्कावीत ह्या घरांतून निघून त्या घरांत जात आहे. तर एखादी दहाबारा वर्षांची चिमरड्यासारखी चमकणारी मुली मिठाईवाल्याच्या दुकानीं काहीं तरी विकत घेत आहे. आणि आपल्याच मस्तींत दंग असलेले पंजाब-पुंगव बेगुमानपणें रस्त्यातून शमले फडकावीत हिंडताहेत. लाहोर शहराचें अंतरंग इथें आहे. लाहोरचा लाहोरपणा ह्या बोळांत, ह्या सज्ज्यांच्या आंत आहे. तिथें लाहोरचें थरथरतें काळीज आहे. आरोग्यानें रसरसणारें, अनलंकृत, पण फांस टाकून सावज काबीज करावें तसें तुमच्या नजरेबरोबरच तुमचें अंतःकरण खेचून घेणारें लावण्य तिथें आहे. लाहोरचे ते रस्ते, ते सज्जे, ते बाजार, तिथले

तें स्पंदन करणारें जीवन पाहूनच पूर्वीचे देशांतरींचे प्रवासी म्हणत असत कीं, "इस्पाहान आणि शीराझ एक केलीं तरी तीं लाहोरच्या पासंगालाहि पुरणार नाहींत." आज सर्व शहरांची प्रवृत्ति तटाबाहेर पडण्याची आहे; तसें लाहोरहि पडत आहे. पण खरें लाहोर, जिथून अकबराच्या आणि जहांगीरच्या कारकीर्दीत अनेक वर्षें मोगल साम्राज्याचीं सूत्रे हलवलीं गेलीं तें लाहोर, आंतच पाहायला मिळतें!

* * *

लाहोरच्या किल्ल्यावर वास्तुदृष्ट्या आणि कलादृष्ट्या जितके अत्याचार झाले तितके इतरत्र क्वचितच झाले असतील. इथली मोती मसजिद सिखांच्या राजवटींत आणि त्यानंतर ब्रिटिश राजवटींतहि सुमारें अर्धशतक सरकारी ट्रेझरी म्हणून वापरली जात होती. १९०३ पर्यंत दीवाने-आमचा बराकीसारखा उपयोग केला जात होता. किल्ल्याचा कांहीं भाग आजहि इन्स्पेक्शन बंगला म्हणून वापरला जात आहे. किल्ल्याचा तुरुंग म्हणून उपयोग करण्याची परंपरा तर आजतागायत चालू आहे. १९४२ च्या आंदोलनांत जयप्रकाशजींना लाहोरच्याच किल्ल्यांत कैदेंत ठेवण्यांत आलें होतें. आणि ह्याच किल्ल्यांत त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांबद्दल प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळांत प्रश्न विचारण्यांत आले होते. पण ह्यापेक्षांहि, सिख राजवटींत जीं हिडीस बांधकामें करण्यांत आलीं, तिथल्या कांहीं दालनांत त्यांनीं आपल्याकडून जी मखलाशी केली तिच्यामुळें किल्ल्याच्या कलात्मक सौंदर्याला कलंक लागला आहे. सिखांना यत्किंचित्‌हि सौंदर्यदृष्टि होती असें दिसत नाहीं. ह्याचा पुरावा शीशमहल, खिलातखाना, वगैरे ठिकाणीं भरपूर आहे. पण त्यांच्या विध्वंसनाला आणि विद्रूपीकरणालाहि न जुमानतां किल्ल्यांतल्या मोगल कलावैभवाचे बरेच अवशेष आज विद्यमान आहेत. त्या सगळ्यांत नजरेंत भरणारा भाग म्हणजे किल्ल्याची, रंगीत कौलांच्या नक्षीकामानें आणि चित्रांनीं मढवलेली, जवळजवळ एक सबंध भिंत. मुसल्मानी धर्माच्या विधि-निषेधांना न जुमानतां त्यांत प्राण्यांचीं आणि माणसांचींहि चित्रे दाखवण्यांत आलीं आहेत. त्यांत शिकारीचे देखावे आहेत. हत्ती-घोडा, हत्ती-हत्ती, उंट-उंट यांच्या लढाया आणि टकरा आहेत. पोलोच्या खेळाचें दृश्य आहे. किल्ल्यांतच नव्हे तर लाहोरमध्यें इतरत्रहि रंगीत कौलांचीं विपुल, विविध आणि अति सुंदर कामें, वझीरखांची मसजीद, गुलाबी बाग, आणि जहांगीरचा मकबरा या ठिकाणीं आहेत. हिंदुस्थानांत इतरहि कांहीं

ठिकाणीं अशीं कामें आहेत; पण इतकीं एका ठिकाणीं क्वचित् दिसतील.

किल्ल्याच्या शेजारीच बादशाही मसजिद आहे. सबंध हिंदुस्थानात इतकी मोठी मसजिद दुसरी नाहीं म्हणतात. मसजिदीच्या जोत्याशीं पाकिस्तानच्या कल्पनेचे द्रष्टे कवि इक्बाल ह्यांची, आणि 'ब्रिटिश साम्राज्याचा खड्गहस्त' असें पंजाबचें अतीव राजनिष्ठ वर्णन करणारे सर सिकंदरहयात खां ह्याची अशा कबरी आहेत. मसजिदीच्या शेजारींच रणजितसिंहाची आणि अर्जुनसिंहाची अशा, सिखांच्या दृष्टीनें फार मोठ्या मानाच्या दोन समाधी आहेत. रणजितसिंहाच्या समाधीवर मध्यभागीं एक मोठें कमल, आणि त्याच्या भोंवतीं अकरा लहान लहान कमलें, आरसपानाचीं आहेत. त्यातलें मोठें रणजितसिंहासाठीं आणि इतर अकरापैकीं चार त्याच्या धर्मस्त्रियाचीं आणि सात रखेल्याचीं आहेत. किल्ल्याचें वास्तुवैभव पाहिल्यावर त्याच्यापुढें ह्या सिख-समाधी मुळींच नजरेंत भरत नाहीत.

रावीच्या पलीकडे शाहदऱ्यात जहांगीरची कबर आहे. मकबरा फार भव्य आणि सुंदर आहे. आणि तिथलें रंगीत कौलाचें रंगवैभव पाहून तर दृष्टि संतृप्त होते. शेजारच्या आवारांतल्या आसफखानच्या—नूरजहानच्या भावाच्या—मकबऱ्यांतलें रंगीत कौलाचें सुंदर काम इराणी नमुन्याचें आहे. हा मकबरा जहांगीरच्या मकबऱ्याच्या मानानें साहजिकच साधा आणि लहान आहे. पण त्याच्या पलीकडला नूरजहानचा मकबरा तर ह्या दोहोंच्याहि मानानें इतका सामान्य आहे कीं माहीतगाराखेरीज तिकडे कुणाचें लक्षहि जात नाहीं. मला स्वतःला आसफखानाच्या मकबऱ्याच्या आवारांत बसलेल्या एका इसमानें आसफखानाचा तोच मकबरा नूरजहानचा म्हणून सांगितलें. आणि मला त्याच्या माहितीच्या खरेपणाबद्दल संशय नसता तर मीहि तसेंच समजून परतलों असतों.

"मला एक शेर मद्य आणि अर्धा शेर मास रोज मिळालें म्हणजे पुरे. माझी पत्नी इतकी चतुर आणि राजकारणकुशल आहे कीं मला कठिण पेचासारखे वाटणारे प्रश्न ती सहज सोडवते." असें म्हणून जहांगीरनें जिच्या हातीं साम्राज्याचीं सगळीं सूत्रें दिली, जिच्या नांवाचीं नाणीं पाडली, आणि जी पडद्यामागें बसून खरोखरच राज्यशकट हाकीत होती, तिच्या उर्वरित मर्त्य अवशेषावर तिच्या मोठेपणाला शोभेसें कांहींहि स्मारक असूं नये याचें नवल वाटलें. पण नवल तरी कां वाटावें? जसें अकबराच्या राजवटीच्या

अखेरच्या दिवसांत गादीसाठीं बखेडे सुरू झाले, तसे जहांगीरच्या कारकीर्दीच्या शेवटींहि सुरू झाले होते. बादशाह दारूच्या आणि अफूच्या व्यसनापायीं इतका निर्बल झाला होता कीं त्याला एक तासभरहि मद्य घेतल्यावाचून राहवत नसे. नूरजहानची खटपट आपला जावई शाहजादा शहरियार तख्तनशीन व्हावा यासाठीं चालली होती, तर तिचाच भाऊ आसफखान आपला स्वतःचा जावई शाहजादा खुर्रम गादीवर यावा म्हणून झटत होता. आणि अखेर शाहजादा खुर्रमच शाहजहां झाला. त्याला नूरजहानविषयीं आदर किंवा आपलेपणा काय म्हणून वाटावा!

* * *

सबंध शहर ओलांडून अगदीं विरुद्ध दिशेला गावाबाहेर बादशाह शाहजहांची शालीमार बाग आहे. याच बादशाही क्रीडोद्यानात, अटकेवर मराठ्यांचा झेंडा रोवणाऱ्या राघो भरारीला मेजवानी देण्यात आली होती म्हणतात.

शालीमारच्या वाटेवरची गुलाबी बाग, आणि तिच्या प्रवेशद्वारावरची रंगीत कौलांची सुंदर कलाकुसर, त्याच्याच समोर रेल्वेच्या आवारात असलेली, शाहजहांच्या स्थापत्यविशारदाची—अलीमर्दानखाची—कबर, शिखांच्या प्रदीर्घ सत्याग्रहामुळें साऱ्या देशाला माहीत झालेली शहीदगंज सत्याग्रहाची जागा, लॉरेन्स गार्डन, पंजाब क्लब आणि मॅसॉनिक लॉज, सिमला हिल नावाची कृत्रिम टेकडी, तिथल्या बूगनव्हिलियाच्या वेलीवरून सुटलेले किरमिजी फुलांचे घबघबे, इतरत्र माझ्या कुठेंहि पाहण्यात न आलेलें खुलें नाट्यगृह, 'आम्हीं हिंदुस्थानचें राज्य तलवारीच्या बळावर जिंकलें आणि तें तलवारीच्या बळावरच टिकवूं,' असें हिंदी लोकांना दिमाखानें सांगणारा लॉरेन्सचा पुतळा, पंजाब पब्लिक लायब्ररी, बीबी पाकदामनचा मकबरा, नीला गुंबज, मौजे-दर्या, लाहोरपासून लंडन किती मैल आहे हें दाखवणारी जनरल पोस्ट ऑफिस जवळ लावलेली पाटी, तिथल्या एका चौरस्त्याला 'चेअरिंग क्रॉस' हें लंडनमधल्या एका स्थळाचें दिलेलें नाव, इत्यादि अनेक लहानमोठ्या स्थलांसंबंधीं लिहायला हवें होते, लिहायची इच्छाहि होती. पण वरचा मजकूर लिहिला आणि थोडासा विसावून विचार सावरण्यासाठीं म्हणून मी थांबलों. थांबून मागें पाहूं लागलों तों माझ्या मनाला एक धक्का बसला.

कोणत्या लाहोरसंबंधीं लिहिलें आहे हें मीं? पांच वर्षांपूर्वीच्या लाहोरसंबंधीं मीं हें लिहिलें आहे. आज तिथें तेंच लाहोर आहे काय? आज-घटकेला

तिथे पूर्वीच्या लाहोरपैकीं काय आणि किती शिल्लक राहिलें असेल? लाहोरच्या आजच्या वस्तींत दर शंभरलाच्च काय, पण दर हजारालाहि एक हिंदु किंवा सिख राहिला नाहीं असें म्हणतात. बडोद्याच्या कोल्हटकराच्या हातचा लाला लाजपतरायाचा तो पुतळा आज तिथें असेल का? 'सनातन धर्म', 'दयानंद ॲंग्लो-वेदिक' असें पूर्वपद धारण करून चालणाऱ्या शाळा, कॉलेजें, वाचनालयें आणि इतर संस्था यांची काय वाताहत झाली असेल? ग्रंथसाहेबाचा संग्रहकर्ता गुरु अर्जुनसिंह आणि सिखांचा सिंह महाराणा रणजितसिंह यांच्या समाधी आज मुस्लिम रखवाल्याच्या हातीं आहेत. त्यांची ते काय कदर करीत असतील? अनारकलीत, माल्वर किंवा शहराच्या आत दिसणाऱ्या अलंकृत आणि अनलंकृत स्त्री-सौंदर्याचें मी माझी लेखणी मोकाट सोडून वर्णन करीत होतो, त्यातलें किती सौंदर्य आता रस्त्यावर दिसत असेल? पाकिस्तानमध्यें शरियतला अनुसरून राज्य व्हायचें आहे. ज्या प्रांताची डेप्युटी डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन आपल्या मुखाचें दर्शन होऊ नये म्हणून तोंडावर बुरखाच्च नव्हे, तर हाताचेंहि दर्शन होऊं नये म्हणून हातमोजे घालून ऑफिसात काम करते. जिथल्या 'बडखोर' स्त्रिया सरकारविरोधी निदर्शनें करायला जातानाहि बुरख्यानें सर्वांग झाकून रस्त्यानें 'मिरवीत' जातात, तिथल्या किती स्त्रिया उघड्या माथ्यानें रस्त्यावर वावरत असतील!

उत्सवप्रिय पंजाबी आतां रावीवर बैसाखीच्या स्नानाला तर जातच्च नसतील. आणि त्याच वेळी रावीच्या पैलतीरावर बसून पैलतीरावर स्नान करणाऱ्या ओलेत्या स्त्रियांकडे पाहण्याची धृष्टताहि आता कोणी उच्छृंखल तरुण करीत नसतील. कारण बैसाखीचें स्नान करण्याला आता हिंदु किंवा सिख तिथें राहिलाच्च नसेल.

पण अजूनहि पंजाबच्या जंगलात पळस फुलत असतीलच्च. वसंतानंतर ग्रीष्म, ग्रीष्मानंतर वर्षा असें ऋतुचक्र आजहि तिथें फिरतच्च असेल. अग्निशिखांशीं स्पर्धा करणारीं पलाश-पुष्पें जशीं कालान्तरानें गळून जातात, तशीच रक्त-बिंदूंच्या पलाश-पुष्पांची स्मृति कालान्तरानें कदाचित् गळून जाईल. आणि ग्रीष्मासारखी वृत्तीची तापदायक उग्रताहि नाहींशी होऊन स्नेहाची वर्षा परत येईल. वर्षा येईल ह्या आशेवरच्च मनुष्य चंडप्रताप ग्रीष्माची उग्रता साहत असतो.

ऑक्टोबर, १९४९

## • ३ •

# 'उर्दू बोलो'

" उर्दू बोलो, उर्दू एशियाकी सबसे बड़ी ज़बान है." असें 'अदबी दुनिया' ह्या उर्दू मासिकाच्या बरेच दिवसापासून माझ्याजवळ असलेल्या एका जुन्या अंकाचीं दोन पानें मला ओरडून सांगताहेत. आणि त्याबरोबरच लाहोरच्या मुक्कामातल्या एका दिवसाची आठवण करून देताहेत.

लाहोरला गेलों तेव्हा तिथं अमक्यातमक्याला भेटायचं असं कांहींच ठरलेलें नव्हतें. कारण तिथं माझ्या तशा ओळखीच नव्हत्या. पण लाहोरच्या छोट्याशाच मुक्कामांत एक दिवस असा आला कीं, कुठं काहीं पाहायला जाण्याइतका वेळ नव्हता, पण कुठं तरी इकडेतिकडे भटकून येण्याइतका अवधि होता. म्हणून मी डीगासिंग ब्लॉक्समधून बाहेर पडून निसबत रोडवर आलों आणि कुठें जावें ह्याचा विचार करीत थोडा वेळ इकडेतिकडे घुटमळलों. तेवढ्यात मला 'अदबी दुनिया'ची आठवण झाली. लाहोरात साहित्याला वाहिलेली अशीं पांचसहा मासिकें प्रसिद्ध होत असत. त्यापैकीं 'अदबी दुनिया' अधूनमधून माझ्या वाचण्यात येत असे. मनांत म्हटलें, "आलोंच आहों लाहोरला, तर जमल्यास संपादकांना भेटावें." म्हणून तिकडे जायचा विचार केला.

पण 'अदबी दुनिया'चा पत्ता मला माहीत नव्हता. कुणाला विचारावें मला कळेना. अनिश्चित मनानें डावी-उजवीकडे पाहूं लागलों, तो समोर 'दयानंद ॲंग्लो-वैदिक लायब्ररी'ची पाटी दिसली. मासिकाचा पत्ता काढायला लायब्ररी-पेक्षां अधिक योग्य ठिकाण कोणतें? मी आत शिरलों आणि एका कारकुनाला विचारलें, " 'अदबी दुनिया'ची कचेरी कुठं आहे?"

त्यानें दुसऱ्या एका कारकुनाकडे पाहिलें. तेव्हां त्या दुसऱ्या कारकुनानें एका शिपायाकडे पाहिले. आणि तो शिपाई पहिल्या कारकुनाकडे पाहूं लागला.

त्यांचा तो टक्क्याचा खेळ पाहून मी तिथून निघालो. लायब्ररीच्या टेबलापाशीं गेलों. पण तिथेंहि मला 'अदबी दुनिया'चा अंक कुठें दिसेना. 'दयानंद अँग्लो-वैदिक' या नावाला पंजाबांत एक विशेष महत्त्व आहे. ज्ञान, प्रगति-परता, सुसंस्कृतता ह्यांचें तें प्रतीक आणि स्फूर्तिकारक मानलें जातें. तें नाव धारण करणाऱ्या ठिकाणीं मला हवी ती माहिती न मिळाल्यामुळें माझा हिरमोड झाला. थोडासा रागावल्यासारखाच होऊन मी तिथून बाहेर पडलो आणि चालूं लागलों.

जवळच्च एका बाजूला एक पुस्तकाचें दुकान होतें. 'हिदायतनामा खाविंद', 'हिदायतनामा बीवी', 'विवाहित आनंद', 'खुराक और सीहत' अशीं हिंदी, उर्दू, गुरुमुखी पुस्तकें, 'प्रीतलडी' सारखीं मासिकें तिथें होतीं. पण 'अदबी दुनिया' नव्हतें. मी तिथून पुढें निघालों. 'अदबी दुनिया'चा शोध काढायचा विचार मीं मनातून काढून टाकला. तेवढ्यात समोरून एक सुशिक्षित दिसणारे सरदारजी दृष्टीस पडले. माझा दाबलेला बेत पुन्हां उमळला. आणि मी त्यांना 'अदबी दुनिया'चा पत्ता विचारला. सरदारजी सुशिक्षित होते. एका कॉलेजांत प्रोफेसर होते. पण लाहोरचे राहणारे नव्हते. त्यांना 'अदबी दुनिया'चा पत्ता ठाऊक नव्हता. त्यांनीं मला पुन्हा 'दयानन्द अँग्लो-वैदिक लायब्ररी'चा हवाला दिला. तिथला माझा अनुभव मीं त्याना सांगितल्यावर ते म्हणाले,

"तुम्ही असेच पुढें 'डेली परताप'च्या ऑफिसात जा. तिथें कोणी तरी सांगतील."

त्याच्याशीं बोलतां बोलतां सहज कॉलेजासंबंधी गोष्ट निघाली. तेव्हा ते म्हणाले, "लाहोरांत चौदा कॉलेजें आहेत. तुमच्या मुंबईत किती आहेत?"

त्या वेळीं मुंबईत सात आठ कॉलेजेच होतीं. मीं त्याना तसें सांगितलें.

मुंबईत इतकीं थोडीं कॉलेजे असल्याचें ऐकून त्याना मुंबईसंबंधीं तुच्छता वाटली असावी, असें त्यांच्या चेहऱ्यावर दिसलें. मुंबईचा प्रतिनिधि म्हणून मीच त्यांच्यासमोर असल्यामुळें, "बस्स? सहा-सात लाख वस्तीच्या लाहोरला चौदा कॉलेजें, पंधरा लाख वस्तीच्या मुंबईला सात-आठच!" असें बोलून त्यांनीं ती तुच्छता माझ्यासमोर व्यक्त केली.

आपला मोठेपणा आणि दुसऱ्याबद्दलची तुच्छता दाखवण्यात पंजाब्याला यत्किंचितहि दिक्कत वाटत नाहीं, असा मला पूर्वीहि अनुभव आला होता. तसें पाहिलें तर प्रत्येक प्रांतातल्या माणसाला इतर प्रांतीयांबद्दल तुच्छता वाटते. पण ती दाखवण्याच्याहि परी आहेत. उदाहरणार्थ, दिल्लीवाला इतरांबद्दल तुच्छता दाखवताना तीवर दरबारी डौलाचें असें मुत्सद्दी आवरण घालतो कीं, प्रहार निघून गेल्यानंतरच काय आलें तें आपल्या लक्षात येतें.

सरदारजींचा निरोप घेतला आणि मी पुढें निघालो. 'अदबी दुनिया'चा शोध आता काढल्याच पाहिजे असें माझ्या मनानें घेतलें. कपड्यात ढेकूण एकदा सुळसुळ् लागला म्हणजे तो पकडल्यावाचून जसें चैन पडत नाहीं, तसें 'अदबी दुनिया'च्या बाबतींत आता झालें होतें. 'वीर प्रताप'च्या ऑफिसाकडे जाण्यासाठी टांगा केला. टांगेवाला मुसलमान होता. मीं बोलता बोलता त्याला सहज म्हटलें,

"लाहोरमध्यें लीगचा बराच जोर असेल."

तो म्हणाला, "जी, हां. लेकिन मैं लीगी नहीं हूं. मैं अहरारी हूं."

मीं म्हटलें, "पण अहरार पार्टीत फार लोक नाहीत ना?"

त्याला थोडा आवेश चढल्यासारखें झालें. तो म्हणाला, "बाबूजी, खेडेगावांत हिंदु मुसलमानात वैमनस्य नाही. तिथें आम्हाला रोज एकमेकांशीं काम पडतं. भांडून कसं चालेल? ही सगळी शहरातल्या सफेदपोश नोकरीवाल्याची करतूत आहे."

मला आठवलें, लाहोरकडे येताना गाडींत फार गर्दी होती, तेव्हा एका वयस्कर मुसलमानानें आपण होऊन बाजूला सरून आम्हाला जागा दिली होती. तोहि म्हणाला होता कीं, खेड्यापाड्यात हिंदु मुसलमानात अदावत नाही. मी गप्प होतो. टांगेवाल्यानें मला विचारलें,

"बाबूजी, आप कहासे आये?"

"बम्बईसे."

"हम कभी बम्बई आएंगे तो आपसे मिलेंगे."

"ज़रूर मिलना." मीं म्हटलें.

आमचें बोलणें संपलें. माझ्या मनाला एक प्रश्न बोचत होता, तो पुन्हा बोचूं लागला. खरेच, लाहोरांत इतकीं कॉलेजें का? आणि तरी हे पोषाखी लोक

इतके आडमुठे का? आणि मध्येंच एकदम साक्षात्कार झाल्यासारखें मला उत्तर सापडलें.

लाहोरात जशीं कॉलेजें खूप तशीं पंजाबात जिल्हानिहाय हायस्कुलेंहि खूप होतीं. जिल्ह्याच्या ठिकाणी एक सरकारी हायस्कूल आणि काहीं ठिकाणी त्याशिवाय एखादें मिशनचें हायस्कूल असायचेंच. प्रगतिशील, स्वतंत्र बाण्याच्या, राष्ट्रीय वृत्तीच्या, आर्यसमाजी लोकांचें एखादें D. A. V. म्हणजे 'दयानंद अँग्लो वैदिक' हायस्कूलहि मग स्थापन व्हायलाच हवें. त्याचा सुधारकीपणा, सबगोलंकारी वृत्ति, आणि जातपात तोडण्याचें धोरण सर्वस्वी नापसंत असलेल्या सनातनी हिंदूंना त्यानंतर एक 'सनातनधर्म' हायस्कूल काढणें साहजिक भाग पडतें. आणि हिंदूंची ही आगळिक मुसलमानांना सहन होणें शक्य नसल्यामुळें त्यांना स्वतःसाठीं एक 'मुस्लिम' हायस्कूल लागतें. हिंदूमध्यें ओढलें जाणें सिखांना पसंत नसल्यामुळें त्यांच्यासाठीं स्वतंत्र 'खालसा' हायस्कूल हवेंच आणि उत्तर हिंदुस्थानांत पडद्याची चाल अद्याप रूढ असल्यामुळें मुलींसाठीं वेगळें 'जनाना' हायस्कूल आलेंच. म्हणजे कोणत्याहि मोठ्या गांवीं किमान सातआठ हायस्कुलें आलीच. तेव्हां लाहोरसारख्या ठिकाणी आर्टस्, सायन्स, मेडिकल, लॉ, कॉमर्स इत्यादि करून चोवीस कॉलेजें असलीं तर नवल काय? पुन्हा आर्य समाजांतहि 'घास' पार्टी आणि 'मास' पार्टी ह्यांचीं वेगळीं कॉलेजें असतात कीं काय कोण जाणे. एकूण शिक्षण, जातींच्या आणि मतांच्या गटांनीं देणाऱ्या ह्या संस्थांत शिकून बाहेर पडलेले लोक कोते आणि आडमुठे न झाले तरच नवल!

लाहोरला इतकीं कॉलेजें का ह्याचें उत्तर मला मिळतें तों मी 'डेली प्रताप'-च्या आफिसाशी येऊन पोंचलो होतों.

बाहेरच्या माणसानें मला संपादकीय विभागांत पाठविलें. तिथें कुणी तरी मला खान काबुली ह्या नावाच्या एका गृहस्थाकडे जायला सांगितलें. ते त्या वेळीं 'लेखन' विभागांत प्रुफ तपाशीत बसले होते. वीस-पंचवीस 'कातिब' एका विशेष प्रकारच्या पिवळट कागदावर एका विशेष प्रकारच्या शाईनें छापायचा मजकूर लिहीत होते—कारण 'प्रताप' पत्र उर्दू होतें आणि उर्दू पत्र कितीहि लहान-मोठें असलें तरी हातानें लिहून शिळेवर छापावें लागतें. तिथेंच खान काबुलीहि होते. दाढी थोडीशी वाढलेली, अंगांत जुनीशी काळी शेरवानी, मळकासा ढिला पायजमा, आणि सौम्य मुद्रा अशा त्यांच्यासमोर मी अनोळखी

गृहस्थ जाऊन उभा राहिलों.

मी कोण? खान काबुली कोण? मीं त्याचें नांवहि ऐकलें नव्हतें. मी मुंबईहून दिल्लीला आणि दिल्लीहून लाहोरला गेलेला एक प्रवासी होतों. तिथें 'अदबी दुनिया'च्या संपादकाना भेटायचें माझ्या मनात उगीचच येतें काय, एक-दोनदां निराश होऊनसुद्धां हट्टाला पेटल्यासारखा मी त्याच्या नादीं लागतो काय, आणि एका मोठ्या दैनिकाच्या लेखन-विभागांत जाऊन एका अनोळखी माणसासमोर उभा राहतों काय--सगळेंच मला मोठें विचित्र वाटत होतें. पण आतां मागें फिरणें अधिक विचित्र झालें असतें.

मी शेजारीं उभा राहिलेला पाहून खान काबुलीनीं नजर वर केली. मीं म्हटलें,

"माझी आपली ओळख नाहीं. पण मला 'अदबी दुनिया'चा पत्ता पाहिजे आहे. आणि तो आपण देऊ शकाल असं कळलं म्हणून मी इथें आलों."

"चला, मीच तुमच्याबरोबर येतो." ते म्हणाले.

मीं म्हटलें, "त्याची आवश्यकता नाही. आपण पत्ता आणि काहीं खाणाखुणा द्या, म्हणजे मी जाईन. माझ्यामुळें आपल्या कामांत व्यत्यय नको."

"तुम्हाला लाहोरची माहिती आहे काय?" त्यानीं विचारलें.

मी म्हटलें, "नाही, मी कालच इथें आलों. मी मुंबईचा राहणारा आहें."

"मग तर मी येतोच तुमच्याबरोबर. घाई नाही ना? एवढं पान पाहून येतो."

काम झाल्याबरोबर उठून उभे राहात ते म्हणाले, "चला,--पण थाबा. मी तुम्हांला आधी आमचा प्रेस आणि ऑफिस दाखवतों. मुंबईत तुम्हाला उर्दू प्रेस पाहण्याचा सहसा प्रसंग येत नसेल."

त्यानीं मग मला 'डेली प्रताप'चा सगळा छापखाना दाखवला. लेखक मजकूर कसा लिहितात, प्रूफ करेक्शन कसं करतात, मजकूर छापला कसा जातो तें सगळीकडे फिरवून समजावून सागितलें. मग आम्ही निघालों.

वाटेनें जाताना मला कळलें कीं, खान काबुली पूर्वी कम्युनिस्ट पक्षांत होते. पण आता राष्ट्रीय मुस्लिम म्हणवीत असत. आणि कॉंग्रेसमध्यें जरी नाही तरी कॉंग्रेसला मिळून होते. ते म्हणाले, "बऱ्याच मुस्लिमांना लीगचें धोरण पसंत नाहीं. पण त्यांना लीगच्या विरुद्ध जाण्याची हिंमत होत नाहीं."

आम्ही मालवर आलों. 'अदबी दुनिया'चें ऑफिस जवळ येत चाललें होतें. तिथेंच खान काबुलीना एक गृहस्थ भेटले. अंगांत लांब सदरा होता, धोतर नेसले होते आणि सोग्यांत कांहीं तरी घेतलेलें होतें. ते जवळ आले तसें खान

काबुलींचें आणि त्यांचें पंजाबींत कांहीं तरी बोलणें झालें. आणि मग त्यांनीं आपल्या धोतराच्या सोग्यातून उंसाचे करवे काढून आम्हाला दिले. ते गेल्या-वर खान काबुली मला म्हणाले,

"हेहि एक जर्नलिस्ट आहेत. 'सी. ॲण्ड एम्.' मध्यें असतात." त्याचा अवतार आणि त्याचा पेशा ह्यातल्या विसगतीचें मला नवल वाटलें. मुंबईत 'टाइम्स' मध्यें काम करणारा कोणी पत्रकार धोतराच्या सोग्यात उंसाचे करवे घेऊन भर दुपारीं हॉर्नबी रोडवरून ग्वात आणि मित्रांना देत जाईल काय? असें मी स्वतःला विचारीत खान काबुलींना म्हणालों,

"दिल्लीला असताना मीं ऐकलं होतं कीं, दिल्ली-लखनौला स्वतःच्या उर्दूच्या कर्तबगारीबद्दल काहींहि वाटत असलं, तरी उर्दू साहित्याचं केंद्र आता निश्चित-पणं लाहोरकडे सरकत चाललं आहे. मला वाटल होत कीं, लाहोरच्या स्टेशनात उतरल्याबरोबर दिल्ली आग्र्यासारखच उर्दू बोललेलं ऐकू येईल जिकडेतिकडे. पण मी आल्यापासून पाहतोय्, सगळे पंजाबीच बोलताहेत. मुसलमानसुद्धा."

खान काबुली म्हणाले, "तुम्हीं ऐकलंत तें थोडंस खरं आहे. हल्लीच्या उर्दू लेखकापैकीं बरेचसे पंजाबचे आहेत. पण ह्याचा अर्थ सबंध पंजाबभर दिल्ली-आग्र्यासारखी सर्वांची भाषा उर्दू आहे असं नाहीं. उर्दू ही पंजाबच्या सुशिक्षिताची विचाराची, विचारविनिमयाची आणि वाङ्मयाची भाषा आहे. पण सर्वसामान्य जनतेची व्यवहाराची भाषा, लाहोरातसुद्धा, पंजाबीच आहे."

मीं त्याना म्हटलें, "मग 'अदबी दुनिया' चा 'उर्दू बोलो, उर्दू एशियाकी सबसे बड़ी ज़बान है—' हा प्रचार मुख्यतः पंजाबसाठींच आहे काय? कीं त्यात दुसरा काहीं राजकीय हेतु आहे?"

त्यांचें उत्तर येण्यापूर्वीच 'अदबी दुनिया' चें ऑफिस आलें. पण एव्हाना उशीर इतका झाला होता कीं, संपादकमहाशय घरीं निघून गेले होते.

"ते संध्याकाळीं भेटतील. आपण येणार असलांत तर मी त्याना सांगून ठेवीन." त्याचा कारकून म्हणाला.

आधींच मला मी उगीच आटापीटा करतों आहें असें वाटूं लागलें होतें. त्यांत पुन्हा तो सगळा वायां गेल्याचें पाहून मी माझ्यावरच इतका चिडलों होतों कीं, "माझं विशेष कांहीं काम नव्हतं. आणि मी पुन्हा येणार नाहीं." असें, सौजन्य सांभाळून त्याला सांगताना माझी अगदी त्रेधा उडाली.

खान काबुलींनाहि माझ्यासाठी उगीचच पायपीट घडली होती. त्याचें मला फारच वाईट वाटलें. मीं त्याचे कसे तरी आभार मानले आणि निरोप घेऊन बिन्हाडाला परतलों.

* * *

'अदबी दुनिया'चे संपादक इतका त्रास घेऊनहि त्या दिवशीं मला भेटले नाहीत, ह्याचें मला त्या वेळी वाईट वाटलें असेल. आज तें शल्य मनांत राहिलें नाहीं. आज मला थोडीशी बोचणारी आठवण राहिली आहे, ती माझ्यासाठीं –एका सर्वस्वी अपरिचित माणसासाठी–मुद्दाम त्रास घेणाऱ्या खान काबुलीची. ते आज कुठें असतील? ते अजून राष्ट्रीय मुस्लिम असतील काय, कीं लीगला मिळाले असतील? आज मला आठवण होते ती त्या टांगेवाल्याची. ज्या गुजरावाला गावचा तो होता तें आता पाकिस्तानात गेलें आहे. तो हिंदु असता तर कदाचित मुंबईला आला असता. पण तो मुसलमान होता. तो कदाचित् अजूनहि लाहोरात टांगा हांकीत असेल. तो अजून अहरार पार्टीत असेल काय? पण पंजाबात आता अहरार पार्टी तरी असेल काय? ज्या खेड्यापाड्यात हिंदु-मुसलमानात मुळीच अदावत नव्हती त्या खेड्यापाड्यात हिंदूला आज जगणें अशक्य आहे.

'अदबी दुनिया'ची आता मला आठवण झालीच तर ती 'उर्दू बोलो'च्या हाकेमुळें होते.

हिंदुस्तानाची राष्ट्रभाषा आणि तिची लिपि आता ठरून गेली आहे. त्यामुळें हिंदुस्तानातल्या उर्दूची व्याप्तीहि ठरल्यासारखी झाली आहे. पश्चिम पाकिस्तान कदाचित ही उर्दूची गोळी गिळील. पण पूर्व पाकिस्तानाच्या घशात ती कायद्याच्या दाडक्यानेंच कोंबावी लागेल. मग ही हाक कोणासाठी आहे? उर्दू अजूनहि 'एशियाकी सबसे बड़ी जबान' आहे काय? कधीं तरी होती काय? मी हे प्रश्न विचारतों. आणि माझ्या समोरच्या त्या 'अदबी दुनिया'च्या जुन्या अंकाकडे पाहतो. तो अजून पूर्वीच्याच जोमात ओरडतो आहे, "उर्दू बोलो. उर्दू एशिया की सबसे बड़ी ज़बान है."

भूतकाळातून येणारी ही त्याची हाक भविष्यकाळात कुठपर्यंत पोंचणार आहे तें कोणी सांगावें!

मार्च, १९५०

## . ४ .

# दिल्ली—एक ‘अजायबघर’

दिल्लीला गेल्यावर तुम्हीं तिथं काय पाहावें आणि काय पाहूं नये हें मी तुम्हांला सांगणार नाहीं. कारण कुणाला काय पाहायला आवडेल आणि काय नाहीं त्याचा नेम नाहीं.

दिल्लीला माझे दोन मित्र आहेत. बरींच वर्षे तिथं राहिलेले आहेत. मी पहिल्यांदां दिल्लीला गेलों तेव्हां एकदा त्याच्यापैकीं एकाबरोबर दिल्लीच्या रस्त्यांतून भटकत होतों. एका ठिकाणीं एका उंच चौथऱ्यावर उभ्या असलेल्या मशिदीचे भव्य, डौलदार घुमट आणि उंच मनोरे पाहून मी त्याला म्हटलें, “काय रे, हीच का जामी मसजिद?”

तो तिकडे न पाहतांच म्हणाला, “होय, हीच. तुला बहुतेक आंत जाऊन पाहायची असेल.”

मीं म्हटलें, “अर्थात, चल जाऊ. जाऊ देतात ना?”

तो म्हणाला, “मीं कधीं चौकशी केली नाहीं. मशिदीसारखी मशीद. तींत पहायचं काय? मला ही मुसलमानधार्जिणी वृत्ति मुळींच पसंत नाहीं. त्यापेक्षां इथं लाल किल्ल्यासमोर अप्पाजी गंगाधरांचें शिवमंदिर आहे तें पहा. अजमेरी दरवाज्याबाहेर, १७३४ सालीं पहिल्या बाजीराव पेशव्यानें ज्या मैदानांत तळ ठोकला होता तें पहायला चल वाटल्यास. किंवा तिकडे सत्तावनी क्रांतियुद्धाच्या स्मारकाशेजारीं बायजाबाई शिंदीचा भाऊ हिंदुराव घोरपडे ह्याचा वाडा आहे तिकडे जाऊं. किंवा तुला पाहायचेंच असलें तर नवी दिल्लींत बिड्लाशेठनीं बांधलेलें लक्ष्मीनारायणाचें मंदिर आहे तें पाहूं. हीं मराठ्यांचीं आणि हिंदूंचीं अशीं स्थळें पाहायचीं कीं, मशिदी, थडगी आणि दर्गे पाहायचे?”

दुसऱ्या एका वेळीं माझ्या दुसऱ्या मित्राबरोबर दरीब्यांतून जुमा मशिदीकडे चाललो होतो. त्याला म्हटलें, "अरे, इथेंच कुठे तरी एक जुनं जैन मंदिर पाहण्यासारखं आहे म्हणतात. तुला ठाऊक आहे कुठें आहे तें?"

हा माझा मित्र सुधारक होता. तो म्हणाला, "कसलं आणलंस मंदिर? इथें मंदिरबिंदिर कांहीं नाहीं. कधी काळीं असल तरी मुसलमानांनीं तें जागेवर ठेवलं असेल होय? आणि असल तरी मला माहीत नाहीं. मी नाहीं मंदिरं-बिदिरं पाहात."

पाहण्यासंबंधींच्या आवडी नावडी ह्या अशा असल्यामुळें मी त्याबाबत कांहीं सांगत नाहीं. मात्र एक गोष्ट सांगितलीच पाहिजे. ती म्हणजे दिल्लीला गेल्यावर दिल्लीबद्दलची माहिती दिल्लीवाल्याला विचारू नका. कराची, कलकत्ता किंवा कोचीन ह्या ठिकाणाहून आलेला एखादा मनुष्य दिल्लींत आढळला, तर त्याला वाटल्यास विचारा. तो तुम्हाला चुकीची माहिती देणार नाहीं. निदान "मला माहिती नाहीं." एवढं तरी सांगेल. पण दिल्लीवाला मात्र "माहिती नाहीं," असें सरळ कधींही सांगणार नाही!

कुणाला 'नाही' म्हणायचं दिल्लीवाल्याच्या दरबारी संस्कृतीला कठिण वाटत असावें. किंवा आपण दिल्लीचे असून दिल्लीची माहिती नाहीं हें परक्यापाशीं कबूल करणें त्याला कमीपणाचें वाटत असेल. त्यामुळें तुम्हीं जर एखाद्याला अमुक ठिकाण कुठें आहे, किंवा अमुक वस्तु कुठें मिळेल, असें विचारलें तर तो तुम्हाला "आगे जा कर देखिये!" असें सांगेल. कदाचित् 'आगे जा कर' तुम्हाला हवें तें मिळालें नाहीं म्हणजे तुमची जी फजिती होते ती पाहण्यातहि त्याला आनंद वाटत असेल. कारण दिल्लीकराच्या दरबारीपणाच्या मागे एक मिस्किलपणाहि दडलेला असतो, असें अनुभवानें कळून येतें.

म्हणूनच दिल्लीकराच्या वागण्यातला दरबारीपणा आणि बोलण्यांतला डौल ध्याना, तुम्ही दिल्लीला गेलात तर, जपा, ही आणखीहि एक गोष्ट मी तुम्हांला सांगेन. संस्कारांची आणि सभ्यतेची अत्यंत पुसट छटा असलेल्या माणसाची-सुद्धा भाषा इतकी सफाईदार, डौलदार, आणि अलंकृत असते कीं कांहीं न सांगतां खूप सांगितल्याचा आणि कांहीं न देतां सर्वस्व देऊन टाकल्याचा ते बेमालूम आभास निर्माण करतील. एखाद्या दुकानांतून खरेदी करतांना तुम्ही जरा जरी किंमत कमी करून मागितलीत तर दुकानदार म्हणेल,

"बाबूजी, आप तो हमारा गिरेबान चाक कर रहे हैं." आणि मग आपण

ओशाळून जाऊन, त्यानें मागितलेल्या किमतीला खरेदी केल्यावर आढळून येतें कीं, ह्या खरेदींत आपला खिसा चांगलाच कापला गेला आहे.

तुम्हीं विडी पेटवायला काडी मागितलीत तर खिशातून आगपेटी काढून, आपल्या जिवाची ज्योत तुमच्यावरून ओवाळायला तयार असल्याचा आविर्भाव करतील ते. पण आगपेटींतून काडी काढतील ती जळकीच आत कोंबलेली असेल. आणि अखेर तुम्हालाच स्वतः आगपेटी विकत घेऊन त्याची विडी, तीहि बहुधा तुम्हींच दिलेली, पेटवून द्यावी लागेल. तुम्हाला माझें म्हणणं अतिशयोक्तीचें वाटेल. तसें तें थोडेंसें आहेच. पण खोटें नाहीं.

आज हजार-आठशें वर्षे राजकारणाचें रगण आणि युद्धांचे यज्ञकुण्ड झालेल्या ह्या दिल्लींतल्या लोकाच्या स्वाभाविक प्रवृत्ती नष्ट झाल्या आहेत, लुप्त झाल्या आहेत, कीं विकृत झाल्या आहेत, हें त्यांची लाघवी भाषा, दरबारी वागणं, आणि सफाईदार बेदरकारी ह्यामुळें ओळखणं कठिणच जातें.

दिल्ली एक अजायबघर आहे. पृथ्वीराजाच्या वेळेपासून आजतागायतच्या राजवटींचीं चिन्हें तिथं आहेत. मुसलमान अमदानीच्या आरंभीं, बाराव्या शतकाच्या अखेरीला, पृथ्वीराज चव्हाणाच्या मंदिराचेंच साहित्य घेऊन ऐबक कुतबुद्दीननें बांधलेल्या, कुतुबमिनारजवळच्या 'कुव्वतुल इस्लाम' मसजिदीपासून तों अठराव्या शतकात बांधल्या गेलेल्या, मुग़ल स्थापत्याची अखेरची अवस्था दर्शवणाऱ्या सफदरजंगाच्या मकबऱ्यापर्यंत, सहा शतकांचा मुस्लिम स्थापत्याचा सगळा इतिहास दिल्लीत उभा आहे. 'कुव्वतुल-इस्लाम' मसजिदीवरचे, पठाणाच्या टोपीसारखे निमुळते होत गेलेले घुमट, आणि सफदरजंगाच्या कबरीवरचे अतीव डेरेदार घुमट, ह्याच्या दरम्यानच्या काळात नुसत्या घुमटाच्या आकारांत किती स्थित्यंतरें झाली, तें पाहायचें असेल तर दिल्लीतच पाहायला मिळेल. अशोकाच्या उज्ज्वल राजवटीचे कीर्तिस्तंभ इथं आहेत तसे १८५७ च्या अपेशी प्रयत्नाचे वधस्तंभहि इथंच आहेत. पांढऱ्या संगमरवरी आणि गुलाबी पिवळ्या दगडांच्या भव्य, विशाल, ऐटबाज हवाशीर प्रासादाच्या शेजारीच एकमेकांना खेटूनरेटून बसलेलीं, लोखंडी खाब आणि विटाचे कठडे मिरवणारीं, आचरट नक्षीकामाच्या गर्दीनं गुदमरलेलीं कोंदट घरेंहि इथेंच दिसतील. एका बाजूला शहराच्या बाहेर, हिरवळीच्या किनारीनें सजवलेले, आणि झाडांच्या सांवलीनं गारवलेले आखीव, रुंद, डांबरी रस्त्याचे मैलच्या मैल आहेत; तर शहराच्या

ऐन वस्तींत, दोन्हीकडच्या घरांच्या मध्यें संकोचानें चिचोळलेले, उघड्या गटारांच्या दुतर्फा खंदकामधून अंग चोरून जाणारे बोळहि आहेत. मोगलाईतली गुलामी मनोवृत्ति आणि आजचें दारिद्र्य यांचें दीनवाणें प्रदर्शन इथें आहे, तशीच मोगलाई मगरूरी आणि आधुनिक ऐश्वर्याची आढ्यताहि इथें आहे. मध्ययुगीन मनोवृत्तीवर विसाव्या शतकातल्या विचाराचें कलम केल्यामुळें आलेली अजब फळेंहि इथेंच पाहायला मिळतील.

दिल्लीतल्या ह्या विविधतेबरोबरच दिल्लीकरामध्यें एक चमत्कारिक विसंगतीहि दृष्टीस पडते. सौंदर्य आणि सजावट ह्याची दिल्लीकराला मनापासून आवड. प्रत्येक गोष्ट त्याला 'नफ़ीस', नाजुक, सुरेख हवी. साधे असले तरी सजवून घ्यायची त्याची प्रवृत्ति. भोकरें नाही तर खिरण्या विकणारा असला, तरी तो त्यावर जरीच्या तारा आणि गुलाबाच्या पाकळ्या विखरील. आपल्या विक्रीच्या वस्तूंचें गोड, आकर्षक वर्णन करील. साधी शहतुतें विकणारा असला तरी म्हणेल, "जलेबी लो जी, जलेबी. ठंडा और मीठा, काला और नरम, गर्मीका दुश्मन, जलेबी लो." किंवा हिवाळ्याच्या दिवसात, पहाटेच्या थंडीत, डोक्यावर मोठी पाटरी भाजलेली रताळीं घेऊन हिंडत असला, तर ओरडत जाईल, "शकरकुंद हलवा, जाडेका मेवा, दो पैसे पौवा, लेते जावो जी." पण त्याबरोबरच उघड्या बादलीत दूध विकायला न्यायला त्याला दिक्कत वाटायची नाही. किंवा एखाद्या बादलीत धुणं धुतल्यावर, ती न विसळता तिच्यातच प्यायचें पाणी घ्यायचा किंवा द्यायचा त्याला संकोच वाटायचा नाही!

इथें मुसलमानामध्यें बायकांना पडदा जितका कडक आहे, तितकाच पडदा टाकून दिलेल्या बायकांत धीटपणा आहे. तसेंच बुरखा घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या बायका पुरुषाबरोबर एकाच सायकलवर मागें किंवा पुढें बसून जातांना भर रस्त्यातून दृष्टीस पडतात. ज्या पुण्यात पुरुषाकडे मागें वळून पाहण्याइतका धीटपणा बायकांत आहे त्या पुण्यात देखील असें दृश्य दिसायचें नाही.

* * *

दिल्लीच्या सगळ्या जीवनाचे आडवे-उभे धागे विणलेले पाहायचे असतील तर ते चांदणी चौकात पाहायला मिळतील. चांदणी चौकात तुम्ही तासचे तास उभे राहिलात तरी तुम्हाला कंटाळा असा यायचा नाहीं. पेशावरपासून कोचीन-पर्यंतचे आणि ढाक्यापासून कोयट्यापर्यंतचे बायकापुरुष तिथें तुम्हाला दिसतील. त्यांचे रूप-रंग-वेष याची विविधता पाहताना आपण आपल्याला विसरून जातो.

सेक्रेटरिएटमधल्या मद्रासी कारकुनांच्या बायका आपल्या द्राविड ढंगाच्या हिंदीच्या साहाय्यानें, तर बंगाली बाबूंच्या बायका आपल्या 'ओ'कारयुक्त भाषेनें तिथें खरेदी करताना आढळतील. आपला पोटरीपर्यंत पोचणारा लहंगा नाचवीत एखादी जाटीण तुम्हाला लगटून जाईल, त्याचप्रमाणें तलम चमकदार काळ्या बुरख्यानें आपाद-मस्तक अंग झाकून घेतलेल्या मुसलमान स्त्रिया तुमच्या अंगाला अंग घाशीत जातील येतील. त्यापैकीं कोणी, एकाद्या बजाजाच्या दुकानांत कापडाचा सौदा करीत असतील, तर कदाचित् कापडाचें पोत पाहण्यासाठीं बुरख्याच्या बाहेर निघालेलीं त्यांचीं नाजुक, निमुळतीं, मेंदी लावल्यामुळें ताबूस पिवळी झालेली, बोटें तुमच्या दृष्टीस पडतील. मग तुम्ही "नहि एतादृश्यः अंगुल्यः रूपविरोधिन्यः भवन्ति।" असा तर्क कराल. आणि कदाचित काहीं निमित्तानें त्या मुखावरचें पटल निमिषमात्र दूर केलें जाऊन तुमचा तर्क खराच असल्याचा तुम्हाला अपेक्षेबाहेर प्रत्यय येईल. किंवा एखादे वेळीं तुमचा तर्क खोटा ठरून चेहरा बुरख्यांत होता तेंच बरें होतें असेंहि वाटायचें.

उत्कृष्ट शिलाईचा उंची लोकरी सूट घातलेला एखादा रुबाबदार सभ्य गृहस्थ चांदणी चौकात भर रस्त्यावर फुटपाथवर उभा राहून द्रोणातून बोटांनीं दहींवडे, रश्शांतले बटाटे, किंवा आलूकी टिकिया खाताना दृष्टीस पडेल आणि तुम्हाला नवल वाटेल. पण तितकाच उंची पोषाख केलेली रसरशीत कांतीची, तरतरीत नाकाची, आणि तिखट नजरेची त्याची बायकोहि त्याच्या शेजारींच उभी राहून तेंच करते आहे असें पाहिल्यावर तुम्ही स्तंभितच व्हाल. आपल्याकडली एखादी प्रतिष्ठित बाई असें करते आहे अशी नुसती कल्पना करून पाहा. बरें दिसणें न दिसणें ह्यासंबंधींच्या आपल्या आणि त्यांच्या कल्पनाच परस्पर-विरुद्ध आहेत.

ज्यांच्याकडे पाहून दबल्यासारखें वाटावें अशीं दुकानें चांदणी चौकात नाहीत. तीं नवी दिल्लीत आहेत. किंबहुना नवी दिल्ली हें जुन्या दिल्लीशीं अत्यंत विसदृश असें अगदीं वेगळेंच शहर आहे. तिथली हिंडण्या फिरण्याची, बाजार-सौदा करण्याची, भेटलें म्हणजे एकमेकांशीं बोलण्याचालण्याची, रीतमुद्धां वेगळीच आहे. कॉनॉट प्लेसमधून हिंडताना एक तर अगदीं स्वाबांत नाहीं तर दबल्यासारखें हिंडावें लागतें. इथें चांदणी चौकातून हिंडताना एखाद्या जत्रेतून हिंडत असल्यासारखें स्वच्छंद वाटतें. एखाद्या दुकानासमोर तुम्ही घटका-घटका उभे राहिलात तरी तुम्हाला कोणी हटकणार नाहीं, कीं काय पाहिजे तें विचारणार नाहीं. आणि दुसऱ्या एखाद्या दुकानांत तुम्हाला कांहीं घ्यायचें नसलें तरी

आग्रहानें आंत बोलावतील.

बाजारांतून हिंडतां हिंडतां मध्येंच तुम्ही अंतर्मुख झालांत तर हाच चांदणी चौक तुम्हाला दिल्लीच्या इतिहासातल्या कांहीं रक्ताळलेल्या प्रकरणांची आठवण करून देईल. तुम्ही जिथें उभे असाल तिथून पाच-पंचवीस पावलांवरच सुनहरी मसजिद असेल. ह्या मशिदीच्या गच्चीवर बसूनच नादिरशहानें दिल्लीच्या नागरिकाची सर्रास कत्तल करवली आणि त्यांच्या रक्तांचे पाट तुम्ही उभे आहांत त्याच रस्त्यानें वाहिले. सुनहरी मसजिदीशेजारच्या कोतवालीसमोर भर रस्त्यावर, १८५७ च्या लढ्यांत भाग घेतलेल्याना—रावाना, रंकांना, राजपरिवारांतल्या लोकाना आणि सरदार-दरखदारांना—फासावर लटकावण्यात आलें. आणि कोतवालीला लागूनच असलेलें शीसगंज गुरुद्वार गुरु तेगबहादुरसिंघाचा ज्या ठिकाणीं औरंगजेबाच्या आदेशावरून वध करण्यांत आला त्या ठिकाणीं उभें आहे.

चांदणी चौकाच्या रस्त्याच्या मध्यभागांतून पूर्वी कालवा वहात होता म्हणतात. आणि त्यात रात्रीच्या वेळीं चांदण्यांचें प्रतिबिंब पडे, त्यावरून त्या चौकाला चांदणी चौक नाव पडलें. आतां तिथें कालवा नाही. आणि आकाशांत रात्रीं चांदण्या चमकतात त्यांचें प्रतिबिंब आता तिथें पडत नाहीं. पण रात्रीं नवाच्या पुढें गेलात तर तिथें दुसऱ्याच चांदण्या चमकतांना दिसतील. आणि मुख्य रस्ता सोडून आड-रस्त्याला गेलें कीं सौंदर्याचा (आणि कुरूपतेचाहि) बाजार भरलेला दिसेल. हा रात्रीचा बाजार आहे. तिथें माल आणि मोल ह्याचे आकडे पटवण्याचें काम दलालामार्फत किंवा प्रत्यक्षच चाललेलें दिसेल. व्यवहाराचा किंवा मालाचा प्रकार किंवा प्रमाण जसें असेल तशी त्याची मोलमोजणी इतर बाजाराप्रमाणें ह्याहि बाजारांत चाललेली असते.

दिल्लीतल्या एका रस्त्याचें लौकिकांतलें नांवच मुळीं 'बाज़ारे हुस्न'—सौंदर्याची बाजारपेठ—असें आहे.

ऑक्टोबर, १९४०

·५·

# फुलांचा शोध

आम्हांला फुलांच्या हाराची ऑर्डर द्यायची होती आणि त्यासाठीं आम्ही बाजारांत निघालों होतों.

कोणत्याहि मोठ्या गावात फुलें मिळण्याच्या जागा साधारणपणें ठरल्या-सारख्या असतात. एक भाजीबाजाराच्या जवळपास, दुसरें देवळाच्या दाराशीं आणि तिसरें, ही आमच्या तर्कबुद्धीची असभ्य उडी आहे असें म्हणाल तुम्ही, पण तिसरें ठिकाण म्हणजे वेश्यांची वस्ती.

नया बाजारांतून अजमेरी दरवाज्यावरून जो रस्ता नवी दिल्लीकडे जातो (त्याच रस्त्याला बाज़ारे हुस्न म्हणतात.) त्या रस्त्यावरून दिवेलागणीनंतर जाऊं लागलें म्हणजे फुलांच्या माळा विकणाऱ्या मुलांची रांग मागें लागते. कारण तिथेंच वेश्यांची नवी वस्ती आहे.

पण आम्हांला एखाद्या चांगल्या फुलवाल्याकडे मोठ्या हाराची आर्डर द्यायची होती. म्हणून आमच्यासारख्या नवख्यांच्या माहितीचें जें एकच एक ठिकाण, फतेपुरी मसजिद, तिथें आम्ही गेलों, आणि फुलांचें दुकान कुठें दिसतें आहे का, म्हणून पाहूं लागलों.

पलीकडे चर्चच्या रस्त्यावर लस्सीवाल्यांचीं दुकानें होतीं तिथें कांहीं दिल्लीचे लाला आणि कांहीं सूटबूटवाले पंजाबी—फुटपाथवर उभे राहूनच—कोणी लस्सी पीत होते, कोणी खुरचन खात होते, तर कोणी जिलबीचा खुराक घेत होते. फतेपुरी मसजिदच्या दाराशींच सुक्या मेव्याच्या दुकानांत नवी दिल्लीच्या देशी 'मेम'साहेब चार आणे किंमतीचा माल बारा आण्यांना घेत होत्या. समोर गोटेवाल्याच्या दुकानांत पडदाशीन बेगमा, आपलीं नाजुक गोरीं-गुलाबी

चिमुकली—आणि कांहीं वेळां राटदेखील—चोटें पडद्याबाहेर काढून, गोटा-किनारीची चाचपणी करीत होत्या. पलिकडे लाल कुंव्याच्या दिशेनें जाणाऱ्या रस्त्यावर दोन मोठ्या पाट्या "हमाम गर्म है" असें ओरडून सांगत होत्या. ट्राम्स धडाड-खडाड करीत बेफामपणें चालल्या होत्या. आणि मधल्या चौकांत दोन सांड बेदरकारपणें टक्कर खेळण्यासाठीं पवित्रे घेत होते.

पण या सगळ्या दृश्यात आम्हाला फुलांचें दुकान कुठेंच दिसेना, म्हणून आम्ही पलीकडेच एक भाजीचें दुकान होतें तिथें चौकशीसाठीं गेलों. आधीं आमच्याकडे त्यानें लक्ष्यच दिलें नाहीं. दुकान मात्र मोठें झोकात थाटलें होतें. वेगवेगळ्या रंगाच्या पालेभाज्या, फळभाज्या, शेंगा अशा खुबीनें रचल्या होत्या कीं त्यांचे रंग एकमेकांना खुलवीत होते. भाज्यांचे रंग लक्ष्यांत घेऊन त्यांची अशी आकर्षक रचना केलेली मीं पुण्याला किंवा मुंबईला पाहिली नव्हती. बऱ्याच वेळानें भाजीवाल्यानें आमच्याकडे, आम्ही गिऱ्हाईकच असावे अशा समजुतीनें पाहिलें.

आम्ही विचारलें, "इथं फुलं कुठं मिळतील?"

त्याचा नूर या प्रश्नानें एकदम पालटला.

आमचा दिल्लीतला नवखेपणा, नव्हे आमचा अडाणीपणा, आमच्या चेहऱ्या-वर स्वच्छ दिसत असावा. कारण त्याच्या नजरेंत दिल्लीवाल्याचा जन्मजात बेदरकार भिस्किलपणा लगेच चमकू लागला.

"फूल? और यहां? सबजीकी दुकानमें भला फूल मिलेंगे?"

"तें आम्हाला माहीत आहे. पण कुठें मिळतील तें आम्हांला सांगा. आम्हाला हाराची ऑर्डर द्यायची आहे."

"फुलांचे हार तुम्हांला रात्रीं चावडी बाजारांत मिळतील. आतां कांहीं सांगता येत नाहीं. पण पाहा प्रयत्न करून. तिकडेच पाहा. इथं तर नाहींच कोणी फुलवाला."

चावडी बाजार म्हणजे वेश्यांची जुनी वस्ती. आतां ती वस्ती तिथून बरीच उठली आहे. शहरातल्या सभ्य लोकांची अब्रू शाबूत राहावी म्हणून इथल्या 'तसल्या' बायकांना एक फर्लांगावर अजमेरी दरवाज्याबाहेर घालवण्यात आलें आहे. अर्थात् शहरांतली सभ्य मंडळी आता तिकडे, बाजारे हुस्नमध्यें, जाते. तरी चावडी बाजारांत 'तशी' वस्ती थोडीबहुत आहेच.

पण दिवसाचा चावडी बाजार आणि रात्रीचा चावडी बाजार यांत दिवस-रात्रीइतकेंच अंतर आहे. इथल्या वेश्यांची सगळी वस्ती वरच्या मजल्यावर

आहे. आणि ती संध्याकाळीं अंधार पडतांना प्रकाशात येऊं लागते. एरव्हीं दिवसभर चावडी बाजारात ताम्यापितळेच्या भाड्याचा, लोखंडी सामानाचा, बरण्यांचा आणि काचभाड्याचा, कागदाचा, स्टेशनरीचा मोठ्या प्रमाणावर घाऊक आणि किरकोळ व्यापार चालतो आणि त्याची सारखी धामधूम असते.

दिवसा आणि रात्रीं सारखीच गजबज असलेला दिल्लींतला हा एकच भाग असावा. वेश्यांची वस्ती शहराच्या मध्यावर असावी की शहराबाहेर यावर मतभेद असूं शकतील. पण आपल्या धंद्यासाठीं चावडी बाजारासारखें ठिकाण निवडण्यांत ह्या स्त्रियांनीं मोठी समजस आणि दूरदृष्टि ठेवली होती असें म्हणावें लागते. कारण चावडी बाजाराच्या एका बाजूला मुसलमानांची वस्ती आहे तर दुसऱ्या बाजूला जैनांची आणि हिंदूंची. तसेंच जुम्मा मसजिद, जैनमंदिर आणि अप्पाजी गंगाधरांचें मंदिर अशीं तीन धर्मस्थानेंहि तिथून अगदीं जवळ आहेत. सर्व धर्मांच्या लोकांना सारखेंच मुक्तद्वार ठेवणाऱ्या ह्या विश्वयोपितांना आपल्या व्यवसायासाठीं याहून चांगलें स्थान कोणतें सापडलें असतें ?

फुलांचा शोध चावडी बाजारातच केला पाहिजे हें ठरल्यानंतर आम्ही लाल कुंव्याची ट्राम घेऊन चावडी बाजारात गेलों, आणि 'बड शाहबूला'पाशीं उतरून पुन्हां फुलांचें दुकान पाहूं लागलों.

वरच्या खिडक्यांतून कांहीं तोंडें बाहेर डोकावून पाहात होतीं. खालच्या दुकानांतून गिऱ्हाइकांची रीघ लागली होती. फुलांचें दुकान कुठेंच दृष्टीस पडेना. कुणाला विचारावें तेंहि कळेना. तेवढ्यात तिथेंच एका पायरीशी एक मनुष्य आपल्या कलप लावलेल्या कल्ल्यांतून कंगवा फिरवीत बसलेला दिसला. त्याच्याजवळ जाऊन आम्हीं त्याला फुलांसंबंधीं विचारलें. तो अगदीं स्तिमित झाल्यासारखा दिसला. फुलांसंबंधीं विचारण्यात आम्ही कांहीं गैर करतो आहों, कीं कांहीं बावळटपणा करतो आहों—आम्हाला कांहींच कळेना. एकदा खालपासून वरपर्यंत आमच्यावरून नजर टाकून, कल्ल्यांतून बोटें फिरवीत तो म्हणाला,

"अजी बाबूजी, इस वक्त फूल? अगर फूल चाहतेही है तो रातको आइये. ऐसे ऐसे फूल दिखलाएंगे कि आपकी तबियत खुष हो जायगी. अभी अभी मेरठसे आई है. ताज़ा, खूब-सूरत और—और फिर अच्छे खानदानकी है—वैसी पेशा करनेवाली नही है. मुसीबतमें पडी है—"

जवळच एक तांबडी-पिवळी लुंगी गुंडाळलेला तरुण एका छोट्या आरशांत रूप न्याहाळीत, मिशांचे आंकडे वळीत, गुणगुणत होता—

"हिसीनोंको तीरछी नज़र देखता हूं—
हुं हूं हूं हुं इत्रे हिना वेचता हूं!"

तोहि आमच्याकडे वळून म्हणाला,

"बाबूजी! आप गतको आइये, जैसी चीज़ चाहिये मिल जायगी."

आम्हीं म्हटलें, "आम्हाला 'तशी' कांहीं चीज नको आहे. आम्हांला हाराची ऑर्डर द्यायची आहे. त्यासाठीं फूलवाल्याचें दुकान पाहिजे आहे."

"ओ! यह बात है? तो आपको फूल इस वक्त यहां नही मिलेंगे."

"तो कहा मिलेंगे?"

"आपा गंगाधरके मंदिरपर जाइए, वहा शायद मिलेंगे."

"वह कहां है?"

"आपको नहीं मालूम? आप कहांके रहनेवाले हैं?"

"हम पुणेके, दक्खनके रहनेवाले हैं, अभी अभी दिल्लीमें आए हैं."

"ओ! यह बात है? तो आपा गंगाधरका मदिर भी तो किसी दक्खनीकाही बनाया हुआ बताते है. आप यहा से, यूं होके, लाल किलेकी तरफ जाइये, कोई भी बता देगा."

एवढी माहिती आम्हांला देऊन पुन्हां —

"गुजरते हैं यहां से तो नज़र उठाकर देखते भी नहीं,
और हम हैं कि रात दिन इन्तिज़ार में बैठे रहते हैं..."

असें गुणगुणत तो मिशांना पीळ देऊं लागला.

चावडी बाजारांतून, जुम्मा मसजिदीवरून, आम्ही लाल किल्ल्याच्या रस्त्यावर, देवळासारख्या न दिसणाऱ्या अप्पाजी गंगाधराच्या देवळाजवळ गेलों. आम्हांला मोठी आशा होती कीं, तिथें तरी फुलें मिळतील. कारण फतेपूरीहून चावडी बाजारांतून इथें येईपर्यंत दहा वाजले होते. ऊन चढूं लागलें होतें आणि उन्हाबरोबर निराशाहि चढूं लागली होती.

पण तिथें गेलों तों फुलांचीं दुकानें उठली होतीं. आणि फुलांच्या राशीवर हबकलेल्या पाण्याचे सुकत चाललेले ओघळ त्याच्या अभावाची तीव्र जाणीव देत होते. वाट चुकलेल्या माणसासारखे अगतिक होऊन, पुढें काय करावें असा मनाशींच प्रश्न विचारीत आम्ही उभे होतो. इतक्यांत एक लालाजी दोंद सांवरीत तोंडांतल्या तोंडांत कांहीं तरी पुटपुटत देवळाच्या पायऱ्या उतरतांना दिसले. आतांपर्यंत दोनदां विचारलेला प्रश्न आम्हीं त्यांनाहि विचारला.

"फूल? बाबूजी, इस वक्त यहां फूल कहां मिलेंगे? फूलोंकी दुकानें तो अब उठ गईं. हां आप अगर सात आठ बजे आते तो ज़रूर मिलते!"

"तुमच्या या दिल्लींत कुठं फुलं मिळतच नाहीत का? एवढं मोठं शहर—"

"अजी वा! बाबूजी, असं कधीं झालंय्. फुलं मिळायची कां नाहीत? तुम्ही असेच या रस्त्यानें दरीब्यांत जा. एखाद्या पनवाड्याकडे लागतील तितकीं फुलं मिळतील."

मी खरोखर कंटाळलों—नव्हे, संतापलों होतों. सकाळपासून तीन तास फुला-साटीं हिंडत होतों आम्ही. पण व्यर्थ! तथापि तिथून दरीबा म्हणजे कांहीं फार लांब नाहीं, म्हणून हिय्या केला आणि दरीब्यात आलों. महबूबचंद बजाज, इक्बालनारायन जौहरी, मेहताबराय इत्रफरोश अशा हिंदु-मुस्लीम संस्कृति संगमाच्या निदर्शक पाट्या वाचीत पानवाल्याच्या दुकानाच्या शोधांत रस्ता चालूं लागलों. दरीब्याचा रस्ता सांकडा, पण तिथला व्यापार जोराचा आहे. त्याचें चांदणी चौकाकडलें टोक हिंदु तर जुम्मा मसजिदीकडलें टोक मुसलमान आहे. रंगाच्या एका छटेंतून दुसरी निघावी, पण त्याची विभाजक रेषा कुठं दिसूं नये, तसेंच इथें या बाबतींत झालेलें होतें. अखेर आम्हांला पानवाल्याचें एक दुकान दिसलें. पण दुकानदार जागेवर नव्हता. आम्हीं इकडे तिकडे चौकशी केली, तेव्हां शेजारच्या एका भाजीवालीशीं तो गप्पा मारीत होता तिथून आला. माणूस वयानें म्हातारा पण वृत्तीनें रंगेल दिसत होता.

दत्तपंथी लोकाचें 'श्री गुरुदेव दत्त' किंवा रामदासीयांचें 'जयजय रघुवीर समर्थ' हें जसें कोणत्याहि दारासमोर उभे राहिलें कीं निर्विकारपणें यंत्रासारखें तोंडांतून बाहेर पडतें, तसें आमच्या प्रश्नाचें आतां झालें होतें.

आमचा सवाल ऐकतांच, आपल्या हृदयसंपुटावरचें आस्तरण दूर करावें अशा आविर्भावानें एका उतरत्या फळीवरचें ओलें फडकें काढीत तो म्हणाला,

"हां हां, बाबूजी, लीजिये. कैसे फूल चाहिये?"

पण त्या फडक्याखालीं दोनचार वेलाचीं पानें, एकदोन तुळशीच्या मंजिऱ्या, आणि पाणी पिऊन पारदर्शक आणि कडेशीं पिंगट होत चाललेलीं कुंदाचीं, तगरीचीं अशीं पांच सात फुलें निर्जीवपणें अंग मुडपून पडलीं होतीं.

'दरीबेमें पनवाडी के यहां चाहे जितने फूल मिलेंगे!'—त्या लाल्यानें सांगितलें होतें. हीं 'चाहे जितने' फुलें! ह्यासाटीं तीन-चार तास उपाशीं पोटीं टल्ले खाल्ले! सोदा लेकाचा! दिल्लीचे सोदे आम्ही ऐकत आलों तें

खोटें नाहीं. दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरांत जिथें 'फूलवालोंकी सैर'सारखे फुलांचे उत्सव होतात, तिथें वेळेवर एका हार-तुऱ्यासाठीं फुलें मिळू नयेत! मला अगदी चीड आली होती. आम्ही पैसे खर्चायला तयार असताना 'आगरांत नारळ—पैशाला तीन' म्हणून हावरेपणानें पुढें पुढें चालत राहणाऱ्या भटासारखी आमची फरपट चालली होती. मी एकदेखील पाऊल पुढें जायला तयार नव्हतो आता.

तेवढ्यात पनवाडी म्हणाला, "बाबूजी, तुम्हाला हवीत तशीं आणि हवीत तेवढीं फुलं फुलाच्या मंडईत मिळतील."

'फुलांची मंडई?' मी मनाशीं म्हणालो—'दिल्लींत नुसत्या फुलासाठीं स्वतंत्र मंडई आहे?' दिल्लीवरचा माझा राग जरा कमी झाला. मीं म्हटलें, 'बरोबर आहे! दिल्लीसारख्या बादशाही शहरांत फुलासाठीं स्वतंत्र मंडई असणें हे शाही वैभवाला साजेसच आहे.' फुलाच्या राशीवर लोटलें तरी पुढें पाऊल टाकायला एका क्षणापूर्वी मी तयार नव्हतो, पण मंडईनें मला पुन्हा आशा लावली.

मी विचारलें, "कुठे आहे मंडई?"

"नीलके कटरेमें!"

"नीलका कटरा कहां है?"

"लाला छन्नूमल के जायदादके पास."

"छन्नूमलकी जायदाद कहां है?" एक एक अपरिचित नाव ऐकून माझी छाती दडपत चालली होती. कुठे असतील कोण जाणे हीं ठिकाणें!

"अरे, बाबूजी! छन्नूमलकी जायदाद आपको मालूम नहीं? इतने बड़े रईस हैं—या आप नये हैं, शायद."

"होय, आम्ही नवीनच आहों."

"तभी तो. अच्छा, आप ऐसे अंदर ही अंदरसे नई सड़क होके घण्टाघर जाइये, वहीं है पास ही. कोई भी बता देगा."

आम्ही नव्या आशेनें पुन्हा जायला निघालो. तेवढ्यांत तो जरा थांबून म्हणाला,

"अजी क्या कहूं बाबूजी! पहिल्यांदा शाही जमान्यांत इथं जवळच होती फुलाची मंडई—सुनहरी मसजिदच्या पलीकडे—मोती बाजाराशेजारीं. आणि आता घण्टाघर आहे ना,* तिथे कारवान सराई होती जहानआरा बेगमची.

* हा काही दिवसांपूर्वी कोसळून पडला अशी बातमी होती.

गेले ते दिवस. ठीकही तो कहा है—

'ज़फर अहवाल आलम का
कभी कुछ है, कभी कुछ है,
कि क्या क्या रग अब है,
और क्या क्या पेशतर यां थे...'"

म्हाताऱ्या पानवाल्याच्या चर्येवरून एक खिन्न स्मृतीची लकेर चमकून गेली!

जिनगरांचीं, पटवेकऱ्यांचीं, किनारीवाल्यांचीं दुकानें मागे टाकीत आम्ही नयी सडकच्या रोखानें चाललो होतो. मी मनांतल्या मनात फुलाच्या मंडईचें चित्र रेखाटीत होतों. दिल्लीचे लोक एकंदरीत रंगीनमिजाज आणि शौकीन यात शंका नाहीं. नुसतीं जांभळें विकायची तरी त्यावर गुलाबाच्या पाकळ्या आणि जरतार रचतील. एखादा खोमचेवाला नाही तर भडभुंजा जरी गावाला निघाला तरी लेसदार खादेपट्टीचा सदरा आणि टोपी घालून प्रवासाला निघेल. मेरठला किंवा सहा मैलावर गाझियाबादला जरी तो जात असला तरी त्याला पोचवायला स्टेशनवर त्याचे पांचसात स्नेही हारतुरे घेऊन जातील; आणि त्याच्याच नव्हे तर एकमेकांच्याहि गळ्यात हार घालतील. उन्हाळ्याच्या दिवसांत रस्त्यातून हिंडताना गळ्यांत मोतियाचे कंठे आणि मनगटात पोहच्या घालून हिंडतील. लग्नकार्यासाठीं किंवा एखाद्या समारंभासाठीं दिल्लीवाले जे हार करतात ते पाहून तर नेत्राचें अगदीं सार्थक झाल्यासारखें वाटते. हत्तीच्या सोंडेसारखे लठ्ठ, गुबगुबीत, पायापर्यंत पोचणारे आणि मधूनमधून सोनेरी रुपेरी पदकांनीं शोभवलेले--

मी आपल्याच तंद्रींत होतों, त्यामुळें भाज्या-चटण्याच्या वासांनीं दरवळणारी परोठ्यांची गल्ली, रेशमी जरतारी साड्यांनीं झगमगणारीं सुरती साडीवाल्यांचीं दुकानें, केव्हा मागे गेली तें मला कळलेंहि नाहीं. आम्ही नई सडकेवरून घण्टा-घरापाशीं, आणि तिथून चौकशी करीत नीलच्या कटऱ्यापाशी आलो. म्हणजे फतेपूरीपासून निघून दिल्लीच्या पोटातून चकरा मारीत मारीत आम्ही पुन्हां फतेपूरीपाशींच आलो! आरंभींच फतेपूरींतल्या त्या भाजीवाल्यानें नीलच्या कटऱ्याची माहिती दिली असती तर आमचा वेळ आणि टल्ला वाचला नसता! पण मग तो दिल्लीवाला कसला? नवख्या माणसाची फजिती करण्यात अस्सल दिल्लीवाल्याला एक प्रकारची गंमत वाटते यांत शंका नाहीं

नीलच्या कटऱ्याच्या त्या दगडांनीं मांचलेल्या अरुंद बोळांत प्रवेश करून आम्हीं पुन्हा आमची चौकशी चालवली आणि एकदां डावीकडे, मग उजवीकडे, पुन्हां डावीकडे आणि पुन्हां उजवीकडे असें चक्रव्यूह-भ्रमण केल्यावर एका मुलाला विचारलें,

"यहा फूलोंकी मंडी कहां है?"

आतां आमचा हा फुलाचा शोध Holy Grail च्या शोधासारखा होऊं लागला होता!

"ही समोरच तर आहे तुमच्या."

तीन खणांच्या दुकानाएवढ्या एका रिकाम्या दालनाकडे बोट दाखवीत तो म्हणाला.

"ही फुलांची मंडई?" मीं त्या भकास रितेपणाकडे पाहात विचारलें, "पण फुलांचीं दुकानें कुठं आहेत?"

"दुकानं? इतका वेळ! दुकानं नऊ वाजताच उठली!"

मीं कपाळाला हात लावला. मला बोलायला शब्दच सुचेनात. ही तीन खणाची खोली! ही दिल्लीची फुलांची मंडई!

कोणावर तरी खूप रागवावेंसें वाटत होतें. पण रागवायचें कुणावर?

आंत शिदींचे बोरिये पसरले होते. सोडून गेलेल्या सोबत्यावर रागावून फुरंगटल्यासारखीं कांहीं फुलें कोनाकोपऱ्यांत पडली होतीं.

आम्ही फुलाच्या मंडईकडे कशासाठीं आलो होतो तेंहि मी आतां विसरलो होतो.

माझा मित्र म्हणाला, "वाः! दिल्ली तर दिल्ली आहे बुवा. आतां त्या सरदारीमलला काय द्यायचं?"

"काय द्यायचं!" मीं म्हटलें, "त्याला थोडंच कबूल केलं होतं कीं आम्ही तुला हार देऊ म्हणून! नुसतेंच भेटून शेकहॅण्ड करूं—चल."

फेब्रुवारी, १९४९

## • ६ •

# बझ्मे-अदब

दिल्लीची गोष्ट आहे. बाजार सीतारामधून तुर्कमान दरवाज्याकडे चाललें म्हणजे वाटेंत मसजिद कलां लागते. तिच्या जरा अलीकडे एका अरुंद गल्लीच्या तोंडाशीं आमचा टांगा थांबला. तिथेंच आंत आम्हाला जायचें होतें.

आदल्या दिवशीं ऑफिसातून बाहेर पडताना सय्यद नूरुद्दीन म्हणाले होते, "उद्यां तुम्हीं माझ्याबरोबर बझ्मे-अदबच्या बैठकीला या, शीशमहलवर."

मीं म्हटलें, "'बझ्मे अदब' काय आहे?"

"कांहीं नाहीं. आम्ही वाङ्मयासंबंधीं आवड असणारी काहीं मंडळी आठवड्यातून एक दिवस जमून गप्पा मारतों तास दोन तास. उद्यां आमची बैठक आहे. तुम्हाला उर्दू वाङ्मयासंबंधीं दिलचस्पी आहे. पाहा येत असाल तर."

मीं त्यांना होय म्हटलें होतें. आणि आता त्यांच्याच बरोबर नवाब गेसूदराझखांच्या शीशमहलकडेच चाललों होतों. बझ्मे-अदबच्या बैठकी तिथेंच भरत असत. बोळातून दोन-चार वळणें घेऊन आम्ही शीशमहलपाशीं पोंचलों.

नवाब गेसूदराझखांचें घराणें फार जुनें आणि प्रतिष्ठित होतें. त्यांचे आजोबा नवाब मीर फतेउल्लाखा आणि ख्वाजा अल्ताफ हुसेन हाली ह्यांचा फार स्नेह होता. आणि मिर्झा असदुल्लाखां, म्हणजे कविश्रेष्ठ ग़ालिब, ह्यांच्या घरीं त्यांचें नेहमीं जाणेंयेणें असे. स्वतः नवाब फतेउल्लाखांनींहि कांहीं कविता केली होती म्हणतात. पण कवित्वापेक्षा रसिकतेबद्दलच त्यांची विशेष ख्याति होती. आणि त्यांची ही रसिकतेची परंपरा नवाब गेसूदराझखानीं चालू ठेवली होती. ते स्वतः जुन्या काव्याचे भक्त आणि दर्दी असले तरी नव्या काव्याकडेहि आस्थेनें पाहात असत. म्हणूनच दर गुरुवारीं आपल्या घरीं साहित्यिकांची बैठक

भरविण्याची त्यानीं पद्धत ठेवली होती.

आम्ही जिना चढून, गच्ची ओलांडून, एका मध्यम आकाराच्या दिवाणखान्यात गेलो. समोरच्या बाजूला, मध्यभागीं गादीवर, नवाबसाहेब बसले होते. चौफेर भिंतीना लागून सलग गाद्या घातलेल्या होत्या, टेकायला लोड होते, आणि दर दोन चार हातावर एकेक रक्षदाणी आणि सिगारेटचा डबा ठेवलेला होता. स्वतः नवाबसाहेबांच्या हातीं जरतारी काम केलेली हुक्क्याची नळी होती. जवळच पानाचा डबा आणि उगालदान होतं.

नवाबसाहेबांचं वय पस्तीस चाळीसच्या सुमाराचं असावं. शरीर सुखावलेलें आणि चेहरा गोरा तुकतुकीत होता. केस काळे, वळणदार आणि चमकदार होते. त्यानीं ढिला पायजमा आणि अंगात जाळीदार झालरी लावलेला मलमलीचा लांब कुर्ता घातला होता. मधूनच हाताच्या अंगठ्यानं आणि तर्जनीनं मिशा दुभागायच्या आणि मग मिशांच्या आकड्याना पीळ द्यायचा अशी त्यांची लकब होती.

त्यांचं बसणं, बोलणं, हालचाल, रुबाबदार, खानदानी, संयमशील परंतु खुशमिजाज माणसासारखी होती. सय्यद नूरुद्दीननं माझी त्यांची ओळख करून दिली. त्यानीं जागेवरून किंचित् उठल्यासारखं करून माझ्याशीं हस्तांदोलन केलें आणि मी एका बाजूला जाऊन बसलो.

दिवाणखाना आकारानं मध्यम पण मोगली धर्तीचा होता. गच्चीकडल्या मेहरपी दगडाच्या होत्या. त्यात दारं बसवली होतीं. इतर तीन भिंतींतहि आतल्या भागात जाण्यासाठीं दारं होतीं. त्यावर चिकाचे पडदे सोडलेले होते. दारांच्या भोवताल्न आणि भिंतीवरून रंगवलेली नक्षी दिल्ली-आगऱ्याच्या किल्ल्यातल्या रंगीत दगडाच्या कामाची आठवण करून देणारी होती. कोनाड्यातून इराणी पद्धतीच्या फुलदाण्या आणि पुष्पगुच्छ रंगवलेले होते.

मी बसलो होतों तिथं भिंतीवर सफेदीच्या पुटाच्या आतून पूर्वीच्या केव्हाच्या तरी चित्राचे अधुक रंग दिसत होते. माझ्या मनांत आलें, हें घर बांधल्यापासून ह्या भिंतीवर सफेदीचे किती हात फिरले असतील! आणि ह्या चित्राच्या खाली आणखी अशींच किती चित्रें लपली असतील! ह्या दिवाणखान्यांत, गेल्या तीन पिढ्या, अशाच काव्य-सभा झाल्या असतील! कधीं कारस्थानें कुजबुजली असतील, तर कधीं कचन्यांचीं पावलें छुमछुमली असतील! छताला एक झुंबर मधोमध टांगलेलें होतं, त्यावर खारव्याचा अभ्रा चढवलेला होता. आणि चंद्राभोवतीं चांदण्या असतात तशा त्याच्या अंवतींभोवती हंड्या डुलत होत्या.

प्रकाशाचीं तीं जुनीं कलेवरें निस्तेज आणि निर्जीव झालेलीं होतीं, पण तीं तिथं होतीं. आणि त्याच्यामधूनच दोन ठिकाणी विजेचे झगझगणारे दिवे लोंबत होते.

मी त्या दिवाणखान्यात स्वैर नजर फिरवीत होतो. त्यामागोमाग माझें मन भटकत होते. इतक्यात माझ्या जवळच्या रिकाम्या जागेवर कुणी तरी येऊन बसलें. त्याच्या पोषाखांतून अत्तराचा भपकारा आला, आणि मी भानावर आलों.

कुणी तरी आपली कविता म्हणून दाखवीत होते. बहुतेक कविता इतकी फारसी-मिश्रित होती कीं मला त्यातल्या क्रियापदाखेरीज फारसें काहीच कळत नव्हतं. पण बाकीची मंडळी रसरंगांत दंग होती.

एक गृहस्थ वाचीत होते—

"जानते हैं हाले-दिल आक़िल क़याफ़ा देख कर......"

"वाह, वा!" एक रसिक उद्गारले, "'जानते हैं हाले-दिल आक़िल क़याफ़ा देखकर'—बुद्धिमान् लोक नुसता चेहरा पाहून मनःस्थिति ओळखतात —वाह, क्या खूब है!"

कवीनें त्यांच्याकडे पाहून झुकून सलाम केला आणि म्हटलें,

"आदाब अर्ज, परंतु खुबी पुढल्या ओळींत आहे. मुलाहिज़ा फरमाइये."

"इरशाद हो." दोघेचौघे म्हणाले.

"जानते हैं हाले-दिल आक़िल क़याफ़ा देख कर,
खतका मज़मूं भॉप लेते हैं, लिफ़ाफ़ा देखकर"

"भई वाह, क्या ख़ूब कहा है—'खतका मज़मू भॉप लेते हैं लिफ़ाफ़ा देखकर'—"

"गज़ब किया है आपने. इसे दुहराइये!" दोघाचौघाच्या तोंडून एकदम उद्गार निघाले.

कवीनें पुन्हा किंचित् उठल्यासारखं करून चौफेर आदाब अर्ज केला आणि म्हटलें, "शुक्रिया, बहोत बहोत शुक्रिया,

'जानते हैं हाले-दिल आक़िल क़याफ़ा देखकर......'"

"'क़याफ़ा देखकर'—वाह वा!" एक रसिक—

"—'खतका मज़मूं भॉप लेते हैं लिफ़ाफ़ा देखकर'—"

"क्या ख़ूब कहा है! क्या खूब कहा है!"

सगळीकडून धन्योद्गार निघाले. कवि कृतज्ञतेचं स्मित दर्शवून जागेवर बसले.

त्यानंतर दुसऱ्या एका कवीनं खिशांतून कागद काढून आपली नवी कविता वाचायला सुरुवात केली,

"करके खून एक्का जा बैठे हैं घरमें और फिर
'पूछते हैं कि मेरे दरपे है ग़ौग़ा कैसा ?"

"भई वाह," एक रसिक एकदम उद्‌गारले. "'पूछते हैं कि मेरे दरपे है ग़ौग़ा कैसा?' इन्हें पता भी नहीं कि क्या मामला है!"

"भई वाह, कमाल कर दिया, क्या खूब शायरी है. वाह वा!"

"शायरी क्या है, कलेजा निकालके रख दिया है."

"शुक्रिया, शुक्रिया," म्हणत उठून कवीनं सगळ्यांना आदाब अर्ज केला.

मराठी काव्यगायन मीं पुष्कळदा ऐकलें होतं; पण काव्यगायनाचा हा प्रकार आणि रसिकता व्यक्त करण्याची ही पद्धति मला अगदीं नवीन होती. अर्थात् मीं हें पाहिलें होतं कीं, दिल्लीच्या बाजारातला सर्वसामान्य मनुष्य सुद्धां जुन्या उर्दू काव्यात मुरलेला असतो. त्यांतले श्लेष आणि संकेत तो रसिकतेनें, लज्जत घेत आस्वादूं शकतो. दाग़, ज़ौक़, मीर, ग़ालिब, अकबर इलाहाबादी यांच्या काव्यांचे बंचे खारीबावलीच्या फुटपाथवर दोन-दोन चार-चार आण्यांना विकले जातात, आणि नित्यशः खपतात. आपल्याकडे मराठींत असें भाग्य फक्त लावण्या आणि गौळणी ह्यानाच लाभतं. उर्दूच्या त्या महाकवींच्या मानानें मी त्या ठिकाणीं ऐकत असलेलें काव्य अगदींच सामान्य होतं. आणि ह्याची जाणीव तिथल्या रसिकानाहि असलीच पाहिजे. पण रसिकता व्यक्त करण्याची एक दरबारी पद्धति शिष्टसंमत झाली होती. त्या पद्धतीनेंच ती व्यक्त झाली पाहिजे. आणि तशीच ती होत होती.

मला कवितांतले काहीं शब्द मधून मधून कळत होते. आणि त्यांवरून बाकीच्यांचा अर्थ लावण्याचा मी प्रयत्न करीत होतो. इतक्यात मी बसलो होतों त्याच्या शेजारच्या दाराच्या आतल्या बाजूला बांगड्या वाजल्या.

मी अगदीं चकित झालो. माझ्या शेजारचे दार उघडें असेल आणि आंत कुणी बसलें असेल ह्याची मला कल्पनाहि नव्हती. दिवाणखान्याला दारें असलीं तरी पडद्यांतून पलीकडलें काही दिसत नव्हतं. त्यामुळें दारें बंदच असतील अशी माझी समजूत होती. बझ्मे-अदबच्या ह्या चर्चेला कुणी पडदानशीन स्त्रियाहि येत असतील हें माझ्या मनातहि आलें नव्हतं. त्यामुळें काकणांचा तो नाजुक आवाज ऐकून मी अगदीं स्तिमित झालो.

इतक्यांत एक कवि म्हणाले,

"काल मी रामलीला मैदानाकडून येत होतों, तेव्हां माझ्या मनात आलें कीं दसरा जवळच आला आहे, तर त्यासंबधीं काही कविता करावी. केली आहे. ऐकवूं काय?'

"ऐकवा, ऐकवा, अवश्य." नवाब गेसूदराझखा म्हणाले.

त्याना इतर दोघा-चौघानीहि दुजोरा दिला, आणि कवि आपली बैठक सांवरून नीट बसले.

का कोण जाणे, लोकानीं त्याना जरी 'वाचा, वाचा' असें जोरात सांगितलें तरी त्यात मला सूक्ष्म अशी थट्टेची छटा जाणवली. सय्यद नूरुद्दिन मला म्हणाले,

"याचं काव्य ऐका जरा. हे स्वतःला कविश्रेष्ठ समजतात. टॉपिकल कविता करणं ह्याची खास तारीफ आहे."

इतक्यात आत पुन्हा काकणें वाजली, आणि आत एकच बाई नसून अधिक असाव्यात असें मला वाटलें. माझें मन आता काव्यवाचन ऐकण्याकडे नव्हतें. ते आंत दाराकडे लागले होते. अर्थात् कवितेचे शब्द माझ्या कानावर पडत होते:

"सिलंगन खेलने लंकाके अंदर
इरादा किये जब सब मिलके बंदर
हुई जब राम–रावनकी लड़ाई
फतह पाए हैं रामचंदर."

दाबलेलें हसूं सभ्य बंधनाना न जुमानता चहूंकडून बाहेर पडलें.

शेरवानीची गळपट्टी उगीचच बोटानीं सारखी करीत कवि इकडेतिकडे पाहूं लागले.

अंगठा आणि तर्जनीनें मिशा दुभागीत रुबाबदार स्वगत नवाबसाहेब म्हणाले,

"ठीकही तो कहा है आपने. सचही जब राम-रावनकी लड़ाई हुई तो रामचंदरजीकीही फतेह हुई. बिल्कुल सही है."

एवढं बोलून ते मिस्किल गंभीरपणानें मिशीचे आंकडे वळूं लागले.

आतल्या बाजूला मंद हास्य खुळखुळलें—हलक्या चरणचालीनें नाजुक पैंजणातून नाद होतो तसें. रेखीव, सभ्य आणि संयत.

बैठकींत चहा आला. आम्ही सगळे चहा घेऊं लागलों. आंतहि चहा आला असावा. कारण आतून बागड्याबरोबर कपबशाचीहि किणकिण येऊं लागली. मी चहा घेत होतो. पण माझें मन मात्र असभ्य कुतूहलानें पडद्याच्या आंत घुसूं

पहात होतें. मी त्या धडपडींत असतांनाच पुन्हा काव्यवाचनाला आरंभ झाला होता.

हें नव-काव्याचें वाचन होतें. जुने संकेत, जुनी शब्दयोजना, जुनीं छंदोबंधनें नको असणारे कवि होते ते. सय्यद नूरुद्दीन मला म्हणाले,

"हे आमच्या आधुनिक कवींपैकीं आहेत. आज़ाद नज़्म–free verse–चे, आणि आज़ाद इश्क–free love–चे, एक मोठे पुरस्कर्ते आहेत. कवितेची भाषा स्पष्ट, रोजच्या व्यवहाराची वापरावी, अशा मताचे आहेत. ह्यांची कविता समजायला फारशी अडचण पडायची नाहीं तुम्हांला."

त्या नव्या कवितेंत चुंबनें होतीं. निमुळत्या नाजुक ओटांचीं, उन्नत उरोजांचीं, सुवृत्त कंटाचीं, उज्ज्वल कपोलांचीं, विलोल नेत्रांचीं, विशाल भालप्रदेशाचीं, सुवासित घनदाट कृष्ण केशकलापाचीं, आरक्त कर्णाग्रांचीं—मदमस्त, रेंगाळणारीं चुंबनें होतीं. कट्यारीसारखे तिखट कटाक्ष होते. विजेच्या लोळासारखे दाहक निःश्वास होते आणि अरबी घोड्याची ऐट होती.

कवितेचा हा उघडेपणा श्लिष्टभाषेच्या भोक्त्यांना पसंत पडला नसावा असें दिसत होतें. पण हुक्क्यांतल्या लखनवी गुडाखूच्या, आणि उंची सिगारेट्‌सूच्या, मंदगंध धूम्रवलयानीं बैटकींतली हवा आधींच कोंदल्यासारखी झाली होती. त्यांत त्या कवितेनें अधिकच धुंदी आणली ह्यांत शंका नाहीं.

एव्हाना माझें मन दारावरचा पडदा सारून आत गेलें होतें. कवितेंत जी नायिका शब्दांच्या कुंचल्यानीं रंगवली होती तिच्या सजीव, स्पंदमान प्रतिमा आत बसल्या असतील का? ज्या हातांत बांगड्या वाजल्या ते आरक्त, कमलाच्या कळीसारखे मृदु असतील का? ज्या कंटांतून मंद हास्याच्या रेखीव लहरी उठल्या ते कंठ सुरईसारखे डौलदार असतील का? ज्या पोशाखांची सळसळ मधूनच जाणवली त्यानीं भूषवलेले देह वेताच्या छडीसारखे लवचीक आणि कदंबाच्या गंदासारखे भरदार असतील का? कसल्या रूपज्योति त्या पडद्यामागें झाकलेल्या असतील? त्या पडद्यामागे नुसतें रूप-लावण्य असेल कीं बुद्धि-वैभवहि असेल?

पडद्यामागें काय असेल यासंबंधींची माझी जिज्ञासा वांझोटी होती हें मला माहिती नव्हतं असें थोडेंच आहे? पण जिज्ञासा ही जिज्ञासाच. क्यूपिडचा मुखडा पहाण्याचा मोह सायकीला आवरला नाहींच ना? माझें मन मला न जुमानतां, दारें तोडून आंत घुसलें होतें. चांदणी चौकांत फिरत असतांना

मध्येंच एखाद्या वेळीं, काजळापेक्षांहि, काळ्या बुरख्यामधून चंद्रापेक्षांहि उज्ज्वल आणि सतेज असा एखादा चेहेरा अशी झळक दाखवून जातो कीं, डोळ्यांत शिरलेलें त्याचें दीप जातां जात नाहीं. चाकूच्या पात्यासारखें सरळ आणि टोकदार नाक, नश्तरासारखी तिखट नजर, गुलाबालाहि फिक्की पाडणारी कांति, आणि पोवळ्याला लाजवतील असे ओठ ह्याचें मनावर असें कांहीं प्रतिबिंब पडतें कीं, पुसटतां पुसटत नाहीं. ह्या आतां इथें पडदानशीन असलेल्या स्त्रिया चांदणी चौकांत हिंडतांना मध्येंच तोंडावरचा पडदा वर टाकीत नसतील कशावरून? कदाचित् दोन दिवसांपूर्वी चादणी चौकांत पाहिलेले चेहेरे आतां ह्या पडद्याआड असतील; किंवा आतां इथें असलेले चेहेरे दोन दिवसांनीं चांदणी चौकात पहायला मिळतील.

पण किती मूर्ख होतों मी! हेच चेहेरे मला दिसते तरी ओळखूं शकलों असतों का मी? आणि मी काव्यचर्चा ऐकायला आलों होतों, कीं पडद्यांतल्या अदृश्य चेहेऱ्यांचें निरीक्षण करायला? नाहीं, मला जिज्ञासा होती ती नुसती सौंदर्याची नव्हती. जिथें सौंदर्य कुणी पाहाणारच नाहीं तिथें सुंदर स्त्रिया कशाला येतील? नाहीं तरी सुंदर स्त्रिया नेहमींच बुद्धिमान्, साहित्यचतुर, काव्यलोलुप असतात असें थोडेंच आहे! बुद्धिमती स्त्रीचें आकर्षण तिच्या शरीरसौष्ठवांत किंवा रूप-लावण्यांत नसतें. तिच्या डोळ्यांतील बुद्धीची चमक, तिचे मार्मिक आणि मर्मभेदक उद्गार, ह्यांत तें असतें. कदाचित् ह्या पडद्यामागच्या स्त्रिया सुंदर नसतीलच. पण रसिक खास असतील. नाहीं तर ह्या बैठकीला, ज्यांत त्यांना उघड भाग घेतां येत नाहीं त्या बैठकीला, त्या आल्या असत्या कशाला! पुष्कळशा घरंदाज पडदानशीन स्त्रिया शिकलेल्या असतात, काव्यमर्मज्ञ असतात, कवयित्री असतात हें मला माहीत होतें. मोगलांच्या राणीवशांतल्या किती तरी स्त्रिया सुशिक्षित, साहित्य-रसिक होत्या. हुमायूंनामा लिहिणारी बाबरची मुलगी गुलबदनबेगम, कवयित्री सलीमा सुलताना, शाहजहानची मुलगी जहानआरा, आणि औरंगजेबाची विदुषी मुलगी झेबुन्निसा ह्या इतिहासाला माहीतच आहेत. आणि नूरजहान—अरबी आणि फारसी वाङ्मयाची व्यासंगी नूरजहान—तिनें तर पडद्यामागें राहून सबंध साम्राज्याची लगाम हातीं ठेवली.

ह्याहि स्त्रिया अशाच कोणी तरी सुशिक्षित, चतुर, सुसंस्कृत, रसज्ञ असल्या पाहिजेत. त्या कोण असतील हें जाणण्याच्या इच्छेंत अस्वाभाविक किंवा अनुचित काय आहे?

आपल्याबरोबर दुसरेंहि कुणी तरी बैठकींत असावें, पण आपल्याला तें दिसूं नये, त्याची दृष्टि आपल्यावरून फिरावी, पण आपली दृष्टि मात्र त्यापासून वंचित रहावी, ही एक प्रकारची चेष्टाच नाही का? अदृश्यतेचा झगा पांघरून परस्यूसनें म्हाताऱ्या जख्विणींची चेष्टा केली तशी ही आपली चेष्टा आहे असें मला वाटलें. जी रसिकता इतर रसिकांबरोबर देववेवीनें वाढवतां येत नाहीं तिचा कोंडमारा होत नसेल का? कीं त्याची, त्या साचलेपणाचीहि, सवय लागते!...अशा अस्वस्थ जिज्ञासेंत मी होतों. एक क्षणभर माझ्या मनात आलें,

"पर्दा उठाया, फिर गिराया, और फिर उठा बैठे,
कि देखें देखनेवालोंमें किसमें होश बाकी है."

असें काहीं तरी होऊन दार उघडून आतल्या स्त्रिया एकदम दृष्टीस पडतील...

तसें काहीं झालें नाही. मात्र आंतल्या दाराची कडी वाजली आणि त्यानें मी कल्पनेच्या त्या यक्षसृष्टींतून नवाबसाहेबाच्या दिवाणखान्यात परत आलों.

मंडळी उठूं लागली होती. मजलिस बरखास्त झाली होती. मींहि उठून आंबलेलें अंग मोकळें केलें. नवाबसाहेबांना सलाम केला. त्यानीं मुद्दाम पुढें होऊन माझ्याशीं हस्तांदोलन केलें. मीं उर्दू साहित्यासंबंधीं आस्था दाखवल्या-बद्दल आनंद व्यक्त केला. पुन्हा येण्याचें आमंत्रण केलें. नंतर सय्यद नूरुद्दीन-बरोबर मी बाहेर पडलों.

* * *

ह्या गोष्टीला आतां आठ वर्षे तरी झाली असतील. पण त्या संध्याकाळची ती आठवण काळाच्या दूरान्वयानें दुरावली नाही. ती संध्याकाळ अजून माझ्यासमोर उभी असल्यासारखी मला दिसते, आणि माझें मन पुन्हां त्या अज्ञाताशीं झटापट घेऊं लागतें.

शीशमहलच्या त्या दिवाणखान्यामध्यें अजून पूर्वीसारख्याच बज्मे-अदबच्या बैठकी भरत असतील का? कीं दिल्लीतल्या अनेक घरंदाज कुटुंबाप्रमाणें नवाबसाहेबहि दिल्ली सोडून दुसरीकडे गेले असतील? तसें असेल तर तो दिवाणखाना आणि त्याच्या मागच्या त्या खोल्या!—त्यांना आतां काय वाटत असेल? तीन पिढ्यापासून परवापर्यंत जीं माणसें तिथें आलीं आणि गेलीं, त्यानीं जी काव्य-शास्त्र-चर्चा केली, आणि पड्याआडून ज्यानीं ती ऐकली, त्या सगळ्यांच्या आठवणी तिथें अजून रेंगाळत असतील!

ऑक्टोबर, १९४८

## . ७ .

# माळव्याच्या स्मृतिच्छटा

बोलतां बोलतां इंदूरचा विषय निघाला. मीं सहज म्हटलें, "पुन्हा एकदां इंदूरला जावंसं वाटतं." तेव्हा कोणी तरी म्हणालें, "आहे काय इंदूरमध्यें एवढं?"

खरेंच, काय आहे इंदूरमध्यें एवढं? इंदूर हें कांही दिल्लीसारखें इतिहास-प्रसिद्ध शहर नाही कीं, तिथल्या सात उध्वस्त शहरांच्या दगडादगडांतून इतिहासाला वाचा फुटावी, आणि ती ऐकायला लांबलांबच्या मुशाफरांनीं यावें; तें कांही आगऱ्यासारखें जगद्विख्यात शहर नाही कीं, तिथला 'संगमरवरी अश्रु' पाहायला जगाच्या कोनाकोपऱ्यांतून प्रवाशांनीं यावें; जयपूरसारखें तें आंखीवरेखींव शहर नाही कीं, त्याची रचना पाहून प्रेक्षकांनीं कौतुक करावें; बडोद्यासारख्या तिथें छायाबहल वृक्षवीथि नाहीत, दर्शनरमणीय विशाल भवनें नाहींत किंवा तिथें एखादें म्यूझियमहि नाही कीं, ज्यांतला पौर्वात्य चित्रसंग्रह पाहण्यांत तासचे तास रमून जावें; शेजारच्याच उज्जनसारखें तें संस्कृतप्राकृत वाङ्मयातल्या नायक-नायिकांचें वसतिस्थान झालेलें नाही, किंवा हल्लींच्या कथा-कादंबऱ्यांच्याहि नायक-नायिका तिथें फारशा राहतांना दिसत नाहीत; जवळच्याच धारानगरीसारखी तिथें एखादी 'भोजशाळा' नाही, आणि अर्थातच 'भोज-राजा आणि कालिदास'सारख्या कथाहि इंदूरशी निगडित झालेल्या नाहींत. इतकें कशाला? ग्वाल्हेर एरवीं इतकें रूक्ष, नीरस, धूलिग्रस्त आणि मागासलेलें आहे ना? पण नुसतें ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर चला! लगेच तुम्हाला वर्तमाना-तून भूतकालाकडे नेण्यासाठीं कितीतरी पूर्वस्मृति चहूंकडून 'मी मी' म्हणत पुढें येतील. किल्ल्याच्या कुशींत दडलेल्या जैनाच्या अजस्र मूर्ती, माथ्यावरची

अनेक मंदिरें, महाल, कुंडें आणि तलाव, हजार दीड हजार वर्षांच्या कालावधींतल्या वेगवेगळ्या संस्कृतींचीं आणि वास्तुपद्धतींचीं हीं प्रतीकें जिकडून तिकडून तुम्हांला हांका मारतील. किल्ल्याच्या पायथ्याशीं एका बाजूला तानसेनाची आणि दुसऱ्या बाजूला झांशीच्या राणीची अशा दोन समाधि—अपूर्व कलाविलास आणि अद्‌भुत पराक्रम यांचीं चिरंतन स्मारकें—पाहून हृदय हेलावल्यावांचून राहील काय? आणि किल्ल्यावर उभें राहून लष्कर, फुलबाग, ग्वाल्हेर आणि पलीकडे मुरार यांवरून धांवती नजर फेका. ५७ च्या क्रांतिकारक उठावांतले वेगवेगळे प्रसंग मनात गर्दी करतील, गोडसे भटजींचा 'प्रवास' आठवेल, त्या प्रसंगींच्या आपल्याच लोकाच्या पराक्रमांच्या आणि नामुष्कीच्या कृत्यांचें स्मरण होऊन हर्षविषादाच्या संमर्दानें ऊर भरून येईल. एकटा ग्वाल्हेरचा किल्लाच कशाला? सबंध ग्वाल्हेर संस्थानांत सर्वत्र अशीं वैभवस्थळें अवशेषरूपानें विखुरली आहेत.

सुप्रसिद्ध विदिशा नगरी आणि तितकीच सुप्रसिद्ध वेत्रवती नदी ह्याच संस्थानांत आहेत. यवनांनींसुद्धां हिंदु दैवतासंबंधीं पूज्यभाव दाखवल्याचें एकमेव निदर्शक—हेलिओडोरसचा विष्णुस्तंभ—ह्याच संस्थानांत आहे. भारतीय चित्रकलेची चर्चा ज्यांचा उल्लेख केल्यावांचून पुरीच होणार नाहीं तीं बाघचीं लेणीं ह्याच संस्थानांत आहेत. कालिदासाचा कालनिर्णय करतांना ज्याचा परामर्श घेतल्यावांचून पुढें जातांच येत नाहीं, तो यशोधर्मदेवाचा शिलालेख मंदसौरमध्यें, ह्याच संस्थानांत, आहे. आणि कालिदासाचा बहिश्चर प्राण, त्याची वाग्विलासभूमि, जिच्यासंबंधीं कितीहि लिहिलें तरी उणेंच वाटावें ती उज्जयिनी! तीहि ह्याच संस्थानांत आहे. यक्षाचा संदेश घेऊन जाणाऱ्या मेघानें ज्या नद्यांमध्यें स्नान केलें, ज्या पर्वतांवर विश्रांति घेतली, ज्या नगरींच्या गवाक्षांतून येणारे स्वागताचे विलोल कटाक्ष स्वीकारले, त्यांतलीं किती तरी आज ग्वाल्हेर संस्थानाच्या परिसीमेंतच आहेत.

इंदूरला हें संचित लाभलेलें नाहीं. पण इंदूरला, होळकर संस्थानाच्या इतिहासाला, एक गोष्ट लाभलेली आहे, तिला इतरत्र तोड नाहीं. तें म्हणजे अहिल्याबाईचें चरित्र! विदिशा-उज्जयिनीचें महत्त्व काव्य-वाङ्मयाच्या वाचकांना, बाघच्या लेण्यांची ओढ कलेच्या रसिकांना, ठिकठिकाणीं विखुरलेल्या भग्न अवशेषांची मातब्बरी पुरातत्त्वाच्या संशोधकांना; पण अहिल्याबाईनें, बदरीकेदारापासून सेतुबंध-रामेश्वरापर्यंत, आणि द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत,

जीं पुण्यस्मारकें आपल्या मागें ठेवलीं आहेत, त्यांचें मोल रावांबरोबर रंकांना, समर्थांप्रमाणें दीनदुबळ्यांना, अनाथअपंगांना, सगळ्यांना सारखेंच आहे.

कुणी आपल्या वैभवाचें प्रदर्शन करण्याकरितां विशाल सौध-प्रासाद बांधले, कुणी आपल्या मोटेपणाची उंची दाखवण्याकरितां उत्तुंग कीर्तिस्तंभ उभारले, कुणी बाहुबलानें हस्तगत केलेल्या नगरांचें संरक्षण करण्याकरितां कोट-परकोट रचले. अहिल्याबाईनें क्षेत्रोक्षेत्रीं नद्यांवर बांधलेले घाट, घाटांशेजारीं उभारलेलीं मंदिरें, मंदिराशेजारीं चालू केलेली अन्नछत्रें हीं कांही वास्तुकलेच्या विलासाचीं प्रात्यक्षिकें नव्हेत कीं, तीं पाहून नेत्र दिपून जावेत आणि लोकांनीं 'वाहवा' म्हणून अचंबा करावा! अहिल्याबाईचीं ही पुण्यस्मारकें म्हणजे अध्वखिन्न यात्रेकरूंच्या पाठीवरून फिरणारा, त्यांचा शीणभाग घालवणारा, त्यांची भाविकता जागृत करणारा मातेचा प्रेमळ हात आहे. आणि तो जणु म्हणतो आहे, "बसा बाळांनो घटकाभर इथें, विसांवा घ्या, शीण घालवा, आणि पुढें जा. तुमची यात्रा सफल होईल!"

इतक्या अबोलपणें, सबंध भारतामध्यें ऐक्याची भावना निर्माण करण्याचें आणि माणुसकीची जाणीव जागृत ठेवण्याचें पुण्यकृत्य क्वचितच दुसऱ्या कुणी केलें असेल. "सृष्टी तुला वाहुनी धन्य" असें ज्या पुण्यश्लोक विभूतींबद्दल म्हणतां येईल, त्यांच्या अग्रभागीं अहिल्येचें स्थान आहे.

पण इंदूरला ऐतिहासिक वैभव लाभलेलें नाहीं, म्हणून तें अगदीं निस्तेज किंवा नीरस ठिकाण आहे, असें नाहीं. उलट इंदूर हें मोटें, वाढतें आणि महत्त्वाचें शहर आहे; माळव्यांतल्या वर्धिष्णु व्यापारधंद्याचें तें केंद्र आहे; जीवंत आणि जीवनप्रवाहानें स्फुरत असलेलें शहर आहे. महाराष्ट्राबाहेर जाऊन-सुद्धां आपण महाराष्ट्रांतच आहों, असें बडोद्याच्या खालोखाल इंदूरलाच वाटतें. बडोद्याला सयाजीरावांनीं रमणीयता दिली असली, तर इंदूर हें स्वभाव-रमणीय आहे. इंदूरच्या रेसिडेन्सींतला नवलखा, त्यांतली नदी आणि तिच्या तीरावरचीं निवान्त-रम्य स्थळें ज्यांनीं पाहिलीं, ज्यांनीं दिवसाच्या श्रमानंतर तिथें संध्याकाळ घालविली, ज्यांनीं केवळ मौजेखातर त्यांतून फेरफटका केला, ज्यांनीं अंधाऱ्या रात्रीं त्यांतल्या रस्त्यांनीं काजव्यांच्या सोबतीनें जा-ये केली, त्यांना त्याचा विसर पडणें कठीण. इंदूरच्या आसपास पांचसात मैल कुठेंहि जा, एखादी नदी, तळें, डोंगर, जंगल, घाट कांहीं आढळलें नाहीं असें व्हायचें नाहीं. आणि रूक्षता तर कुठेंच नाहीं!

पण याहून विशेष म्हणजे इंदूरपासून चाळीस-पन्नास मैलांच्या परिसरांत किती तरी प्रेक्षणीय आणि रमणीय स्थळें अशीं आहेत कीं, जिथें पुन्हा पुन्हां गेलें तरी नवा आनंद वाटावा आणि पुन्हा पुन्हां जावेंसें वाटावें.

होळकर कॉलेजापासून ओंकार मांधाता कितीसें लांब असेल! पण तिथें जायला आम्हाला दहाहून अधिक तास लागले, हें कुणाला खरें तरी वाटेल का? ऑक्टोबरच्या उन्हांत दिवसभर सायकल चालवून आमचीं तोंडें आणि हात लाल जांभळे झाले, आणि मुक्कामावर पोचतां जीव मेटाकुटीला आला. पण सकाळीं उठून जेव्हां तें नर्मदेचें भव्य आणि गंभीर पात्र पाहिलें आणि पलीकडच्या 'वैदूर्यमणिपर्वता'वर दृष्टि स्थिरावली, तेव्हां आमचे नेत्र धाले, सगळा शीण गेला आणि 'सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते' याचें प्रत्यंतर आलें! पर्वताच्या माथ्यावर चढून मंदिराच्या शिखराच्या गवाक्षांत घुसून लांबवर नजर टाकल्यावर जें नयनवेधक दृश्य दिसतें तें तर प्रत्यक्षच पाहिलें पाहिजे.

एकदां आम्ही देवासला गेलों होतों—तसे दोनतीनदां गेलों होतों—तिथें आम्ही गांवांतून हिंडलों. कुणी साधुमहाराज रहात होते त्यांचें दर्शन घेतलें. तिथला तो सुप्रसिद्ध 'सामलात' रस्ता पाहिला. आणि संस्थानी—म्हणजे संस्थानिकाकडला नव्हे!—पाहुणचारहि घेतला. पण मला आकर्षण कशाचें वाटलें असेल, तर तिथल्या कालिकेच्या टेकडीचें. उज्जैनींतली गडाची कालिका आज ओसाडीची अधिष्ठात्री झाली आहे, तर धारची कालिका राजघराण्याच्या कुलदेवतेला शोभेशा इतमामांत आणि बंदोबस्तांत रहात असते. देवासच्या कालिकेनं मात्र आपलें निवासस्थान आपल्या भूमिकेला आणि प्रकृतीला शोभेसें ठेवलें आहे. त्याची हयगय झालेली नाहीं, तसेंच तें फाजील माणसाळवलेंहि गेलें नाहीं. चौफेर झाडीनं आच्छादलेल्या टेकडीच्या मध्यावरचें तें गुहेसारखें देऊळ, त्याचा तो खडबडीत अंतर्भाग, देवीची ती ईषद्-भीषण आकृति, हें सर्व असें काहीं गंभीर आणि किंचित् भयप्रद आहे कीं, तें दशकुमारांतल्या किंवा कथासरित्सागरांतल्या एखाद्या कथेंतूनच तर प्रकट झालें नाहीं ना, असें वाटावें! आणि खरोखर जेव्हां जेव्हां मीं तें स्थान पाहिलें, तेव्हां तेव्हां मला विश्रुतचरितांतल्या विंध्यवासिनी दुर्गेच्या मंदिराची आठवण झाली.

* * *

एखाद्या गांवासंबंधीं कीर्ति आणि माहिती ऐकून आपण एक मनोमय चित्र

उभे करतों, आणि प्रत्यक्ष ठिकाण पाहिल्यावर त्याच्या ठिकऱ्या उडतात, असा बरेच वेळां आपल्याला अनुभव येतो. पण उज्जैन पाहून माझी जितकी निराशा झाली तितकी दुसरी कुठें क्वचितच झाली असेल.

उज्जैनला गेल्यावर मी मोठ्या जिज्ञासेनें इकडे तिकडे पाहूं लागलों कीं, कुठें तरी माझ्या मनोमय चित्राशीं जुळेल असें कांहीं तरी दिसेल!—कीं मीं चित्रच चुकीचें उभें केलें होतें? क्षीणपुण्य स्वर्गस्थ आत्म्यांनीं परत पृथ्वीवर येत असताना आपल्या उरल्यासुरल्या पुण्यबलावर खेचून आणलेलें स्वर्गाचें कांतिमत् खण्ड तें हेंच काय? कुठें आहे तें? हिरेमाणकाच्या, पांचू नील-मण्याच्या, मोतींपोवळ्याच्या, उघड्यावर राशी रचून रत्नाकराशीं स्पर्धा करणारा अवंतीचा सराफा तो हाच काय? गवाक्षातून बाहेर येणारे, नितंबकेशिनींच्या केशसंस्कारधूपाचे सुगंधोद्गार—कुठें आहेत ते? अलक्तकरागाचीं मदचिन्हें भूमीवर उमटवीत सज्ज्यांतून रुमझुमणाऱ्या लोलापाङ्गी पौरांगना कुठें दिसत नाहीत त्या? आणि ज्या गंधवतीचें जल आपल्या स्नानानें नवयुवती सुरभित करीत ती गंधवती कुठें आहे? आणि त्या नवयुवतीहि कुठें दृष्टीस पडत नाहीत!

ज्या उद्यानात शकारानें वसंतसेनेचा घात केला तें उद्यान कोणतें? आणि चारुदत्ताला ज्या मार्गानें वधस्तंभाकडे नेलें तो मार्ग कोणता? प्रद्योत राजाचा नलगिरी हत्ती उन्मत्त होऊन ज्या रस्त्यांतून इतस्ततः धावला ते रस्ते हेच काय? दगडाला रडवणाऱ्या आणि वज्रालाहि विदीर्ण करणाऱ्या 'उत्तररामचरिता'चा प्रयोग ज्या रंगमंदिरात होई तें कुठें उभारलें होतें? आणि ज्या कालप्रिया-नाथाच्या उत्सवप्रसंगाच्या निमित्तानें त्याचा प्रयोग झाला त्या कालप्रियानाथाचें स्थान आज आहे, तिथेंच तेव्हा होतें काय? आणि तेंच हें काय?

पण मी हे प्रश्न काय विचारतो आहें? अवंतीची आजची दुर्दशा पाहून अनेक कवींनीं 'कालाय तस्मै नमः' म्हणून विलाप केलेले नाहीत काय? असे वारेमाप प्रश्न विचारल्यानें निजस्वरूप उज्जयिनी कुणालाहि कशी दिसेल? मानधन उज्जयिनी, तिचें भाग्यचक्र फिरल्यापासून, अधोमुख झाली आहे. तिचें मुख वर उचलून तिला आश्वासलें तर ती ओळख देईल. किंवा त्या महाकालालाच विचारा; गडाच्या कालिकेला विचारा; नदीपलीकडल्या कालभैरवाला विचारा; भर्तृहरीच्या गुंफेतल्या अंधकाराला विचारा; घाटावर, रस्त्यावर, खंडेऱ्यांवर पायाखालीं तुडवल्या जाणाऱ्या, उन्हापावसांत, थंडीवाऱ्यांत तडकणाऱ्या आणि झिजणाऱ्या दगडांना विचारा; तिथल्या स्थलदेवतांना विचारा;

वनदेवतांना जलदेवतांना—विचारा; त्यांना बोलकें करा म्हणजे—ती उज्जयिनी, विक्रमाची उज्जयिनी, भवभूतीची उज्जयिनी, गुणाढ्याची उज्जयिनी, कालिदासाची उज्जयिनी तुमच्यासमोर उभी राहील.

* * *

पर्वत-पहाडांशीं माझी केवळ तोंडओळखच आहे—आणि तीहि कांहीं थोड्यांशींच. त्यांच्याशीं खेळून किंवा झगडून त्यांचें गूज मीं जाणून घेतलें आहे, असें मी म्हणूं शकत नाहीं. पण ज्या कांहीं थोड्यांशीं माझी ओळख आहे, त्यांतली विंध्याची ओळख मोठी प्रसन्न आहे. हिमालयासारखा तो पृथिवीचा मानदंड होऊन राहिला नसेल. पण पश्चिम सागरापासून शोणभद्रा-पर्यंत तो पसरला आहे, हा विस्तार काही अल्प नव्हे. आणि त्याहूनहि विशेष म्हणजे अगस्तीपुढें वांकून आर्यांना आपल्या पाठीवरून दक्षिणापथांत जाऊं देण्याचा मोठेपणा त्यानें मिळवला आहे. तो नम्र झाला, पण दीन झाला नाहीं. आणि अप्रसन्न तर नाहींच नाहीं.

हिमालय हा देव-गंधर्वांचा, यक्ष-किन्नरांचा आश्रयदाता असेल, तर विंध्य हा हाडामांसाच्या माणसांचा आश्रयदाता आहे. किती राजांना आणि राजपुरुषांना, राजपुत्रांना आणि राजकन्यांना, कापालिकांना आणि भिक्षूंना, यात्रेकरूंना आणि साहसी प्रवाशांना, चोरांना आणि दरवडेखोरांनाहि त्यानें आपल्या उत्संगावर खेळवलें आहे आणि कुशींत जागा दिली आहे!

पण कितीहि प्रसन्न झाला तरी पर्वतच तो! त्याचेंहि रूप कुठें कुठें उग्र आणि रौद्र असायचेंच. इंदूरजवळ पाताळपाण्याच्या, किंवा त्याच्या थोडें वरतीं मेंदीकुंडाच्या, पायथ्याशीं धबधब्याची अखंड गर्जना ऐकत, किंचित् अंधारलेल्या त्या दरींत उभे राहिलें असतांना भीतीनें हृदय थबकतें आणि अंगावर शहारे येतात. पण अशी थोडीशी भीति वाटली नाहीं, तर तो पर्वत कसला? आणि त्याच्याबद्दल आदर तरी काय वाटणार?

इंदूरच्या आसपास विंध्याचीं रमणीय स्थळें उमाप आहेत.

अगदीं सहज म्हणजे चोरल स्टेशनवर उतरून विंध्याच्या खोऱ्यांत शिरावें, नदीच्या कांठाकांठानें डोंगराच्या अंगाखांद्यावरून दिवसभर हिंडावें, आणि संध्याकाळच्या वेळेला पाताळपाण्याच्या माथ्याशीं वर यावें. चोरलचा प्रवाह कुठें ऐसपैस पसरला आहे, तर कुठें त्यानें अंग चोरलें आहे. कुठें तो मोकळ्या मनानें हंसतखेळत खळाळत येऊन डोणींत उडी घेतो आहे, तर कुठें घुम्या-

सारखा एखाद्या डोहांत मुकाट्यानें पडून राहिला आहे. एखाद्या ठिकाणीं आसमंताचें विविधरंगी प्रतिबिंब त्याच्यामध्यें स्वच्छ दिसेल, पण त्याचा थांग लागणार नाहीं; तर दुसरीकडे भोंवतालची सृष्टि बाजूला सरून त्याचेंच अंतरंग तळापर्यंत स्वच्छ दृष्टीला पडेल.

डोंगरावर चढतांना कुठें वाळू तर कुठें गरगरीत गोटे वाटेंत येतात. पाय ठरतां ठरत नाहीं. एक पाऊल वर जावें आणि तीन पावलें खालीं घसरावें. एखाद्या ठिकाणीं अशी बिकट वाट येते कीं, छातीइतक्या उंचीवर जेमतेम चवडा टेकण्याइतपत जागा सांपडते. आधाराला एखादें रानझुडुप किंवा गवताचा झुबका मिळतो. त्यावर सगळा भार टाकायचा, सगळा जीव हातापायात आणायचा, आणि देह वर उचलायचा. समजा, पाय सुटला तर? झुडुप मुळासकट हातांत आलें तर? सोबत्याच्या हाताचा आधार घेतला आणि तो निसटला तर?—वर सुखरूप आल्यावरच आपण खरोखर श्वास घेऊं लागतो. निदान तें आपल्याला कळतें. पण बिकट चढणींत एक पाय टेकलेला आणि दुसऱ्यासाटीं जागा शोधीत आहों अशा स्थितींत?—त्या क्षणाला हृदय धडधडत असतें कीं संथ असतें? धडधडत असेल तर तोल कसा सांवरतो? आणि त्या प्रसंगीं तें संथ कसें राहील? कसे सुटलों आपण त्यांतून? भीति ही खरोखर लांबूनच भिववते का?

दऱ्याडोंगरांतून केलेल्या प्रवासांची आठवण झाली म्हणजे मला नेहमीं आयुष्याच्या प्रवासाची आठवण होते. आयुष्यांत मनुष्य मागें पाहूं लागला, म्हणजे त्याला पुढें पाहण्यासारखे कांहीं राहिलें नाहीं असें समजावें असें म्हणतात. कां असें समजावें? कठिण अशा खिंडींतून, अडचणीच्या वाटेंतून, आपला सगळा जोर एकवटून, पावलापावलाला नेट देऊन, कष्टानें वाट काढीत वर आलेल्या माणसानें मागे वळून कां पाहूं नये? आणि जरासें चुकलें असतें तर मागें वळून पहायला आपण मागें राहिलोंच नसतों, अशा प्रसंगांतून सहीसलामत पार पडल्याबद्दल त्याला थोडेंसें धन्य वाटलें, तर काय हरकत आहे? मी म्हणतों, मनुष्यानें आयुष्यांत जरूर मधून मधून मागें पहावें. पुढला मार्ग कठीण असला, तर मागला अनुभव त्याला हिंमत देईल. आणि सोपा असला तर मागल्या प्रवासस्मृति त्याची करमणूक करतील. त्यानें तोंड मागें वळलेलें ठेवून पुढला रस्ता चालण्याचा आधळेपणा करूं नये, एवढेंच फार तर म्हणतां येईल.

इंदूरची आठवण झाली म्हणजे मला हे सगळे प्रवास आणि प्रसंग आठवतात. आणि वाटतें, पुन्हां त्यातल्या काहीं ठिकाणीं जावें. पण ह्या आठवणी झाल्या म्हणजे मला खरी चुटपुट लागते ती मीं न केलेल्या आणि अर्धवट केलेल्या प्रवासाची. बलिदानातून पावित्र्याचें तेज प्रकट करणाऱ्या रूपमतीच्या अद्भुतरम्य जीवनामुळे ज्या निसर्गसुंदर माडवगडाला एक निराळीच मनोहारी उज्ज्वलता प्राप्त झाली, त्या गडावर जाऊनदेखील तो न पाहता परत यावें लागावें, यासारखी हिरमोड करणारी गोष्ट दुसरी कोणती असू शकेल? पण केवळ धुकें आणि पाऊस याच्यापुढें आम्हाला हार खावी लागली. आणि धुक्याच्या अवगुंठनातल्या अर्धस्फुट सौंदर्याच्या छाया पाहूनच समाधान मानीत—किंवा असमाधान मानीत—आम्हाला इंदूरला परतावें लागलें. चार वर्षे इंदूरला होतों, पण मी महेश्वर काहीं पाहिलें नाहीं. 'जाऊ केव्हा तरी' असें करताना राहिलें तें राहिलेंच! होळकराची जुनी राजधानी, महाराष्ट्राच्या सुवासिनींना सौभाग्यवसनें पुरवणारी पेठ, अहिल्याबाईच्या वास्तव्यानें पुनीत झालेली ती भूमि मीं अद्याप पाहिली नाहीं.

नर्मदेचें मीं बरेच ठिकाणीं दर्शन घेतलें आहे. पावसाळ्यात धुंद होऊन भेडाघाटावरून बेभान उड्या टाकताना मीं तिला पाहिलें आहे. ग्वारीघाटला सरारून धावताना बघितलें आहे. ओंकाराला खोल डोह करून पोटाशीं मगरी-माशांना घेऊन बसलेलें पाहिलें आहे. खळघाटला सथपणें पुढें सरकताना पाहिलें आहे. आणि भडोचला थकून भागून ती शांत झालेलीहि पाहिली आहे. उफाळून खळाळून धावणाऱ्या या कल्लोलिनीला कुणी अडवील हें कुणाला शक्य वाटेल? पण सहस्रार्जुनानें आपल्या उद्दाम बाहूंनीं तिला अडवलें, आणि त्यांतून तिला सहस्रधारानींच मार्ग काढावा लागला. तें दृश्य मीं अद्याप पाहिलें नाहीं. महेश्वरला नर्मदेचें पात्र विशाल आणि गंभीर आहे म्हणतात. तें पाहण्याच्या तरी निमित्तानें पुन्हा इंदूरला गेलें पाहिजे.

नोव्हेंबर, १९४६

## .८.

# ओंकार मांधाता

"बाबूजी, आप ब्रह्मलोकमें हैं." सकाळीं उठून विचारलेल्या प्रश्नाचें हे उत्तर ऐकून मी स्तंभित झालो. एका अर्थी मला थोडें बरेंहि वाटलें. काहीं एक कल्पना किंवा तयारी नसताना जर एखाद्याला फर्स्ट क्लासात पास झाल्याचें कळलें तर त्याला का बरें वाटणार नाही? पण कायापालट आमच्यात झाला कीं जगांत झाला हें आम्हाला कळे ना. कारण आदल्या रात्रीं आम्ही एका धर्मशाळेंत झोपलो होतों, आणि सकाळीं जागे झालो ते ब्रह्मलोकांत! दुसरें म्हणजे मला मी ब्रह्मलोकात गेल्याचें नवल वाटलें नाहीं. पण माझ्या बरोबरचे इतर तिघे! एक त्यांतला नीट्शेचा भक्त होता. आणि दुसरा नितात सुखवादी. अशा लोकाना ब्रह्मलोकात प्रवेश करूं देणारा दरवान गाफिल असला पाहिजे यात संशय नाहीं.

नतर जेव्हा आम्ही ह्या ब्रह्मलोकातून सफर करायला निघालो तेव्हा आम्हांला तें ठिकाण इतर कुठल्याहि क्षेत्रासारखेंच असलेलें दिसलें आणि आम्हाला पृथ्वी वरच असल्याचें समाधान वाटलें. अरुद घाणेरडे बोळ. फरसबंद, खाली-वर जाणारे रस्ते, आणि त्यावरून वहाणारे सांडपाण्याचे ओहळ. सगळें अगदीं ओळखीच्या सारखें.

आणि खरोखर होतों आम्ही क्षेत्रांतच.

वास्तविक इंदूरहून ओंकारेश्वर म्हणजे ४०-४५ मैल. सायकलचा पाच—फार तर सहा—तासाचा रस्ता. पण तेवढ्या प्रवासाला आम्हांला जवळ जवळ दहा तास लागले होते. आम्ही ओंकारेश्वरला पोचलो तोपर्यंत संध्याकाळचे सहा वाजून गेले होते. आमच्या अंगांवर खंडीभर धूळ आणि ऑक्टोबरच्या उन्हानें

दिलेलें, पन्नास निस्तेज मुलींना पांच महिने पुरेल इतकें सनटॅन गोळा झालें होतें. अशा रीतीनें आम्ही मृत्युलोकचे वाटसरू ब्रह्मलोकांतल्या धर्मशाळेंत दाखल झालों होतों.

ब्रह्मलोकांतून फिरतां फिरतां नर्मदेच्या घाटावर येऊन पोंचलों तेव्हां आम्हांला कळलें कीं तिथून खाली अर्धाएक मैलावर विष्णुलोक आहे आणि नदीच्या पैलतीरावर कैलासलोक आहे. एका पंचक्रोशींत तिन्ही लोकांची सोय करून ठेवणाऱ्या योजकांची खरोखर धन्य आहे असें म्हणून आम्ही कौतुक करीत होतो. पण आम्हांला फार वेळ कौतुक करीत बसणें शक्य नव्हतें. कारण भूक सपाटून लागली होती आणि आंघोळहि करायची होती. पण आंघोळीसाठीं पाण्यांत उतरायला आमचें मन घेईना. खरें म्हणजे नदीचें पात्र विशाल आणि सुंदर होतें. पण त्या वेळीं पाणी पुरानें माजलेलें मातट असें असल्यामुळें आमचें सुसंस्कृत कॉलेजमन मागें घेई—इतकें कीं आम्ही अखेर जवळपास एखादी विहीर आहे कीं काय याची चौकशीहि केली. तेव्हां एक गृहस्थ हंसून—आमच्या मूर्खपणाला बहुधा—म्हणाले, "बाबूजी, यहां तो पुन्नवान् सब नरब्दा-मय्यामें नाहते हैं. बल्के पीने को भी यही पानी ले जाते हैं. हां, कोई पापीही ऐसा हो जो यहां आके कुंवेकी खोज करे."

ही थप्पड खाल्ल्यावर अखेर आम्ही निवांत जागीं जाऊन नदीच्या त्या पाण्यांतच स्नान केलें! पण साबण वापरायला मात्र विसरलों नाहीं. आमच्या वागण्यातल्या ह्या विरोधाभासाकडे पाहून आसपासच्या तिन्ही लोकांतले सगळे देव मिस्किलपणें हंसले असतील यात शंका नाही.

विष्णुलोकाकडे आम्ही निघालो तेव्हां वाटेंत आम्हांला एक आश्रम लागला. पण मुनिमहाराज 'मॉडर्न' असावेत असें दिसलें. कारण त्यानीं आपल्या कुटीच्या बाहेर सिनेमासारखी जाहिरात लावून त्यावर लिहिलें होतें : "माया-ब्रह्मचैतन्यमहाराज खडीसाखरेच्या खड्यांत एका क्षणात ब्रह्मसाक्षात्कार घडवतील. मुमुक्षूंनीं अवश्य लाभ घ्यावा."—आणि खरोखर आम्हाला तिथें साक्षात्कार झाला.

आम्ही हुच्च कॉलेज-तरुण होतों. कुचेष्टेच्या बुद्धीनें आंत गेलों होतों. पण बाहेर पडतांना आमचे आत्मे पश्चात्तापाच्या दाहानें विशुद्ध झालेले होते.

आंत जाऊन आम्ही अग्नीला इंधन देत असलेल्या मुनींना अभिवादन

केलें आणि इकडच्या तिकडच्या प्रश्नांनंतर सहज विचारलें, "इथें येतांना वाटेंत वाळवंटांत ठिकठिकाणीं आम्हीं चारदोन दगड एकत्र ठेवलेले आणि त्यावर पाणी-फुलें टाकलेलीं पाहिलीं, तें काय?"

ते म्हणाले, "इथें जितने कंकर उतने शंकर. पण तुम्ही हें विचारायला आलां काय?"

आम्ही : नाहीं. आम्ही आपल्या दर्शनाला आलों आहों.

मुनि : माझे दर्शन? माझें दर्शन काय घेणार? माझ्या देहाचें? तुमचा देह तसा माझा देह. अस्थि-मांस-रक्त-चर्म हा काय मी आहें? खरा मी जो आहें तो चर्मचक्षूंचा विषय नाहीं. त्याला साक्षात्कार घडला पाहिजे—

"त्यासाठींच आम्ही आलो आहों. आपण बाहेर पाटी लावली आहे ती पाहून."

"तुमची इच्छा खरी आहे काय?"

"अर्थात्!"

"टाका दोन दोन पैसे."

"पैसे?"

"कांहीं तरी दिल्याखेरीज कांहींहि मिळत नसतें. हें नाममात्र आहे."

दोन दोन पैशांत ब्रह्मसाक्षात्कार मिळत असेल तर तो न घेण्याइतके आम्ही मूर्ख नव्हतों. आम्हीं पैसे काढून ठेवले.

मुनींनीं आम्हांला चिचोक्याएवढा एकेक खडीसाखरेचा खडा दिला, आणि सागितलें, "हा तोंडांत घालून चघळा." आम्हीं 'तथास्तु' केलें.

"कसा लागला?"

"गोड."

"कशासारखा?"

"कशासारखा? कशासारखा म्हणजे?—खडीसाखरेसारखा."

"पण म्हणजे कसा? तुम्ही सगळे खडीसाखरच खाताहां. सांगा कसा गोड लागतो?"

"तें कसें सांगणार? तें खाणारालाच कळेल."

"बस. हाच ब्रह्मसाक्षात्कार. ब्रह्मसाक्षात्कार म्हणजे दुसरें काय? तो ज्याचा त्यालाच झाला पाहिजे. तो झाला म्हणजेच कळतो. आणि कळला म्हणजेच झाला म्हणायचा!"

'नीट्शे' त्यावर कांहीं विचारणार होता. पण आम्हीं त्याला दाबून म्हटलें, "झाला एवढा साक्षात्कार तुला पुरेसा झाला नाहीं काय?" आणि नंतर अत्यंत सुलभतेनं आम्हाला साक्षात्कार घडवल्याबद्दल मुनिमहाराजाना धन्यवाद देत आम्ही बाहेर पडलों.

वास्तविक इतक्या मोठ्या साक्षात्कारानंतर ओंकारेश्वराच्या ज्योतिर्लिंगाचें दर्शन घ्यायची आम्हाला आवश्यकता नव्हती. पण नर्मदेच्या पात्रातून हिंडण्याची लालसा, आणि इतकें विख्यात ज्योतिर्लिंग पाहण्याची जिज्ञासा आम्हाला स्वस्थ बसू देईना. तेव्हा आम्ही एक नावाडी पाहून, आम्हाला साक्षात्कार झाल्याचें क्षणभर विसरून, त्याच्याशीं क्षुल्लक चार आण्याकरिता घासाघीस करून त्याचा मचवा अखेर ठरवला.

उजवीकडून दोन उंच कड्यामधल्या किंचित् अरुंदशा खिंडींतून येऊन डावीकडे पसरत जाणारें नर्मदेचें पात्र एकीकडे भीषण तर दुसरीकडे खुलास वाटतें. समोरचा मांधात्याचा डोंगर जरा पलीकडे लांब असता तर जें दृश्य सुंदर आणि रमणीय वाटलें असतें तेंच तो डोंगर खोल आणि जोरदार प्रवाहाच्या जवळ आल्यानें किंचित् भयजनक वाटतें. आणि ह्या नदीच्या पात्रात मगरी आणि मोठमोठे मासे असतील काय असा प्रश्न मनात आल्यावाचून राहात नाही. तसा तो आम्ही नावाड्याला विचारलाच. त्यावर तो म्हणाला,

"हा जी, उधर ऊपरकी तरफ तो बहुत मगर-मच्छ हैं. लेकिन उमूकारजीका ऐसा परभाव हैं कि वह यहा नही आने पाते."

ओंकारजीच्या प्रभावासंबंधीं त्या नावाड्याची भावना पाहून आम्हांला मौज वाटली---पण 'नीट्शे'नें त्याला झाडलाच. तो म्हणाला,

"अजी क्या बकते हो? इसमें ओंकारजीका क्या प्रभाव है? जहा इतने यात्री आते-जाते-रहते हैं वहाँ भला मगर-मच्छ कैसे आएँगे? ओंकारजीकी बातें ओर किसीको सुनाना."

पुन्हा आम्हाला 'नीट्शे'ला चेपावें लागलें.

देऊळ डोंगराच्या अर्ध्या उंचीवर आहे. आख्यायिका अशी आहे कीं, शंकराचें लिंग इथें पक्कें बसलेलें नाही; तें हलतें, पण तें पाताळापर्यंत गेलेलें आहे! शिवाय, लिंगाच्या स्नानासाठीं नर्मदेचें पाणी आतल्या आतून--सायफनच्या तत्त्वानुसार!—आपोआप पिंडीपर्यंत येतें! हे दोन्ही चमत्कार

आम्हांला अजमावायचें होतें.

हॅट, कमरेचा पट्टा, वहाणा, कॅमेरा वगैरे सगळ्या चर्मजन्य वस्तू बाहेर ठेवून —ठेवाव्याच लागतात—आम्ही मंदिराच्या थेट गाभाऱ्यांत गेलों. आणि पिंडीला हात लावून हलवून पाहिली. पिंडी म्हणतां येत नाहीं. कारण इथलें लिंग घडीव दगडाचें नाहीं. तें स्वयंभू—आणि म्हणून ओबडधोबड—आहे. पिंडी इतकेशी भासली इतकेंच. पिंडी आणि शाळुंका याच्यांत फट आहे. तींत पाणी काठोकाठ भरलेलें होतें. तें, पुजारी म्हणाला, नर्मदेचें आहे. अर्थात् नर्मदेचेंच असलें पाहिजे. पण तें आणून घातलेलें कीं आपोआप 'आतल्या आतून चढून आलेलें' हाच प्रश्न होता.

आम्ही पिंडी हलवून पाहिल्यावर पुजाऱ्यानें म्हटलें, "पिंडी हलते ना? हलणारच. पाताळांत तिचें मूळ आहे; भूतळांत नाहीं."

अर्थात् पाताळापर्यंत जाऊन पोंचण्याची आमची हिंमत आणि तयारी नव्हती. पण निदान कुठपर्यंत हात जातो तें पहावें म्हणून आम्ही लिंग आणि शाळुंका याच्या मधल्या फटींत हात घालूं लागलों. तेव्हां पुजाऱ्याला आमचा सशयीपणा पाहून अगदीं शकरागारख्या क्रोध आला. तो म्हणाला,

"हां, हाथ मत अंदर डालिये, भगवानको तकलीफ होगी." म्हणून त्यानें हरकत घेतली.

आम्ही आणखी खोल शिरूं लागलों तर आम्हालाच उलट तकलीफ होण्याचा संभव आहे, असें पाहून आम्हीं काढता हात घेतला. पण त्या साचलेल्या पाण्याची घाण चांगला अर्धा तास तरी गेली नाहीं.

* * *

कैलास-लोकाच्या ह्या उतरणीवरून दिसणाऱ्या दोन्ही कांठावरच्या सुंदर देखाव्याकडे वळून वळून पहात आम्हीं कांट्याकुट्यांतून, दगडा-धोंड्यांतून डोंगर चढूं लागलों. आणि जसजसे आम्ही वर जाऊं लागलों, तसतसें क्षितिज रुंदावत जाऊन नर्मदेचें सगळें खोरें दिसूं लागलें. कित्येक वेळां आम्ही आपलें चढणें थांबवून त्या देखाव्याकडे पहात असूं. पण आमच्याबरोबर दिवसहि चढत होता. ऊन तापत चाललें होतें. आणि पोटें रिकामीं होत चाललीं होतीं. म्हणून आम्ही झपाट्यानें चढायला आरंभ केला. पण दहापांच खडकांवरून उड्या मारल्या नसतील तोंच 'नीट्शे' मागें पडूं लागला, आणि नंतर कांहीं तरी आव्हान करण्यासाठीं तो पवित्राहि घेत होता. पण त्याआधींच तो मटकन्

त्याखालीं बसला, आणि त्यानें डोळे झांकून घेतले. आमच्याबरोबर पाण्याच्या बाटल्या होत्या, पण त्या एव्हाना रिकाम्या झाल्या होत्या. आम्ही एक-दोघे पाणी शोधण्यासाठीं निघालों. पाणी आणायचें म्हणजे खालून गावांतून, किंवा डोंगर माथ्यावर कुठं, विहीर वगैरे असेल तर तिथून. पण सुदैवानें आमच्या समोरून एक गगडी बाई पाणी घेऊन येताना दिसली. विंध्यपर्वताची ती रम्य वनश्री, खालीं चकाकत खळाळत जाणारी नर्मदा, आम्ही दोन चार तरुण कॉलेजि यन्स—आणि त्यांतून पाण्याच्या शोधार्थ निघालेले—अशा 'सेटिंग'मध्यें, पाणी आणणारी स्त्री मूळची गोरी पण श्रमानें आरक्त झालेली, नाजुक बांध्याची, परीसारख्या हलक्या पावलांनीं चालणारी एखादी तरुणी असावी कीं नाहीं? कलेच्या आणि काव्याच्या सगळ्या संकेतांनीं ही गोष्ट निश्चित केलेली आहे. पण आम्हाला दिसलेली स्त्री गोरी नव्हती, चकित-हरिणीप्रेक्षणा नव्हती, मस्तक न्यस्तकुंभा असूनहि सुस्तनी नव्हती. ती बिचारी एक गलितगात्र, निस्तेज डोळ्यांची, सुरकुतलेल्या चेहऱ्याची म्हातारी होती. निसर्ग कलेची नक्कल करीत असतो ही गोष्ट आम्ही कालेजातल्या खोल्यांतून किती अट्टाहासानें प्रतिपादीत असू. Oscar Wilde ची आणि कलेची कदर न राखल्याबद्दल आम्हीं निसर्गाला बेवकूफ ठरवलें—म्हणजे ठरवलें असतें. पण त्या वेळी आम्हाला काव्यापेक्षा पाण्याची गरज होती. "पिपासितैः काव्यरसो न पीयते" हे सत्य बाजवीपेक्षां अधिक अट्टाहासानें पुढें येत होतें. त्या म्हातारीनेंहि, आपण धांपा टाकीत आणलेलें पाणी सिम्में-शिम्में जाणार याची पर्वा न करता, तरुणीच्या तत्परतेनें, तें आम्हाला दिलें. आणि पाण्यानेहि आपल्या धर्माला जागून आम्हाला यश दिलें. शिवाय 'नीट्झे'ला तरुणीबिरुणी असल्या भानगडी नापसत असल्या-मुळें देखील तो कदाचित् आढेवेढे न घेता शुद्धीवर आला असावा. पण एकंदरीत आमची पुढली वाटचाल निर्विघ्न झाली हे खरें.

माथ्यावर पोचल्यावर कित्येक आवारें, पडक्या इमारती ओलांडून आम्ही एका मोठ्या मोकळ्या जागेत पोचलों, तों आम्हांला ओंकारजीच्या मंदिरापेक्षांहि भव्य आणि सुंदर असें एक शंकराचें—गौरीसोमनाथाचें—मंदिर दिसलें. मंदिराचें सगळें प्रमाण भव्य आहे, आणि मंदिराची जागाहि अतिशय कुशलतेनें निवड-लेली आहे. इथली शंकराची पिंडी इतकी प्रचंड आहे कीं ती दोन माणसांच्या विळख्यांत येत नाहीं. तिसऱ्या माणसाचा हात लागतो. सख्खे मामा-भाचे

दोघे सारख्याच वयाचे असले तर मात्र त्यांच्या विळख्यांत पिंडी येते असें म्हणतात. आमच्याबरोबर एक भाचा होता. पण एकाच नावेंतून मामा-भाच्यांनीं प्रवास केला तर त्यात मृत्युभय असते, म्हणून मामा आला नव्हता. आणि दुसरा मामा-भाचा आम्हाला त्या वेळीं तिथे मिळण्यासारखा नव्हता. त्यामुळें मामा-भाच्यांनी 'ती अद्‌भुत दिव्य शक्ति' आम्हाला अजमावता आली नाहीं.

पिंडीला तडा गेल्या आहेत. पूर्वी ह्या पिंडीत पूर्वजन्म आणि पुढील जन्म दिसत असत म्हणतात. औरंगजेबानें पिंडीत पाहिलें तेव्हा त्याला आपलें भविष्य अगदीं अप्रिय दिसून आलें. त्या रागाच्या भरात त्या दिल्लीश्वरानें मंदिराला आग लावण्याची आज्ञा दिली. तीन पिंडी तडकली. तेव्हापासून त्रिजन्मदर्शन देण्याची पिंडीची शक्ति नाहीशी झाली. औरंगजेबाचें भवितव्य त्यामुळें सुधारलें कीं नाहीं कुणास ठाऊक, पण पुढल्या सर्व पिढ्यांचें भवितव्य दर्शनाचें साधन एका अविधाच्या क्रोधावेशजन्य कृत्यानें नाहीसें झालें एवढें खरें. आपली ही दिव्य शक्ति गमावून बसलेली पिंडी जेवढी प्रचंड त्याच प्रमाणात समोरचा नंदी आहे. आणि समोर देवळाच्या आवारात प्रचंड असा गणपति आणि तसाच प्रचंड मारुति आहे. मंदिराच्या आतल्या बाजूनें शिखरात चढून वेगवेगळ्या झरोक्यातून पाहिलें म्हणजे चारी दिशाना जो सुंदर, विशाल आणि प्रसन्न देखावा दिसतो तो पाहताना तिथून परतावेंसें वाटत नाहीं.

* * *

नर्मदा ही खरोखर मोटी अवखळ नदी आहे. हिला ज्या कोणीं हे नाव दिलें असेल, त्याचें अंतःकरण कवीचें असलें पाहिजे. तो तिच्या खऱ्या स्वरूपाशीं समरस झाला असला पाहिजे. एकदा उगमापासून निघाल्यावर थकूनभागून समुद्राला मिळेपर्यंत ही नदी खळाळत, उफाळत, फेसाळत, रेंगाळत—कधी खोल, कधी उथळ, कधी अंग चोरून, तर कधीं अस्ताव्यस्त पसरून, कुठे धुवाधार, तर कुठे सहस्रधार, कुठे काळ्यानिळ्या फत्तरातून, तर कुठे संगमरवरी गायागिरयातून—कधीं अडखळत, तर कधीं धांवत पळत, इतक्या विविध रूपानीं आणि प्रकारानीं जात असते कीं तिला तेच नाव यथार्थ आहे, आणि गङ्गा ही खरोखरच अगदी वाच्यार्थानें गङ्गाच वाटते.

गंगाप्रदक्षिणेची यात्रा सांगितली आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. पण

नर्मदाप्रदक्षिणेची सांगितली आहे. ती केल्यानें पुण्य लागेल कीं न लागेल तेंहि मी सांगूं शकत नाहीं. पण वैराग्याच्या नाड्यात मिसळून एक वेळ नर्मदा-प्रदक्षिणा करावी, असें मात्र माझ्या मनात अनेक वेळा येऊन गेलें आहे.

नोव्हेंबर,
१९४२

## ९.

# वऱ्हाडांत आडवाटेनें

आमची मोटर अकोला-अकोट रस्त्यानें चालली होती. आम्हांला दहि-हांड्याच्या बाजूला जायचें होतें. दिवस मार्च महिन्याचे होते. मार्चचे दिवस म्हणजे काही उन्हाळ्याचे दिवस नव्हत. दिल्ली-आग्र्याकडे, उत्तर हिंदुस्थानात, ह्या दिवसांत पिपळासारख्या म्हाताऱ्या झाडातहि जीवनरस मावेनासा होऊन कोंवळ्या लुसलुशीत, तुकतुकीत, ताबूस पालवीच्या रूपानें ओसंडून बाहेर येतो. सरसोंचीं आणि गव्हा-हरबऱ्याचीं शेते आपले जीवितसाफल्य माथ्यावर मिरवीत वाऱ्यावर डुलत असतात. माणसाच्या मनात आणि शरीरातहि एक अस्फुट अस्वस्थता चलबिचल करीत असते. ती वसंतपंचमीच्या आणि होळीच्या प्रसंगी उच्छृंखल होऊन बाहेर पडत असते. पण इथे वऱ्हाडात मात्र एकदरींत रूक्षच होते. इतके महिने अंगावर बाळगलेला धान्यभार टाकून देऊन हुश्श करीत काळी-तपकिरी धरित्री उन्हात पसरली होती. तिनें आपला एक पाय डोंगररांगेच्या आधारानें उंच करून आकाशाला टेकला होता, आणि दुसरा क्षितिजावरून पलीकडे लोंबत टाकला होता. पुन्हां तिचा क्षेत्रपति तिला नांगरील, तिच्यात बीजारोपण करील,—तें ती वाढवील, सहस्रगुणित करून बाहेर फेकील, ते कापले जाईल आणि अशा रीतीनें तिचें जीवनचक्र पुन्हा फिरू लागेल. त्या दरम्यानची विश्रांति ती घेत होती. तिच्या अफाट पसरलेल्या उंचसखल पृष्ठभागावर, वळणदार उंचवट्यांवर, घरंगळणाऱ्या उतारावर, मधून मधून आंब्या-पिंपळांची गर्द डेरेदार झाडें उभी नसतीं, कडव्याच्या पिंगट पांढऱ्या गंजी टायीं टायीं उभ्या नसत्या, तर धाड्याच्या गंकट गेमाऱ्यांनीं व्यापलेल्या त्या श्यामलेच्या देहाकडे पाहवलें नसतें. कापसाची वेचणी होऊन

गेली असली तरी कांहीं शेतांतून निष्पर्ण पऱ्हाटी उभी होती. तिच्यावरचीं तुरळक फुलें आपल्या हिरव्या पिवळ्या क्षीण स्मितानें आसमंताचा ओकेपणा सपादून नेत होतीं.

वाटेच्या वाटगगावर सावली धरण्यासाठीं उभे केलेले लिंबाचे आणि बाभळीचे वृक्ष कर्तव्यदक्ष सेवकाप्रमाणें उभे होते. पण सावली देण्याचें मुख्य साधन जी पालवी ती त्यांना सोडून गेली होती. झुंबराच्या फांद्याप्रमाणें आधीं खाली आणि मग टोकाशीं वर वळणाऱ्या कडुलिंबाच्या डहाळ्याची एक प्रकारची गुंफण होऊन सबंध झाडाचीच एक सुंदर चित्राकृति सिद्ध झाली होती. आणि कडुलिंबाचें हें सौंदर्य त्याची पालवी झडून गेल्याखेरीज दिसणें शक्य नव्हतें हेंहि खरं. पण त्या वेळीं ह्या चित्रसौंदर्यापेक्षा छायाशीतलतेची अपेक्षा अधिक होती. बाभूळ तर बिचारी पानाफुलांचा हिरवा-पिवळा भरगच्च साज अंगावर मिरवीत असतानाहि आपले काटे लपवूं शकत नाहीं! आता तर काय, तिच्या अंगावर नुसतेच कराल काटे उरले होते.

एखादे वेळीं मात्र, एक दोन मैल गेलें कीं मध्येंच, एखादी बाभळ हिरव्या नाजुक पानानीं आणि पिवळ्याधमक फुलांनीं सजून उभी राहिलेली दिसे. आणि ती जणु आपल्या इतर सर्व बहिणींच्या दैन्याची आणि असमर्थतेची भरपाई करी. मध्यें तर एकदा एक शेराचें झाड पुरुष दोन-पुरुष उंच वाढलेलें, करड्या-हिरव्या काटकुळ्या पानांबरोबरच नखाएवढ्या फिकट शेंदरी रंगाच्या फुलांनीं गजबजलेलें दिसलें. त्या शेंदरी शिडकाव्यानें आणि बाभळीच्या पिवळ्या धमक ठिपक्यांनीं इतर सगळ्या उणीवा जणुं भरून काढल्या.

चौदा-पंधराव्या मैलापाशीं, चौहाट्याच्या थोडेंसें अलीकडे, आमच्या गाडीनें अकोटचा पक्का रस्ता सोडला आणि उजवीकडे वळून दहिहांड्याची वाट धरली. पक्का रस्ता सुटला तसा डोक्यावर सांवली धरण्याचा देखावाहि संपला. आतां-पर्यंत सरळ चालणारी गाडी आता खाली-वर, डावी-उजवीकडे हेलकावूं लागली, मध्येंच उसळी मारूं लागली, आणि गप्पकन् गचकूं लागली. हीं इकडली गावें जणुं आम्हाला म्हणत होतीं, "नको, नको, तुम्ही शहरचीं माणसं. तुम्ही इकडे येऊं नका. तुम्ही आमच्या दैन्याला हसाल. आणि येणारच असाल बापडे, तर तुम्हांला ठेंचाळत, अडखळत, हिंदकळत यावें लागेल." रस्त्याच्या कडांना आणि शेतांच्या बांधांवर अनिर्बंधपणें वाढणाऱ्या बोरीबाभळींनाहि जणुं

आमचें हें आगंतुक आक्रमण पसंत नव्हतें. त्या आमच्या गाडीला चावीत आणि बोचकरीत. पण त्याच वाटेनें दहिहांड्याला एका मोठ्या मातबर जमीन-मालकासाठीं तीन ट्रॅक्टर आणि एक थ्रेशिंग मशीन गेलें होतें. असें असतांना त्यानीं आमची अडवणूक करणें म्हणजे हत्ती जाऊं देऊन शेपूट अडवून धरण्या-सारखें होतें. साहजिकच त्याचें कांहीं चाललेंहि नाहीं. आमची गाडी पुढेंच चालली.

उन्हांतून सावलींतून, दगडागोट्यांवरून, नागरलेल्या शेतांतून, ओहळांतून, नाल्यांतून आमची मोटर करोडी, धारेल, रेल, हिंगणी अशीं गावें घेत चालली होती. गांवाजवळ गाडी आली कीं चार दोन कुत्रीं मोठमोठ्यानें भुंकत गाडीवर धावून येत. त्यांच्या मागोमाग मुलें आणि माणसेंहि रस्त्यापर्यंत येऊन उभीं रहात. मोटरचा वेग कमी होई. गाव मागें पडलें कीं, पुन्हा भर्र्र करून वेग वाढे. बोरी-बाभळी गाडीला बोचकारूं लागत, दगडगोटे अडवूं लागत, आणि त्यांना न जुमानतां गाडी चालत राही.

गांवांतली बहुतेक घरें रखरखीत काळीं, मातीचीं असत. एखादेंच दगडी जोत्याचें घर उठून दिसे. क्वचित् एखाद्या झाडावर भगवें नाहीं तर पांढरें फाटकें निशाण फडकताना दिसे. म्हणजे तिथें खालीं कुठें तरी देऊळ असावें. पण सगळा रंग बहुतेक काळा मातट, मातट, मातट! ऊन एका बाजूनें पडतें तर ऊन-सावल्यांच्या विरोधानें तो एकरंगीपणा कांहीं तरी कमी झाला असता. पण सूर्य माथ्यावर येत चालल्यामुळें तेंहि होईना.

दहिहांडा कोस अर्धा कोस राहिलें असेल. तेवढ्यात मोटरींत कांहीं तरी बिघाड झाला. आणि आम्हाला अर्धा पाऊण तास तरी थांबावें लागेल असें दिसलें. गोष्ट वाईट खरीच; पण शेजारीं रस्त्याच्या कडेलाच एक गाव होतें, तें आत जाऊन पाहता येईल, म्हणून मला स्वतःला तरी त्यातल्या त्यात बरेंच वाटलें.

मोटर थांबल्याबरोबर नेहमींप्रमाणें मोटरीभोंवतीं चार पांच कुत्रीं, दहा पांच मुलें आणि दोन चार प्रौढ माणसें यांचें कडें पडलें. बायकांनाहि कुतूहल होतेंच. पण त्या मर्यादा सांभाळून लांब उभ्या राहिल्या.

त्या कड्यांतून वाट काढीत मी बाहेर पडलों. समोर डाव्या बाजूला एका शेतांत बॅडमिंटन कोर्टाएवढ्या जागेत गव्हाचा उपना चालला होता. सगळी जागा स्वच्छ सारवलेली होती. एक माणूस एका धोपाटण्यानें गव्हाच्या ओंब्या

झोडपीत होता. दुसरा एक माणूस एका तीन पायांच्या लाकडाच्या बांकावर उभा राहून हात उंचावून सुपातून धान्य ओतीत होता. धान्य खालीं पडत होतें आणि भुसा वाऱ्याबरोबर उडून जात होता. दुसऱ्या दोनतीन बाया धान्य भरीत किंवा आणखी कांही करीत होत्या. मी आत गेलो. गहूं अगदीं स्वच्छ, टपोरा, सोनेरी रंगाचा होता. दिल्लीहून मुंबईला आल्यापासून गेल्या सात आठ वर्षांत मीं असा रसरशीत, तेजस्वी गहू पाहिला नव्हता. (आणि पुढेंहि पाहीन कीं नाहीं याची वानवाच आहे!) क्षणभर मनात आलें, ह्यातले मूठभर दाणे घेऊन खिशात टाकावेत. आणि मनानेंच मी मूठ भरून उचलली देखील. पण पुन्हा म्हटलें, हा शेतकरी मला मूठभर दाणे द्यायला अनमान करणार नाही, पण ते मूठभर दाणे सध्या रेशनमध्यें मिळणाऱ्या गव्हामुळें होणारें दुःख अधिक अणकुचीदार करायचे. म्हणून मग मीं तो विचार टाकून दिला. आणि मनानेंच उचललेले दाणेहि परत टाकून दिले.

हजारो वर्षे ज्या पद्धतीनें गव्हाचा उपना करण्यात आला असेल त्याच पद्धतीनें तो चालला होता. त्या एका शेतकऱ्याच्या रूपानें माझ्यासमोर, गुराढोराचे कळप बाळगण्याचें सोडून देऊन, जमीन नांगरून गावें बसवणारा मानव उभा राहिला. आपल्या पूर्वजापेक्षा त्यानें एक पाऊल पुढें टाकलें होतें.—पण त्यापुढें?

तिथून मग मी रस्ता ओलांडून दुसऱ्या बाजूला गावाकडे वळलो. समोर उंचावर एक शाळा दिसली. माझाहि पेशा शिक्षकाचाच असल्यामुळें आपले-पणानें मी पुढें होऊन पायऱ्या चढून वर गेलो. शाळेचा एकच मोठा हॉल होता. पंधरावीस मुलें बसकरावर बसली होतीं आणि आपल्यासमोर उघड्या धरलेल्या पुस्तकातून एकाच उच्च स्वरात वेगवेगळा मजकूर वाचीत होतीं. तीसचाळीस वर्षांपूर्वीचें माझें लहानपण मला आठवलें. आम्ही असाच गोंगाट करीत असूं. ह्या गोंगाटाची गमत अशी असते कीं, तो ऐकणाऱ्याला गोंगाट होतो, —करणाऱ्याला नाहीं. मला वाटतें, आपल्यासकट सगळींच मोटमोठ्यानें वाचीत असली, म्हणजे आपलें इतराच्या आवाजाकडे लक्ष जात नाहीं. इतकेंच नव्हे तर, आपल्या मजकुरावर लक्ष स्थिरावण्याला त्या मुगारच्या वाचनाचा उपयोगच होत असावा. कवितेच्या आशयावर मन स्थिरावण्याला तालाचा उपयोग होतो म्हणतात तसेंच हें असावें. एवढें खरें कीं, तीं मुलें आपल्या वाचनात इतकीं गुंग होतीं कीं, त्याना गप्प करायला मास्तरांना बरेच प्रयास पडले.

बोलण्याला सुरुवात म्हणून मीं मास्तराना विचारलें,

" शाळेंत मुलं किती आहेत ?"

ते म्हणाले, " शाळेच्या पटावर अठरा मुलं आहेत."

" वस्ती किती आहे गावाची ?"

" असेल तीनशें-सवातीनशें. पूर्वी चारशें-साडेचारशें होती. आतां कमी झाली आहे."

मला वाटलें, वस्तीच्या मानानें चाळीस-पन्नास तरी मुलें शाळेंत जाण्या जोग्या वयाचीं असायला हवींत. शाळेबाहेरच्या मोकळ्या जागेत सहा ते दहा वयाचीं पांचसात मुलें खेळत होतीं. त्याच्याकडे पहात मीं विचारलें, " हीं मुलं शाळेचीं नव्हेत का ?"

शेजारीच गावातले कुणी तरी प्रतिष्ठित गृहस्थ उभे होते. म्हणाले, " लोक मुलांना शाळेंत धाडायला राजीच होत नाहींत. इथें शाळा निघाल्याला दोन तीन वर्षं झाली. मुलं शाळेंत यावीं म्हणून आधीं आम्हीं त्याना कुडत-टोपी देत होतों. कपडे धड असेपावेतों मुलं शाळेंत यायचीं. फाटले कीं शाळेंत यायचीं थांबायचीं."

" म्हणजे शाळेंत घालून येण्यालायक कपडे त्याच्याजवळ नाहीत म्हणून. कीं—"

" त्याचे आईबापं त्यानला कामाला लावतेत."

हें उत्तर मुद्याला धरून होतें असे समजावें कीं सोडून, तें मला कळेना.

तेवढ्यात मास्तर म्हणाले,

" गावांत ब्राह्मणाचीं घर आहेत दोनचार. पण ते आपली मुलं दहिहांड्याच्या शाळेंत पाठवतात."

" पावसाळ्यात ?"

" पावसाळ्यांत रस्ता चागला नसतो, तेव्हा तिथच कुणाकडे ओळखीदेखीनं ठेवतात."

" इथं मास्तर तुम्ही एकटेच का ?"

" एकटाच. तीन इयत्ता आहेत."

हा कोण अपरिचित अडथळा दारात येऊन उभा राहिला, म्हणून तीं सगळीं पधरावीस मुलें ' आ ' वासून डोळे मोठे करून इतका वेळ पाहात होतीं. आणि एकमेकाना कोपरखळ्या मारीत होतीं.

मास्तर पुढें म्हणाले, " पटावरच्या अठरा मुलांपैकीं दहा अस्पृश्यांचीं आहेत."

मीं त्या मुलांकडे पाहिलें. त्यांतलीं स्पृश्य कोण आणि अस्पृश्य कोण, मला कांहीं ओळखतां आलें नाहीं.

तिथून निघताना माझी वर्गाच्या भिंतीवर नजर गेली. 'राष्ट्रसंघ चिरायु होवो', 'बालकाना मान द्या', 'मनुष्याच्या मोठेपणाचा मार्ग मृत्यूच्या मैदानांतून जातो' इत्यादि इत्यादि थोर आणि गंभीर वचनें तिथें झळकत होतीं. मुलांची नजरमुद्रा पोचू शकणार नाही इतक्या उंचीवर तीं लावलेली पाहून मला वाटलें, मुलांसाठीं नमावींतच तीं. तीं मास्तरांसाठीं आणि आमच्यासारख्या आगतुकांसाठीं असावीत.

शाळेच्या मागच्याच अंगाला देवळासारखें कांहीं तरी दिसलें. म्हणून पुढें होऊन आत गेलों. ज्याला देवळाचा सभामंडप म्हणतां आलें असतें तिथें ठिकठिकाणीं शेणाचे ताजे पोहो पडले होते, धाड्यांचे तुकडे त्यांतच आसपास विखुरलेले होते, आणि 'आम्हीहि इथें आहो.' असें गोमूत्राचा दर्प ओरडून सांगत होता. गाभाऱ्यासमोरच्या नदीभोंवतालच्या जागेत धूळ आणि माती भरली होती. गाभाऱ्याच्या गजाच्या दाराला कुलूप होतें. आत पिंडीला पूजेचे संस्कार झालेले नव्हते. मागे ओट्यावर विठ्ठलरखुमाईच्या मूर्ती होत्या, त्यावर पूजेचीं चिन्हें होतीं, पण शिळीं होतीं. गावाच्या इतक्या जवळ असलेल्या देवळाची अशी दुर्दशा कां असावी असा विचार करीत मी बाहेर पडत होतों, तों एक वृद्ध गावकरी आमच्याकडे कुतूहलानें पाहात उभे असलेले दिसले. त्याना विचारलें,

"काय भाऊ, देवळाचा असा गोटा का झाला आहे?"

"काय सांगावं राजा हो, इनाम आहे देवाला, पण सेवा होत नाहीं."

"पण विठ्ठलरखुमाईच्या अंगावर वस्त्रं आहेत."

"तीं घातलीं अशीच एकान एकादशीच्या येळला!"

गांवातलीं बहुतेक घरें काळ्या मातीचीं, राखट होतीं. अनेक घरांच्या भिंती थोड्याबहुत ढांसळलेल्या होत्या. कांही घरांचीं छपरें निघून जाऊन आतले वासे दिसत होते. एकदोन ठिकाणीं गाडीचीं चाकें, धांव निखळून गेलेलीं, आऱ्याचीं दाताडें वासलेली, उन्हांत निर्जीव पडली होतीं. मनुष्याच्या गति-प्रगतीच्या त्या प्रतीकाची ती अगतिकता पाहून क्षणभर विषण्ण वाटलें. एकंदरींत सगळेंच दृश्य उदास, एकरंगी, राखट होतें. आणि वरून तळपणारें

ऊन त्यांत आणखी भर घालीत होतें. चारदोन माणसें दिसली. त्यांचेहि चेहरे निर्विकार, निरुत्साह होते. मध्येंच एक दगडाविटांचें, अगदीं ओळंब्याच्या रेषेंत येतील अशा सरळ उभ्या भितींचें, दाराला तेलपाणी दिलेलें, चुन्यानें धवळलेलं आणि गेरूच्या पट्ट्यांनी सुशोभित केलेलें घर, कळकट कपडे घातलेल्या निस्तेज कारकुनाच्या घोळक्यात कडक इस्तरीच्या कपड्याच्या एखादा ऑफिसर दिसावा, तसें दिसत होतें. तें एखाद्या वतनदार देशमुख देशपांड्याचें किंवा सावकार मारवाड्याचें असावें.

गावांतून परत येऊन आम्ही शाळेच्या ओट्यावर बसलों. तिथें गांवांतले आणखी दोनचार सद्गृहस्थ आले. गावात देवीची साथ चालू असल्याचें बोलतांबोलतां कळलें. आम्हीं विचारलें,

"देवीडॉक्टर येतात कीं नाहीं?"

"येतो आठा-चौ रोजीं."

"मग मुलं-माणसं टोचून घेतात कीं नाहीं?"

"घेनार घेत्यात बी अन् नाई घेनार नाई बी घेत."

जेनरनें जेव्हां देवीच्या लशीची प्रतिबंधक उपयुक्तता सिद्ध करून दाखवली, तेव्हां तिचा पहिल्यांदा उपयोग करणाऱ्या देशांत आपला हा हिंदुस्थान देश होता असें म्हणतात. त्याच हिंदुस्थान देशात, आज दीडशें वर्षांनंतर, गावोगांव देवीडॉक्टर फिरत असूनमुद्धा, सांथ आली तर देवी टोचून 'घेनार घेत्यात बी अन् नाई घेनार नाई बी घेत.' अशी स्थिति आहे! एखादा समाज काळालाहि कसा गिळून बसतो!

शाळेच्या ओटीवरून शें पन्नास पावलांवर आणखी एक देऊळ दिसत होतें. त्याच्या मातीच्या भिंतीचा एक कोपरा पडून गेला होता आणि आतला ओके-पणा बाहेर डोकावत होता. त्या गांवांतलें तें एकच एक मारुतीचें देऊळ होतें. तरी त्याची अशी दुर्दशा होती. त्याखेरीज गांवात आणखी एक मरीआईचें आणि एक जाखाईचें देऊळ होतें. त्या मारुतीच्या देवळाकडे पाहून मला मघांशी पाहिलेल्या शंकराच्या देवळाची आणि त्याला असलेल्या इनामाची आठवण झाली. आणि मीं त्याचा उल्लेख केला. तेव्हा एक गृहस्थ म्हणाले,

"देवाचं इनाम आमच्याच घराण्यांत आहे. पण पोटालाच पुरत नाहीं, तर देवाचं काय करणार?"

चार पडकीं देवळें, बरींच अर्धपडकीं घरें, एक जेमतेम चालणारी शाळा,

एक चांगला भला वाडा, एक विहीर आणि एक कंपोस्ट खताचा खड्डा, हीं आपल्या चतुःसीमेंत वागवणाऱ्या त्या गावाचा निरोप घेण्याची वेळ आली. कारण मोटर दुरुस्त झाली होती.

आम्ही गाडींत बसून पुन्हा पुढली वाट चालूं लागलो. गावांत नुकत्याच पाहिलेल्या दृश्यांची मनात गर्दी झाली होती ती व्यवस्थित लावीत होतो. तेवढ्यात दहिहाडा गाव दिसूं लागलें. आणि मी जागच्या जागींच जरा नीट बसलों. आज सकाळपासून आतापर्यंत पाहिलेल्या गावापेक्षा पुष्कळच मोठं दिसत होतं गांव. पण सबंध गावाचा एकंदर रंग सगळीकडचा तोच होता— राखट काळा. गांवाच्या बाहेरच्या बाजूला, पण गावाशेजारींच, झाडांच्या गर्दीत, एका आवारात एक मोठा पांढरा घुमट दिसत होता. पूर्वी मुसलमानी अमदानींत दहिहाडा हें सत्तर-पाउणशें गावांवरचें सुभायतीचें गाव होतं. त्यामुळें मला वाटलें, हा कोणा तरी मातबर मनुष्याच्या किंवा पीर-अवलियाच्या मकबऱ्याचा घुमट असावा. अकोटजवळहि गावाच्या बाहेरच्या बाजूला असेच बरेचसे घुमट दृष्टीस पडतात.

गावाशीं पोंचलों तो दुपार होऊन गेली होती. ऊन चांगलें तापलें होतें. आमची मोटर गेली ती थेट मकबऱ्यासमोरच्या मैदानांत झाडाची सांवली होती तिथें. खाली उतरल्यावर मला कळलें कीं, ज्याला मी मकबरा समजत होतों तें शंकराचें देऊळ होतें. आणि तिथेंच रूपनाथ महाराजाची समाधि होती. आमची मोटर सावलीत जाऊन उभी राहताच जणुं तिनें ओढून आणल्याप्रमाणें चारपाच माणसें आवतींभोवतीं गोळा झाली; निर्विकार कुतूहलानें आमच्याकडे पाहात उभीं राहिलीं; आणि नंतर काहीं वेळानें जशी आली तशीं नाहीशीं झालीं. आमच्या येण्यानें तिथली शांतता ढवळली गेली होती ती पुन्हा पूर्ववत् झाली. एका झाडाखाली दोनतीन गायी आणि बकऱ्या रवंथ करीत स्वस्थ बसल्या होत्या. गाडीच्या आवाजानें त्यांनीं कान टवकारले होते. ते पुन्हा खाली पाडून डोळे मिटून त्यांनी परत रवंथ चालू केलें. पलीकडे एका पडक्या भिंतीच्या वीतभर सावलीत एक कुत्रं पेंगत पडलें होतं. आमची दखल घेण्यासाठीं त्यानें मान थोडीशी वर उचलली आणि पुन्हा पायांत मुडपून घेतली. पिंपळाच्या पानांची सळसळ, लांब कुठें तरी एखाद्या घारीचें किलकिलणें, आणि एखाद्या कावळ्याची कावकाव एवढ्या जिवंतपणाच्या खुणा

बगळल्या, तर बाकी सर्व स्तब्ध, भगभगीत आणि उदास होतें.

आम्ही मुक्कामावर जायला निघालो. गावात रस्ते अरुंद, वळणें फार आणि चढउतार बरेच होते. बरीचशी घरें जुन्या घराच्या चौथऱ्यावर, त्याच्याहि काही थोड्याशाच भागावर, बांधलेली दिसत होतीं. उभ्या घराच्या आसऱ्यानें पडकीं घरेंहि जागा राखून होतीं.

चालतां चालतां आम्ही एका वळणावर आलो, तो रस्त्याशेजारच्या एका बगळीतून एक बाई उठून उभी राहिली, आणि आम्ही पुढें गेल्यावर पुन्हा खालीं बसली. मी इकडे तिकडे पहात चाललो तर आणखीहि अशीच अनिर्वर्णनीय परकलत्रं दृष्टीस पडायचीं म्हणून मी मुकाट्यानें खालीं पाहून चालूं लागलो! त्यामुळें गावातलें काहीं पाहण्यासारखें पहायचें राहून गेलें असेल तर कोण जाणे.

जेवणाची व्यवस्था यजमानानीं ह्या दिवसात जितकी थाटाची ठेवता येईल तितकी ठेवली होती. आमची जेवणं होत असता मध्येंच ते म्हणाले,

"तुम्हाला जेवणात ताजा भाजीपाला नाहीं देता आला आम्हाला, माफ करा."

आम्ही काहीं उत्तर देण्याच्या आधीच ते पुढें बोलूं लागले,

"दहिहांड्याचा भाग शेतीला चांगला आहे. पण फळ-भाजीपाल्याला वाईट आहे. इथून आसपास दोनशें चौरस मैल जमीन खारी आहे. पूर्वी इथं मिठाचं उत्पन्न फार होतं. इथं गोड्या पाण्याची फार पंचाईत आहे—"

मीं म्हटलें, "उन्हाळ्यात फारच त्रास होत असेल."

"ते विचारूं नका. एकेक हांडा पाण्यासाठीं दोन दोन कोस जातात लोक. विहिरींत झरे असले तर विहिरी आणखी खोल करतात. ओहळात, नाल्यांत खड्डे खणून ठेवतात. रात्रींत पाणी साठेल त्याची राखण करण्यासाठीं त्यावर फळी आडवी टाकून तिच्यावर निजतात. त्यांतूनहि एखादे वेळी चोरी होते. पण पाणी identifiable property नाहीं ना! त्यामुळें पोलिसात तक्रार करून उपयोग होत नाहीं."

पाणी identifiable property नसल्यामुळें 'कर्तव्यदक्ष' पोलिसांचा होणारा निरुपाय ऐकून मला एकीकडे गमत वाटली. पण लोकांची दुर्दशा मनांत येऊन म्हटलें, आज १९५० मध्यें ही स्थिति, तर सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेंत पाण्यासाटीं लढायाहि होत असतील!

जेवण आणि वामकुक्षी झाल्यावर पडल्या जागीं करमेना, म्हणून खिडकीशीं

जाऊन उभा राहिलों आणि बाहेर नजर टाकली. अकोटचा रस्ता सोडून आडवाटेला लागल्यापासून जें दृश्य पाहात आलों होतों तेंच चारी बाजूला दिसत होतें. तीच लांबवर पसरलेली काळी-तपकिरी जमीन. तीच पिंगट-करडी, खुरट्या झुडुपांचे हिरवे-पिवळे ठिपके अंगावर घेतलेली दगडाळ, बरड जमीन. कित्येक ठिकाणीं पावसाळी ओढ्यांनीं शेतांतली माती,—शेतकऱ्यानें कष्टानें नांगरून, मशागत करून, सुपीक केलेली माती,—धुऊन नेली होती. आणि ज्या वाटेनें नेली होती ती वाट मागें ठेवली होती. दहिहांड्याची शहानूर नदी पावसाळ्यांत गांवात शिरून नुकसान करी, म्हणून गावकऱ्यांनीं तिला बांध घालून वेगळया वाटेनें लावून दिलें. पण तिला जाऊन मिळणाऱ्या पावसाळी ओढयांनीं काय करावें, ह्याचा त्यांनीं विचार केला नाहीं. आपली बाहेर जाण्याची वाट बंद झाल्याचें पाहून खवळलेले ते ओढे पावसाळ्यांत क्रोधावेगानें फोंफावत मागे गावाकडे वळतात आणि गांवाची माती पोखरून खाऊन टाकतात. त्यांनीं लचके काढून नेल्यामुळें गांवाबाहेरची एका अंगाची जमीन नृसिंहानें फाडलेल्या हिरण्यकश्यपूच्या पोटासारखी दिसत होती.

वऱ्हाडच्या जमिनींत कांहींहि पेरलें तरी सोनेंच पिकतें म्हणतात. पिकतहि असेल. पण त्या सोन्याची झळाळी कोणत्याच गावातल्या घरावर (एखाददुसरें सोडून) मला दिसली नव्हती. गावातल्या माणसाच्या अंगातोंडांवर दिसली नव्हती. त्यांच्या चालण्याबोलण्यांत दिसली नव्हती. त्यांच्या वृत्तींत दिसली नव्हती. ऋतुचक्राच्या प्रवर्तनानुसार धरित्रीच्या समृद्धीला आणि वैभवाला भरतीओहोटी येते तशी तिच्या अंगाखांद्यावर खेळणाऱ्या, तिच्यावर पोसणाऱ्या तिच्या बाळांच्या वृत्तीलाहि भरतीओहोटी येत असेल काय? कीं ही निर्विकारता, कळाहीनता, त्याची नित्य प्रकृति आहे!

संध्याकाळीं आम्ही शंकराच्या आणि रूपनाथ महाराजांच्या समाधीच्या दर्शनाला गेलों. त्यांच्या पुण्यतिथीच्या वेळीं हजारों लोक जमतात. तीन दिवस भंडारा होतो, त्यांत रोज हजार पान जेवतें. आम्ही गेलों त्याच्या आदल्याच दिवशीं भंडारा संपला होता. पण आम्हांला लाह्या-बत्ताशाचा प्रसाद मिळाला, तो घेऊन आम्ही दहिहाडा सोडलें.

दिवेलागणी झाली होती. निघायला थोडासा उशीरच झाला होता. मोटर जोरांत चालली होती. दिव्याच्या उजेडांत रस्त्याचा खडबडीतपणा कांहीं वेगळाच, उठाव देऊन रेखल्यासारखा दिसत होता. नांगरलेलीं शेतें, गार्दीतून

काढून, फोडून पसरून टाकलेल्या मळक्या कापसासारखीं दिसत होतीं. बांधावरच्या बोरी-बाभळी आमच्या मोटरीला शेवटचें बोचकारून घेत होत्या. ओढ्या-नाल्यांतून, दगडा-गोट्यांतून, शेतांतून, पाणंदींतून वाट काढीत गाडी चालली होती. आकाश करडें-काळें झालें होतं. काळ्या अवकाशात आजूबाजूचीं झाडेंझुडपें अधिक काळीं दिसत होतीं. दिवसा पाहिलेलीं गावें उलट्या क्रमानें मागे पडत होतीं, आणि तिथं पाहिलेलीं दृश्यें मनापुढून झरझरा सरकत होतीं.

नोव्हेंबर, १९५१

## . १० .

# अंबा मनोहर नगरी

परळीच्या वैद्यनाथाच्या मनातून भगवती त्रिपुरसुंदरी योगेश्वरीशीं लग्न करावें असें होतें. त्या लग्नासाठीं योगेश्वरी आणि तिच्या बरोबरचें वऱ्हाड कोकणातून परळीकडे निघालें होतें. लग्नाच्या आधल्या दिवशीं, परळीच्या अलीकडे सातआठ कोसांवर, जयंती नदीच्या ऐलतीरावर तळ पडला होता. लग्नाचा मुहूर्त सकाळचा, गर्गाचार्यांचा ठरलेला होता. वेळेवर परळीला पोचता यावें यासाठीं तळ हलवून बरोबरची मंडळी योगेश्वरीला निघण्याची घाई करीत होती. आधीं बराच वेळ ती उठलीच नाहीं. आणि उठल्यानंतरसुद्धा वेशविधान, केशभूषा इत्यादि प्रसाधनकार्यांतच ती वेळ घालवूं लागली. इकडे तर लग्नाचा मुहूर्त टळेल कीं काय, असा प्रसंग उभा राहिला. मनस्विनी योगमाया बुद्ध्याच उशीर करीत होती. कारण तिच्या मनांतून वैद्यनाथाशीं लग्न करायचें नव्हतें. बरोबरच्या लोकाचा जीव खालीं-वर होऊं लागला. हिच्या अशा दिरंगाईमुळें मुहूर्त टळला तर वरपक्षाला तोंड कसें दाखवायचें? आणि जगांत अपकीर्ति होईल ती वेगळीच. तिला उचलून पालखींत घालावें आणि वाट चालूं लागावें असेंहि कांही शहाण्या सज्जनांनीं सुचवून पाहिलें. पण त्या आदिशक्तीच्या अंगाला हात लावण्याचें कोणाला धैर्य होईना.

असें हें आगे-मागें चाललें असतांनाच पहाटेचा कोंबडा आरवला. झालें, लग्नाचा मुहूर्त शेवटीं टळला. परळीच्या वैद्यनाथाशीं लग्न करायचें नाही ही योगेश्वरीची इच्छा सफल झाली. तिला कृतार्थतेचा आनंद झाला. त्या भरांत तिनें तिथेंच राहायचें ठरवलें. आणि ती जिथें राहिली तेंच योगेश्वरीचें अंबापुर, जोगाईचें अंबें झालें; शेकडों कोसांवरच्या सहस्रावधि भाविकांचें

यात्रास्थान झालें.

झाल्या प्रकारानें स्तंभित झालेली बरोबरची मंडळी भीतीनें, आश्चर्यानें, निराशेनें, लज्जेनें जागच्या जागीं स्तब्ध, अगदीं स्थाणुवत् निश्चल होऊन गेली. ती योगेश्वरीच्या मंदिरापासून कांहीं अंतरावर जयंती नदीच्या उभय तीरावर, कुणी उभी, कुणी बसलेली, कुणी आडवी झालेली अजून दृष्टीस पडतात. तिच्या लवाजम्याची छावणीहि तिथें जवळच आहे.

आदिमाया योगेश्वरीचा प्रकृतिस्वभाव अत्यंत निग्रही आणि बाणेदार हें तर विख्यातच आहे. दक्ष प्रजापतीच्या घरच्या यज्ञसमारंभाला तिला आणि तिच्या पतीला आमंत्रण नव्हतं. पण बापाच्या घरचें कार्य, ह्या आपुलकीच्या भावनेनें ती अनाहूत तिथें गेली. परंतु धनाढ्य आणि मदांध बहिणींनीं आणि मूर्ख बापानें तिथें तिचा आणि तिच्या पतीचा जो अपमान केला तो तिला सहन झाला नाहीं. तिनें तत्काळ स्वतःच्या ठिकाणीं योगाग्नि प्रदीप्त करून आपल्या देहाचें निःशेष दहन केलें. पुढें नगाधिराज हिमालयाच्या थोर कुलांत जन्माला आल्यानंतरसुद्धां तिनें पुन्हा शंकराशींच विवाह करण्याची प्रतिज्ञा केली. संकल्पसिद्धीसाठीं घोर तपश्चर्या आरंभली. प्रत्यक्ष शंकरानें कपटवेषानें तिच्या-पाशीं जाऊन तिला आपल्या विचारापासून परावृत्त करण्याची पराकाष्ठा केली. पण ती अणुमात्रहि ढळली नाहीं, उलट त्याच्यावरच कोपली. आणि अखेर शंकराशीं विवाहबद्ध होण्याचा आपला निश्चय तिनें पार पाडला.

ह्या सगळ्या गोष्टी काय कुणाला ठाऊक नाहीत? असें असताना परळीच्या वैद्यनाथाशीं लग्न करायला मात्र ती इतकी अनुत्सुक कां असावी हे खरोखर कळत नाहीं. कैलास पर्वतापुढें परळीच्या देवळाचें तें टेकाड म्हणजे मेरु पर्वता-पुढें भस्मांतला खडा असें तर तिला वाटलें नसेल? किंवा आपण शंकराची अभिलाषा धरायची त्याऐवजीं तोच आपली धरतो हा व्युत्क्रम, आणि त्यामुळें त्याच्याकडे येणारा कमीपणा, तिला आवडला नाहीं? किंवा पूर्वावतारीं केव्हां तरी, शंकरानें तिचें कांहीं अप्रिय केलें असेल, तेंच मनांत धरून तर तिनें त्याच्याकडे पाठ फिरवली नाहीं? कीं योगेश्वरीची ह्या ठिकाणीं कुमारीरूपांत उपासना होते, त्याची संगति लावण्यासाठीं ही आख्यायिका उभी करण्यांत आली आहे?

कांहीं असो; स्थानिक लोक तिच्यासंबंधीं अशी आख्यायिका सांगतात खरी. ती ऐकत असतांना माझ्या मनांत मात्र वेगळ्याच विचारांच्या धाग्या-दोऱ्यांची

गुंतागुंत सुरू झाली. लोक सांगतात, आतां अंब्याची झालेली योगेश्वरी, मुळांत कोंकणांतून, परळीच्या वैद्यनाथाशीं लग्न करण्याकरितां इकडे आली. तिकडे मुंबईजवळ साष्टी बेटावर, अंधेरीनजीक, एक जोगेश्वरी गुंफा आहे. अंब्यालाहि योगेश्वरीच्या मंदिरापासून कांहीं अंतरावर अशीच एक गुंफा आहे. परळीला जसा वैद्यनाथ आहे, तसें मुंबईत परळला गव्हर्नमेंट हाउसच्या आवारांत शके ११०९ चा जो मराठी शिलालेख सांपडला, त्यांतहि राजा अपरादित्यानें आपलें शासन लोपविणाऱ्याला 'श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबी' घातली आहे. पण परळला तर वैद्यनाथ देवाचें मंदिर ऐकिवांत नाहीं.[१] कीं त्याचाहि मूळ देव परळीचाच वैद्यनाथ? परळीहून वैद्यनाथ आणि अंब्याहून जोगेश्वरी अशीं बिंब राजाच्या अनुयायी ब्राह्मण-क्षत्रियांबरोबर मराठवाड्यांतून कोकणांत गेलीं. तीच घटना उलट फिरवून इथल्या लोकांनीं कोंकणांतून जोगाईला परत यायला लावलें असेल. अनेक कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मणांची कुलदेवताहि अंब्याची जोगाईच आहे. ती तरी कशी? असे उलटसुलट धागे माझ्या मनांत गुंतूं लागले. पण त्यांचा उलगडा तिथें कसा होणार?

अंबे जोगाई हें ठिकाण आपण केव्हां तरी पाहावें, अशी माझ्या मनांत पुष्कळ दिवसांपासून इच्छा होती. कांहीं निमित्तविशेषानें ती पुरीहि झाली. पण मनाला जो प्रसन्नतेचा आनंद वाटावा तो मात्र मला योगेश्वरीच्या दर्शनानें वाटला नाहीं. खरें सांगायचें तर आपलीं देवस्थानें पाहून क्वचितच मनाला प्रसन्न वाटतें. प्रार्थनामंदिरांच्या स्वच्छतेच्या आणि प्रतिष्ठेच्या बाबतींत मुसलमान आणि ख्रिस्ती लोक जितकी आस्था दाखवतात, त्याच्या शतांशानेंहि आपण दाखवीत नाहीं. विजापुरापासून लाहोरपर्यंत आणि अमदाबादपासून दक्षिण हैदराबादपर्यंत अनेक ठिकाणच्या लहानमोठ्या, नव्या-जुन्या अनेक मसजिदी मीं पाहिल्या आहेत. पण जिची प्रतिष्ठा आणि ओज राखली गेली नाहीं अशी एकच मसजिद (अमदाबादेंत) माझ्या पाहण्यांत आली. आणि तीहि वहिवाटींत नाहीं ह्याचें कारण ती वास्तु शापित आहे अशी समजूत आहे. एरव्हीं सगळीकडे, अगदीं ओस पडलेल्या किल्ल्यांतसुद्धां, जर मसजिद असेल तर जवळ जे कोणी चारदोन मुसलमान असतील ते तिची निगा राखतात आणि तिची अप्रतिष्ठा होऊं देत नाहींत. ह्याच्या उलट आम्ही हिंदु मात्र आपल्या देवस्थानांचें पावित्र्य आणि प्रतिष्ठा ह्यांबद्दल इतके बेफिकीर असतों कीं

१. परळ येथें संगमेश्वर वैजनाथाचें एक मंदिर आहे. वैजनाथ म्हणजेच वैद्यनाथ.

दुसऱ्यांनीं त्यांची अप्रतिष्ठा केली तर त्यांवर रागावण्याचाहि आपला अधिकार आपण गमावून बसलेलों असतों.

तोच अनुभव मला योगेश्वरीच्या मंदिरांतहि आला आणि अस्वस्थ वाटलें. देवळाचें प्रसन्न, पवित्र देऊळपणच मला तिथें दिसलें नाहीं. देवळाच्या गाभाऱ्यांत अगदीं 'लिम्पतीव तमोङ्गानि' असा किट्ट अंधार, अर्थात् नंदादीप वगळून. देवळाचा गाभारा अगदीं तमोमय असावा, जसें आपलें जीवन आहे तसा, आणि तिथला नंदादीप हा अंतरींच्या ज्ञानदिव्याचा, किंवा चिन्मय परमात्म परंज्योतीचा, प्रतीकरूप जाणावा, या गोष्टी मीं ऐकल्या आहेत आणि तसें मानतांहि येईल. परंतु दिव्याच्या तेलाचा दिपूस वास, निर्माल्याचा शिळा वास, धूपादिकांचा राखट वास यांनींहि गर्भगृह कोंदाटून जावें असें तर नाहीं ना? पण बहुधा तसाच अनुभव येतो. मी दोनचारच मिनिटें तिथें होतों. माझा जीव गुदमरून गेला. पूर्वजांचा स्मृतिगौरव म्हणून देवीसमोर यथाशक्ति कांहीं तरी ठेवलें आणि देवीचा शेंदरी तांदळा पुन्हां एकवार दृष्टिनिविष्ट करून मी बाहेर सभामंडपांत आलों.

महानुभाव संप्रदायप्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी या देवळांत दर्शनाला आले होते, त्या वेळीं त्यांनीं 'बाहेरीली दोन्ही दारवंठा धरूनी भितरीं अवलोकिलें' आणि 'कैसें स्थान सदीप. एथ जो अनुष्ठान करी तेया अनुष्ठानसिधि होईल.' असे उद्गार काढले. त्या वेळीं देवळाची ओज कशी ठेवली जात होती कुणी सांगावें? आणि आज त्यांनीं हें पाहिलें असतें तर काय उद्गार काढले असते तें तरी कुणाला ठाऊक? सभामंडपाच्या मध्यभागीं झुंबरावर मातट रंगाच्या तरटाची गवसणी घातली होती. वरच्या छतांत कांहीं कोरीव काम असेल तर तें त्याच्यामागें लोपलें आहे. देवळाची बांधणी कल्याणजवळच्या अंबरनाथच्या देवळासारखी म्हणजे नवव्या-दहाव्या शतकाची आहे. चिरे रचण्याची पद्धति, त्यांत साधलेले कोन-काटकोन, आणि मुख्यतः सुंदर विविध रेखीव कोरीव काम यांमुळें देवळाला भक्कमपणाबरोबर एक आकर्षकताहि आलेली दिसते. सभामंडपाच्या खांबांवर, तुळयांवर किवा इतरत्र मुळांत जर कांहीं कोरीव काम असेल तर तें वर्षानुवर्षांच्या चुन्याच्या पुटांखालीं लोपून अदृश्य झालें आहे. पृष्ठभागाच्या खडबडीतपणावरून त्याच्या अस्तित्वाचा काय अंधुक अजमास येईल तेवढाच. मुळांतल्या सौंदर्याची केवढी ही आंधळी अवहेलना! देवळाच्या बाहेरल्या भागाचीहि तीच स्थिति आहे.

सभामंडपाच्या पश्चिमेकडल्या बाजूला गुरवानें आपलें घर केलें आहे. ती बाजू बंदच आहे. पूर्वेकडल्या प्रवेशमार्गावर त्याची बैठक असते. त्यामुळें देवळात प्रवेश करताना आपण देवळात शिरतों आहों कीं गुरवाच्या घरांत शिरतों आहों असा सभ्रम उत्पन्न होतो. त्यातच मी गेलो तेव्हां त्या बैठकींत एक फेटेबाज इसम विडीचे झुरके घेत बसलेला होता, तें पाहून तर मला अगदींच उद्वेग वाटला. देवाच्या सभामडपांत विडी ओढणें हे मला नास्तिकतेपेक्षाहि अक्षम्य वाटतें. देवळाचे रक्षक आणि मानकरी भक्तांच्या भावनाची सौदागिरी करण्याच्याच कामाचे राहिले म्हणजे पवित्र आणि प्राचीन देवस्थान देखील किती कलाहीन होतें! मला तिथें अधिक वेळ घालवावासा वाटेना. प्रत्यक्ष वैद्यनाथाशीं लग्न करण्याला नकार देणारी तेजस्विनी आदिशक्ति योगेश्वरी हें सर्व स्वस्थपणें कसें पाहते? कीं भक्तांनीं फासलेल्या शेंदराच्या लिंपणाखालीं झांकलेल्या तिच्या दृष्टीला आपला हा अपमान दिसेनासा झाला आहे?

देवीचें देऊळ बांधलें तेव्हां तें कसें दिसत असेल, त्यावरल्या कोरीव कामाचें रेखासौंदर्य कसें असेल, ह्याचा अंदाज पाहायचा असला तर अंबे जोगाईच्याच किल्ल्यांत एक मूर्तिविहीन देवमंदिर बांधल्यावेळच्यासारखें अद्याप उभे आहे, तें पाहावें. त्यावरुन बांधकामाच्या, कोरीव कामाच्या, सौंदर्याची कल्पना येऊं शकते. तिथें खरोखरच प्रसन्न वाटतें. मुळात देवीच्या देवळातहि असेंच वाटत असलें पाहिजे. ह्या देवळाच्या समोरच गेलें म्हणजे गांवांत चतुष्पथावर मधोमध एक मंदिर आहे. एके काळीं गणपतीच्या मूर्तीनें सनाथ झालेलें हें मदिर प्रशस्ति-लेखांत वर्णन केल्याप्रमाणें 'नभोविम्बचुंबि' नसलें तरी आटोपशीर, रेखीव आणि डौलदार आहे. जिथें एके काळीं नित्य पूजिली जाणारी मूर्ति होती, त्या ठिकाणीं आता गांवांतले रिकामटेकडे लोक जुगार खेळतात किंवा झोंपा काढतात. या दोन्ही देवळात एक एक यादवकालीन शिलालेख आहे. हीं दोन्ही देवळें निजाम सरकारच्या पुराण-वस्तु-संरक्षण खात्याकडे आहेत. त्यामुळेंच बहुधा गांवांतले हिंदु तिकडे फारसे फिरकत नाहीत. शिवाय तिथें मूर्ति नाहींत हेंहि कारण असेल. परंतु मुसलमानांना मात्र तिथें जुगार वगैरे खेळण्याला मज्जाव नसावा असें दिसतें. तथापि, त्या लोकानीं तिथले ते शिलालेख (शक्य असून देखील) उध्वस्त किंवा विद्रूप केले नाहींत हे त्यांचे उपकारच म्हटले पाहिजेत.

जी स्थिति योगेश्वरीच्या मंदिराची तीच नागझरीच्या पवित्र तीर्थाची. त्याचा फार महिमा ऐकून तिथें गेलो, तों नागझरीचें कुंड वडारणींचा पाणोठा झालेला

दिसला. त्यांचें तोंड धुणें, अंग धुणें, कपडे धुणें, सगळें तिथेंच चाललें होतें, आणि रहाटगाडग्यांच्या माळेसारखी त्याच्या जाण्यायेण्याची माळ फिरत होती. बाहेरगांवाहून भाविकतेनें स्नानासाठीं आलेल्या लोकांना बराच वेळ तिष्ठत राहिल्यावांचून जागाहि मिळत नसे. खरोखरच रमणीय होऊं शकलें असतें असें हें स्थान आहे. पण—

* * *

योगेश्वरीच्या देवळावरून मुकुंदराजाच्या समाधीकडे जातांना वाटेंतच नदी-पलीकडे एक लेणें आहे. पुण्याच्या पाताळेश्वराची आठवण करून देणारें हें लेणें जमिनींत खोल खणून कोरलेलें आहे. त्यामुळें, त्या ठिकाणीं लेणें असावें अशी लांबून कल्पनाहि येत नाहीं. हत्ती, नंदी वगैरेंच्या भव्य मूर्ति तिथें उन्हापावसानें कुरतडलेल्या आज हजार-बारारों वर्षे उभ्या आहेत. हें लेणें म्हणजेच लोकाच्या आख्यायिकेंत योगेश्वरीच्या लग्नाच्या वऱ्हाडाची छावणी झाली आहे. ह्या लेण्यातल्या लोकांचेच सगे-सोबती, आणखी जरा पुढें, रस्त्याच्या बाजूच्या कपारींत, रस्त्यावरच्या पुलाखालीं, आणि पुलाखालून वाहणाऱ्या ओढ्याच्या पात्रांतहि, काही भग्न आणि काहीं भग्नप्राय असे, शतकानुशतकें उन्हा-पावसाचे, थंडी-वाऱ्याचे, दैवी आणि मानवी तडाखे खात पडले आहेत. काहीं मूर्ति खरोखरच सुंदर आहेत. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून वाटेनें जाणाऱ्या वाटसरांच्या भावना काय थोड्याशा हिंदळत-हेलकावत असतील तेवढीच त्याची कदर !

त्यांना बाजूला टाकून जातांना पुनः पुन्हां त्यांच्याकडे मागे वळून पाहिल्या-वांचून राहवत नाहीं.

* * *

मुकुंदराजाच्या समाधीचें स्थान किती शांत, प्रसन्न आणि रमणीय आहे तें अगदीं खोऱ्याच्या कडेशीं आल्याखेरीज कळत नाहीं. इतकें रमणीय स्थान अंब्यांत दुसरें नाही. हा मुकुंदराज, विवेकसिंधूचा कर्ता मुकुंदराजच कीं दुसरा कोणी, यासंबंधीं विद्वानांत नेहमींप्रमाणेंच मतभेद आहेत. मुकुंदराजाचे गुरु रघुनाथ आणि परात्परगुरु हरिनाथ यांच्या समाधि मध्यप्रांतांत आहेत. आणि कोणा एका मुकुंदराजाची समाधि बैतुलजवळ खेडल्याला आहे. ह्यावरून विवेक-सिंधूचा मुकुंदराज तिकडला असावा, अंब्याचा नसावा, असें अनुमान काढण्यांत आलें आहे. अंबे–जोगाईचा मुकुंदराज कोणी असो, अंब्याचे लोक त्यालाच

विवेकसिंधूचा कर्ता मानतात, आणि श्रद्धेनें त्याच्या समाधिस्थानीं उत्सव-भजनादि कार्ये करीत असतात एवढें खरें.

दरीच्या अर्ध्या उतारावर डोंगराच्या कपारींत समाधि आहे. समोर अंगण आहे. खोल दरीमध्यें खालीं जयंति खळाळत चालली आहे. मागें-पुढें चौफेर गर्द झाडी पसरली आहे. ग्रीष्मागमाचा समय असूनसुद्धां तिच्यावर चित्र-विचित्र छटांचें रंगवैभव खेळतें आहे. फुलांनीं डवरलेलीं पांढऱ्या चांफ्याचीं गेंदासारखीं झाडें तर खोऱ्यांत इतकीं आहेत कीं, दासोपंतांनीं पुराणिकाचें वर्णन करतांना 'मस्तक भरूनि फुलें । चंपकाचीं ॥' म्हटलें तें सांकेतिकपणें नव्हे तर वस्तुस्थितीच्या आधारावर हें दिसून येतें. खालच्या बाजूला खोरें रुंदावत जाऊन, त्यांतून पश्चिमेकडल्या, लांबवरच्या दऱ्याडोंगरांच्या चढत्या उतरत्या रेषा एकमेकींना ओलांडतांना दिसत आहेत. उन्हाळ्याच्या आरंभींचें हें नयनमनोहर दृश्य वर्षाऋतूंत केवढ्या वैभवानें उफाळून उठत असेल! समाधीच्या खालच्या बाजूला बुटीनाथाचें रम्य ठिकाण आहे. आणि वरती घोडदरा, जिथें अंबापुरचा राजा जैत्रपाल घोड्यासकट डोहात बुडाला तो.

हा जैत्रपाल मोठा विक्षिप्त ब्रह्मजिज्ञासु होता. गांवांत कोणी साधु आला म्हणजे यानें त्याला ब्रह्म दाखवायला सांगावें आणि त्यानें दाखवलें नाहीं म्हणजे त्याला सक्तमजुरी द्यावी. असे शेंकडों साधू त्यानें तळें खणण्याच्या आणि आपल्या अश्वशालेसाठीं चणे भरडण्याच्या कामाला जुंपले होते. त्याची ही कीर्ति ऐकून मुकुंदराजांनीं त्याला ब्रह्म दाखवायचें ठरवलें. त्यांनीं जैत्रपालाला घोड्यावर स्वार होऊन आपल्याबरोबर यायला सांगितलें! राजा जैत्रपालानें घोड्याच्या एका रिकिबींत पाय ठेवला, आणि दुसरा उचलून ठेवतो आहे, तेवढ्यांत मुकुंदराजानें घोड्यासकट राजाला एक चाबकाचा फटकारा हाणला. तत्काल राजा आणि घोडा जागच्या जागीं खिळले, ते सात दिवस. सातव्या दिवशीं राजाची समाधि उतरली. त्यानें ताबडतोब मुकुंदराजाचे पाय धरले. त्याला ब्रह्म तर दिसलेंच, पण समाधीच्या बरोबरच त्याची गुर्मीहि उतरली होती. त्यानें सर्व साधूंना सत्कारपूर्वक निरोप दिला. मुकुंदराजहि जायला निघाले. त्यांच्या मागो-माग राजाहि घोड्यावर बसून निघाला. राजा मागोमाग येत आहेसें पाहून महाराजांनीं पळायला आरंभ केला. वाटेंत जयंति नदीचा उभा कडा लागला. तेव्हां महाराजांनीं एकदम पैलतीरावर उडी मारली आणि ते अदृश्य झाले. त्यांच्या मागोमाग राजानें आपला घोडा घातला; पण घोड्यासकट तो डोहांत

पडला आणि तिथेंच त्या दोघांना जलसमाधि मिळाली. तोच हा घोडदरा.

गर्विष्ठ राजांना शहाणपण शिकविण्याचें दुष्कर कार्य आपल्या ह्या देशांत अनेक सत्पुरुषांनीं केलें आहे, इतकेंच सत्य कदाचित् या आख्यायिकेंत असेल. पण त्या कथेशीं निगडित करण्यासाठीं स्थळें निवडण्यांत लोकानीं औचित्य दाखवलें आहे ह्यांत शंका नाहीं.

अंबें हें गांव जोगाईचें खरें, पण विवेकसिंधूचे कर्ते मुकुदराज आणि विशालतेंत सागराशीं स्पर्धा करणाऱ्या गीतार्णवाचे कर्ते दासोपंत ह्यांच्यामुळेंहि अंब्याला महाराष्ट्रांत प्रख्याति मिळाली आहे. मी ज्याच्याकडे उतरलों होतों ते जेव्हा मला म्हणाले कीं, 'चला, आपण देवघरीं जाऊन पासोडी पाहूं.' तेव्हां मला साहजिकच फार आनंद झाला. सव्वालक्ष 'गीतार्णव', सव्वालक्ष 'पदार्णव' आणि सहस्रावधि इतर रचना करणारे दासोपंत म्हणजे उद्यमशीलतेचा प्रतिमहासागरच ! इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या नित्य वापरण्याच्या वस्तूंशीं त्यांचें सगळें जीवनचरित्र निगडित झालेलें असतें. त्या त्या वस्तूच्या दर्शनामुळें त्यांचें व्यक्तित्व जणुं जागतें होऊन आपल्या सन्निध टाकतें; आणि त्यांच्याशीं आपला साक्षात् संबंध आल्याचें समाधान लाभतें. मला वाटलें होतें, ही दासोपंतांची पासोडी म्हणजे त्यांची पांघरायची पासोडी असेल. पण दासोपंताची ही अडीच हात रुंद आणि चोवीस हात लांब अशी पासोडी म्हणजे त्यांच्या उद्योगशीलतेची पराकाष्ठा आहे. तीवर त्यांनीं आपल्या हातानें 'पंचीकरण' हा समग्र ग्रंथ लिहिला आहे.

ह्या पासोडीचें टोंक पाण्यांत भिजवून तिचें तीर्थ घेतलें म्हणजे ताप, जाळ, भूतबाधा वगैरे नाहींशीं होतात असें म्हणतात. खरें खोटें कोण जाणे, पण केवळ तिच्या दर्शनानें आपल्यामधल्या आलस्यपिशाचानें पळ काढावा एवढा उद्योगाचा प्रपंच त्या पासोडीवर उभा आहे एवढें खरें. त्यांचें टळक रेखीव वळणदार अक्षर पाहून त्यांच्या श्रमाचें कौतुक तर वाटतेंच, पण मन अगदीं प्रसन्न होतें. दासोपंत अतिशय व्यवस्थित गृहस्थ होते. देवपूजेच्या, उत्सवांच्या वगैरेसंबंधीं त्यांनीं अगदीं स्पष्ट आणि कांटेकोर नियम घालून दिले ते त्यांच्या दोन्ही देवघरांत आजतागायत पाळले जात आहेत. दररोजच्या लिहिण्यासाठीं दोन पैशांची, म्हणजे कदाचित् एक बुधलेंभर, शाई ज्याला लागायची, त्याला इतका उद्योग करून शिवाय सर्व गोष्टी काटेकोरपणें नियमबद्ध करण्याला वेळ कसा

मिळत असेल ह्याचें नवल वाटतें. दासोपंतांची पासोडी, त्यांचा गीतार्णव, आणि इतर ग्रंथ ही खरोखर राष्ट्राची संपदा आहे. त्यांच्या वंशजांनीं ह्या वस्तूंचें जीवापाड जतन केलें आहे हें त्यांना खरोखर भूषणावह आहे. आजपावेतों चारशें वर्षें टिकाव धरून राहिलेल्या या वस्तू कालवशात् जर्जर होत आहेत. कोणी संशोधक, अभ्यासक, अजीजी दाखवून, अगत्य दाखवून त्यांतला काही कांहीं भाग घेऊनहि जातात; पण नेलेलें परत करीत नाहींत. कांही व्यक्तींच्या हलगर्जीपणामुळें, अशा रीतीनें राष्ट्राची हानि होते आहे. यापुढें या वस्तूंची जपणूक, अधिकारी संस्थाकडून व्हायला हवी. नाहीं तर कालांतरानें त्या नष्ट झाल्यावांचून राहणार नाहींत.

* * *

अंबे जोगाईची बाजारपेठ, आणि खांचखळग्यांमुळें उंचसखल झालेले आणि पदोपदीं धुळीचा खकाणा उडवणारे तिथले रस्ते माझ्या अपेक्षेशीं सुसंगत होते. पण तिथल्या घरांच्या त्या काळ्या दगडाच्या पांच-सहा पुरुष उंचीच्या भिंती, त्यांमधून वळणें घेत जाणारे अरुंद बोळ, हीं मला अनपेक्षित होतीं. त्या भिंतींच्या तटबंदीमुळें प्रत्येक घर किल्ल्यासारखें वाटतें. एका प्रवेशद्वाराखेरीज रस्त्यावर खिडकी वगैरे क्वचितच कुठें दिसते. त्यामुळें मध्येंच रस्त्यांतली रहदारी थोडा वेळ बंद झाली म्हणजे त्या उंच, भक्कम, अजस्र भिंतींमधून वाट काढीत जाणाऱ्या चिचोळ्या बोळातून वळणें घेत जाताना आपण एखाद्या 'नानाजन-पदाकीर्ण' अशा गजबजलेल्या गावांत नसून, इतिहासाला हुलकावणी देऊन आड जागीं उभ्या असलेल्या एखाद्या निर्जन गांवांतून भटकतों आहों कीं काय अशी शंका येते, इतकें एकदम शुक्क वाटतें.

नाही तरी अंबें जोगाई हें गाव एका बाजूलाच आहे. एकीकडे बार्शीहून आणि दुसरीकडे परळीहून तिथें जातां येत असलें तरी तिथें एकंदरींत हालचाल कमीच. योगेश्वरीमुळें मराठी संस्कृतीशीं, आणि मुकुंदराज-दासोपंतांमुळें मराठी वाङ्मयाशीं, तें निगडित झालें असलें, तरी ह्या गोष्टी आठवणींनींच उजळून काढायच्या. मुख्य रस्त्यावरच्या गांवाची सळसळ तिथें नाहीं. आज गांवाला आधुनिकतेचा जीवंतपणा, तेज कशामुळें असेल तर तिथल्या कार्यकर्त्यांमुळें. तिथल्या नागझरीची पवित्र जलधारा जशी अखंड स्रोतस्विनी आहे तशीच ह्या मंडळींची ध्येयनिष्ठ कार्यधारा आज वर्षानुवर्षें अडीअडचणींतून खांचा-खबदडींतून वाट काढीत अखंड वाहात राहिलेली आहे आणि तिथलें जीवन

तिनें जीवंत ठेवलें आहे.

योगेश्वरीच्या ह्या सगळ्या आठवणी बरोबर घेऊनच मीं परळीच्या वैद्यनाथाचें दर्शन घेतलें. त्यासंबंधींहि इथेंच लिहायला हवें. पण ज्याच्याशीं विवाहबद्ध व्हायचें योगेश्वरीनें निग्रहपूर्वक नाकारलें, त्याची मीं इथें तिच्याशेजारीं प्रतिष्ठापना करणें अगदीं अनुचित होईल, म्हणून तूर्त तरी मला इथेंच थांबलें पाहिजे.

एप्रिल, १९४८

# . ११ .

# ‘ परल्यां वैद्यनाथं च ’

संध्याकाळीं योगेश्वरीचा निरोप घेतला, आणि रात्रीं आठ-साडेआठाच्या बेताला अंब्याहून निघालों तो वैद्यनाथाच्या दर्शनासाठीं परळीच्या वाटेला लागलों. प्रवास सारा पंधरा मैलांचा आणि तोहि बसनें करायचा, म्हणजे जेमतेम तासाचा. पण येडशी-येरमाळ्याकडून बस येणार, ती अंब्याच्या तळावर पांच-चारच मिनिटें थांबणार. उतारूंची गर्दी मी म्हणत होती. अधल्या-मधल्या स्टेशनावर जागा मिळण्याची आगगाडीवर जशी पंचाईत तशीच अधल्या-मधल्या तळावर बसलाहि पंचाईत. परंतु दाटीदाटीनें कां होईना, बसमध्यें बसण्यापुरती जागा मला मिळाली आणि मला धन्यता वाटली.

उतारूंची आणि सामानाची चढ-उतार संपून बस चालूं लागली, आणि तिची एकसुरी सरसर-खडखड सुरू झाली. थोडयाच वेळानें गांव, योगेश्वरी विद्यालया-साठीं योजलेली नवी जागा, नागझरीचा टापू हीं मागें पडलीं. माझेंहि लक्ष्य पुढल्या मुक्कामाकडे लागलें. तोंडानें, मला वाटतें, मी ‘ परल्यां वैद्यनाथं च ’ असें पुटपुटत होतों. लहानपणीं पाठ असलेल्या, आणि आतां विस्मृतीच्या खंडेऱ्यांत लुप्त झालेल्या शिवमहिम्नस्तोत्राचा ‘ महिम्नः पारं ते परमविदुषो यद्यसदृशी । स्तुतिर्ब्रह्मादीनाम्’ इत्यादि चरणांच्या आधारानें चुकतमाकत, मनांतल्या मनांत स्मरणोद्धार करीत होतों. आणि माझ्या डोळ्यांसमोर एक वयस्क अग्निहोत्री ब्राह्मणाची सौम्य मूर्ति येत होती. लहानपणीं हैद्राबादला असतांना एक ब्राह्मण, दुपारीं बरोबर अकरा-साडेअकराच्या दरम्यान, नित्यनियमानें येत, ओसरीच्या कडेशीं उभे राहात, आणि ‘ यज्ञेश्वराय नमः ’ असें उच्च स्वरांत म्हणून आपलें तांब्याचें लखलखीत भिक्षापात्र पुढें करीत. त्यांत आम्ही नेमानें मूठ

अर्धी मूठ तांदूळ घालीत असूं, डोक्याला तांबडी बनातीची कानटोपी, कपाळावर आणि डोळ्यांच्या खालीं-वर भस्माचे पट्टे, दोन भुंवयांमध्यें आडवें लंबगोल कोरडें लाल कुंकूं, अंगावर थंडीच्या दिवसांत तांबडी शालजोडी, आणि एरव्हीं रुइफुली रेशीमकांठी उपरणें, खालीं दाभणकांठी धोतर, अंगानें सडपातळ, चेहरा लांबट आणि वर्ण तांबुसगोरा. अग्निहोत्राच्या तांबुस अग्निज्वालेशीं सुसंवादी, रक्तवर्णप्रचुर वेषभूषा केलेली आणि नित्य पाहिलेली ती मूर्ति मनांत ठसली होती. आम्ही मुलें त्यांना 'यज्ञेश्वर' शास्त्रीच म्हणत असूं. 'यज्ञेश्वर'-शास्त्री परळीचे राहणारे होते असें त्या वेळीं ऐकलें होतें. आतां मी परळीकडे चाललों होतों, म्हणूनच मला वाटतें, परळीचा म्हणून पाहिलेला तो एकच एक मनुष्य जणुं सगळ्या परळीकरांचा प्रतिनिधि होऊन माझ्या मनाच्या ओसरीच्या कडेशीं पुन्हां 'यज्ञेश्वराय नमः' अशी प्रत्यभिज्ञेची हांक देऊन उभा राहिला.

मी मनांतल्या मनांत त्यांच्याकडे पाहात होतों; तोंडानें 'परल्यां वैद्यनाथंच' असें यांत्रिकपणें पुटपुटत होतों. मधूनच एखादें टेकाड किंवा उंचवटा येई, रस्ता वळण घेई किंवा खळग्यात उतरून वर चढे, त्या वेळीं गचके बसत त्यांना शिव्या देत होतों. उतारूंनीं आधींच दोहोंकडून चेपलेलें अंग आणखी आंवळून चोरून घेत होतों. विड्यांच्या धुराचा कडवट-तिखट वास, आणि उतारूंच्या घामट अंगांतून आणि मळकट कपड्यांतून येणारा भपकारा, टाळण्यासाठीं आधींच्या गुदमऱ्यांत आणखी नाकावर रुमाल दाबीत होतों. 'अमंगल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलम्' असें म्हणून ती स्थिति आदरपूर्वक स्वीकारणें मला शक्य नव्हतें. तासाभराचाच प्रवास, पण केव्हां संपतोसें वाटूं लागलें.

पण तेवढ्यांत वैद्यनाथाची कृपा झाली आणि उतारू हालचाल करूं लागले. परळी जवळ येत चालली होती. माझें मन आपल्याशींच दंग होतें तें भानावर आलें. कांहीं लोक गांवांत उतरले. मी रात्र स्टेशनांत काढून सकाळीं वैद्यनाथाच्या दर्शनाला जाणार होतों.

सकाळीं उठल्यावर मीं गांवाकडे पाहिलें. ज्या टेकडीवर वैद्यनाथाचें मंदिर आहे असें ऐकलें होतें, ती कोस-अर्ध कोसावर दिसत होती. सगळीकडे जाग आली होती. स्टेशनाच्या हॉटेलांत कपबशा खडखडूं लागल्या होत्या. आवारांत पोर्टरांच्या घरासमोर म्हशी रेकूं लागल्या होत्या. कोंबडे आरवत होते. कुत्रीं भुंकत होतीं. लहान पोरें रडत-ओरडत आयांच्या मागें हिंडत होतीं. दर्शनाला

जाणारे कोणी उतारू आहेत का पाहण्यासाठीं गांवांतल्या ब्रह्मवृंदांपैकीं कांहींचीं पावलें स्टेशनाकडे वळलीं होतीं. मला दर्शनाला जायचें होतें म्हणून रात्रपाळीच्या स्टेशनमास्तरांनीं एक पोरसवदा ब्राह्मणपुत्र माझ्याबरोबर दिला, आणि नीट दर्शन करवण्याबद्दल त्याला बजावलें.

योगेश्वरीनें अव्हेरलेल्या देवाधिदेवाच्या दर्शनाला मी चाललों होतों. मी मुंबईचा रहिवासी. परळ गावच्या लोकांना ज्या वैद्यनाथदेवाची भाल 'सकुटुंबिया पडे' अशी अपरादित्यानें धास्ती घातली होती त्या वैद्यनाथाच्या दर्शनाला जातांना मला विशेष जिज्ञासा वाटावी हें साहजिकच होतें. शिवाय प्रज्वलिकानिधानाचा हा वैद्यनाथ म्हणजे एखादा गांवाशेजारचा शिव-महादेव नसून बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. साध्या शिवलिंगाचें दर्शन घेतलें तर सात जन्मांचें पातक नाहीसें होतें. हें तर ज्योतिर्लिंगाचें दर्शन. परळीचा ब्राह्मण सगळा भिक्ष-भोजी. त्याला उपजीविकेची विवंचना नको म्हणून पेशव्यांनीं समस्त ब्रह्मवृंदाला भूमि दान केलेली. त्यामुळें साहजिकच मला वाटलें होतें कीं, इथले ब्राह्मण निरंतर शिवोपासनेंत मग्न असतील. मी जात होतो त्या पहांटेच्या प्रसन्न वेळीं, टेकडीच्या पायथ्यापासून मंदिरापर्यंतच्या वाटेवर दोन्ही अंगाना बेला-फुलाचीं, पूजा-साहित्याचीं, दुकानें लागली असतील. रात्रीं केलेल्या पापांचें क्षालन व्हावें म्हणून शिवदर्शन घेण्याकरिता जाणाऱ्या-येणाऱ्याची रीघ लागली असेल. त्यांच्यांतलेच कोणी स्नानें करून ओलेत्यानें जात-येत असतील, त्यांच्या वस्त्रांतून आणि इतरांच्या पूजाकलशातून ठिबकलेल्या पाण्यानें मधली वाट भिजून गेली असेल. आणि अशा शीत, शांत, गंभीर, प्रसन्न आणि पवित्र वातावरणांत वैद्यनाथाचें दर्शन घेऊन मी कृतार्थ होईन.

पण मीं जसा गावाच्या जवळ येत चाललों तसा निराश होत चाललों. स्टेशनापासून जो डोंगर मोटा वाटत होता तो जवळ आल्यावर टेंगणा वाटूं लागला. असें पुष्कळदां होतें. कांहीं डोंगर लांबून लहान वाटतात, पण जवळ गेल्यावर त्यांची भव्यता जाणवते. पण ह्याच्या उलट कांहीं लांबून उंच वाटतात, पण आल्यावर तितके उंच वाटत नाहींत. तसेंच परळीच्या डोंगराचें आहे. भगवान् शंकराचें ज्योतिर्लिंग तिथें प्रकट झालें तेव्हां त्यालाहि हें जाणवलें असावें. कैलासाच्या उच्च शैलशिखरावर ज्याची नित्य वसती त्याला बव्हंशीं निरस्तपादप अशा ह्या टेंकडीवर राहण्याची पाळी आली तेव्हां त्याचा अतिशय

हिरमोड झाला असेल. म्हणूनच मला वाटतें, त्याचें प्रारंभींचें मंदिर अगदीं क्षुद्र आणि संकुचित होतें. पण देवमंदिराची दीनावस्था भक्ताला कशी सहन व्हावी? अहिल्याबाई होळकरणीनें तें अदेवसदृश मंदिर पाहिलें मात्र, तिनें ताबडतोब नवें भव्य मंदिर बाधण्याचा निश्चय केला आणि तसा हुकूमहि सोडला. पण शोधशोधूनहि तिला बांधकामाला योग्य दगड कुठं सापडेना. आपल्या मंदिरासाठीं नव्हे, पण भक्ताची इच्छा पूर्ण करण्यासाठीं देवाला मध्यें पडावें लागलें. त्यानें तिला स्वप्नात दृष्टांत दिला कीं, अमुक ठिकाणीं पहार चालव, तुला हवा तसा आणि तितका दगड लागेल. तिनें देवादेशाप्रमाणें करताच मनमानेइतका दगड सांपडला आणि त्यातूनच वैद्यनाथाच्या भव्य आकाराला शोभेसें विशाल मंदिर सिद्ध झालें. तेवढाच भव्य सभामंडप झाला. आणि त्याला साजेसें प्रवेशद्वार उभं राहिलें. पलीकडे शेजारींच—कदाचित् इथूनच मंदिरासाठीं दगड काढला असेल—मार्कंडेय तीर्थ आहे. शिवलिंगाला घट्ट मिठी मारून बसल्यामुळेंच ज्याला यमपाश बांधूं शकले नाहींत त्याचें तीर्थकुंड शिवलिंगाशेजारींच असावें यात औचित्यच आहे.

मला आधीं वाटलें होतें कीं, शिवभक्तांच्या दाटींतून वाट काढीत मला मंदिराकडे जावें लागेल. पण मी गेलों तों मंदिराच्या उंच चढणीवर चारपांचहि माणसें नव्हतीं. पूजासाहित्याचें दुकान एकहि नव्हतें. मी आत गेलों तों सभामंडपहि रिकामाच होता. त्यामुळें आम्हीं वाजवलेली घंटा उगीचच फार मोठ्यानें वाजली असें मला वाटलें. आम्ही आल्याची आत वर्दी पोंचवायला एवढा मोठा निनाद आवश्यक नव्हता. एखाद्या क्षुद्र घंटिकेची किणकिणहि त्याला पुरेशी होती. माझी कल्पना होती कीं, मी सभामंडपांतून गाभाऱ्याशीं जाईन तेव्हां 'नमो भवाय च रुद्राय च नमः शर्वाय च पशुपतये च...' असा घनगंभीर रुद्रघोष आंतून कानावर येईल. दोनचार ब्राह्मण वैद्यनाथाभोवतीं बसलेले होते. आणि मंद स्वरांत काहीं तरी म्हणतहि होते. कदाचित् 'पयश्च मे रसश्च मे घृतं च मे मधु च मे...' असें देवाजवळ मागत असावेत. स्वतःसाठीं नाहीं तर दुसऱ्याकडून पैसे घेऊन त्याच्यासाठीं मागत असावेत. पण कदाचित् स्वतःसाठींहि मागत असतील. कारण माझ्याबरोबरच्या ब्राह्मणपुत्रानें मला सांगितलें कीं, हल्लीं ब्राह्मणांना दिवस वाईट आले आहेत. लोकांची देवाधर्मावर पूर्वीसारखी श्रद्धा राहिली नाहीं. ब्राह्मणांना पूर्वीसारखी प्राप्ति होत नाहीं. खरें, देवापुढें जें कांहीं ठेवलें जाईल तें गुरवाचें, त्यावर ब्राह्मणांचा अधिकार नाहीं,

असा गुरवा-ब्राह्मणांचा तंटा कोर्टांत जाऊन निवाडा झाला आहे.

दर्शन घेऊन प्रदक्षिणा पुरी करून मंदिरांत सर्वत्र फिरून बाहेर पडण्यासाठीं मी महाद्वारांत आलों, आणि क्षणभर तिथेंच उभा राहिलों. खालच्या बाजूला गांव पसरलेलें होतें. कच्चे रस्ते, धाब्याचीं आणि कौलारू घरें. देशावरचें कोणतेंहि गाव जसें मळकट आणि धुळकट दिसतें तसेंच हें दिसत होतें. गांवाच्या एका अंगाला पोस्टाची तांबडी पाटी दिसत होती. पलीकडे जिनिंग फॅक्टरीचें उंच धुराडें होतें. आणि त्यापलीकडे जरा अंतरावर स्टेशनाचें आवार आणि त्यांतले एकमेकांना छेद देऊन जाणारे चकचकीत रूळ दिसत होते. एकूण नव्या जमान्याच्या कर्कश करांगुलीचा स्पर्श ह्याहि गांवाला झाला होता आणि त्याचा शिक्का त्यावर बसला होता.

माझी नजर पुन्हा गांवावर फिरली. ह्याच गांववस्तींत कुठें तरी पांच-सातशें वर्षांपूर्वी जगमित्र नागाचें घर असेल. त्याचें चरित्र मला आठवलें आणि जिन, स्टेशन, पोस्ट ऑफिस ह्यांचा मला विसर पडला.

भगवंतांनीं व्याघ्ररूप घेतलें आहे आणि त्याला उपरण्याच्या टोंकाला बांधून जगमित्र नागानें गांवांत आणलें आहे; बायकापोरांची गाळण उडाली आहे; ती सगळी मिरवणूक आपल्या घराकडे येतांना पाहून हवालदाराचें धाबें दणाणलें आहे; त्याच्या बायकोपोरांनीं आकांत मांडला आहे; जगमित्राच्या आणि गांवकऱ्यांच्या हातापायां पडून हवालदार अखेर आपली कशी तरी सोडवणूक करून घेतो आहे;—हीं दृश्यें मी मनोमन पाहात होतों. तेवढ्यांत माझ्या पोरसवदा वाटाड्यानें हांक मारून म्हटलें,

"झालं महाराज सर्व दाखवायचं."

माझें लक्ष्य मंदिराच्या आवारांतल्या एका बगीच्याकडे गेलेलें पाहून तो म्हणाला, "आमच्याकडे एक मुसलमान तालुकदारसाहेब होते. त्यांनीं गांवांतल्या मुलांना खेळण्यासाठीं ही बाग करून दिली आहे. त्यांचंच नांव दिलंय तिला."

हिंदु मंदिराच्या आवारांतल्या उद्यानाला मुसलमान अधिकाऱ्याचें नांव दिल्याचें उदाहरण निजाम राज्यांतच पाह्यला मिळेल. किंवा कदाचित् त्या उद्दाम मुसलमान हवालदारानें अधिकारमदानें जगमित्राशीं जो अतिप्रसंग केला होता त्याचें प्रायश्चित्त म्हणूनहि तालुकदारानें गांवकऱ्यांच्या मुलांसाठीं हें उद्यान करून दिलें असेल.

मंदिरापुढल्या पायऱ्या उतरून खालीं येत असतांच ब्राह्मणपुत्र मला म्हणाला,

"कांहीं अभिषेक वगैरे करायचा असेल तर आज्ञा व्हावी."

"काय खर्च येईल ?" मीं विचारलें.

"काय आपल्या मर्जीला येईल त्याप्रमाणें करतां येईल. अमकाच असा कांहीं खर्च नाहीं. जसं द्रव्य द्याल तसा अभिषेक होईल."

"तरी पण ?"

"तसा आमचा कांहीं जोरा नाहीं ! कोणी चार आण्यांपासून सुद्धां देतात !"

तो माझ्याबरोबर तास दोन तास हिंडत होता. तेवढ्यासाठीं तरी त्याला कांहीं तरी द्यायला हवेंच होतें. मी त्याच्या हातावर मला योग्य वाटली ती रक्कम ठेवली आणि म्हटलें,

"तुम्हांला ह्याचें वाटेल तें करा. अभिषेक करा किंवा करूं नका. हें माझ्याकडून तुम्हांला दिलें आहे."

असें म्हणून मीं त्याला नमस्कार केला. आम्ही टेकडयांच्या पायथ्याशीं आलों होतों. तो गांवाकडे गेला. मीहि 'नमो नेदिष्ठाय प्रियदव दविष्ठाय च नमः।' म्हणून वैद्यनाथाला मनोमन वंदन करून, इतक्या वेळचें त्याचें सान्निध्य सोडून निरोप घेऊन निघालों.

नोव्हेंबर, १९५०

# . १२ .

# हिडाल्गोची करमणूक

माझें सगळें लक्ष्य त्या भव्य मुखाकडे लागलें होतें. हनुवटी किंचित् आंत ओढल्यामुळें खालच्या मांसल भागाला थोडासा फुगवटा आलेला होता. खालचा ओठ वरच्या ओठाच्या मानानें जरा जाड आणि पुढें येऊन वळलेला. नाक सरळ आणि सुबक. दृष्टि ध्यानांत मग्न आणि निमीलित. जणुं मिटलेल्या डोळ्यानीं सृष्टीचें अखंड निरीक्षण चाललेलें आहे. हनुवटीचें दार्ढ्य आणि स्मिताचें मार्दव यांचा त्या मुखावरचा संगम विलक्षण मनोवेधक होता. कदाचित् त्या स्मितांत, आपल्या कर्तृत्वाचें आपणच कौतुक करून घेणाऱ्या माणसासंबधीं ईषद् उपहास असेल; कदाचित् उगीचच धडपड करणाऱ्या मानवाबद्दल, वडील माणसाना लहान मुलांबद्दल वाटतें तसें, कौतुक असेल. हनुवटीचें दार्ढ्य 'मी तुमच्या सगळ्या लीला जाणतों. माझी दृष्टि निमीलित असली तरी मला सगळें दिसतें आहे. दुष्टांना शासन झाल्यावाचून राहणार नाहीं.' हें सूचित करीत असेल. ती मुद्रा, ती चर्या, तें ध्यानावलोकन, मर्त्य मानवाचें नव्हतें. तें मृत्युंजय महेशाचें होतें.

चित्तवृत्ति तल्लीन होऊन माझी दृष्टि त्या मुखावर एकाग्र झाली असतांना एकाएकीं मला असें वाटूं लागलें कीं, इतका वेळ मिटलेले हे डोळे चटकन् उघडणार तर नाहींत? निरस्मितामध्यें स्थिरावलेलें हें ओष्ठसंपुट विलग तर होणार नाहीं? शतकानुशतकें किंचित् कलतें राहिलेलें हें शिर वर उचललें तर जाणार नाहीं? आज माणसानें माणुसकीला जो काळिमा लावला आहे तो पाहून क्रोधानें त्या धनुराकार भृकुटीचा भंग तर होणार नाहीं? आणि तसें झालें तर! तसें झालें तर—?

पण तसें झालें नाहीं. ती भव्य पण प्रमाणबद्ध पाषाणमुद्रा विचलित झाली नाहीं. ती पाषाणप्रतिमा होती तशीच राहिली. माझें मन विचलित झालें. माझी एकाग्रता भंग पावली. मला भानावर आणलें,

“टडडम्–टडडम्–टडडम्–टडडम्
टडडम्–टडडम्–टडम्--टडम्
किस्मत हमारे साथ है–हाँ–
जलनेवाले जला करें–हॉ–
जलनेवाले जला करें...”

ह्या जोरकस, ठेक्यांत उच्चारलेल्या शब्दांनीं. मला आधीं वाटलें, कोणी पुरभय्ये असतील. पण सिनेमांतल्या गाण्यांची भाषा पुरभय्यांची असली, तरी त्यांना तीं गाणीं सफाईनें गातां येत नाहींत! तीं गातां येतात शहरांतल्या शाळा-कॉलेजां-तल्या विद्यार्थ्यांना. आणि पुरभय्यांपेक्षां त्यांना तीं गाणीं आवडतातहि अधिक मीं वळून पाहिलें. गाणारी मंडळी पुरभय्ये नव्हती. शहरी लोक—बहुधा कॉलेज-विद्यार्थीच—होते, आणि नाचत गात होते.

ज्या ठिकाणीं प्रवेश केल्यानंतर तिथलें भव्य शिल्प-दृश्य पाहून मस्तक आदरानें लवावें आणि मन आश्चर्यानें स्तिमित व्हावें; ज्या ठिकाणीं श्वासोच्छ्वास करतांना आपण कांहीं बोललों तर तें त्या स्थानाला अनुचित तर होणार नाहीं ना, या शंकेनें वाणी मूक व्हावी; ज्या ठिकाणीं पाऊल टाकीत असतांना तें अनाठायीं पडत नाहीं ना, अशी शंका येऊन पावलें भीत भीत पडावीं; त्याच ठिकाणीं निःशंकपणें गोंगाट करण्याचें कांहीं लोकांना धारिष्ट होतें ह्याचें कारण, तिथल्या मूर्ति पाषाणाच्या आहेत, त्या आपलें पारिपत्य करणार नाहींत, ह्या विश्वासामुळेंच ना? ज्या ठिकाणीं गायन झालें तर एखाद्या तानसेनाचें शास्त्र-शुद्ध तपःपुनीत आणि सुस्वर गायन व्हावें, ज्या ठिकाणीं नृत्याचे पदविन्यास झालेच तर ते भरतनाट्याचेच व्हावेत—नटराज शिवाला नृत्य प्रिय नाहीं असें कोण म्हणेल?—अशा ठिकाणीं चार दिवसांहून अधिक काळ टिकण्याची ज्यांची पात्रता नाहीं अशीं गाणीं कशीं तरी कंठांतून काढीत, कोणी तरी उद्धत पदाघात करावे, ह्यापेक्षां त्या स्थानाचा अधिक उपमर्द काय होऊं शकेल!

मुसलमानांनीं आपलीं मंदिरें उध्वस्त केलीं, आपल्या मूर्ति विच्छिन्न आणि विद्रूप केल्या, हें आपण नित्य पाहतो आणि आपलें अंतःकरण त्वेषानें आणि निष्क्रिय क्रोधानें थरथरतें. परंतु इस्लामला वृक्ष, पशुपक्षी आणि मानव ह्यांच्या

प्रतिमांचें पूजन मान्य नाहीं. मुस्लिमांच्या धर्मदृष्टीनें तें महापाप आहे. कुफ्र आहे. म्हणून धर्मांधपणें केलेलीं हीं कृत्यें उद्वेगजनक असलीं तरी क्षम्य समजतां येतील. परंतु घारापुरीच्या लेण्यांतल्या मूर्तींचे अवयव मुसलमानांनीं धर्मांधपणे तोडले नाहींत. १६०३ सालापर्यंतमुद्धां संबंध लेणें---शिल्प, भिंती आणि छत—सुंदर रंगांनीं रंगविलेलें होतें. त्यापूर्वी आणि पुढें जवळजवळ एक शतकभर लेणीं आणि सबंध बेट पोर्तुगीजाच्या हातीं होतें. लेण्यांतल्या मूर्तींचा विध्वंस आणि चित्रांचा नाश बराचसा त्यांनीं केला. कॅथलिक पोर्तुगीजांना तर प्रतिमापूजन वर्ज्य नव्हतें! प्रभू येशूच्या आणि त्याच्या पवित्र मातेच्या प्रतिमांची ते भक्तिभावानें पूजा करतात, त्यांच्यापुढें धूप-दीप जाळतात, त्यांना हार-फुलें वाहतात, त्यांच्या पायाशीं गुडघे टेकून अघमर्षण करतात आणि मागणें मागतात. त्यांना त्या शिल्पाची भव्यता दिसली नाहीं?—दिसली. तिनें ते इतके आश्चर्यचकित झाले कीं, ते मानवाच्या हातून निर्माण झालेलें असेल असें त्यांना वाटेना. इतका त्यांच्या मनावर त्या शिल्पाचा प्रभाव पडला. पण ते हिंदूचे देव होते. आणि पोर्तुगीजांचें भारतांतलें नियत कार्य हिंदु धर्माचा उच्छेद करून या भूमीवर ख्रिस्ताचा सूळ रोवावा हें होतें. म्हणून त्यांनीं घारापुरीच्या लेण्यांचे तबेले केले, तिथल्या गुहा शिपायांना बराकी म्हणून दिल्या, आणि समोरच्या उघड्या जागेची चांदमारी केली. एका हिडाल्गोनें तर केवळ करमणूक म्हणून समोरच्या अंगणांत तोफ बसवून लेण्याच्या मुख्य मंडपांत गोळे सोडले. गोळे आंत पडल्यावर त्यांचा जो धुडुम्–धुडुम् –धुडुम् ध्वनि उठला, आणि त्याचे आंतल्या आंत जे पडसाद घुमले ते ऐकून त्याला मोठी गंमत वाटली. त्रिगुणात्मक भवनदीच्या कलुषित प्रवाहाचें शतकानुशतकें ध्यानावलोकन करीत असलेल्या त्या महेशमूर्तीलाहि हिडाल्गोच्या त्या चेष्टा पाहून करमणूक वाटली असेल.

पोर्तुगीजांनंतर इंग्रज आले. त्यांनींहि घारापुरीच्या बेटावर आपली शिबंदी ठेवली. त्या शिबंदींतल्या शिपायांनीं आपलेहि हात लेण्यांतल्या मूर्तींवर, तिथल्या खांबा-भिंतींवर चालवले. पोर्तुगीजांपेक्षां इंग्रज धर्माच्या बाबतींत अधिक सहिष्णु असतील. पण ज्या इंग्रज शिपायांनीं ताजमहालाची नाजुक आरसपानी नक्षी खरवडायला मागेंपुढें पाहिलें नाहीं, त्यांना घारापुरीच्या त्या खरबरीत दगडांत कोरलेल्या लेण्यांची काय मातब्बरी वाटावी? आणि त्यांनीं आपल्या चाकू-सुऱ्या, किंवा छिन्न्या काय म्हणून आवराव्या?

बेटावरची शिबंदी उठली. लेणीं पावसाळ्यांत आसऱ्याला फार चांगली होतीं. गांवांतल्या शेतकरी-गुराख्यांनीं आपलीं गुरें तिथें बांधावीं, शेण्या-गोवऱ्यांचा तिथें सांठा करावा, सप्तमातृका मंदिरांत किंवा त्याच्या समोरच्या गणपतीच्या सोप्यांत चुली घालाव्या आणि तिथेंच वसती करावी. त्यांनींहि लेण्यांची फारशी बूज राखली नाहीं. ते तर हिंदूच होते ! लेण्यांचे देव त्यांचेच देव होते ना? पण ते अडाणी, जडमूढ, गांवकरी होते. क्षमाशील महेशानें त्यांच्या अज्ञ आचरणाकडे क्षमेच्या दृष्टीनेंच पाहिलें असेल किंवा त्यानें तिकडे डोळेझाक केली असेल.

पण सुशिक्षित, सुसंस्कृत, नागरजनांनीं परधर्मीयांचें पारुष्य, अज्ञजनांचा अडाणीपणा आणि अनादर आपल्या ठिकाणीं एकवटावा ! जिथें आल्यानतर महेशमूर्तीच्या दर्शनानें भूत-भविष्य-वर्तमानाचा आपोआप विसर पडून आपण त्या रूपाच्या अवलोकनात तल्लीन व्हावें, त्या ठिकाणीं, एका वेगळयाच अर्थानें त्या भव्य शिल्पाचा आपल्याला विसर पडून आपण आपल्या मौजेत दंग व्हावें, इतकीं आपली मनें बधिर आणि संस्कार लुप्तप्राय झाले आहेत ! बुत्‌शिकन गझनवी महमूदाचा कडवेपणा आपल्या ठिकाणीं नाहीं, तशीच बुत्‌परस्तांची असीम धर्मश्रद्धाहि नाहीं. आपण केवळ उदासीन किंवा जडबुद्धि झालों आहों, असा ह्याचा अर्थ आहे काय?

जें भव्य आणि दिव्य सौंदर्य निर्माण करण्यासाटीं छिन्नीचा एक एक घाव घालीत शेकडो लोक अनेक वर्षे खपले असतील, ज्या शिल्पाची मनांतल्या मनांत योजना करण्यासाटीं कलावंताला दीर्घकाल समाधि लावावी लागली असेल, त्याची छिन्नीच्या एका घावानें, बंदुकीच्या एका गोळीनें, खिळ्याचाकूच्या एका ओरखडयानें, अनुचित शब्दाच्या एका उच्चारानें, आपण एका क्षणांत अप्रतिष्ठा करूं शकतों ह्याची जाणीव न ठेवतां वागणें हेंहि एक प्रकारचें vandalism च आहे. मग त्याला vandalism म्हणोत अथवा न म्हणोत.

पण सृष्टिकर्त्या महेशाच्याहि क्षमाशीलतेला मर्यादा आहेच. त्याच्या उग्र रूपाची आपल्याला कल्पना यावी म्हणून महेशमूर्तीचें तें दक्षिण मुख कसें दाखवलें आहे पहा. 'रुद्रं यत् ते दक्षिणं मुखम्' हें मंत्रोच्चारण चुकीचें असेल, पण महेशमूर्तीचें तें दक्षिण-मुख खरोखरच रुद्र आहे. क्रोधानें रक्त गोळा झाल्यामुळें तें फुललें आहे. नाकपुड्या थरथरताहेत. भ्रुकुटी आकुंचित होऊन वर आल्या आहेत. मिशा अग्निशिखांसारख्या उफाळत आहेत. ओठांतून

बाहेर पडणारी जीभ संयमानें दाबून धरलेली आहे. वरचा मुळा डोकावत आहे. जटांतून सर्प बाहेर पडताहेत. मुकुटांत नरकपाल आहे. भालप्रदेशावरचा तृतीय नेत्र उघडण्याच्या बेतांत आहे. तो उघडला तर त्यांतून निघणारा क्रोधाग्नि जगाचा संहारच करील. पण हा संहार सूडाचा नाहीं. द्वेषाचा नाहीं. तिरस्काराचा नाहीं. जगाचें पुनरुज्जीवन व्हावयाचें तर किल्मिष जळून गेलेंच पाहिजे. संहारावांचून पुनर्निर्मिति नाहीं,—म्हणून संहार आहे. अनिवार्य, निर्वैर संहार आहे तो.

पण ह्या कल्पान्ताला अनंत अवधि आहे. तोंपर्यंत हें जगत् चाललेलें आहे तसेंच चालत राहील. लोक कडू तें गोड करून घेतील. कोंड्याचा मांडा करतील. दुःखें साहतील. सुखाच्या क्षणांतून हुरूप मिळवतील. असुंदर साहित्यांतून सौंदर्य निर्माण करतील. आपलें वितस्तिमात्र जीवन योजनप्रमाण मानून सगळे व्यवहार करतील. त्यांचें संरक्षण मातेच्या मायेनें महेशमूर्तीचें वाममुख करतें आहे. तें किती सौम्य-सुंदर आहे! त्याच्या किरीटाची आणि त्याखालच्या केसांची रचना तरी किती कौशल्यानें केली आहे! त्या भरलेल्या खालच्या ओठाची बाहेरची कडसुद्धां शिल्पकारानें किती खुबीनें—

पण गाणाऱ्या मंडळीनें दुसरें कांहीं तरी गाणें सुरू केलें, आणि माझें चित्त व्यग्र झालें तें झालें. मी तिथून उठून पलीकडे गेलों. पश्चिमेकडे टांक्याच्या बाजूला शंकर-पार्वतीच्या विवाहमंगलाचें शिल्प आहे. ती अजून त्याची पत्नी झालेली नाहीं; कारण ती पहा—ती त्याच्या उजव्या अंगाला उभी आहे. विवाहानंतर तिला त्याच्या डाव्या अंगालाच राहिलें पाहिजे. तिची सखी तिच्यामागें उभी आहे. ब्रह्मदेव उपाध्याय आहे. विष्णु, इंद्र इत्यादि देव विवाहसमारंभासाठीं आले आहेत. शंकराची मुद्रा प्रसन्न आणि सस्मित आहे. पार्वतीच्याहि मुखावर नववधूला उचित असे भाव आहेत. त्यांत संकोच आणि लज्जा आहे. ज्या शंकराच्या प्राप्तीसाठीं तिनें घोर तपश्चर्या केली, कोणाच्याहि विरोधाला जुमानलें नाहीं, त्याच शंकराचें पाणिग्रहण करतांना तिचा तो धीटपणा कुठें नाहींसा झाला आहे; आणि तिच्या पित्याला, तिच्या मागें उभें राहून, तिला धीर द्यावा लागत आहे. त्यासाठींच त्यानें तिच्या उजव्या दंडावर आपला हात हळुवारपणें ठेवला आहे. साहजिकच आहे. प्रिय अशा पतीच्या घरीं जाण्यासाठीं तिचें चित्त उत्कंठित झालें असलें तरी मातृकुल सोडतांना अंतःकरणा-

बरोबरच पाऊलहि जड व्हावें हें स्वाभाविक आहे. विवाहानंतरच्या जीवनाचा विचार, तें जीवन प्रिय अशा पतीबरोबरचें असलें तरी, जीवाला शंकाकुल करतो. त्या दिशेनें पडणारें पहिलें पाऊल म्हणजे ज्ञातांतून अज्ञाताकडे जाणारें. तेव्हां तें आरंभीं तरी थबकावें यांत नवल नाहीं.

शंकर प्रसन्न असला म्हणजे जितका प्रेमळ, तितकाच क्रोधाविष्ट झाला तर भयंकर होतो, ह्याचा तिला प्रत्यय आलाहि. समोरच तो अंधकासुराचा वध करीत आहे. अंधकासुरानें ब्रह्मदेवापासून वर मिळवला आणि उन्मत्त होऊन तो पार्वतीचेंच हरण करूं पाहूं लागला. त्याचा वध होणें अवश्य होतें. शंकराची मुद्रा कशी क्रुद्ध झाली आहे पहा. ओठ विलग झाले आहेत आणि त्यांतून वरचे दोन सुळे दिसताहेत. कपाळाला आंठ्या पडून भुंवया आकुंचित झाल्या आहेत. त्यानें उजव्या हातानें खड्ग उचललें आहे, आणि डाव्या हातानें अंधकाला त्रिशूळानें भोंसकून वर अधांतरीं धरलें आहे. गळ्यांत नररुंडमाळा आहे आणि तो कृत्तिवासा आहे हें त्यानें मागें दोन हातांनीं ताणून धरलेल्या चर्मावरून दिसतें आहे. हें त्याचें भयानक रूप पाहून शेजारींच बसलेली पार्वती घाबरली नसेल तर ती स्वतः महाकाली आहे म्हणूनच.

रावणाचा गर्व उतरवण्याला तर कैलासपतीला इतकेंहि करावें लागलें नाहीं. कुबेराचा पराभव केल्यामुळें मदोन्मत्त झालेल्या त्या दशग्रीवाला वाटलें कीं, नवग्रहांना पालथें घालून त्यांच्या पाठीवर पाय देणारे आपण; कैलास, कैलास म्हणजे अशी कोण वस्तु! त्यानें कैलास उखडण्याच्या हेतूनें खांदा खालीं घातला. कैलासाला हादरा बसलेला पाहून स्त्रीस्वभावानुरूप पार्वती भयभीत झाली. शंकराच्या डावीकडून उठून ती त्याच्या उजवीकडे जाऊन बसली. पार्वतीची त्रेधा पाहून शंकरानें नुसतें स्मित केलें आणि दोन गणांच्या डोक्यावर दोन हात ठेवून डाव्या पायाच्या नुसत्या अंगठ्यानें दाबलें. त्याबरोबर रावण जागच्या जागीं राहिला आणि कैलास स्थिर झाला. त्यापूर्वी नाहीं तर त्या वेळीं तरी पार्वतीला शंकराच्या सामर्थ्याची प्रतीति आली असेल.

आणि नटराजाचें तांडवनृत्य पाहून तर ती स्तिमितच झाली असेल. आठहि बाहू खालीं-वर, डावीकडे-उजवीकडे वाढत्या लयींत फिरताहेत, आणि त्यांच्याच जोडीला तालाबरोबर पावलें पडताहेत. सगळें विश्वचक्र जणुं त्याच्याभोंवतीं गिरक्या घेतें आहे, पण त्याची मुद्रा मात्र स्थिर, प्रशांत आहे. गणपति, कार्तिकेय, शृंगी-भृंगी इत्यादि गण, देवदेवता, गंधर्व, अप्सरा, नृत्यावलोकनांत

दंग आहेत.—आणि पार्वती ? तीहि जवळच उभी आहे. महाकालीच्या रूपांत तीहि तांडव-नृत्य करते. पण शंकराचें नृत्य चाललें असतांना ती नुसती प्रेक्षक आहे. कदाचित् ती त्याचे पदविन्यास, त्याचे हस्तविक्षेप, त्याच्या मुद्रा मनांत सांठवून ठेवीत असेल !

पण एकंदरींत शंकराबरोबर संसार करणें पार्वतीला कठीणच गेलें असेल. पाऱ्यासारखी चंचल प्रकृति त्याची. ती सांभाळतांना तिची तारांबळ उडाली असेल. जो प्रसन्न झाला म्हणजे आत्मलिंगहि निःशंक देतो आणि क्रुद्ध झाला म्हणजे 'कालोऽस्मि लोकक्षयकृत्' म्हणून प्रवृद्ध होतो, जो मदनाला केवळ कटाक्षपातानें भस्मसात् करतो आणि कोणाहि लावण्यवतीला पाहताच कामविव्हल होतो, त्याच्याशीं संसारयात्रा करताना कलह हे व्हायचेच. मग तिनें त्याची मांडी सोडून लांब सरावें आणि मध्यें अंतर ठेवून बसावें, असेंहि चित्र एखादे प्रसंगीं दिसणें स्वाभाविकच आहे.

पण जीं 'वागर्थाविव संपृक्त' आहेत त्या पार्वतीपरमेश्वरांमध्यें कलह किंवा विश्लेष उत्पन्न झाला तरी तो किती टिकणार ? प्रावृट्कालीं कषायित झालेलें नदीचें जल शरदृतूंत निर्मळ होतेंच ना ? आपणांत कलह उत्पन्न झाला तरी आपण दोन नसून एकच आहोत, दोघेहि एकमेकांचे बहिश्चर प्राण आहोत, हें काय तिला माहीत नव्हतें ? किंबहुना, तिची तशी दृढ श्रद्धा होती म्हणूनच ना तिनें त्याच्यासाटीं तसली घोर तपश्चर्या आणि कठोर देहदंडना केली ? अर्धनारीनटेश्वराचें मूर्तिशिल्प त्या ऐक्याचेंच दृश्य रूप आहे. डावीकडून ती मूर्ति पहा,—पार्वतीच्या उभें राहण्यांत काय ऐट, डौल आणि आत्मविश्वास आहे ! सरळ नाक, बांकदार भुंवया, रेखीव रूप, अनिमिष नेत्रांनीं त्याकडे पहात राहिलें तरी तृप्ति म्हणून होणार नाहीं. आणि शंकर कसा दृढ आणि स्थिर आहे तोहि पहा ! अर्धे अंग पुरुषाचें आणि अर्धें स्त्रीचें, अशी मूर्ति खरें म्हणजे हेंगाडी दिसायची. पण इथें ती तशी मुळींच दिसत नाहीं. दार्ढ्य आणि मार्दव ह्या ठिकाणीं अविरोधानें एकत्र आलीं आहेत.

* * *

ही लेणीं पाहायला येणाऱ्यांसाटीं बेटावर पुष्कळ सोयी करायचा सरकारचा बेत आहे म्हणतात. बेटावर पुष्कळ सोयी करायला कांहींच हरकत नाहीं. धक्या-पासून लेण्यापर्यंत चांगला रस्ता करायला हवा आहे. आधीं धक्काच किती तरी चांगला करायला हवा आहे. वाटेनें जिथं झाडें नाहींत तिथं झाडें लावायला हवीं

आहेत. आणखी पुष्कळ गोष्टी हव्या आहेत. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लेण्यांत जाऊन त्या स्थानाशीं विसंवादी असें वर्तन कोणी करणार नाहीं याची खबरदारी घ्यायला हवी आहे. पैशानें सर्व करमणूक विकत घेणारांना थोडी विनम्रता शिकवायला हवी आहे. आणि आपल्या पूर्वजानीं लेणीं खोदून ठेवलीं तीं आपण तिथें जाऊन 'टडडम् टडडम्' करण्यासाठीं नाहीं ह्याची जाणीव व्हायला हवी आहे.

नोव्हेंबर, १९४९

## ·१३·

# कळस आणि क्रूस

मडगांवहून सकाळींच आम्हीं शांतादुर्गा, मंगेश इत्यादि देवस्थानें, आणि जुनें गोवें, पणजी वगैरे स्थळें पाहण्यासाठीं निघालों.

मडगांव मागें टाकून रायतूर, अंबोडा अशीं गांवें घेत घेत बस चालली होती. वाटेनें मधून मधून एकसारखीं लहानमोठीं खेडीं लागत. गांवाच्या बाहेर रस्त्याच्या कडेला किंवा बाजूच्या शेतांत, बखळ जागेंत, ठिकठिकाणीं क्रूस उभे केलेले दिसत. त्यांवर कुठें कमानी बांधलेल्या तर कुठें छपरी केलेली, कुठें देवळासारखें बांधकाम तर कुठें जाळीवर वेल चढवलेले दिसले. जिकडे तिकडे पाटपाणी आणि दाट हिरवळ-झाडी दिसत होती. त्यांच्यामधूनच आडवे-तिडवे, सरळ-नागमोडी तांबडे रस्ते शांत पसरलेले होते, त्यामुळें दृष्टि संतृप्त होत होती.

फोंडें मागें टाकून आमची बस निघाली, तेव्हां ड्रायव्हरनें सांगितलें कीं, "आतां आपण शांतादुर्गेच्या देवळांत पहिल्यांदा जाऊं."

शांतादुर्गेच्या देवळाजवळ पोंचून, समोरच्या अरुंद रस्त्यावर उभ्या असलेल्या मोटरींच्या गर्दीतून वाट काढीत बरीच पुढें जाऊन आमची बस उभी राहिली तेव्हां माझ्या मनांत नाना विचारांनीं आणि कल्पनांनीं दाटी केली होती. शेंकडों सारस्वत कुटुंबांच्या कुलदेवतेच्या मंदिराकडे मी चाललों होतों. माझ्या अंतःकरणांत त्यांची श्रद्धा नव्हती. पण आदरयुक्त कुतूहल होतें. गोमंतकीय लेखकांनीं आपल्या कथा-कादंबऱ्यांतून केलेलीं वर्णनें वाचून गोमंतकांतलीं देवळें, त्यांच्या भोंवतालच्या अग्रशाळा, त्यांच्या समोरचीं तळीं,

शेजारच्या बागा आणि नारळीपोफळींच्या रेखीव राया, देवळांतले भट-पुजारी, आणि देवाची आणि पही-पाहुण्यांची सेवा करणाऱ्या गुण-रूपसंपन्न, कर्तव्यदक्ष भाविणी, ह्यांचें मनामध्यें एक अभेद्य साहचर्य निर्माण झालेलें होतें. माझी तर कल्पना होती, कीं कोणत्याहि बागेंत गेल्यावर वेलींवर बहरलेलीं आणि ताटव्यांवर फुललेलीं विविधरंगी फुलें दृष्टीस पडावींत हें जसें स्वाभाविक, तसेंच गोव्यांतल्या कुठल्याहि देवळांत गेलें तरी फुलांशीं स्पर्धा करणाऱ्या प्रफुल्ल आणि सुंदर चेहऱ्याच्या भाविणींचे थवे आवारांत इतस्ततः हिंडतांना दिसत असतील. अशाच कांहीं कल्पना मनांत घोळवीत शांतादुर्गेच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराकडे जाणाऱ्या रस्त्यानें चढत असतांना, कवि बोरकरांची 'शांता झालि दुर्गा' ही ओळ मला आठवली आणि त्याबरोबरच त्यांच्या 'भावीण' कादंबरीची आठवण होऊन मी आपल्या मनाशींच प्रश्न केला, "बोरकरांच्या अंताशेटनीं ज्या शेवंतीची कमनीय आकृति समोर ठेवून शांतादुर्गेची सोन्याची कांचोळी घडवली, त्या शेवंतीशीं सदृश अशी एखादी आकृति देवळांत गेल्यावर दृष्टीस पडेल काय?" आणि त्या प्रश्नाच्या उत्तरासाठीं दृष्टि फेंकीतच मी आवारांत शिरलों. इकडे तिकडे फिरून उत्तर न आणतांच दृष्टि परतली. पण येतांना तिनें त्या विस्तीर्ण आवाराकडून मला उलट प्रश्न आणला, "गोव्यासंबंधींच्या कथा-कादंबऱ्या वाचून तूं इतका उल्लू झाला आहेस काय?" त्या प्रश्नानें मला राग आला. मी थोडासा ओशाळलोंहि. आणि इकडे तिकडे न पाहतां देवळाकडे चाललों. देवळाचें बांधकाम माझ्या मनावर कांहीं ठसलें नाहीं. देवळाचा घुमट तर एखाद्या चर्चच्या घुमटासारखाच आहे. माझ्या मनाचा थोडासा विरसच झाला. पायऱ्या चढून आंत गेलों, तिथें बाहेरच्यापेक्षांहि अधिक स्वच्छता, व्यवस्था, शांतता होती. पण दिवाणखान्यासारख्या दिसणाऱ्या त्या दालनाच्या भिंतींवर ठिकठिकाणीं पोपट, बदकें, ससे, नद्या, तळीं, डोंगर, होड्या, बंगले ह्यांच्या रेशमी, लोकरी भरतकामाच्या तसबरी टांगलेल्या आणि त्यांवर साखरदांडे, रेगे, नाडकर्णी, सबनीस अशीं सारस्वत स्त्रियांचीं नांवें-आडनांवें भरलेलीं पाहिलीं, तेव्हां मी एखाद्या देवळाच्या सभामंडपांत आलों आहें, कीं सारस्वत भगिनीसमाजाच्या हस्तकौशल्याच्या प्रदर्शनगृहांत, याची मला वानवा पडली. पण आंत गाभाऱ्यांत घंटा वाजत होती, आणि तिथून कांहीं मंत्रोच्चार कानांवर येत होते, त्यामुळें हा संदेह दूर झाला आणि गाभाऱ्याकडे लक्ष्य गेलें. गाभाऱ्यांत देवीभोंवतीं कमानदार प्रभावळीवर दिवे लावलेले होते. त्यांच्या

लवलवणाऱ्या लाल-केशरी ज्योति आणि त्यांनीं चहूंवार फेकलेला मंद सोनेरी प्रकाश ह्यामुळें मूर्तीभोवतालचा भाग उजळून निघाला होता, आणि देवळांत सर्वत्र जाणवणाऱ्या प्रसन्नतेची तिथें परमावधि झाली होती. देवळांत इतकी स्वच्छता आणि प्रसन्नता मीं इतरत्र क्वचितच पाहिली असेल. चारच दिवसांपूर्वी मी गोकर्ण-महाबळेश्वराच्या देवळांतील गर्दी, गाभाऱ्यांतला कुबट उबारा, आणि भटजींची घायकुती बेपर्वाई पाहून आलो होतो. त्यामुळें तर इथलें वातावरण मला विशेषच चांगलें वाटलें.

गाभाऱ्याच्या दाराशेजारी एका तक्त्यावर देवकृत्यांची यादी आणि त्यांना येणारा खर्च ह्याचा तपशील दिला होता. भक्ताच्या भाविकतेचें मोजमाप असें पैशांनीं करणें, आणि पैशांच्या हिशोबानें पुण्य जोडणें हें थोडेंसें चमत्कारिक खरेंच. पण आपल्याला जें देवकृत्य करावयाचें आहे त्याला खर्च किती येणार, किंवा आपण जे पैसे खर्च करूं इच्छितों त्यात काय देवकृत्य होऊं शकेल, ह्याची यजमानाला स्पष्ट कल्पना असणें हें, ह्या गोष्टी भटजींच्या लहरीवर किंवा अडवणुकीच्या ताकदीवर सोपवण्यापेक्षां पुष्कळच बरें यांत शंका नाही.

गाभाऱ्याला प्रदक्षिणा घालून परत सभामंडपांत येऊन मी बाहेर पडणार तोंच तिथल्या एका खांबाच्या पायथ्याशीं, स्वच्छ पांढरीं पातळें नेसलेल्या, डोळ्यांत रेखून काजळ घातलेल्या, नीरस नजरेच्या दोन जीर्णगात्र प्रौढा एकमेकींशीं कांहींतरी कुजबुजत बसलेल्या दिसल्या. त्या मधून मधून पोकळ हंसत होत्या. मीं त्यांच्याकडे पाहिलें. मला वाटतें, मीं रोखूनच पाहिलें असावें. आणि मग मला, मीं आवारांत शिरतांना जो प्रश्न विचारला होता, त्याचें उत्तरहि मिळालेंसें वाटलें. त्या जणूं म्हणत होत्या, "तुमच्यासारखे लोक (ह्यांतला माझ्यापुरता आरोप मीं, कपड्याला येऊन चिकटलेलें कुत्रें झटकून टाकतात तसा, मनानेंच झटकून टाकला !) इथें ज्यासाठीं येतात तें इथें नाहीं. तें तुमच्या मुंबई, महाबळेश्वर, माथेरान ह्यांसारख्या ठिकाणींच आहे. त्यासाठीं तुम्हीं इथें येण्याची जरूरी नव्हती."

आवारांतून बाहेर पडताना माझ्या मनांत आणखी एक प्रश्न आला. केळोशीहून इथें आल्यावर ज्या महारांकडून थोडीशी जागा घेऊन देवीला हें स्थान करून देण्यांत आलें त्या महारांना ह्या देवळांत कांहीं विशेष हक्क असतील का ?

* * *

रामनाथाच्या देवळाचा जुना सभामंडप फार लहान होता. म्हणून गोव्यांतल्याच

एका धनाढ्य व्यापाऱ्यानें खूप पैसा खर्च करून त्याच्याच पुढें एक कॉंक्रीटचा प्रचंड सभामंडप उभारला आहे. पण त्यामुळें देवळाला सभामंडप होण्याऐवजी सभामंडपामागं देऊळ अंग चोरून बसल्यासारखें दिसतें. राजकोटच्या बॅ. मसुरेकरांनीं बांधून दिलेला नगारखाना आणि मूळचें देऊळ ह्यांना वास्तुसौंदर्याची प्रौढी मिरवतां येत नसली तरी त्यात परस्पर सुसंगति होती. पण त्या दोघांच्या मध्यें येऊन बसलेल्या ह्या नव्या ऐसपैस सभामंडपाचा श्रीमंत आडदांडपणा डोळ्यांना बघवत नाही. देवळातला देव ह्या अन्याचारांबद्दल तक्रार करीत नाहीं हें खरें. पण म्हणून माणसानं किती सूट द्यावी ! त्या विरूप विसंगतीकडे समभावानं पाहण्याइतका समतोलपणा रामनाथानं आम्हाला दिला नाहीं, म्हणून आम्ही तातडीनं तिथून बाहेर पडलो.

शांतादुर्गेची टापटिपीची आधुनिकता आणि रामनाथाची अविचारी आधुनिकता पाहिल्यानंतर महालक्ष्मीच्या देवळातला तो थोडासा शांत आणि ओसाड जुनाटपणा आम्हांला पुष्कळच बरा वाटला. ह्या देवळाला कोणी मोठी महाजन मंडळी नाहींत कीं काय कोण जाणे ! देवळाचा बराचसा भाग मोडकळीला आला आहे आणि त्याच्या सभामंडपाचें बहुतेक लांकूडकाम जागेपासून सुटून आलें आहे. तें बाजूला काढून ठेवलेलें दिसलें. त्यातल्या कांहीं तक्त्यांवर कृष्णाच्या क्रीडांचीं, कामसूत्रांतल्या आसनांचीं, मल्लयुद्धाचीं अशीं सुंदर चित्रें आहेत. आणि त्यांचे रंगहि चांगले आहेत. ओळीनं ऐटींत बसायचं तें रद्दी सामानासारखं पडावें लागल्यामुळें साहजिकच तीं उदास दिसत होतीं ! आणि जिथून तीं पडलीं किंवा काढली तिथल्या भकास रिकाम्या चौकटी वरून आमच्याकडे आणि चित्रांकडे केविलवाणेपणानं पहात होत्या. खांबांच्या वरच्या अंगाना हत्ती, सिंह, घोडे, इत्यादिकांच्या आकृति कोरल्या आणि रंगवल्या होत्या. त्याच्यांतहि एक प्रकारची उदास अस्वस्थता दिसत होती. "सुपांतले हसतात आणि जात्यांतले रडतात, पण शेवटीं दोघांचेंहि भवितव्य एकच." असेंच त्या स्वतःकडे आणि खालीं पडलेल्या चित्रांकडे आमचें लक्ष्य वेधून सांगत होत्या.

पण मोडकळीला आलेल्या ह्या देवळावरून सुद्धां गोव्यांतल्या जुन्या देवळांचें काम कसें असावें ह्याची आम्हांला कल्पना आली. ह्या देवळांच्या बांधणींत, सजावटींत भारतीयता आहे. परंपरेशीं संगति आहे. कारागिरीबद्दल—स्थानिक कुंभार, गवंडी, पाथरवट, सुतार, चितारी, कांसार, सोनार, ह्यांच्या कामाबद्दल—

आदर आणि त्यांची कदर आहे. शांतादुर्गेच्या किंवा रामनाथाच्या देवळांत ती दिसली नाहीं ह्याचें थोडेंसें वैषम्यहि वाटलें.

आमच्या बसवाल्यानें मुद्दाम योजलें होतें, कीं सहजच होत होतें कुणाला ठाऊक, पण त्यापुढें आम्हीं जीं देवळें पाहिलीं तीं उत्तरोत्तर अधिकाधिक चांगल्या स्थितींत असलेलीं दिसलीं.

* * *

बांदिवड्याच्या नागेशाचें देऊळ छोटें पण सुरेख आणि व्यवस्थित ठेवलेलें आहे. त्याचाहि सभामंडप आणि सजावट जुन्या पद्धतीची आहे. देवळाभोंवतालचें आवार प्रशस्त आणि स्वच्छ आहे. देवळाच्या समोर खालच्या बाजूला चांगलें मोठें चौकोनी तळें आहे आणि त्याच्या तिन्ही बाजूंनीं नारळी-पोफळींची गर्द छायेची मोठी बाग आहे. गोमंतकीय कथांमधून ज्यांचें वर्णन नेहमीं वाचण्यांत येतें तीं ठिकाणें हीं, असें तिथें फिरतांना वाटतें.

श्रीनागेशावर गांवकऱ्यांची जशी भक्ति आहे तशी देवाचीहि त्यांच्यावर कृपादृष्टि असावी असें दिसतें. एका "विजयादशमीच्या सुमुहूर्तावर श्री नागेशानें प्रसन्न होऊन गांवकऱ्यांना 'विजय कौल' नामक कौल दिल्याचें आणि त्यांना 'सूवर-दान' केल्याचें" देवळांत कृतज्ञतापूर्वक नमूद करण्यांत आलें आहे.

* * *

वेलिंग गांव मुख्य रस्त्यापासून मैल दोन मैल आंत आहे. पण तिथेंहि एक-दोन देवळें, देवस्थानें आहेत, असें बसवाला म्हणाला, म्हणून आम्ही तिकडे गेलों. आम्हीं तिथलें लक्ष्मी-नृसिंहाचें देऊळ पाहिलें मात्र आणि पूर्वी पाहिलेलीं सगळीं देवळें मागें पडलीं. देवळाच्या सभामंडपांत शिरतांच तिथलें संपूर्ण जुन्या पद्धतीचें काम नजर वेधून घेतें. गिलाव्यांतच गेरू घालून तयार केलेल्या भिंतींवर गणपती, गरुड, शेषशायी, मारुति ह्यांचीं रेखीव डौलदार चित्रें काढलेलीं आहेत. आंतल्या सभामंडपांत वरच्या कठड्याच्या चौकटींत बसवलेल्या लांकडी तक्त्यांवर रंगीत चित्रें आहेत. तीं अर्थातच महालक्ष्मीच्या देवळांतल्यासारखींच पण अधिक चांगल्या स्थितींत आहेत. लांकडी खांबांवर वेली-नक्षीचें भरगच्च कोरीव काम आहे. गाभाऱ्याच्या दाराची चौकट चांदीच्या पत्र्यानें मढवलेली आहे. आणि त्याच्या दोन्ही दारवंठ्यांवर द्राक्षांच्या वेलीचें उठावकाम केलेलें आहे. सगळ्या कामांत सगळीकडे एक प्रमाणबद्धता आणि

घाटदारपणा आहे. देऊळ सुस्थितींत, सुसज्ज आहे. त्यावरून महाजन मंडळी देवळावर पैसा चांगला खर्च करणारी असावी हें दिसतच होतें. पण देवकृत्यांच्या यादींत 'नाटक' आणि 'गॅसबत्तीसह नाटक' ह्यांचा समावेश होता, त्यावरून देवळांत वेळोवेळीं येणारी भाविक मंडळीहि चांगली संपन्न असावी हें सिद्ध होत होतें.

* * *

म्हाडदोळचें म्हाळसेचें देऊळ जवळजवळ चारशें वर्षांचें जुनें आहे. तिथलेंहि सगळें काम वेलिंगच्या नृसिंहाच्या देवळांतल्यासारखेंच संपूर्ण प्राचीन पद्धतीचें आणि शाबूत आहे. आणि त्याचा मधून मधून जीर्णोद्धारहि होत गेलेला आहे, असें "गोमंतकस्थ आणि कर्णाटकस्थ महाजनांनीं शके १७८९ मध्यें दारुकामाचा ताम्रपट्टांनीं जीर्णोद्धार केल्याचा" उल्लेख आहे त्यावरून दिसतें.

श्रीमंगेशाचें देवस्थान हें आम्हीं पाहिलेलें शेवटचें. तें शांतादुर्गेची आठवण करून देणारें आहे. मुख्य रस्त्यापासून आंत देवळापर्यंत बरेंच चालून जावें लागतें. तो सगळा रस्ता कॉंक्रीटचा केलेला आहे, आणि माडांच्या रायांतून गेलेला आहे. आंत गेल्यानंतर मंगेश-माहात्म्य वगैरेसारखें एखादें पुस्तक मिळालें तर घ्यावें म्हणून मी तिथल्या ऑफिसांत गेलों. तिथें मला कळलें, कीं प्रती संपल्या आहेत, मुंबईंतच कुठें तरी मिळतील. तेव्हां मी सहज म्हणालों,

"शांतादुर्गेच्या देवळांतहि मला असंच उत्तर मिळालं."

तिथें इतरहि कांहीं गृहस्थ बसले होते. कोण, कुठले वगैरे प्रास्ताविक प्रश्न झाल्यावर एकानें मला विचारलें,

"तुम्हीं शांतादुर्गेचं देवस्थान पाहिलं आहे. हेंहि पाहिलं आहे. तुम्हांला आमचं हें देवस्थान कसं काय वाटलं?"

ह्या प्रश्नाचें उत्तर देतांना सावधगिरी बाळगायला पाहिजे होती. हीं दोन देवस्थानें आणि त्यांचा भक्त समाज हीं वेगळीं आहेत, त्यांच्यांत 'कौटुंबिक' चुरस असण्याचा संभव आहे, हें माझ्या त्या वेळीं लक्षांत आलें नाहीं. मीं म्हटलें,

"तुमचं हें मंगेशीचं आवार लहान दिसतं. शांतादुर्गेचं त्या मानानं प्रशस्त आहे."

"अहो, त्याच्यावर जाऊं नका. आमचं संस्थान अधिक श्रीमंत आहे. आणि ह्या मंदिराला महाजन मंडळीहि अधिक आहेत."

मीं पुढें म्हटलें,

"शिवाय शांतादुर्गेला भाविक मंडळींनीं तसबिरी वगैरे अर्पण केल्या आहेत. तशा इथें दिसत नाहींत."

पण माझा पाय खोलांत चालला होता.

"तें तुम्हाला माहीत नाहीं. तुम्ही जोशी म्हणजे चित्पावन काय? असो. अहो, शांतादुर्गा ही आपल्याला हवं तें मागून घेणारी देवता आहे. रेशनिंगच्या दिवसातसुद्धां लोकाच्या स्वप्नांत जाऊन तिनं चांगल्या तांदुळाचा मुग्रास नैवेद्य मागून घेतला. आमच्या मंगेशीचं तसं नाहीं हां. तो मिळेल त्यांत संतुष्ट असतो."

"होय का? त्याच्या स्वभावातलं हें अंतर मला अर्थातच माहीत नाहीं." मीं म्हटलं आणि लगेच जीभ चावली. पण पुढं मनाशीं म्हणालों, "किती झालें तरी शांतादुर्गा ही स्त्रीच आहे. ती कांहींहि करून आपल्या मनाजोगतें करून घेणारच."

श्रीमंगेशाच्या मनाचा भोळा मोठेपणा माहीत नसल्यामुळें त्याला उणेपणा आणणारा जो अभिप्राय आधीं माझ्या तोंडून अजाणतां निघून गेला होता, आणि ज्यामुळें त्याच्या भक्ताना कदाचित माझा रागहि आला असेल, त्याबद्दल मी 'त्राहि मा गिरीश!' अशी करुणा भाकण्यापेक्षा अधिक काय करणार ?

गोव्यातल्या देवळांतली स्वच्छता, टापटीप, भोवतालची रमणीयता, जुन्या पद्धतींतल्या देवळाचें परंपरागत सौंदर्य, आणि नव्या पद्धतींतल्या देवळांतली व्यवस्था हीं सर्व पाहून मन इतकें प्रसन्न होतें, कीं तिथून निघावेंसें वाटत नाहीं. आणि निघायची वेळ आली, कीं पाय ओढून काढावा लागतो. गोव्यांतल्या ह्या आपल्या कुलदेवतांवर गोव्यांतल्या आणि गोव्याबाहेरच्याहि भक्तांचें इतकें प्रेम दिसतं, कीं देवळांतून हिंडताना तें जाणवल्यावांचून राहात नाहीं. पोर्तुगीजांच्या छळामुळें शेंकडों हिंदु कुटुंबें दक्षिणेकडे आणि उत्तरेकडे निघून गेलीं, तरी तीं आपल्या देवांना विसरलीं नाहींत.

मंगेशाच्या समोरच्या मांडवाखालीं थोडा वेळ विसांव्यासाटीं बसलो असतांना हे किंवा असेच विचार मनांत आले, ते मीं सहज शेजारींच बसलेल्या एका गृहस्थांना बोलून दाखवले. तेव्हां ते म्हणाले,

"अहो, आमचं सोडून द्या. पण हे गोव्याचे ख्रिस्ती आपल्या बापजाद्यांचा धर्म आणि देव अजीबात विसरले आहेत म्हणतां कीं काय! नांव सोडा! त्यांच्यांत अजून लग्नाच्या वेळीं जात पाहतात. ब्राह्मण आणि चाड्डो ह्यांच्यांत

मोठी चुरस आहे इथें. आणि किती तरी ख्रिस्ती लोक इथें ह्या आपल्या देवांना कौल लावायला येतात. आणि आमचे देवहि त्यांना, चुकलीं तरी आपलीच लेंकरं म्हणून कौल देतात. तुम्हांला खर नाहीं वाटणार. पण मी खरं सागतों अगदीं."

आणि मग मला आठवलें, समरसेट मॉमला भेटलेला एक गोमंतकीय ख्रिस्ती गृहस्थ म्हणाला होता, "आम्ही ख्रिस्ती खरे, पण खरे आम्ही हिंदूच आहों."

* * *

मंगेशाच्या देवळाशीं थोडें विसावून आम्ही निघालो आणि कळसाचा प्रांत मागें टाकून सैन्याच्या आणि परकीय राजसत्तेच्या बळावर हिंदुस्थानच्या भूमींत पहिल्यांदा जिथें क्रूस रोवला गेला तिथें, म्हणजे जुन्या गोव्यांत, शिरलो. आणि ज्या १५६० सालीं म्हाडदोळच्या म्हाळसेची स्थापना झाली त्याच सालीं स्थापन झालेल्या Palace of Inquisition च्या इमारतींचे भग्न अवशेष आणि सेंट कॅथरीनचें कथीड्रल ह्यांच्या मधल्या चौकांतून पुढें जाऊन सां कायतानच्या कथीड्रलपाशीं पोचलो.

कथीड्रलचीं दारें बंद होतीं, आणि रखवालदार वगैरे कुणी जवळपास दिसतहि नव्हतें. शेवटीं आमच्या ड्रायव्हरनें जाऊन कुणाला तरी झोपेंतून उठवून आणलें. रखवालदाराशीं आधीं मी मराठींत बोललो. तें त्याला कळलें नाहीं. मग इंग्रजींत बोललो. तें त्याला मुळींच कळलें नाही. मग शुद्ध हिंदींत बोललों. तेंहि नीटसें कळलें नाहीं. मग मुंबई पद्धतीचें हिंदी बोलूं लागलों, तें मात्र त्याला कळलेंसें दिसलें. सां कायतानचें कथीड्रल रोममधल्या सेंट पीटरच्या कथीड्रलच्या धर्तीवर बांधलेलें आहे म्हणतात. कथीड्रल बाहेरून तसेंच आंतून भव्य आहे. भिंतीवर वेगवेगळ्या ख्रिस्ती संतांच्या चरित्रांतल्या प्रसंगांचीं प्रचंड चित्रें रंगवलेलीं आहेत. ब्रात्तीम (बाप्तिस्मा) साठीं आणि इतर कारणांसाठीं लागणारें 'पवित्र पाणी' सांठवण्याचा हौदहि एकाच भक्कम संगमरवरी दगडांतून कोरून तयार केलेला आहे. देवळाच्या चॅन्सेलच्या खालीं तळघरांत प्रेतें पुरण्याची व्यवस्था आहे. आम्हांला ती व्यवस्था दाखवायला रखवालदार तयार होता, आणि चारपांच पायऱ्या आम्ही उतरलोहि. पण पुढें जायची उत्सुकता वाटेना. कथीड्रलमध्यें दोन तीन ठिकाणीं उंच, चिंचोळीं कपाटें दिसलीं. त्यांत आंत एक माणूस बसण्याची सोय, आणि दोन बाजूंना जाळी आहे. तीं कशासाठीं म्हणून विचारतां आम्हांला कळलें कीं, Confessions चीं तीं कपाटें आहेत.

पाद्रयानें आंत बसायचें आणि बाहेर बसून कोणीहि 'पापनिवेदन' करायचें. आम्हीं जुन्या गोव्यांत पाहिलेल्या प्रत्येक चर्चमध्यें ही 'पापनिवेदनपेटिका' होती. निवेदित पापाचें श्रवण केल्यानंतर तें क्षमेला पात्र आहे कीं नाहीं हें ठरवण्याचा आणि क्षमा मिळवून देण्याचा अधिकार सर्वस्वीं पाद्रयाचा असतो. त्यामुळें ख्रिस्ती (कॅथलिक) समाजावर पाद्रयांचें अतिशय वजन असतें.

कथीड्रलशेजारच्या इमारतींत (हें पूर्वी कॉन्व्हेंट होतें) एक पुराणवस्तुसंग्रह आहे. त्यांत हिंदु मूर्तींचे भग्नावशेष, मंदिरांचीं दारें, खांब, स्थलभ्रष्ट केलेले शिलालेख, शंकराच्या नुसत्याच पिंडी किंवा शाळुंका, कांहीं मूर्तींचीं शिरें, कांहींचीं धडें, तर कांहींचे पाय आहेत. तिथेंच एका ठिकाणीं एका स्त्रीच्या धडाचा भाग (हातांसह) आहे. हातांचा आकार, बोटें, बोटांचीं पेरें आणि ठेवण इतकी सुरेख आहे कीं, आपण पिठ्या दगडांत कोरलेल्या मूर्तीचा अवशेष पाहात नसून जीवंत हातच पाहातों आहोंसें वाटतें. आणि आपण पाहात असतांनाच हात उचलला जाईल असा भास होतो. हातांवरूनच कल्पना करायची तर सबंध मूर्ति अप्रतिम सौंदर्यसंपन्न असेल असें वाटतें.

तिथून जवळच Arco des Vice Reis (व्हाइसरॉयांची कमान) आहे. कमानींतून, दगडानें मढवलेल्या रस्त्यावरून, पुढें गेलें कीं मांडवी नदीचें भव्य आणि भरदार पात्र दिसतें. पलीकडे गर्द हिरवी झाडी आहे. तें दृश्य पाहून क्षणभर तरी मनुष्य थबकल्याशिवाय राहात नाहीं. जुनें गोवें ही राजधानी होती तोंपर्यंत, म्हणजे जवळजवळ तीनशें वर्षें, सर्व पोर्तुगीज व्हाइसरॉय इथें उतरून ह्याच कमानींतून राजधानींत प्रवेश करीत, म्हणूनच तिला व्हाइसरॉयांची कमान म्हणतात. अजूनहि तोच प्रघात आहे. नदीकडे पाठ करून कमानीकडे पाहिलें म्हणजे वरच्या बाजूला, एक ख्रिस्ती संत एका ख्रिस्तीतर माणसाच्या मानेवर पाय देऊन उभा राहिलेला दाखवलेला दिसतो. त्याचा खड्गधारी उजवा हात हिंदुस्थानाच्या दिशेनें पसरलेला दाखवला आहे. ह्या अपमानकारक पुतळ्याचा अर्थ उघड आहे.

कमानींतून परत आंत येऊन आम्हीं असीसीच्या सां फ्रान्सिसचें आणि से प्रेमासियालचें (सेंट कॅथरीनचें) अशीं चर्चेस पाहिलीं. सां फ्रान्सिसचें कथीड्रल अत्यंत जुन्यांपैकीं आहे. तें एका मशिदीचेंच साहित्य घेऊन बांधलें आहे, म्हणतात. कथीड्रलसमोरच्या मोकळ्या जागेंत हत्तीच्या पायाच्यापेक्षांहि प्रचंड घेराचे खांब आणि खांबांचे लहानमोठे भाग आडवे-उभे पडलेले आहेत. हेंहि

कथीड्रल आंतून भव्य आहे. पण त्यांतलें निळें, तांबडें, सोनेरी रंगकाम भडक वाटलें. चर्चमध्यें एका ठिकाणीं Sacraments म्हणजे येशु खिस्ताचे पवित्र अवशेष आहेत. ह्याच्या पाठीशींच पूर्व दिशेला तोंड केलेलें सेंट कॅथरीनचें कथीड्रल आहे. हेंहि अति भव्य व सुंदर आहे. ऑल्टर, पुल्पिट ह्यांची सजावट आणि लांकडी कामावरचा सोनेरी मुलामा सर्व प्रेक्षणीय आहे.

ह्या दोन कथीड्रल्सच्या समोर दक्षिणेच्या बाजूला बॉं जीझूचें चर्च, त्यांतच सा फ्रांसिस शावियेरची शवपेटिका आणि त्याच्या मागे एक जेझ्युइट मठ आहे.

आम्ही आधीं जेझ्युइटांच्या मठांत गेलों. मध्यें मोठा थोरला चौक आणि त्याच्या चारी बाजूंना उंच लांबच लांब ओसऱ्या आहेत. आत शिरताच त्याच्या भव्यपणानेंच छाती दडपली. भरभराटीच्या काळांत इथल्या मठात जगभरचे जेझ्युइट विद्यार्थी शिक्षणासाठीं येत आणि इथें शिक्षण घेऊन जगांत सर्वत्र धर्मप्रसारासाठीं जात. आता त्याची फक्त झाडलोट होते. आंत शिरलों तेव्हां एक बाई ओसरी झाडीत होती. आम्ही सारखे उन्हातच हिंडत होतों. तहान लागली होती. बाईला विचारलें, "पाणी प्यायला मिळेल का?" तिलाहि मराठी कळेना. एकदा, दोनदा, तीनदां असा अनुभव आलेला पाहून मला थोडासा धक्का बसला. गोवा महाराष्ट्रात आहे आणि कोंकणी ही मराठीचीच उपभाषा (किंबहुना मराठीच) आहे असें आम्ही म्हणतों. पण मीं गोव्यात पाहिलें, हिंदूंना मराठी कळते. आमच्या मुसलमान बस ड्रायव्हरलाहि कळत होतें. पण खिस्त्याना नीटसें कळताना दिसलें नाहीं. त्या मानानें त्याना मोडके हिंदी— मोडकेंच हिंदी—अधिक कळतें. आम्ही ज्याच्याशीं बोललों ती मंडळी कोणी राजकीय जाणीव झालेली पांढरपेशीं खिस्ती माणसें असतीं तर तीं मराठीचें अज्ञान बुद्ध्या पांघरताहेत असें म्हटलें असतें. पण जुन्या गोव्यांत देवळाची झाडलोट किंवा रखवाली करणाऱ्यांच्या बाबतींत तसें समजण्याची सोय नव्हती. कांहींहि म्हटलें तरी मला थोडेंसें अस्वस्थ वाटलें खरें.

पण आम्हांला काय हवें होतें तें बाईला कळलें. ती चौक ओलांडून आम्हाला मागे घेऊन गेली. तिथें मोठी मोकळी जागा होती. आणि तींत चांगली रेखलेली, शंखशिंपल्यांच्या विविध आकृतींनीं शृंगारलेली, फुलानीं नटलेली सुंदर बाग होती. तो मठ, ती बाग, तो एकांत पाहून मला बोकाशियोच्या डेकॅमेरनमधल्या 'मुक्या' माळ्याच्या गोष्टीची आठवण झाली. पण इथें मुक्यांचें

सोंग घेऊन एखादा माळी कामाला राहिला असता तरी उपयोग नव्हता. कारण मठांत जोगिणी कुठें होत्या ?

बागेच्या टोंकाशीं एक विहीर होती. तिचें गोड गार पाणी बाईनें आम्हांला पाजलें. आम्हींहि तिचे आभार मानले आणि पुन्हा मठांत येऊन बों जीझूच्या वस्त्रागाराच्या वाटेनें सां फ्रांसिस शावियेरच्या शवपेटिकेपाशीं आलो.

विविध रंगांच्या आरसपानांनीं, आरसपानांच्या चित्रांनीं, आणि सोनेरी मुलाम्यानें सजवलेल्या एका उंच चबुतऱ्यावर भरगच्चपणें शृंगारलेल्या चांदीच्या पेटींत सां फ्रांसिसचें शव ठेवलेलें आहे. तें कांहीं वर्षांतून ठराविक वेळीं दर्शनासाठीं उघडतात. यंदा तसें उघडणार आहेत. आणि शव आतां सडूं लागल्यामुळें ही शवदर्शनाची संधि शेवटचीच ठरणार आहे असेंहि म्हणतात. ह्या शवपेटिकेच्या तीन किल्ल्यांपैकीं एक गोव्याच्या आर्चबिशपकडे, एक व्हाइसरॉयकडे आणि एक चर्चच्या मुख्याकडे, अशा असतात. त्यामुळें तिघांच्या संमतीनेंच पेटी उघडणें शक्य असतें! मराठ्यांच्या हल्ल्यांना एक वेळ गोव्याचे फिरंगी इतके कंटाळले होते म्हणतात, कीं एका व्हाइसरॉयनें वैतागानें आपला राजदंड सां फ्रांसिसच्या शवपेटिकेवर फेंकून दिला. आणि अजून देखील नवा गव्हर्नर जनरल जेव्हां अधिकार-ग्रहण करतो तेव्हां त्यानें आपला राजदंड त्या शवपेटिकेवरून उचलून घ्यावा, अशी पद्धत असल्याचें ऐकलें.

ह्या चर्चमध्यें सां फ्रान्सिसच्या शवपेटिकेच्या समोरच्या दालनांत आणखी कांहीं Sacraments आहेत.

बों जीझूचें चर्च जुन्या गोव्यांतल्या चर्चेसमध्यें सगळ्यांत चांगल्या स्थितींत आहे. भव्यतेंत तें कदाचित् सां कायतान किंवा से प्रेमासियालच्या बरोबरीला येणार नाहीं. पण त्याची रंग-सजावट वगैरे अधिक ताजी आणि श्रीमंती थाटाची आहे.

* * *

जुन्या गोव्यांतल्या त्या भव्य कथीड्रल्समधून हिंडतांना आपण हिंदुस्थानांत नसून यूरोपांत आहों, आणि विसाव्या शतकांत नसून पंधराव्या सोळाव्या शतकांत आहों असें वाटूं लागतें. जुन्या गोव्याची वस्ती उठून दीडशें-दोनशें वर्षें झालीं तरी हीं चर्चेस इतक्या वैभवांत आणि सुस्थितींत आहेत. मग गोव्याच्या ऐन भराभरांटींत, शहराची वस्ती जेव्हां दोन-तीन लाख होती, आणि 'ज्यानें गोवें पाहिलें त्याला लिस्बोआ पाहण्याची जरूरी नाहीं.' अशी म्हण पडली

होती, त्या काळीं शहराचा हा मुख्य भाग आणि हीं देवळें किती गजबजलेलीं आणि वैभवशाली दिसत असतील! यूरोपांतल्या आणि आशियांतल्या नाना देशांतले लोक इथें येत असतील, आणि शें-पाऊणशें वर्षांत उत्कर्षाच्या शिखरावर चढलेल्या या नगरीचा थाट पाहून थक्क होत असतील.

पण तोच वैभवाचा काल ख्रिस्ती धर्माच्या राक्षसी क्रौर्याचा काल होता. "माझ्या पैशावर सत्ता जेझ्युइटाची आणि माझ्या बायकोवर फ्रान्सिस्कनाची." अशी म्हण रूढ असल्याचाहि तो काल होता. ह्याच सेंट कॅथरीनच्या कथीड्रलच्या समोर Palace of Inquisition होता. आणि दोहोंच्या मधल्या त्या विस्तीर्ण चौकांत इन्किझिसांवच्या आदेशानुसार पाखंड्यांना जीवंत जाळण्याचा किंवा त्यांचे हाल करण्याचा 'धर्मविधि' होत असे. आणि हें धर्मकृत्य पाहण्यासाठीं सर्व लहानथोर स्त्री-पुरुष नागरिकांनीं यावें (आणि शक्य तर त्यापासून धडाहि घ्यावा) म्हणून ह्याच कथीड्रलची घंटा मोटमोठ्यानें घणघणून त्यांना बोलावीत असे. आणि ह्याच कथीड्रलच्या प्रशस्त ओट्यावर बसून बडेबडे लोक आणि भोंवतालीं जमलेली गर्दी तें धर्मकृत्य, पुण्य संपादन केल्याच्या बेहोष आनंदानें पाहात असे.

धर्मसमीक्षणसभेचा राजवाडा (Palace of Inquisition) आज जमीनदोस्त झाला आहे. त्याच्या भिंताडांतून रान माजलें आहे. आणि त्याचीं भुयारें बुजून गेलीं आहेत. धर्माधिकाऱ्यापुढें किंवा राजाधिकाऱ्यापुढें मान न तुकविल्याबद्दल ज्यांना तिथें तळघरांत कोंडलें होतें, खोड्यांत अडकवलें होतें, आणि सांखळदंडानें जखडून टाकलें होतें, आणि ज्यांना तिथून नगरामधल्या त्या विस्तीर्ण चौकांत आणून पौरजनांसमक्ष जीवंत जाळलें होतें, किंवा हालहाल करून जिवें मारलें होतें, त्यांचे मरणोत्तर शांततेला आंचवलेले, आणि स्वर्गप्रवेशाला अपात्र ठरलेले अस्वस्थ आत्मे अजून त्या ओसाडींत रात्रीच्या वेळीं भटकत असतील, आणि कान असलेल्यांना त्यांचे उसासे ऐकूंहि येत असतील. तिथून एका हांकेवर, शेजारच्या दोन मोठ्या देवळांत, ज्याचे पवित्र अवशेष अजून जपून ठेवलेले आहेत, आणि जो 'पाखंडी' म्हणूनच क्रुसावर चढवला गेला, त्या जीझलाहि धर्माच्या नांवाखालीं अमानुष अत्याचार करणाऱ्या त्या पाळकांपेक्षां त्यांच्या धर्मसत्तेला बळी पडलेल्यांबद्दलच कदाचित् जास्त जिव्हाळा वाटत असेल.

डचांच्या हल्ल्यांमुळें आणि सांथीच्या रोगांमुळें ओसाड झालेलें जुनें गोवें

आणि तिथलीं तीं मोठमोठीं ख्रिस्ती देवळें मागें टाकून आम्ही मांडवीच्या कांठाकांठानें, गयबंदराच्या वाटेनें पणजींत प्रवेश केला.

पणजी स्वच्छ, टुमदार आणि टवटवीत शहर आहे. गांवांतून हिंडतांना वास्को आणि मडगांवची आठवण झाली तरी वॉस्कोचा ओकेपणा किंवा मडगावची गर्दी तिथें जाणवत नाहीं. एकमेकींना लगटलेल्या फार उंच आणि फार मोठ्या इमारती नसल्यामुळें डोळ्याना ताण पडत नाहीं कीं छाती दडपल्यासारखें होत नाहीं. आमच्यापैकीं काही जणाना जकातींतून नेतां येण्यासारख्या बऱ्याच मालाची खरेदी करायची होती. म्हणून आम्ही ह्या दुकानातून त्या दुकानात जात होतों. वाटेंत एक जोड्याचें दुकान दिसलें, त्यावर 'Sapataria' लिहिलेलें होतें. पुढें मग 'Lavendaria' (लॉण्ड्री), 'Livraria' (पुस्तकविक्रेते), 'Joelharia' (ज्यूएलर), 'Papelaria' (स्टेशनर) 'Drogaria' (ड्रगिस्ट) अशीं दुकानें लागलीं. त्यांचीं तीं पोर्तुगीज नावें वाचण्याचा आम्हांला नादच लागला. मध्येंच एका ठिकाणीं 'Quesova Voicunto Poi' असें नाव दिसलें. ते काय असावें असा विचार करता करतां एकदम लक्ष्यात आलें कीं तें 'केशव वैकुंठ पै' आहे. एकदरींत पोर्तुगीज स्पेलिंग हेंगाडेंच असा आम्हीं निवाडा देऊन टाकला.

फारशी खरेदी करणे जमत नाही असें दिसून आल्यावर पणजीच्या त्या स्वच्छ वळणदार डांबरी रस्त्यावरून रमत रमत मांडवीवरच्या 'Estacao Central' (सेंट्रल स्टेशन) कडे गेलों. बस तिथेंच उभी करून खाडी ओलांडून म्हापश्याला आणि तिथून पुढें कळंगुटला जाऊन यावें असा विचार होता कारण कळंगुट हें गोव्याचें रिव्हियरा आहे, असें एका दर्दी सद्गृहस्थानीं आम्हाला सांगितलें होतं. सात समुद्र ओलांडण्याऐवजीं एक खाडी ओलांडून जर रिव्हियरा (-याच्या सर्व वैशिष्ट्यांसह) पाहता येतें तर पाहायचें कोण सोडील? पण उशीर होत आला होता. विशेष रात्र होण्याआधीं मडगावला परतायचें होतें. म्हणून तो विचार बाजूला सारून Estacao Central मधल्या Bar Caravela मध्यें जाऊन थोडा वेळ बसावें असेंच शेवटीं ठरविलें.

बार कारावेलाच्या मागच्या अंगाला बाल्कनीसारखी गॅलरी आहे. तिच्या अगदीं खालपर्यंत खाडीचें पाणी येतें. त्यामुळें तिथें बसलें म्हणजे बोटीच्या डेकवर कठड्याशीं बसल्यासारखें वाटतें. तिथेंच खाद्य-पेय मागवून, चीजच्या चकत्या-बरोबर त्या पेयाचे, जिभेला आणि घशाला चुरचुरीतपणें सुखवीत खाली जाणारे घोट घेत आम्ही गप्पा मारीत बसलों.

पलीकडल्या तीरावरून वाफोर सुटला होता. तो इकडे येईल तेव्हां त्यावर चढण्यासाठीं आमच्या बाजूच्या धक्क्यावर लोक गोळा होऊं लागले होते. नवीन पद्धतीचे ढंगदार पोषाख केलेल्या त्या उतारूंच्या मध्येंच, स्वच्छ पांढऱ्या पॉपलिनचा लांब कोट, खालीं तलम धोतर, डोक्यावर तांबड्या मखमलीची उंचसर टोपी, आणि कपाळावर वैष्णवांसारखा अक्षतीचा काळा ठिपका आणि त्यावर अंगाऱ्याची काळी उभी रेघ, असे एक पोक्त रुबाबदार गृहस्थ दृष्टीस पडले. तेव्हां खरें गोवें दिसल्यासारखें वाटलें. गोव्यांतल्या आमच्या मुक्कामांत तशा पोषाखांतलीं माणसें त्यापूर्वी आम्हांला दिसलीं नव्हतीं आणि नंतरहि दिसलीं नाहींत.

त्याचप्रमाणें मुंबई-पुण्यांत संध्याकाळच्या वेळीं जशा बायका रस्त्यानें जाता-येतांना दिसतात तशा आम्हांला वास्कोत, मडगांवांत किंवा पणजींतहि दिसल्या नाहींत. पणजीचे रस्ते आणि बंदरभाग तर अशा हिंडण्याफिरण्याला फारच अनुकूल. तरी देखील संध्याकाळच्या वेळीं पोषाखाची झकपक करून, हौशी लोकांच्या सकौतुक दृष्टिक्षेपांचा विषय होत हिंडूं न इच्छिणाऱ्या गोव्यांतल्या स्त्रियांना अधिक सभ्य म्हणावें कीं मागासलेल्या म्हणावें हें सांगणं थोडेंसें कठिणच वाटलें.

सूर्य मावळला नव्हता, पण मावळण्याच्या विचारांत होता. पलीकडल्या गर्द हिरव्या झाडीवर सोन्याचीं वर्खें आणि लांब धारदार पातीं चमचमत होतीं. मांडवीच्या मंथर लाटांवर सोन्याच्या साखळ्या जुळत होत्या, तुटत होत्या आणि पुन्हां जुळत होत्या. त्या डुलणाऱ्या लाटांकडे आणि त्यावरच्या सोनेरी नाचाकडे पहात असतांनाच केव्हां तरी बार कारावेला बोटीसारखा चालूं लागला. आणि मी मागें...मागें...शतकाशतकांनीं मागें गेलों.

वरती पांच सात मैलांवर मीं मघांशीं पाहिलेलें जुनें गोवें अल्बुकर्कनें वीस जहाजें आणि बाराशें माणसें ह्यांच्या साहाय्यानें अवघ्या एका दिवसांत काबीज केलें. त्यावेळीं तें विजापूरकरांकडे होतें. त्यापूर्वी तें विजयनगरच्या राजाकडे होतें. त्यांनीं तिथें ब्रह्मपुरी वसवली होती. त्याच्याहि पूर्वी केव्हां तरी तें कदंबांकडे होतें त्याच्याहि आधीं कदाचित् मौर्यांकडे असेल—त्याच्या आधीं...आणि त्याच्याहि आधीं...?

परशुरामानें ही भूमि वसतीयोग्य केली त्याच्याहि पूर्वीपासून आजतागायत उत्फुल्ल स्वच्छंदानें वाहत आलेल्या मांडवीनें अशीं किती तरी राजकुलें आलीं-

गेलेलीं पाहिलीं असतील! माणसाच्या मूर्ख महत्त्वाकांक्षांना आणि वैभवमदाला ती हंसत असेल आणि गोवेकरांना म्हणत असेल: "वेड्यांनो, आजची राजवट तरी राहणार आहे थोडीच! तुम्ही मनांत आणाल तर तुमच्या भूमीचे स्वामी व्हाल."

"—अहो, चला आतां. कीं इथेंच रात्र काढायची आहे?"

आमच्यापैकीं कुणाचा तरी शब्द कानांवर आला. खरेंच उठायला हवें होतें. मांडवीनें आपलीं सुवर्णवलयें रात्रीपुरतीं सूर्याच्या स्वाधीन केलीं होतीं. आतां तिच्या पाचूच्या अंगावर निळ्या काळ्या सावल्यांचा खेळ चालला होता. उठणें भाग होतें.

तिथून निघालों. मडगांवला आलों. आणि आतां तर तिथून परत घरीं आल्यालाहि किती तरी दिवस होऊन गेले आहेत. तिथून निघालों, पण माझें मन—मनाचा एक भाग—तिथेंच, Estacao Central च्या मागच्या त्या व्हरांड्यांत, मांडवीच्या तीरावर राहिला आहे. कांहीं भाग जुन्या गोव्यांतल्या त्या सोनेरी सजावटीनें झळाळणाऱ्या भव्य चर्चेसमध्यें राहिला आहे. पण त्यापेक्षांहि मोठा भाग अंत्रूज महालांतल्या त्या शांत, स्वच्छ, प्रसन्न देवळांच्या रम्य परिसरांत राहिला आहे.

ऑक्टोबर, १९५२

.१४.

# कारवार

दुपारीं एक वाजतां मुरगांवहून सुटलेली 'साबरमती' कारवार बंदरांत शिरत होती. चारचा सुमार असावा. कारवार संमेलनाच्या मुंबईतल्या कार्यकर्त्यांपैकीं कांहीं लोक त्याच बोटीवर होते. ते सांगत होते: "तो कूर्मगड, तो मधलिंगड, तो देवगड, त्याच्यावर लाइट-हाउस आहे." त्यांचे शब्द कानांवर पडत होते, पण आमचें तिकडे लक्ष्य नव्हतें. सदाशिवगड, काळी नदीचें मुख, कारवारची वेळ, ह्यांवरून आमच्या नजरा फिरत होत्या. मंगेशराव तेलंगांसारखे विद्या-कला-व्यासंगी रसिक तपस्वी, आणि रामा राघोबा राण्यांसारखा परमवीर-चक्रधारी रणशूर झुंझार ह्यांनीं ज्याला 'इदं ब्राह्ममिदं क्षात्रम्' असें दुहेरी तेजो-वैभव दिलें तो भूमिभाग आमच्या नजरेच्या टप्प्यांत येत होता. कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर आणि काव्यात्म प्रकृतीचे साहित्यिक काकासाहेब कालेलकर ह्यांच्या लेखण्यांनीं ज्याच्यासंबंधीं आमचीं अंतःकरणें समुत्सुक केलीं होतीं, ज्याच्या सौंदर्यगीति आम्हीं अनेकवार ऐकल्या होत्या, किंबहुना आम्ही ज्यासाठीं मुख्यतः आलों होतों, तो कारवारचा किनारा समोर दिसूं लागला होता. तिकडे आमचें सगळें लक्ष्य होतें. किनाऱ्यावरचीं एका बाजूचीं सुरूचीं झाडें नाजुक कुंचल्यांनीं चित्रित केल्यासारखीं दिसत होतीं. माडाच्या झाडांच्या झावळ्या पिसांसारख्या लवलवत होत्या. मोठमोठ्या वृक्षांच्या हिरव्या गोंड्यांची भरगच्च हिरवी झूल पांघरलेला प्रशस्त डोंगर ह्या सगळ्यांच्या मागें बेपर्वाईनें धुंद पसरला होता. पिवळसर हिरवा, फिकट हिरवा, गडद हिरवा आणि काळसर हिरवा, अशा एकाच हिरव्या रंगाच्या विविध छटांच्या पार्श्वभूमीवर किनाऱ्यापाशीं चार-दोन पांढऱ्या इमारती उभ्या होत्या. त्यांच्या एकंदर बांधणीवरून

त्यांच्यावर सरकारी बांधकाम खात्याची छाप दिसत होती. तें सगळेंच दृश्य समरसेट मॉमच्या पसीफिक कथांची आठवण करून देत होतें.

आमची बोट धक्क्यापासून अर्ध्या मैलावर नांगर टाकून उभी राहिली. आणि ती तिथेंच थांबणार होती. कारण पुढें पाणी पुरेसें खोल नव्हतें. आम्हांला न्यायला पडाव यायचे होते ते दिसूं लागल्याबरोबर त्यात आपल्याला आधीं जागा मिळावी म्हणून प्रत्येकाची धडपड सुरू झाली. कारवारला उतरणारे तीनशें-साडेतीनशें उतारू बोटीच्या किनाऱ्याकडल्या अंगाला गोळा झाले.

शेवटला पडाव येऊन बोटीला लागला तेव्हा सूर्य मावळून अंधार पडूं लागला होता. आणि पडाव सुटला तेव्हां सात-साडेसात झाले होते. पडाव आणि बोट ह्यांच्यातलें अंतर वाढत चाललें. शेवटीं बोट वळून दिसेनाशी झाली. आधीं सोनेरी, मग किरमिजी, आणि मग भस्मी असे एकामागून एक रंग घेऊन शेवटीं आकाशानें वद्य द्वादशी-त्रयोदशीचा रंग घेतला. तोच रंग खालीं पाण्यालाहि आला. पाणी उसळत होतें. त्यावर पडाव झोके घेत होता. त्याच्यावर आमचीं अंतरंगें हेलावत होतीं. कारवारचा किनारा अंधारांत गुडुप झाला होता. त्याला अधूनमधून 'पंक्चरणा'च्या दिव्यांचीं तांबडीं-पिवळीं टिबें काय तीं डोकावून इथें वस्ती आहे असें सांगत होतीं.

पेट्रोमॅक्सच्या दिव्यांचा हिरवा-पांढरा प्रकाश धक्क्यावरचा अंधार दूर सारण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होता.

कारवारच्या किनाऱ्यावर दिवसांउजेडीं पाय ठेवावा अशी आमची इच्छा होती. म्हणून इतका उशीर लावल्याबद्दल आम्ही कारवारकरांवर रागावलों होतों. पण आम्ही दिवसां उतरलों असतां तर कारवारच्या किनाऱ्याकडे आणि बंदराकडे रात्रीच्या अंधारांत समद्राच्या बाजूनें पाहण्याची संधि कशी मिळाली असती? आणि ती संधि मिळाली नसती तर एका संस्मरणीय दृश्याला आम्ही आंचवलों असतों.

आमचें आपसांत कांहीं तरी बोलणें चाललें होतें, तेवढ्यांत,

"ई महाराष्ट्रमंदि यष्ट् जोर माडतार नोड्री."[1]

असे कानडी शब्द माझ्या कानांवर आले. मीं मागें पुढें पाहिलें. आमच्या पडावावरच दोन बंदर अधिकारी होते. त्यांचें आपसांत बोलणें चाललें होतें.

---

१ हे महाराष्ट्रीय लोक किती जोर करताहेत पहा तर.

ते दुसरें कांहीं बोलते तर मला इतकें वाटलें नसतें. कारण कारवार उत्तर कानडा जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असल्यामुळें तिथें कानडी अधिकारी, सरकारी नोकर, असणें स्वाभाविक होतें. पण ह्या त्यांच्या उद्गारांमुळें कारवारी लोकांचें 'कानडी' दुखणें मात्र एकदम नजरेस पडलें. कारवारच्या मराठी शाळांत आणि ऑफिसांत सरकारी फॉर्म कानडींत येतात, मैलाच्या दगडावरचे आंकडे कानडी करण्यांत आले आहेत, आणि कारवारास आलेले एक अधिकारी तर इतके कट्टर कानडी होते कीं, त्याना 'सुस्वागतम्' हा संस्कृत शब्दहि नागरी लिपींत लिहिलेला चालत नसे; कारण नागरी ही मराठीची लिपि आहे,—अशा ज्या गोष्टी आम्ही ऐकत होतो त्याचें हें वाक्य एक प्रत्यंतर होतें. एकंदरींत कारवारला भरणारें हें मराठी संमेलन म्हणजे कानडीवरच्या आक्रमणातली एक मोहीम आहे असें काही तरी पुढें त्यांचें बोलणें चालत राहिलें.

धक्क्यावर जे-एक कीं दोन-गॅसचे दिवे होते ते जकात-तपासणीसाठीं होते. त्याच्या भोंवतीं गोळा झालेल्या लोकानीं त्याचा प्रकाश अडवला होता. त्यामुळें पलीकडे सगळीकडे दाट काळोखच होता. आमचें सामान, आमच्याबरोबरचीं माणसें, कुठें आहेत तें दिसेना आणि विचारलें तरी कुणाला सागता येईना. 'अंधेनेव नीयमाना यथान्धाः' अशी आमची सगळ्यांची अवस्था झाली होती. बरोबरचीं माणसें कशीं तरी एकत्र येऊन अखेर आम्ही एका बसमधून गांवाकडे निघालों. पण कुठून कुठें, कसे चाललों होतों तें लक्ष्यांत येईना. आणि अखेर निवासांत पोंचलों तरी कुठें आलों तें कळेना.

आणि ह्या सगळ्याला कारण कारवारांत वीज नाहीं. कारवारबद्दल इतकें चांगलें ऐकलें असूनसुद्धां कुठल्या कुग्रामांत आलों असें म्हणायचा मोह झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून भोंवतालीं नजर टाकली मात्र, आणि मग आदल्या रात्रीं कारवारला कुग्राम म्हणण्याचा मोह झाला होता, तो किती मूर्खपणाचा होता तें कळलें.

एका बाजूला समुद्र, मध्यें वसतीपुरती थोडीशी साफसूफ करून घेतलेली जागा आणि दुसऱ्या बाजूला लाब पसरलेला डोंगर. कारवार गांव खरोखरच सृष्टीच्या कुशींत जागा करून घेऊन वसलें आहे. बाजारपेठ सोडली तर प्रत्येक घराला आवार आहे, आणि त्यांत लहानमोठीं अनेक फळझाडें, फुलझाडें लावलेलीं आहेत. आवाराबाहेर आणि आसपास शेजारींच डोंगर आणि जंगल

झाडी. घराशेजारची झाडी कुठें संपते आणि जंगलाची कुठें सुरू होते तें समजायचें सुद्धा नाहीं. कित्येक ठिकाणीं तर जंगल-झाडी आणि अंगणांतलीं झाडें ह्यांत कुंपणाचाच काय तो वेगळेपणा आहे. आणि त्याला न जुमानतां वन्य वृक्षलता आणि नागर वृक्षलता एकमेकींच्या हातांत हात घालून हितगुज करतांना दिसतात.

* * *

कारवारच्या शेजारीं कारवारपेक्षांहि जुनीं अशीं पाहण्यासारखीं अनेक स्थळें आहेत. गोकर्ण महाबळेश्वराच्या लिंगावरच्या कवचाचे जे तुकडे उडाले त्यांपैकीं एक जिथें येऊन पडला तें शेजवाड कारवारजवळच आहे. तिथेंच शेजेश्वराचें जुनें मंदिर आहे. तीनशें-चारशें वर्षांचें जुनें चर्च असलेलें सुंकेरी, आणि कारवारला 'कारवार' हें नांव ज्यावरून पडलें तें कडवाडहि जवळच आहे. पण वेळ थोडा आणि पहायचें पुष्कळ अशी आमची स्थिति झाली होती.

मात्र सदाशिवगडला गेलेंच पाहिजे असें ठरवून संमेलनाच्या पहिल्याच दिवशीं दुपारचें जेवण झाल्यावर बसनें कोडीबागला आणि लॉंचनें काळी नदी ओलांडून सदाशिवगडला गेलों. एके काळीं हा गड गडकरी, पहारेकरी आणि शिबंदी ह्यांनीं गजबजलेला असे. कारण गडाची जागा अगदीं मोक्यावर आहे. आजघटकेला मात्र गडावर सागाच्या पानांची फडफड आणि पाचोळ्याची सळसळ काय ती ऐकूं येते. पण दरवाज्याच्या कमानींतून एकदोन भिंती ओलांडून खाडीकडल्या बाजूला आलें कीं, एकीकडे पूर्वेकडून येणारा काळी नदीचा भव्य गंभीर प्रवाह आणि पश्चिमेकडला समुद्राचा अनंत विस्तार ह्यांच्यावरून फिरतांना दृष्टि हरखून जाते. खालीं असताना दृष्टि अडवणारीं झाडें झुडुपांसारखीं क्षुद्र दिसूं लागतात आणि भोंवतालच्या दृश्य क्षेत्रांतलें त्यांचें योग्य स्थान त्यांना मिळतें. सदाशिवगडापासून देवगडापर्यंतची बेटांची चंद्राकार रांग बंदराला वेंघेंत घेत होती, आणि मधून कांहीं ठिकाणीं थोडीशीच जमीन कासवाच्या पाठीसारखी पाण्याच्या वर आलेली दिसत होती. आम्ही उभे होतों तिथून खालच्या बाजूला एक बुरजासारखी खोली होती. तिथें आंत शिरतांच एक पाकोळी फडफडत बाहेर पडली. "ह्या ओसाड जागेंत बुद्ध्या येऊन पाहण्यासारखें कांहीं नाहीं. आणि मला ही तुमची अगांतुकी पसंत नाहीं." असेंच जणुं ती सांगत होती. मी गवाक्षांतून डोकावून बाहेरच्या देखाव्याकडे पाहात होतों, तों गवाक्षाशेजारींच भिंतींतून बाहेर आलेल्या पिंपळाच्या वीतभर रोपट्यावरच्या माणकाच्या रंगाच्या तुकतुकीत पारदर्शक

पानांनीं माझें लक्ष वेधून घेतलें. किती निर्धास्तपणें वाऱ्याच्या झुळकेवर हेलकावत होतीं तीं! आणि प्रत्येक हेलकाव्याबरोबर त्यांची चमचमहि वेगवेगळें रूप घेत होती. खालीं समुद्राचा आणि नदीचा बहुरंगी जलविस्तार, त्यावर गर्द हिरव्या झाडांच्या वेगवेगळ्या आकृति, समोर अथांग आकाशाचा नीलिमा, त्या हिरव्या-निळ्या पार्श्वभूमीवर आपल्या विरोधी चमकदारपणानें चमचमणारीं तीं माणकाचीं पिंपळपानें उठून दिसत होतीं. तिथल्या त्या कठिण पण मोक्याच्या ठिकाणीं बसून चाललेली त्यांची ती चिमुकली चमचम मला अजून आठवते आहे.

* * *

कारवारच्या सृष्टिसौंदर्यांत एक भरघोस ताजेपणा आहे. आणि तो तिथल्या झाडांवेलींतच नव्हे, तर तिथल्या बाजारपेठेंत सकाळ-संध्याकाळ विकायला येणाऱ्या कळ्यां-फुलांत, फुलांच्या वेण्यांत आणि केवड्याच्या कणसांत देखील प्रत्ययाला येई. आपल्याकडल्यासारखींच अबोलीचीं, मोगरीचीं फुलें, पण किती टपोरीं, टवटवीत आणि सतेज! अबोलीचा रंग अधिकच खुललेला आणि गर्द, तर मोगऱ्याच्या कळ्या हस्तिदंतांतून कोरल्यासारख्या पुष्ट, रेखीव. शालीन शृंगाराचीं साधनें, आणि कारवारच्या उद्यानांनीं अतिथि-कारवार कन्यकांच्या भगिनींसाठीं आणलेलीं उपायनें होतीं तीं. ह्या शृंगारानें सजलेल्या कारवारकन्यकांकडे पाहिल्यावर कुणी कुणाचें सौंदर्य वाढवलें ह्याचा संभ्रम पडे. आधींच त्यांच्या कानांतलीं हिऱ्यांचीं कुडीं आणि त्याचे विलोल विशाल नेत्र ह्यांच्यांत चमकदारपणाबद्दल कायमची होड लागलेली. त्यांत मोगऱ्याचें तेज आणि त्यांची अंगकांति ह्यांच्यांत अधिक मनोहर कोण त्याची स्पर्धा लागे. आणि अधिक कौतुक कुणाचें करावें याची प्रेक्षकाला वानवा पडे!

पण आमच्या निवासाशेजारीं एकदां मीं एक वनकन्या पाहिली आणि मग मात्र 'दूरीकृता खलु उद्यानलता वनलताभिः' असें म्हणावेंसें वाटलें. सतेज, गव्हाळी अंगकाति; कंबरेवरचा भाग अनावृत, पण गळ्यांत काळ्या पोतीचीं पेंडीं इतकीं घातलेलीं कीं त्यांनीं वक्षःस्थळ अर्धेंअधिक झांकलें गेलेलें; मध्यम बांधा; सुवृत्त, पुष्ट पण अनतिपीन अवयव आणि नवयौवनाची रसरस; तिच्या अंगसौष्ठवानें एकाद्या मूर्तिकाराची दृष्टीहि खिळवून ठेवली असती, तेव्हां प्राकृतजनाची कथा काय?

* * *

एका बाजूला काळी नदीचें मुख आणि दुसऱ्या बाजूला बैतखोलची सुंदर खाडी, हीं दोन्ही स्थळें एकेकटींसुद्धा प्रेक्षकांचें लक्ष्य तासन्‌तास वेधून घेण्याला समर्थ आहेत. पण त्यांच्यामध्यें पसरलेल्या कारवारच्या 'वेळे'चें सगळ्यांत जास्त कौतुक झालें आहे.

कारवारच्या वेळेवर पहिली गोष्ट मनात भरते ती तिथली स्वच्छता आणि शांतता. पिगट पाढऱ्या वाळूचा मैलच्या मैल पसरलेला स्वच्छ पट्टा, आणि त्यावर सरसरत येऊन सलगी करणारा निळा-हिरवा-काळा समुद्र याचा सारखा मागं पुढें हेलकावण्याचा खेळ पाहात बसलें म्हणजे कंटाळा म्हणून येत नाहीं. वरती माडाची सळसळ आणि जरा पुढें गेलें कीं सुरूच्या झाडाचे अखंड सुस्कारे ह्याची आणि सागराच्या घोषाखाची चुरसच लागल्यासारखी वाटते.

एक वेळ सागरानें भूमीला सर्वांगीं संपूर्ण व्यापून टाकलें होतें. पण आतां तिच्या अंगाचा केवढा तरी भाग त्याच्या आटोक्याबाहेर गेलेला आहे. जणूं तें त्याला सहन होत नाहीं, म्हणून परत तिच्या अंगावर झेपावण्याचा त्याचा अहोरात्र प्रयत्न चालला आहे. वर्षाऋतूंत रुद्रमरुताचें साहाय्य मिळून त्याला बळ चढतें, आणि तो फांफावून उफाळून तिच्या अंगावर धडका देतो. पण एरव्हीपेक्षां दहापांच पावलें पुढें जातां येईल तेवढेंच. मग पुन्हां हताश होऊन, थकून जाऊन, सौम्य होऊन तो तिची मनधरणी करूं लागतो. प्रेयसीच्या अंगाला स्पर्श करूं पाहणाऱ्या प्रियकराच्या बोटांसारख्या त्याच्या इवलाल्या लाटा किनाऱ्याच्या वाळूवर तुरतुरूं लागतात, आणि तो तिच्या कानांत पुटपुटूं लागतो. तरी पण त्याचें ईप्सित जिथल्या तिथेंच राहतें. नाना देशींचीं रमणीय रहस्यें तो तिच्या कानांत कुजबुजतो, आणि आपलीं ठेवणींतलीं रत्नें तिच्या पायाशीं ओततो. पण ती त्याला अधिक पुढें येऊं देईल तर शपथ. एक वेळ त्यानें तिला अगदीं गुदमरून टाकलें होतें, त्याचा तिला राग आला आहे कीं काय कोणी सांगावें? पण त्याच्या मनाला तिचा तो दुरावा जाचतो. त्यामुळेंच खिन्न होऊन तो अहोरात्र उसासे टाकीत असतो. ते तिथें सारखे ऐकूं येतात.

आमच्या इथल्या मुक्कामांत कारवारच्या आठवडे-बाजाराचा दिवस आला. बाजारांतल्या वस्तू, आणि माणसेंहि, पाहून आपण आपल्याच देशांत आहों कीं परदेशांत अशी भ्रांत पडली. आपली भाषा त्यांना कळत नाहीं आणि त्यांची आपल्याला नाहीं, देशावरच्या आठवडे-बाजारांत ज्वारी-गव्हाच्या राशीच्या

राशी दिसतात—त्या इथें मुळींच नव्हत्या. तर उलट देशावरच्या बाजारांत वाण्याच्या दुकानांत ज्या वस्तू पिशव्या-पुरचुंड्यांतून दिसायच्या, आणि तोळा माशानें किंवा फार तर रतला-अर्धरतलानें विकल्या जायच्या त्यांच्या इथें राशीच्या राशी उभ्या होत्या. रिठे, शिकेकाई, आम्रोशी, अमसुलें, मिरीं, मसाल्याच्या जिनसा ह्यांचे एवढाले ढीग देशावर कुठले दिसायला? पण मिरीं-मसाल्याच्या वस्तू हें कारवार जिल्ह्याचें मुख्य धन आहे. कारवार जिल्ह्यातल्याच गिरसाप्पा गावच्या राणीला 'मिऱ्यांची राणी' म्हणून युरोपांतले लोक ओळखीत, इतकीं मिरीं तिथें पिकत. बाजारांत ठिकठिकाणीं फणस डोंगरासारखे रचून ठेवलेले होते, आणि काजू पायल्यांच्या मापानीं विकले जात होते. कारवारच्या जंगलात इतके बांबू असतांना बाजारात तऱ्हेतऱ्हेचें बुरुडकाम न दिसलें तरच नवल. व्यापारी आणि गिऱ्हाईक ह्यांना जिथें एकमेकाची भाषा कळत नाही तिथें सौदा करण्यात एक वेगळीच गंमत असते. ह्या गमतीचा अनुभव घेत आम्हीं खरेदी केली. आणि तिथूनच घेतलेल्या एका टोपलीत त्या वस्तू टाकून टोपली एका हमालाच्या डोक्यावर देऊन आम्ही आमच्या बिऱ्हाडाकडे निघालो. हमालाचें नाव होतें होन्नाप्पा गौडा. तो धंद्यानें हमाल नव्हता. "तूं एरव्हीं काय काम करतोस?" असें विचारलें तेव्हा तो म्हणाला,

"रैतु केलसा!"

पण त्याचें 'रैतु केलसा' (शेतमजुरी) त्याला वर्षभर पोसूं शकत नव्हतें. म्हणून तो मोल-मजुरी करी. गावांत, बाजारात आणि इतरत्र ज्या गौडती स्त्रिया दिसल्या त्यांनीं केसांत–कानांत पांढरीं, तांबडीं, पिवळीं फुलें, गवताचे तुरे घातलेले असले, तरी त्यांच्याहि चेहऱ्यावर प्रफुल्लता किंवा उत्साह दिसण्याऐवजीं कष्टलेपणा, खिन्नता, गुरांच्या तोंडावर दिसते तशी भावरहितता होती. त्यांच्याकडे पाहून मलाहि उगीचच उदास आणि कष्टल्यासारखें वाटलें. आणि आधीं जरी 'दूरीकृता खलु उद्यानलता वनलताभिः' असें मला वाटलें असलें तरी तें खरें नव्हे, असें मनांत आलें. शेतांत आणि रानांत राहणाऱ्या ह्या लोकांचें जीवन म्हणजे एक अविच्छिन्न कष्टपरंपराच असली पाहिजे. आणि तिच्याच खुणा त्यांच्या चर्चेवर उठलेल्या असाव्यात.

कदाचित् मी भावनावश होत असेन. त्यांचें आयुष्य सुखाचें नसलें तरी समाधानाचें असेल. त्यानीं केसांकानांत खोवलेलीं तीं रंगी-बेरंगी फुलें आणि ते तऱ्हेतऱ्हेचे गवती तुरे नव्हते का सांगत: "आम्ही सृष्टीचीं स्मितें ह्याच्या

मुखांवर झळकतों आहों. त्यांचें जीवन आमच्याशीं एकरूप झालेलें आहे. आम्ही आमचीं सुखदुःखें चांगलीं जाणतों. तुला त्यांच्यासाठीं उसने उसासे टाकायची आवश्यकता नाहीं."

तसेंहि असेल. तसेंच असो.

ऑक्टोबर, १९५२

·१५·

# गोकर्ण

कारवारहून गोकर्णाकडे चाललों होतों. बैतखोलची खाडी, गुड्डेहाळीचा डोंगर, राण्याचें चेंडिया गांव मागें टाकून मोटार पुढें गेली. तरी किती तरी मैलपर्यंत रस्ता आणि समुद्र हुतुतूच्या खेळांतल्या गड्यांप्रमाणें एकमेकांच्या जवळ येत आणि परत लांब होत. जणुं परशुरामानें बळकावलेली भूमि परत मिळविण्यासाठीं समुद्र पुढें सरसावत होता आणि त्याला मागें रेटण्यासाठीं भूमि पुढें घुसत होती. कारवारच्या पाठीकडला डोंगर, पुढल्या बाजूचा समुद्र आणि सदाशिवगडावरून दिसणारा नदीमुखाचा विस्तार यांचीं दृश्यें अजून मनांत रेंगाळत होतीं. त्यांच्या छटा समोरच्या देखाव्यांत मिसळत होत्या. पाहता पाहतां रस्ता आंत वळला. समुद्र लांब जात चालला दिसेनासा झाला. आणि मग सगळीकडून तांबड्या लाल मातीवरच्या हिरव्या रंगाच्याच वेगवेगळ्या छटा सरसावून येऊं लागल्या. त्यांतच कुठें पांढऱ्या शुभ्र फुलांनीं डंवरलेलीं कुंदाचीं बेटेंच्या बेटें उठून दिसत, तर कुठें बकाळीच्या फुलांचे झळकदार शेंदरी गुच्छ झटकन् पुढें येत. त्या रंग-वैचित्र्यानें विस्मित झालेली दृष्टि स्थिरावते न स्थिरावते तोंच काळ्या जांभळ्या करवंदांचे रसरशीत झुबके माना डोलवून हाक मारीत, आणि त्यांच्याभोंवतीं वाऱ्यावर आंदुळणारीं पिवळीं-निळीं रानफुलें आपल्या सौम्य आग्रहाची त्यांना साथ देत. त्या चिमण्या हांकेला ओ न देणें अरसिकपणाचेंच नव्हे तर अमानुष झालें असतें.

पण हें आमचें असें मधें मधें थांबणें, उतरणें, रेंगाळणें आमच्या ड्रायव्हरला पसंत नसे. तो म्हणे,

"असं तुम्ही करूं लागलांत तर चार दिवसांत देखील मुक्काम गांठणार नाहीं.

अन् पुढं तर तुम्हांला असे देखावे दिसतील कीं हलावंसंच वाटणार नाहीं."

त्याचं म्हणणं अगदीं रास्त होतं. सगळा प्रवास वेळेवर संपवणें भाग होतें. शिदोरीसारखाच वेळदेखील आपल्याला हवा तितका बरोबर बांधून घेतां आला असता तर काय बहार झाली असती ! पण 'कायदा पाळा गतीचा—थांबला तो संपला' अशी टोचणी लागली होती, ती आम्हाला पुढें ढकलीत होती. तांबडी-लाल माती, रंगीबेरंगी फुलानीं नटलेली झाडी-झुडुपं, गडद निळें आकाश, ह्याचे वळणावळणाला बदलणारे चित्रसुंदर रचनाविशेष डोळे घाईघाईनें, अधाशीपणानें, अतृप्तपणे पीत होते. आणि रेंगाळण्याची इच्छा आहे पण पुढें जाणें भाग आहे अशा ओढाताणीत सापडलेलें मन तीं सगळीं दृश्यें सांठवून घेत होतें.

तीं सगळीं दृश्यें मन आठवणींत साठवून घेत होतें तसेंच गोकर्णासंबंधीं ऐकलें-वाचलेलें आठवणींतून बाहेर काढीत होतें. गोकर्ण क्षेत्रांतलें शंकराचें महाबलेश्वरलिंग हें त्याच्या ज्योतिर्लिंगासारखें नाही. तें त्याचें आत्मलिंग आहे. त्याच्या विश्वसंहारक शक्तीचें तें निधान-संपुट आहे. शंकराकडून तें मोठ्या प्रयासानें मिळवून परम मातृभक्त रावण लंकेकडे नेत असतांना चिंताग्रस्त झालेल्या देवांनीं कारवाई करून गुराख्याचें कपटरूप घेतलेल्या गणपतीच्या हातून तें तिथें खालीं ठेववलें. म्हणून गोकर्णाचें माहात्म्य. शंकराला आपली शक्ति आत्मलिंगात घालावी लागली तीहि गोकर्ण क्षेत्रींच, आणि क्रोधाविष्ट शंकराच्या संहारशक्तीचा पहिला भयानक प्रत्यय सर्व देवांना आला तोहि तिथेंच.

आडात घातलेल्या गळाला लागून मोठ्या वस्तूबरोबर लहानसहान वस्तूंहि जशा वर येतात तशी पुराणातल्या विस्मयकारक आणि रोमहर्षण प्रसंगांच्या या आठवणींबरोबर एका मधुर आणि प्रेमळ प्रसंगाचीहि आठवण वर आली. कुमठ्याजवळच्या मल्लापूर गावचे लपट्टे नारणप्पा सर नारायण चंदावरकरांचे पूर्वज. त्यांची पत्नी लक्ष्मी आणि देवगिरीचे साधुपुरुष रमावल्लभदास ह्यांची भेट गोकर्ण क्षेत्रातल्या समुद्रतीरावरच झाली. तिथून तिनें त्यांना आपल्या गावीं नेलें. रमावल्लभदासामुळें तीं आणि तिनें सगळें कुटुंब कृष्णभक्त झालें. आणि तिथपासून त्या प्रांतांत कृष्णभक्तीची परंपरा चालू झाली.

आठवणींचे प्रवाह मनांत खालीं-वर फिरत होते. मोटार पुढें चालली होती. वळणावळणाला नवा दृश्यविस्तार नजर वेधून घेत होता.

गहिऱ्या पाण्यानें जडावलेल्या आणि तीरांवरच्या दाट झाडीनें भारावलेल्या

गंगावळीचें कालव्यासारखें रेखीव पात्र ओलांडून तर पलीकडल्या तीराला पोंचली तेव्हां हलकासा धक्का बसला. इथून आतां गोकर्ण लांब नव्हतें. जरासें पुढें गेलें आणि सानीकट्ट्याचीं मिठागरें ओलांडली कीं गोकर्ण. त्याप्रमाणें पंधरावीस मिनिटांत गांवांत शिरून घरां-देवळांच्या मधून पुढें जात महाबळेश्वराच्या मंदिराशीं पोंचलोंच.

* * *

डावीकडच्या जमिनीचा भाग समुद्रांत बराच पुढें गेल्यामुळें अर्धचंद्राकार झालेल्या त्या स्वच्छ पिंगट वालुकाविस्तारावर निळ्या-पांढऱ्या समुद्राचा फेसाळ खेळ चालला होता. कारवारच्यापेक्षां इथें समुद्र अधिक निळा होता का? कीं आज आकाश अधिक निळें होतें? कीं इथल्या वाळूच्या रंगामुळें असें वाटत होतं?...शंकराचें आत्मलिंग घेऊन कैलासाहून लंकेकडे चाललेल्या रावणाला वाट वाकडी करून इकडे पश्चिम सागरावरच्या गोकर्ण क्षेत्रांत येण्याचें खरोखर कारण नव्हतें. पण एकदा इथें आल्यावर मात्र, समुद्रानें वेढलेल्या लंकेच्या त्या अधिपतीला इथली समुद्राची शोभा पाहून क्षणभर मोह पडला असला तर नवल नाहीं. साहजिकच मग तो नुसतीच संध्या करण्याऐवजीं थोडासा तिथें रेंगाळत राहिला असेल. आणि म्हणूनच कदाचित् त्याची संध्या आटपायला वेळ लागला, आणि देवांचें फावलें. तो संध्येसाठीं उभा असेल तिथेंच कदाचित् आम्ही उभे असूं. त्यानें वीसहि हातांनीं सूर्याला अर्घ्य दिलें तेव्हां समुद्राच्या पाण्याला जो खळाळ आला तोच हा असेल. समुद्र आम्हांलाहि म्हणत होता, "आंत या." आणि आम्ही कदाचित् कांकूं करूं म्हणून आम्हांला घेण्यासाठीं तो पुढें येत होता. आम्ही कांकूं करणार नव्हतांच. प्रवासानें आंबलेले, उन्हानें घामेजलेले होतों. पुढें होऊन आंत शिरून 'हस्तौ पादौ' प्रक्षाळूं लागलों. त्या नादांत वेळ चालला, पण पाण्याची ओढ सोडवत नव्हती. आणि मग तिथेंच मला महालापूरच्या लक्ष्मीच्या कानांतून गळून पडलेलें कर्णफूल दिसूं लागलें. कर्णफूल सांडल्याचें तिला दुःख नव्हतें. पण मुद्दाम शिवरात्रीच्या स्नानासाठीं आणि दर्शनासाठीं आली होती ती. अशा शुभ दिवशीं तें हरवावें म्हणून ती कष्टी झाली होती. विमनस्क होऊन बावरून ती इकडे तिकडे बघूं लागली. गर्दीत तिच्याभोंवतीं घोळका जमला. ओळखी-अनोळखी बायकापुरुष 'काय झालं, काय झालं—' करूं लागले. त्यामुळें ती साध्वी अधिकच गांगरली. तेवढ्यांत कुणी सत्त्वशील दिसणारा पुरुष तिथें आला. आणि काय झालें तें

कळल्यावर म्हणाला, "अग, कर्णफूल तुझ्या कानांत आहे." खरेंच! कानांतच होतें! पण फूल सांडलें होतें हेंहि नक्की. हा पुरुष सामान्य नव्हे हें तिनें जाणलें, आणि त्याचे तिनें पाय धरले. "मुली, ऊठ—" म्हणून रमावल्लभदासांनीं तिला उठवलें. आणि ती चालूं लागली.

पाण्यांतून स्वतःला ओढून काढीत मीहि बाहेर पडलों. आत्मलिंग ठेवून गुप्त झालेल्या गणपतीच्या गाई त्याची प्रतीक्षा करीत जशा बसल्या असतील तशाच पांचसात गाई किनाऱ्यावरल्या झाडांच्या सावलींत बसल्या होत्या. लिंग खालीं ठेवण्यापूर्वी गणपति समुद्रापासून थोडासा लांब गेला असावा असें वाटतें. कारण समुद्रापासून महाबळेश्वराच्या मंदिरापर्यंत जाण्यासाठीं आम्हांला बरेंच चालावें लागलें. प्राकारामुळें मंदिराचा खालचा भाग जरी दिसत नसला तरी वरचा जो भाग दिसत होता त्यावरून मंदिराचा भक्कमपणा आणि भव्यपणा नजरेंत भरत होता. मंदिराच्या आसपास आतांसारखे वसती-वाडे नसतील, तेव्हां तर त्याची भव्यता विशेषच जाणवत असेल.

ज्यामुळें त्या सबंध भूमीला 'गोकर्ण' नांव पडलें, तें आदिगोकर्ण मंदिराच्या आवारांतच आहे असें ऐकलें होतें. ब्रह्मदेवाच्या मनांत सृष्टि निर्माण करावी असें आलें, तेव्हा त्यानें आधीं चार ऋषी उत्पन्न केले आणि त्यांना हें काम सांगितलें. पण ते तयार होत ना. तेव्हां ब्रह्मदेवानें आपल्या मस्तकांतून शंकराला उत्पन्न केलें. आणि त्याच्यावर सृष्टिनिर्माणाचें कार्य सोपवलें. त्यानें विचार केला, आपण जी सृष्टि निर्माण करणार तींत काहींहि नश्वर असतां कामा नये. म्हणून तो जलांत शिरून तिथें ध्यानस्थ राहिला. पण अशीं युगानुयुगें लोटलीं तरी तो बाहेर येईना. तेव्हा त्याची प्रतीक्षा करून कंटाळलेल्या ब्रह्मदेवानें हातात माती घेऊन पृथ्वी आणि प्राणी निर्माण केलीं. हें शंकराला कळलें तेव्हां अपमानाच्या संतापानें त्याचा जळफळाट झाला आणि तो पृथ्वीला फाडीत बाहेर निघाला. भयभीत झालेली पृथ्वी गायीचें रूप घेऊन त्याच्याकडे गेली आणि त्याची प्रार्थना करून म्हणाली,

"माझा नाश करूं नको. मी तुला माझ्या कानांतून बाहेर जाण्याला वाट करून देतें."

त्याप्रमाणें शंकर गायीच्या कानांतून बाहेर आला. तें विवर म्हणजे गोकर्ण. तेंच आदिगोकर्ण आणि त्यालाच रुद्रयोनीहि म्हणतात. एका अर्थी शंकराचें जन्मस्थानच तें. तें कुठें आहे म्हणून चौकशी केली, तेव्हां तिथल्या एका

गृहस्थांनीं आम्हांला आवारांतच एके ठिकाणीं एक खोलगट जागा आणि त्यांत एक शिवलिंग दाखवलें. सृष्टीच्या उत्पत्तिकालाच्या एका प्रचंड उत्पाताचें तें क्षुद्र आणि संकुचित अवशिष्ट पाहतांना आम्हांलाच लाजल्या-संकोचल्या-सारखें झालें.

त्या वेळीं प्रज्वलित झालेला आपला क्रोधाग्नि देवांच्या प्रार्थनेवरून आवरून, केंद्रित करून, शंकरानें एका लिंगांत घातला. तें त्याचें आत्मलिंग. तें रावण लंकेंत नेत होता. आणि तेंच गणपतीनें युक्तीनें खालीं जमिनीवर ठेवलें.

"ज्या गणपतीनें ही क्लृप्ति केली तो तिथें उभा आहे." त्या गृहस्थांनीं आम्हांला सांगितलें.

खरोखरच पलीकडे एका कोपऱ्यांत गणपति उभाच होता. गुराख्यानें लिंग खालीं ठेवल्यामुळें संतापलेल्या रावणानें तिथें उभ्या असलेल्या गणपतीच्याच कपाळावर प्रहार केला. त्याची खूण वागवीत तो बिचारा अजून तिथेंच आणि तसाच उभा आहे.

गुराख्यानें जमिनीवर ठेवलेलें लिंग उचलण्यासाठीं रावणानें हात घातला. पण तें त्याला उचलेना. कैलास हादरवून सोडणाऱ्या रावणाचा मीपणा दुखावला. त्यानें वीसहि हात घालून सगळें बळ एकवटून पुन्हां प्रयत्न केला. परिणाम एवढाच झाला, कीं लिंगाचें कवच तेवढें त्याच्या हातीं आलें. तें त्यानें रागानें भिरकावलें. त्याचीं चार शकलें होऊन दहा कोसांच्या परिसरांत चार ठिकाणीं तीं पडलीं. लिंगाचा गाभा जमिनींत राहिला तो राहिलाच. त्यावरच महाबलेश्वराचें मंदिर उभारलेलें आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या लांकडी चौकटीवरच्या कोरीव कामानें माझें लक्ष्य वेधून घेतलें. तिकडे पाहात पाहात मी आंत पाऊल टाकीत होतों, तों तें फरशीवर पालथें पडून देवाला दंडवत करीत असलेल्या एका भक्ताच्या पाठीवर पडलें. ती पाठ फरशींत कोरलेली होती म्हणून बरें, नाहीं तर अवघड प्रसंग उभा राहिला असता. मी पाऊल उचलून दुसरीकडे टेवूं लागलों, तों उंबऱ्याच्या आंतबाहेर अनेक भक्त फरशीमध्यें पालथे रेखलेले दृष्टीस पडले. त्यांच्या पाठी टाळून पाऊल टाकणें अशक्य होतें. यात्रेकरूंनीं आपल्या पाठीवरून पाय देऊन पुढें जावें—देवाच्या वाटेवरची आपण पायरी व्हावें—हाच त्या भक्तांचा खरा उद्देश असला पाहिजे. परंतु देवाच्या वाटेवर यावज्जीव पालथें पडून राहाणें अन्य महत्त्वाच्या व्यवसायांमुळें शक्य नसल्याकारणानें त्यांनीं पुण्यसंपादनासाठीं

ह्या पर्यायाचा अवलंब केला असावा. सभामंडपांत गेलों तों सभामंडपाची सर्व भूमीच कूर्मपृष्ठाकार. त्याच्याहि पाठीवर पाय देण्यावांचून गत्यंतर नव्हतें. दारांत भक्तांच्या आणि इथें कांसवाच्या पाठीवरून पाय देतांना इतकें संकोचल्यासारखें होत होतें, कीं ह्या औद्धत्याचें परिमार्जन कसें होणार असें वाटलें. महाबलेश्वराच्या दर्शनानें जो पुण्यसंचय होणार होता त्यांतूनच काहीं कारणीं लागून हें झालें असतें तर असतें.

सुदैवानें महाबलेश्वराच्या दर्शनाचें पुण्य, आत्मलिंग म्हणून, मोठंच आहे. काशीप्रमाणें सर्व पुण्यस्थानें इथें असून शिवाय समुद्रहि असल्यामुळें 'सागरे सर्व तीर्थानि' ह्या न्यायानें तें आणखी अनंतपट झालें आहे. इतर क्षेत्रीं अनेक दिवसाच्या वसतीनें जेवढें पुण्य मिळत नसेल, तेवढें गोकर्णमहाबलेश्वराचे एक वेळ दर्शन घेतल्यानें मिळतें.

कांसवाच्या पाठीवरून चालत जाऊन, नंदीला यथास्थान वंदन करून रीतीप्रमाणें त्याच्या शिंगांमधून शंकराचें दर्शन घ्यावें म्हणून पाहूं लागलों. तों गाभाऱ्याच्या अंधारांत दिव्यांचा अति क्षीण प्रकाश आणि भक्तांच्या धूसर आकृती यावांचून कांहीच दिसेना. खरोखर गाभाऱ्यांत गर्दी बाहेरून दिसत होती त्यापेक्षां कितीतरी अधिक होती. त्यामुळें त्या पंचवीस हात चौरस जागेत उकाड्यानें कोंडमारा होत होता. विश्वकर्म्यानें हें देऊळ बांधलें म्हणतात. चांगलें बांधलें आहे. पण तें बांधतांना त्यानें गाभाऱ्याला गवाक्षें ठेऊन प्रकाश आणि प्राणवायु आंत खेळण्याची सोय केली असती तरी चाललें असतें. पण विश्वकर्मा झाला तरी त्याला स्थापत्याचे प्रचलित संकेत मोडतां येत नसावेत.

गाभाऱ्याच्या मध्यभागीं प्रशस्त अशा काळ्या शाळुंकेवर एक पांढरट गोकर्णाकृती उठलेली आहे, आणि मध्यें खळगा आहे. भक्ताला दर्शन होतें तें एवढेंच. खरें आत्मलिंग त्या शाळुंकेच्या खालीं आहे. तिथें गायीचे दोन कान आणि त्यांच्यामध्यें उभट लिंग आहे असें म्हणतात. (म्हणजे गोकर्णमहाबळेश्वर ह्या शब्दसंहतीचा पार्थिव अन्वयार्थ.) प्रसंगविशेषीं, किंवा तसाच कोणी धनिक-दाता आला तर, वरची शाळुंका काढून दाखवतात असेंहि कळलें. परंतु आम्ही गेलों त्या वेळीं प्रसंग विशेष नव्हता किंवा आम्ही तसेच कोणी धनिक-दाते नव्हतों, त्यामुळें तो दर्शनयोग आम्हांला लाभला नाहीं. आणि लाभला असता तरी त्या कोंदट भक्तसंकुल गर्भागारांत मुहूर्तमात्रहि थांबवलें नसतें. शाळुंकेवर जलधारांनीं रुद्राभिषेक चालले होते तर आमच्या रोमरंध्रांतून

घर्मजलाचीं कारंजीं फुटत होतीं. शांतता नाहीं, प्रसन्नता नाहीं, गांभीर्य नाहीं; सगळी घाई, गडबड, गोंधळ, पोटभरू पुजाऱ्यांची पोपटपंची, कुंद वातावरण आणि निर्माल्याचा कुबट दर्प. हीं टाळण्यासाठींच महाबलेश्वरानें शाळुंकेच्या खालीं राहायचें पत्करलें असावें.

माध्यान्हीं दर्शन झाल्यामुळें निदान आजन्मकृत पापाचें तरी व्यपोहन झालेंच असेल असें समाधान मानीत मंदिराच्या बाहेर पडलों. त्याच्या त्या भव्य शिखराकडे वळून पाहिलें. आणि मग माडांच्या तोरणांतून थरथरणाऱ्या समुद्रावर पुन्हां एकदां दृष्टि टाकून गोकर्णक्षेत्राचा निरोप घेतला.

गोकर्णक्षेत्रीं वसलेल्या महाबलेश्वरासमोर वीणा वाजवण्यासाठीं जाण्याची नारदाला इतकी घाई झाली होती, कीं आपल्या वीणेवरची माळ अयोध्ये-बाहेरच्या उद्यानात पतीबरोबर विहार करीत असलेल्या इंदुमतीच्या स्तनतटावर पडून त्या आघातानें तिला मृत्यु आला ह्याची त्याला दादहि नव्हती.

इतकी घाई करण्याला त्याची शंकरासंबंधीची भक्ति हें कारण असलें तरी तें विशेष प्रबल नसावें. कारण कैलासावर प्रत्यक्ष शंकराचें सान्निध्य लाभत असत ना त्याच्या प्रतीकाच्या उपासनेची आवश्यकता काय? तेव्हां शंकरा-संबंधींच्या भक्तीपेक्षांसुद्धा, तिन्ही बाजूनीं समुद्रानें वेढलेल्या ह्या गोकर्णाकृति भूमिभागाच्या आणि त्याच्या आसमंताच्या दृष्टिभोग्य सौंदर्याचें आकर्षण हेंच विशेष कारण असावें. ह्या पाचूसारख्या हिरव्या द्वीपकल्पाचें, आणि त्याभोंवतीं आपल्या शंखोज्ज्वल फेनाची माळ गुंफण्यांत अहोरात्र दंग असलेल्या, विविध-वर्णच्छटा धारण करणाऱ्या, नीलोदधीचें विहंगदर्शन हिमालयांतल्या भकास, बर्फाळ निवासानंतर त्याला विशेष चित्तवेधक वाटत असेल. म्हणूनच तो तसा घाईघाईनें यायला निघाला असेल. अजूनहि मधून मधून येत असेल.

डिसेंबर, १९५२

·१६·

# शरावती

गोकर्ण सोडून गिरसाप्पाच्या वाटेला लागल्यावर मोटरी वेगानें चालल्या. जसजसें अंतर कापत चाललें, तसतसें आसमंताचें स्वरूप पालटत चाललें. शेतें आणि तुरळक झाडीचे मोकळे माळ मागें पडले. तांबडा लाल रस्त्याचा पट्टा कधीं सखल जागेंतून, कधीं डोंगराच्या कडेवरून, तर कधीं झाडांच्या गर्दीतून अगदीं रानाचा गाभा कापून वाट काढीत चालला होता. आम्ही उंचावर असलों म्हणजे खालीं खोऱ्यांत मैलचे मैल नुसत्या सुपारीच्या बागा दिसत. वेताच्या छडीसारखे लवचीक आणि कांतून काढलेल्या खांबासारखे सरळ असे त्यांचे भुरकट-करडे बुंधे आणि त्यावरचीं हिरवीं, किरणांसारखीं पसरलेली पानें पाहिलीं, म्हणजे उंचाड्या अष्टावक्रांप्रमाणें जेमतेम तोल सांवरून धरणाऱ्या माडांची आठवण होऊन हसूं येई. कवायतीला उभ्या राहिलेल्या मुलींसारखी त्यांची रेखीव रचना मन आकर्षून घेत आहे तोंच मोटर दाट अरण्यांत शिरे आणि तिथली झाडांची गर्दी स्तिमित करून टाकी. गुडघ्याएवढ्या खुरट्या कांटेरी झुडपापासून आभाळाला उचलून धरणाऱ्या प्रचंड वृक्षापर्यंत सर्वांना सारख्याच आवेगानें कवटाळणाऱ्या विवेकशून्य आश्रयातुर वेली; आकाशाच्या दुध्या-निळ्या पार्श्वभूमीवर काळीं जाळीं कोरणारीं कळकीचीं राक्षसी बेटें; तीन तीन पुरुष उंचीचीं केवडयांचीं झाडें; इतर ओळखीचीं आणि अनोळखी झाडें-झुडपें—किती पहावें आणि कुठें पहावें अशी मनाची स्थिति होई.

वाटेंत एका ठिकाणीं लालशेंदरी रातांबे पडलेले दिसले, ते खाऊन कपडे व तोंडें रंगवून घेतलीं. पुढें एका ठिकाणीं, श्रावणांत पारिजातकाच्या फुलांचा सडा पडावा तसे आंबे पडलेले दिसले. चांगले पाडाला आलेले, हिरवे-पिवळे, पण

लहान. किती ? श्रीवर्धनी रोठ्यांइतपत ! आम्हीं अधाशीपणानें पुष्कळसे भरून घेतले. पण चोखून पाहातों तों काय ? आंबा म्हणजे निव्वळ आंब्याची व्याख्या–मूळप्रकृति–होती. साल, रेषा, कोय आणि चिकाळ आंबट-गोडी. तेव्हां मग सगळीं फळें 'इदं न मम' म्हणून धांवत्या गाडींतून ओतून वनदेवताना परत दिलीं.

मधून एखादी वेल दाखवून आमचा ड्रायव्हर सागे, "ही मिऱ्यांची वेल, ही विड्याच्या पानांची, ही गुंजेची," आणि आम्ही नवल करीत कर्तव्यदक्ष 'हुंकार' देत असूं. दोन डोळ्यानीं पाहायचें किती आणि साठवायचें किती ? एवढ्या दाट अरण्यातून जात असतांना काहीं जनावरें दिसलीं तर किती बहार होईल असें मनाशीं म्हणतच होतो, तों एकदां पांच सात रान-डुकरांची एक मातट माळ रस्त्यावरून आडवी मुसडी मारून गेली. तेव्हां मात्र खरें रान पाहिल्यासारखें वाटलें. अर्थातच चपळ सडपातळ नीलगाई, मस्त थोराड रानरेडे, जबरदस्त सुस्त अजगर, एखादा वाघ किंवा वाघरूं असें कांहीं दृष्टीला पडलें असतें तर रानाचा रानपणा अधिक ठसला असता. पण हें आतां म्हणायला ठीक आहे. त्या वेळीं खरोखरच असें कांहीं दिसतें तर 'सीदन्ति गात्राणि । मुखं च परिशुष्यति' अशीच अवस्था झाली असती. भर दुपारची वेळ होती म्हणूनच असा प्रसंग येण्याचा फारसा संभव नव्हता. तिन्ही साजची किंवा रात्रीची वेळ असती तर तो आलाच असता. मध्येंच एखाद्या ठिकाणीं झाडीनें झांकळलेला पाणवठा किंवा डोह दिसला म्हणजे रात्रीच्या प्रहरीं तिथें कसला देखावा दिसत असेल ह्याचा विचार येऊनच आंतल्या आंत थरकांपल्या-सारखें होई. कारवारला येतांना अमर्याद आणि अथांग निळा समुद्र पाहिला,—हा हिरवा समुद्रच होता. त्या समुद्राच्या पृष्ठभागावरून तरंगत आलों होतों आणि ह्याच्या पोटांतून वाट कापीत चाललों होतों. दोन्ही सारखेच भयाण आणि मनुष्याला एकाकी आणि क्षुद्र वाटायला लावणारे.

ऐन दुपारीं तिन्हीसांजचा आभास उत्पन्न करणाऱ्या त्या अरण्यांतून जातां जातांच खरोखरची तिन्हीसांज जवळ येत चालली. असूर्यंपश्या देवदारांसारखें जपून जोपासून वाढवलेल्या वेलदोड्यांच्या आणि सुपाऱ्यांच्या राशींनीं भरलेली शिर्सीची बाजारपेठ डावलून आम्ही पुढें चाललों होतों.

बराच वेळ गेल्यावर जंगलांतच एका ठिकाणीं गाडी थांबवून ड्रायव्हरनें आम्हाला विचारलें,

"ऐकूं येतं कांहीं ?"

"काय ?" आम्ही थोडेंसें घाबरतच उलट प्रश्न केला. वाटलें, कशाबद्दल विचारतो आहे !

"धबधब्याचा आवाज ? इथून दोन मैलांवर आहे."

जिवांत जीव येऊन आम्ही कान दिल्यासारखें केलें. ऐकूं येत होता खरा. आतां आम्ही अधिकच उत्सुक झालों. पंधरा वीस मिनिटांत मुंबई-बंगल्याशीं जाऊन पोंचलों. मुंबई-बंगल्यांत राहायची सोयहि होती. पण चारी धबधब्यांचा सगळा देखावा म्हैसूर-बंगल्याकडून अधिक चांगला दिसतो. शिवाय त्या बाजूनें खालीं जायलाहि अधिक चांगला रस्ता आहे. तेव्हां मुक्कामाला म्हैसूर-बंगल्याकडेच जायचें ठरवावें लागलें. धबधब्याच्या रोखानें थोडेसे खालीं उतरलेले आम्ही तसेच परतून मोटरींत बसलों. आणि धबधब्याच्या वरच्या अंगाला मैल दोन मैलांवर तर आहे तिकडे निघालों. आम्ही पोंचलों तों सहा वाजून गेले होते. आणि तर सहालाच बंद होते. आमच्यासारखेच आणखीहि कांहीं लोक खासगी मोटरीनें पलीकडे जाण्यासाठीं आले होते. तरवाल्यानें आम्हांला पलीकडे न्यायचें नाकारलें. आम्हीं त्याच्याशीं हुज्जत घातली. आमची अडचण समजावून सांगितली. थोडासा रुबाब दाखवून पाहिला. बक्षिसाची आशा दाखवली. पण तो हूं कीं चूं करीना. आम्हीं ड्रायव्हरला विचारलें, "काय करायचें ?" तो म्हणाला, "स्वस्थ बसा, सर्व व्यवस्था लागेल." त्याच्यावर विसंबून आम्ही स्वस्थ बसून राहिलों. आणि उगीच आसपास येरझारा घालूं लागलों. ह्या भागांत नारळीपोफळींचीं झाडें दिसत नव्हतीं. देखावा देशावरच्या सारखा होता. आम्ही बसलो होतों तिथून जवळच एका ठिकाणीं कांहीं फुलें दिसलीं. त्यांचा तुरेदार आकार आणि तांबडा-पिवळा रंग फार मोहक वाटला. आम्हीं थोडींशीं तोडून घेतलीं. कोणी तरी म्हटलें,

"ह्याचं नांव काय असेल ?"

"कोण जाणे."

"मग आपण कांहीं तरी नांव देऊं."

"आपण काय नांव देणार ?"

"काका कालेलकरांनीं हें पाहिलं असतं तर त्याच्या रंगावरून त्यांनीं त्याला त्याला 'सोहागफूल' किंवा 'सौभाग्यपुष्प' नांव दिलं असतं."

आम्ही तीं 'सौभाग्यपुष्पें' निरखून पाहूं लागलों. त्यांचें नामकरण झाल्यामुळें त्यांना आतां व्यक्तित्व आणि वैशिष्टय आलें होतें. आम्ही त्यांचें कौतुक करतों आहों तों ड्रायव्हर आला आणि सांगूं लागला,

"चला, तरीवर जायचं."

ती दुसरी मोटरवाली मंडळी कंटाळून परत मुंबई-बंगल्याकडे गेली होती. ती जायचीच तरवाला वाट पहात होता. त्यानें आमच्या बॅगा एका तरीवर चढवल्या. आम्ही एका होडींत चढलों. इथें शरावतीचें पाणी एखाद्या तळ्यांतल्या-सारखें शांत होतें. दोहों बाजूंना झाडीनें झांकलेले डोंगरांचे उंचवटे होते. खालीं मैल दोन मैलांवर नऊशें फुटांचा धबधबा आहे हें कुणी सांगूनहि खरें वाटलें नसतें. एव्हांना सूर्य मावळून गेला होता. वर काळें-निळें आभाळ; खालीं संथ, शांत, काळें-निळें पाणी; दोहो अंगांना काळे तट; सगळ्या निळ्या-काळ्या रंगांच्या गंभीर छटा, आणि सगळें निःशब्द. आम्हांला नदी ओलांडायला पांच-सातच मिनिटें लागलीं असतील. पण त्या तेवढ्या वेळांत असें वाटलें, जणूं आम्ही अनंतकालाची यात्रा करतां आहों. जणूं काल थांबला आहे. भूत-भविष्याला कांहीं अर्थ नसून सबंध काल वर्तमानच आहे. आणि आम्ही असेच प्रवास करीत राहणार आहों. आम्ही कुठून आलों नाहीं आणि आम्हांला कुठें जायचेंहि नाहीं. चार दोन क्षणच, पण आम्ही आम्ही राहिलों नव्हतों....तर परतीराला लागली, आम्ही पुन्हां आम्ही झालों. प्रवास चालू झाला. कालाला गति मिळाली.

म्हैसूर-बंगल्यावर पोंचून अंगणांतल्या कठड्याशीं स्वस्थपणें जाऊन बसलों तों रात्रीचे साडेआठ-नऊ झाले होते. बंगल्यांतले आणि अंगणातले, दृष्टीला अडथळ्यासारखे वाटणारे दिवे कांहीं वेळानें विझले. आणि मग खालीं खोऱ्यांतला अंधार आणि वर कृष्णपक्षांतल्या रात्रीची धूसरता एवढेंच राहिलें. त्या धूसरतेंत धबधबा नुसता ऐकूंच येत होता. आणि कठड्याच्या माथ्याशीं फेसाळ असें प्रचंड कांहीं तरी जाणवत होतें.

आम्ही कारवारहून निघालों तेव्हां बरेच लोक आम्हांला म्हणाले होते,

"ह्या दिवसांत गिरसाप्पाला कशाला जातां तुम्ही? ह्या दिवसांत तिथें पाहण्यासारखं कांहीं नसतं. गिरसाप्पा पाहायचा तर डिसेंबर ते फेब्रुआरी ह्या दिवसांत पाहावा."

पण आम्हीं आमच्या मनाशीं ठरवलें होतें, कीं ह्या प्रवासांत गिरसाप्पाला गेल्यावांचून राहायचें नाहीं. मग तिथें गेल्यावर कोरड्या पात्रांतले दगडगोटे पहावे लागले तरी हरकत नाहीं. त्या भव्य-भीषण स्थलांतले दगड-गोटे सुद्धां पाहण्यासारखे असले पाहिजेत. आणि तें तसें दृश्य पाहणें ही देखील एक संस्मरणीयच घटना ठरेल.

पण 'पुरा यत्र स्रोतः' असें दृश्य पाहण्याचा प्रसंग आमच्यावर आला नाहीं. धबधब्याच्या खालच्या बाजूला म्हैसूर सरकारचा वीज-कारखाना आहे. त्यासाठीं शरावतीच्या वरच्या बाजूला धरण बांधलें आहे. त्यामुळें प्रवाह अजीबात कोरडा कधींच होत नाहीं. किंबहुना, उन्हाळ्यांत सुद्धां धबधब्यांत अधिक पाणी सोडतां येतें. आम्ही तिथें गेलो त्याच्या दुसऱ्याच दिवशीं मद्रासचे कीं म्हैसूरचे एक मंत्री येणार होते. त्यांच्यासाठीं धबधब्यांत मुद्दाम अधिक पाणी सोडणार होते असें कळलें. धबधब्यावर ताबा मिळवून त्याचा तोटीचा नळ करणारा मनुष्य कर्तबगार खरा. पण ऐकून बरें वाटलें नाहीं. माणसाळलेला धबधबा हे शब्द उच्चारायला जीभ धजावेना. त्यांतल्या त्यांत समाधान एवढेंच, कीं वीज काढण्यासाठीं म्हैसूर सरकारनें धबधब्याला खांबां-सांखळ्यांच्या वेढ्यांनीं विद्रूप केलें नाहीं.

तो फेसाळ कडेलोट पाहात आणि धबधबा ऐकत असतांना मध्यरात्र केव्हां उलटली तें कळलें नाहीं.

सकाळीं सगळें दृश्य बदललेलें होतें. आदल्या रात्रीच्या काळोखाच्या दरीच्या जागीं, हिरव्या-पिवळ्या रानानें झांकळलेली काळ्या-पिंगट दगडा-कपारींची दरी पसरलेली दिसत होती. समोर 'राजा' नऊशें फुटांवरून ओळंबा धरल्यासारखा सरळ वरून खालच्या कुंडांत कोसळत होता. त्याच्या डाव्या बाजूला बऱ्याच अंतरावर 'रोअरर' गर्जना करीत उडी घेत होता. त्याच्या शेजारीं 'रॉकेट'चा प्रवाह मधल्याच एका खडकावर आपटून सहस्रशः विदीर्ण होऊन वर उशी घेऊन खालीं सूर मारीत होता. आणि त्याच्याहि डावीकडे, त्या तीन दांडगटांपासून जरा बाजूला, 'ला दाम ब्लॉश' (गौरी) एखाद्या सलज्ज कुलवतीप्रमाणें संकोचानें अंग सांवरीत खालीं उतरत होती. तिच्या त्या उतरण्याला धबधबा म्हणणें तिचा उपमर्द होईल. हिरकण्यांच्या पडद्यासारखा तिचा प्रवाह आधीं एका कपारीवर, तिथून खालच्या दुसऱ्या कपारीवर, तिथून तिसरीवर असा घरंगळत

होता. पश्चिमेकडून जेव्हां तिसऱ्या प्रहराचें ऊन तिच्या अंगावर पडत असेल तेव्हां तिचें उज्ज्वल रूप देवांनीं खालीं उतरून पाहाण्याच्या योग्यतेचें असेल. आणि खालीं देखील तिचें कुंड, राणीवशाची स्नानाची पुष्करणी वेगळी असावी तसें, वेगळें होतें. नदीला पूर आला म्हणजे मग मात्र, गर्दीत जसें सभ्य-असभ्य, नाजुक-आडदांड असे भेद ठेवणें अशक्य होऊन सगळे एकमेकांत मिसळतात तसे हे प्रवाह बरेचसे एकमेकांशीं अंगें घांशीत उड्या घेतात. पण ह्या वेळीं जो तो आपलें वैशिष्ट्य आणि वेगळेपण सांभाळून होता. आणि कधीं कधीं किंचित् क्षीण झालेल्या स्त्रीचें लावण्य जसें वेगळीच रेखीव शोभा धारण करतें तशी 'गौरी' ह्या वेळीं सुंदर दिसत होती. जिथून ती खालीं उतरत होती, तिथेंच कड्याच्या टोकाशीं उभा राहून एक चांफा तिचें लावण्य निरखीत होता. तिच्या दर्शनानें तो इतका बेहोष झाला होता, कीं आपल्या अंगावरली पानें गळाल्याचें त्याला भान नव्हतें. आपल्या फुलांच्या शुचिस्मितानें आपण वातावरण प्रसन्न करीत आहों ह्याचेंहि त्याला भान नसेल. आणि तो इतका वांकला होता, कीं कड्याच्या कपारींत त्याचे पाय जखडले गेले नसते तर तिचें रूप अखेरपर्यंत पाहण्यासाटीं त्यानें खालीं उडीहि घेतली असती.

दोन्ही कुंडांच्या मधला कडा बराच पुढें आलेला आहे. त्याच्या पायथ्याकडला कांहीं भाग प्रचंड अशा कांसवाच्या वर उचललेल्या डोक्यासारखा दिसत होता. जणूं समुद्रमंथनाचें काम संपल्यानंतर, अमृत पिण्यासाटीं आणि रत्नांच्या वांटणीसाटीं उत्सुक झालेले देव, गरज सरो आणि वैद्य मरो ह्या न्यायानें, मंदराचलाखालच्या कांसवाला तिथेंच विसरले होते; आणि शरावतीच्या पायाखालच्या ह्या विवरांतून तें बाहेर येऊं पाहात होतें. डोकें वर आलें आणि शरीर खालीं राहिलें तें राहिलेंच. कल्पांतानंतर पुन्हां देवांना अमृताची गरज लागेल तेव्हां त्यांना कांसवाची आठवण होऊन त्याचा शिलोद्धार होणार. तोंपर्यंतचा काळ त्याला कांसवाच्या सोशिकपणानेंच कंठावा लागेल.

वरून कोसळलेले आणि खालून मोकळे झालेले हत्तीएवढाले प्रचंड खडक खालीं कुंडाच्या कांठाशीं पसरलेले आहेत. त्यांवर उभे राहून वर पाहिलें. 'यतो वाचो निवर्तन्ते' असें रौद्र दृश्य होतें. ज्यांच्या प्रवाहामध्यें शेंकडों फुटांचें खरोखर अंतर ते धबधबे वर एकमेकांना खेटलेले दिसत होते. कड्याच्या टोकांवरच्या प्रचंड वृक्षांना वृंदावनांतल्या तुळशीच्या रोपट्यांचा आकार आला होता. गंगावतरणाच्या वेळीं आकाशांतून कोसळणाऱ्या गंगेकडे

पाहतांना भगीरथाला आणि शिवाच्या गणांना कसें वाटलें असेल ह्याची कल्पना मन करूं लागलें.

खालीं कुंडांतलें काळें-हिरवें पाणी, वरतीं शेवाळलेले पिंगट-काळे कडे आणि त्यावरून सहस्रावधि वर्षें अविरत कोसळत आलेले ते प्रचंड प्रवाह. खालून वर, वरून खालीं फिरतांना दृष्टि स्वधर्म विसरून जाते. विवश होते. भ्रमते. पांढऱ्या शुभ्र कबुतरांसारख्या शेंकडों पक्ष्यांचा कळप त्या धबधब्यांच्या आंतबाहेर मधूनच गर्रकन् गिरकी घेऊन जातांना दृष्टीस पडला, म्हणजे मग त्या घोर-गंभीर दृश्याला उज्ज्वल नाजुकपणाचा स्पर्श होऊन जातो आणि दृष्टि परत भानावर येते.

* * *

गिरसाप्पापेक्षां अधिक उंच, अधिक रुंद किंवा अधिक मोठे धबधबे जगांत इतरत्र आहेत, पण भव्यता आणि सौंदर्य ह्यांचा असा संयोग इतरत्र नाहीं असें म्हणतात. उन्हाळ्यांत त्या क्षीण प्रवाहांतहि एवढी भव्यता होती, मग पावसाळ्या-नंतरच्या दोनचार महिन्यांत जेव्हां प्रवाह पुष्ट असतो तेव्हाचें त्याचें रूपवैभव अलौकिकच असलें पाहिजे. त्या वेळीं सबंध दरी घोषारवानें निनादून तुषारांनीं दाटून जात असेल; त्यांवर उन्हाची तिरीप पडली म्हणजे इंद्रधनुष्यें उमटून "घोषाच्या कुंडीं । नाद चित्रांचीं रुपडीं । प्रणवाचिया मोडीं । रेखिलीं ऐसीं ॥" दिसूं लागत असतील; आणि पाहणाऱ्याला, क्षणमात्र कां होईना, योगिजनांना कष्टसाध्य समाधीनेंच लाभणारा दिव्यत्वाचा साक्षात्कार होत असेल. तें अनुपम दृश्य आम्हांला पाहायला मिळालें नाहीं. पण तें स्थानच असें आहे, कीं जें पाहिलें तेंहि 'यदल्पमपि तद्बहु' असेंच वाटावें.

मार्च, १९५३

## .१७.

# कृष्णा पश्चिम तटाकेसीं

उत्तरदेशीं करंज नगरीं ब्राह्मणाच्या घरीं जन्म, आणि वाराणसी क्षेत्रीं कृष्णसरस्वतींच्या हस्तें संन्यासदीक्षा, घेतल्यानंतर पुढें नृसिंहसरस्वती 'भिलवडी ग्रामासी, भुवनेश्वरासन्निध' आले आणि कृष्णेच्या पश्चिम तीरावर औदुंबर वृक्षाच्या आश्रयानें राहिले. तेव्हांपासून औदुंबर हें एक क्षेत्र, आणि दत्तभक्तांच्या यात्रेचें महत्त्वाचें स्थान झालें. लांबलांबून लोक त्या ठिकाणीं येतात. ठिकाण छोटें पण रमणीय आहे असें ऐकलें होतें. त्या भागांत गेल्यानंतर औदुंबरला न जाता तसाच आलों असतों तर मनांत अल्पशी कां होईना रुखरुख राहिली असती.

म्हणून आम्ही भिलवडी स्टेशनावर उतरलों आणि औदुंबरला जाण्यासाठीं एका टांग्यांत बसलों. तिथें उतरण्याची काय सोय आहे काय नाहीं ह्याची आम्हांला कांहींच कल्पना नव्हती. आम्हांला गुरुपादुकांपाशीं कांहीं मागायचें नव्हतें आणि कांहीं द्यायचेंहि नव्हतें. त्यामुळें एखाद्या ब्राह्मणाकडे उतरण्यांत कांहीं औचित्य नव्हतें. तिथल्या पांचसात हौशी लोकांनीं एक वाङ्मय-मंडळ चालवलें आहे असें मीं ऐकलें होतें. पण त्याचें नांव मला आठवत नव्हतें आणि आठवत असतें तरी टांगेवाल्याला तें विचारून काय उपयोग होता? तरी पण उगीच कांहीं तरी विचारावें म्हणून मीं सहज गोष्ट काढली. तेव्हां लगेच तो म्हणाला,

"तुम्हांला जोशीबुवांकडे जायचंय् होय? ते आहेत गांवांतच. पुण्याला साहित्यसंमेलनाला गेले होते. काल्च आले. भोंसलेहि इकडेच जवळच असतात. त्यांनाहि भेटायचं असेल तुम्हांला? तुम्ही औदुंबरला गेलांत म्हणजे जोशीबुवा तुम्हांला नेतीलच त्यांच्याकडे."

बोलतां बोलतां टांगा भिलवडी गांवापाशीं आला. गांवाबाहेरचा प्रचंड पिंपळ आणि चहा-विडीचीं दुकानें मागें टाकून नदीच्या उताराला लागला. नदीवरून बांधलेल्या फरशीपाशीं येतांच टांगेवाला म्हणाला, "उतरून पायीं चालूं लागा. मी टांगा मागून आणतों."

नुकतेंच नदीला पाणी येऊन गेलें होतें. कांठाशीं चिखल फार झाला होता. आणि माझे पाय आंत चालले होते. भिलवडीला नदीकांठीं घाट बांधायचें ठरलें त्या वेळीं पाण्यांत दगड ठरेनात तेव्हां मेलेल्या गुरांचीं शिंगें तिथें टाकलीं, त्यांना मुळें फुटून तीं तिथें पक्कीं रोवलीं गेलीं, आणि त्यांवर घाट बांधला गेला, असें म्हणतात.

आणखी कांहीं वेळ जर मला तसेंच चिखलांत रहावें लागलें तर माझ्याहि पायांना मुळं फुटतील कीं काय अशी मला भीति वाटूं लागली. पण सुदैवानं तसें कांहीं झालं नाहीं. आणि स्वतःला सांवरून घेऊन मी फरशीवरून चालूं लागलो.

पलिकडल्या तीरावर चढून गेलें कीं रस्ता वळतो आणि त्याबरोबर भोंवतालचें दृश्यहि पालटतें. भिलवडी स्टेशनापासून गांवापर्यंतचा भाग, तुरळक झाडें सोडलीं तर, बहुतेक निरस्तपादप आणि मैदानाचा होता. इथें आल्याबरोबर दोहों बाजूंना गर्द झाडी लागली आणि टांग्यांत न बसतां पायींच चालावेंसें वाटूं लागलें. परंतु बंड्ड गोविंदानें आम्हाला टांग्यांत बसवलेंच आणि वळणावळणानें फिरवून उंबराच्या झाडाच्या एका दाट राईपाशीं आणलें. तिथें टांगा थांबवून, एका घराच्या दाराशीं जाऊन "जोशीबुवा, पाहुणे आले आहेत—" अशी त्यानें ललकारी दिली आणि कवि सुधांशूंना घेऊन तो बाहेर आला. आमची परस्पर ओळख नव्हती ती आम्हीं करून घेतली. अशा रीतीनें टांगेवाल्याच्या आस्थेमुळें आणि कवि सुधांशूंच्या सौजन्यामुळें आम्ही अखेर त्यांचेच पाहुणे झालों.

दत्ताचें स्थान नदीकांठींच पण जरा खोलगट जागेंत आहे. आणि ब्राम्हणांचीं दहावीस घरें आहेत तीं त्याच्यामागेंच वरच्या बाजूला एका ओळींत आहेत. दत्ताच्या स्थानाभोंवतीं उंबराच्या झाडांची इतकी दाट सांवली आहे कीं, उन्हाळ्याच्या दिवसाच्या भर बारा वाजतांहि उन्हाचा ताप होत नव्हता. समोरच खालीं कृष्णा आहे. प्रवाह तीरापासून खोल आहे आणि पात्रांत डोह आहे.

त्यामुळें विस्तारापेक्षां नदीचा खोलपणाच जास्त जाणवतो.

दोन्ही तीरांवरचीं शेतें, वाड्या, बागा आणि राया पात्रावर ओणवून आपल्या समृद्धीचें प्रतिबिंबित रूप त्यांत पाहात होतीं. त्यांचें कौतुक करण्यासाठींच जणूं कृष्णेनें तिथें डोह केला आहे. कीं नृसिंहसरस्वतींच्या निवासानें पुनीत झालेल्या त्या स्थलाशीं ती घोटाळते आहे ?

कांठापासून प्रवाहापर्यंत एक छोटासा घाट आहे. पण त्या ठिकाणाचा स्वाभाविकपणा घालवण्याइतकें त्यानें त्यावर आक्रमण केलेलें नाहीं. तांबुस-पिंवळ्या पोटाचे आणि मोठाल्या काळसर-हिरव्या खवल्यांचे कृष्णेंतले मासे हरिद्वारच्या माशांपेक्षां पुष्कळच जाडे आणि मोठे आहेत. तेहि टाकलेले दाणे खायला वर येतात. पण त्यांत हरिद्वारच्या माशांसारखा हपाप, रेटारेट, धडपड, चढाओढ दिसली नाहीं. हरिद्वारच्या पंड्यांच्या मानानें औदुंबरचे क्षेत्रस्थ ब्राह्मण जसे अधिक संयमी आणि सौजन्ययुक्त दिसतात, तसाच संयम कदाचित् ह्या माशांच्या अंगीं आला असेल. किंवा कृष्णेकांठचा शेतकरी जसा अंगानं मजबूत आणि मनानें मानी असतो तसेच हे मासेहि असतील. कृष्णेकांठच्या मातीचा आणि तिच्या पाण्याचाच तो गुण असेल. कांहीं असो. तिथल्या माशांबद्दल माझें मत एकंदरींत चांगलें झालें आणि त्यांचा भाग त्यांना देतांना मनाला बरें वाटलें.

वास्तविक देवदर्शन घेऊन मग घाटावर माशांना खायला घालायचें असा क्रम असतो. पण आम्हीं त्याची उलटापालट केली. आम्हीं आधीं माशांना खायला घालून मग देवाकडे गेलों. उंबरांच्या वेटोळ्यांत बांधलेलं देऊळ आणि त्याचें आवार लहानच आहे. गर्दी-गडबड, घोष-घंटानाद असेंहि कांहीं नव्हतें. लोक गुपचूप येत, देवाला नमस्कार करीत, काय ठेवायचें ते ठेवीत आणि प्रदक्षिणा करून जात. कुणाला देवाला नैवेद्य करायचा असेल तर ब्राह्मणाकरवीं व्यवस्था करीत. भोंवतालीं ओवऱ्यांतून कांहीं लोक येऊन राहिलेले होते. कुणी जप करतांना तर कुणी पोथी वाचतांना दिसत होते. त्यांतच एक अठरा-वीस वर्षांचा दर सुटींत नेमानें येणारा कॉलेजचा विद्यार्थीहि होता. जो तो आपल्याच कामांत किंवा नादांत मग्न होता.

देवाचें दर्शन घेऊन पलिकडल्या तीराला जाण्यासाठीं नावेंत बसलों. ज्या भुवनेश्वरीनें श्रीगुरूचा मोठेपणा स्वतः होऊन मान्य केला होता, तिच्या

दर्शनाला आम्हांला जायचें होतें. कोल्हापूरच्या वेदरत ब्राह्मणाच्या मंदमति मुलानें भुवनेश्वरीजवळ तीन दिवस तीन रात्री धरणें धरलें होतें. आणि विद्या प्राप्त होत नाहीं म्हणून त्यानें आपली जीभ कापून टाकली, तेव्हां देवीनें त्याला औदुंबरातळीं वसतीला असलेल्या श्रीनृसिंहसरस्वतींपाशीं पाठवलें होतें. त्यांच्या कृपेनें त्याला कापलेली जिव्हा आणि विद्या दोन्ही प्राप्त झाल्या. उज्जयिनीच्या गडाच्या कालिकेजवळ बसून कालिदासानें देखील अशाच आततायी उपायांनीं बुद्धि आणि कवित्वशक्ति मिळवली होती. तो पुढं महाकवि झाला. ह्या ब्राह्मणपुत्रानें पुढें आपल्या बुद्धीचें आणि विद्येचें काय सार्थक केलें तें कुणालाच माहीत नाहीं.

बुद्धि किंवा विद्या नाहीं म्हणून देवाला अशा प्रकारचें सांकडें घालणारे लोक हल्लीं दिसत नाहींत. त्यामुळें देवाना आतां पूर्वीसारखी वारंवार पंचाईत पडत नसेल ! कदाचित् त्यांना चुकल्यासारखेंहि वाटत असेल !

भुवनेश्वरीचें दर्शन घेऊन परत नावेकडे यायला निघालों तेव्हां श्री. जोशी म्हणाले,

"तुमच्या गाडीला अजून बराच अवकाश आहे. इथं जवळच तादवरवाडीला भोंसले राहातात त्यांना आपण भेटून येऊं."

श्री. जोश्यांच्या संवयी आणि आवडीनिवडी टांगेवाल्याला किती चांगल्या माहीत होत्या ह्याचें मला त्या वेळीं पूर्ण प्रत्यंतर आलें.

आम्ही उताराची वाट सोडून नदीला समांतर असे वरच्या बाजूला चाललो. उजव्या अंगाला कापलेल्या शेतांचे सोनेरी रुपेरी धांडे उभे होते. खालीं पडलेलीं सोपटें मधूनच चमकत होतीं. काळसर-तांबूस वाटेवर मध्येंच बाभळीचे दुबेळकी रुपेरी कांटे 'आम्ही इथें आहोत, बघून चाला—' म्हणून सावध करीत, तर त्यांतच विखुरलेलीं बाभळीचीं पिवळीं-धमक गोंडेदार फुलें 'आमच्या-कडे बघा' म्हणून हांक मारीत. पायाशेजारच्या या चिमुकल्या चित्रांवरून दृष्टि उचलून पाहिलें, तर लांब तादवरवाडीची झाडी दिसली. पैलतीरावर शेवरीच्या झुडुपांच्या लांबच लांब रांगा मळईवरून रांगत येऊन नदीच्या पाण्याशीं खेळत होत्या. त्यांच्यापलीकडे झाडांनीं आपलीं हिरवीं-काळीं डोकीं वर काढलीं होती. कांहींनीं वेलींना प्रेमानें खांद्यांवर घेतलें होतें, तर कांहींनीं कंटाळून झटकून टाकलें होतें. नदीचा सतत वाहणारा प्रवाह, यात्रेकरूंच्या सोयीसाठीं सतत उभा असलेला घाट, त्यामागें झाडांची राई, त्यांतून डोकावणारीं घरें,

त्यांच्यामधून फिरत जाणारे रस्ते, त्या राईत आणखीच एकमेकांना बिलगून उभीं असलेलीं उंबराचीं झाडें आणि त्यात आडोशाला आसऱ्यानें बसलेलें देऊळ—सगळें दृश्य एखाद्या कवितेसारखें होतें.

आम्ही शंपन्नास पावलें गेलो असूं, तेवढ्यांत एक गवळी डोक्यावर दुधाचा हंडा घेऊन येत होता तो श्री. जोश्यांना म्हणाला,

"काय जोशीबुवा, पाहुण्यांना घेऊन मास्तराकडे जातांहां वाटतं? पण मास्तर घरीं नाहींत. शाळेंत गेलेत. निरोप आहे का काही सांगायचा?"

"म्हणावं, पाहुणे आले आहेत. लवकर आमच्याकडेच या."

"बरं, बरं." म्हणून तो भिलवडीच्या वाटेनें चालूं लागला. आम्ही परतलों.

टांगेवाला भेटल्यापासून आतांपर्यंत पाहात होतों, जो तो आपला घरच्या-सारखा इतरांची सोय पाहायला आणि काम करायला तत्पर. शहरगांवचें दगडा-विटांच्या बांधकामासारखें आंखीव, रेखीव, पण रूक्ष निर्मम वागणें कुठं आणि हें मळईसारखे मऊ, पाऊलवाटेसारखे सोयिस्कर आणि नदीकांठासारखें परोपकारक वागणें कुठं!

उतारापाशीं परत आलो तो नाव नाहीं. पैलथडीला नाव होती, पण नावाडी नव्हता. लछमनझुल्याची अवस्था येते कीं काय असें वाटलें. पण इथें सगळेच एकमेकांचे होते. एक गृहस्थ नावेंत चढून बांबूनें नाव चालवूं लागलेले दिसले. त्यांना श्री. जोश्यांनीं हांक मारली. त्यांनीं नावेची दिशा बदलून ती आमच्या दिशेनें चालवली आणि ते मोठ्यानें म्हणाले,

"म्हैस दिसत नाहीं कुठं, म्हटलं कुठं गेली पाहावं. कोणी पाव्हणे आहेत वाटतं बरोबर?"

श्री. जोश्यांनीं मला त्यांच्यासंबंधीं सांगितलें,

"हे आमच्या वाङ्मयमंडळाचे एक मोठे आधार आहेत. वाङ्मयाची आणि वाङ्मयचर्चेची त्यांना चांगली आवड आहे."

पांढरपेशा राहणी आणि साहित्य ह्यांची आपल्या मनांत अशी पक्की गांठ बसलेली आहे कीं, त्यांचा तो थोराड, काळा, निरोगी देह, मानेवर गांठ मारलेली शेंडी, गळ्यांतलें शुभ्र जानवें, गुढघ्यापर्यंत वर घेतलेलें धोतर, तें नाव चालवणें, आणि त्यांचें साहित्यप्रेम ह्यांची सांगड घालणें मला जड गेलें.

* * *

कोल्हापूरच्या ब्राह्मणपुत्राला जिव्हा आणि विद्या दिल्यानंतर श्रीनृसिंहसरस्वती

औदुंबरला फार काळ राहिले नाहींत. तिथें ते गुप्त झाले आणि आणखी खालच्या बाजूला कृष्णा-पंचगंगासंगमाशेजारीं अमरापुराजवळ प्रकट झाले. औदुंबरच्या मानानें पंचगंगासंगमाचा भाग किती विशाल आणि मोकळा आहे. औदुंबरजवळ कृष्णेचें पात्र आवळल्यासारखें झालें आहे तर इथें मोकळें सुटलें आहे. औदुंबरला नदीच्या दोन्ही बाजूंनीं मळई आहे, तर इथें वाळवंट आहे. औदुंबरची रमणीयता, झाडा-शेतांची, आटोपसरपणाची, दाटीची आहे; तर पंचगंगासंगमाची विस्तीर्ण वाळवंटाची आणि ऐसपैस आहे. आणि संगमाचें माहात्म्यहि औदुंबरच्या डोहापेक्षां अधिक आहे. औदुंबरचें आटोपशीर ठिकाण, सोडून श्रीनृसिंहसरस्वती जसे ह्या मोकळ्या ठिकाणीं आले, तसा त्यांचा सिद्धिसामर्थ्याचा लौकिकहि तेथें आल्यावर फार विस्तारला. त्यांनीं ह्या ठिकाणीं संगमाशेजारीं, औदुंबरापाशीं बारा वर्षे निवास केला. त्यांच्या ह्या निवासानें कृष्णा-पंचगंगासंगम आणि त्याच्या आसमंताचा भाग पुनीत झाला आहे, आणि त्यांनीं केलेल्या चमत्कारांनीं अजूनहि भारून गेला आहे. म्हणूनच कदाचित् औदुंबरला जितके लोक जातात त्यांच्या शतपट लोक नरसोबाच्या वाडीला जातात. औदुंबरला जितकी शांतता आहे तितकी इथें गजबज आहे. औदुंबरला माणसानें निसर्गावरून हात फिरवण्याचा फार प्रयत्न केलेला दिसत नाहीं, तर उलट इथें निसर्गापेक्षां माणसाचाच हात जास्त मोठा दिसतो.

औदुंबरहून नरसोबाच्या वाडीकडे जातांना माझ्या मनांत वास्तविक श्रीनृसिंहसरस्वतींचें तिथलें चरित्र यायचें. अमरापुरांतल्या ज्या ब्राह्मणाच्या अंगणांतला घेवड्याचा वेल उपटून त्याला त्यांनीं घटकाभर अस्वस्थ केलें, आणि नंतर त्याच वेलाच्या मुळाशीं सुवर्णद्रव्याचा हंडा दाखवून त्याला 'अहो धन्य' म्हणायला लावलें, आणि त्याची 'यावच्चंद्र दिवाकरौ' ददात मिटवली त्या ब्राह्मणाचा वंश आतां कुठें असेल आणि त्याचें आतां कसें चाललें असेल? शिरोळच्या एका स्त्रीचीं मुलं ब्रह्मसमंधाच्या बाधेमुळें जगत नसत. त्यांची ती बाधा घालवून तिची वंशवेल श्रींनीं निर्बाध केली. आज ती तिथेंच फोंफावत असेल काय? चौसष्ट योगिनी रोज श्रींना आपल्या नगरींत नेऊन तिथें त्यांची षोडशोपचारें पूजा करून त्यांना सुग्रास भोजन देत. श्री गांवांत भिक्षा मागत नाहींत याचें स्थानिक ब्राह्मणांना मोठें वैषम्य वाटे. पण त्यांच्या भोजनाचें रहस्य एका गंगानुजानें पाहिलें. ती गोष्ट त्यानें कुणालाहि सांगूं नये असें श्रींनीं त्याला बजावलें. पण ती गुप्त गोष्ट आपणा सर्वांना कळली हें आपलें केवढें भाग्य! श्रींची

त्याच्यावर कृपा झाल्यामुळें त्याचें भाग्य भरभराटीला आलें, तेव्हां बहुधा त्या वेळींहि ती गोष्ट फारशी गुप्त राहिली नसावी ! पण त्या भाग्यवान् गंगानुजाचे वंशज आज तितक्याच, किंवा चढत्या भाग्यानें, कुठें नांदत असतील ? अशीं अनेक कुतूहलें नरसोबाच्या वाडीला जातांना मनांत जागीं व्हायचीं. पण मला खरोखर उत्सुकता होती अंगांत भुतें आलेलीं माणसें पाहायची ! भुतांनीं पछाडलेलीं माणसें तिथें संध्याकाळीं आरतीच्या वेळीं अगदीं अस्वस्थ होतात आणि खांबाला मिठी मारतात, नतर त्यांना खालीं कृष्णेंत स्नान करायला सांगतात, आणि मग गुरुकृपेनें आणि स्थानमाहात्म्यानें भूत जातें असें मीं ऐकलें होतें. भुतानें पछाडलेलें माणूसच मीं अद्याप पाहिलेलें नसल्यामुळें तें दृश्य पाहायला मिळावें ही माझी मोठी इच्छा !

आम्ही गेलों तेव्हां तिन्हीसांजाची प्रदोषाची वेळ होती. प्रवेशद्वारापासून तों पादुकांच्या देवळापर्यंत आणि जरा पुढेंहि सगळी वाट दगडांनीं मढवलेली होती. एका अंगाला ओंवऱ्यांतून वासुदेवानंदसरस्वतींचीं आणि इतर दत्तभक्तांचीं नांवें खोल्यांवरून लिहिलेली होतीं. आम्ही घाटावर पोंचलों तों अंधार पडूं लागला. प्रवाहापलीकडलें अफाट पिंगट वाळवंट करडें होऊं लागलें. आणि पलीकडली औरवाडची झाडी काळवंडूं लागली. खालच्या बाजूला लांब पंचगंगेचा संगम आणि पलिकडला कुरुंदवाडचा घाट अंधारांत अदृश्य व्हायच्या बेतांत आले होते. कृष्णा-पंचगंगासंगमांत एक स्नान करण्याचें पुण्य, प्रयाग-संगमावर माघ-स्नान केल्याच्या पुण्याच्या शतपट आहे हें माहीत होतें. पण आरतीची वेळ जवळ येत चालली होती. भुताटकी पाहण्याची उत्सुकता अधिक तीव्र होती. त्या बालिश कुतूहलाला वश होऊन आम्हीं त्या महापुण्याकडे पाठ फिरवली.

वाडीचें देऊळ अगदींच किरकोळ असलेलें पाहून माझी फार निराशा झाली, आणि ते जे भुतांनीं पछाडलेल्यांनीं मिठी मारायचे खांब ते तात्पुरत्या उभारलेल्या मंडपाचे जसे खांब असतात तसेच होते. आणि खरोखर मंडप तात्पुरताच होता. कृष्णेच्या पुराच्या प्रकोपामुळें अधिक मोठें किंवा टिकाऊ बांधकाम केलें नसावें. मंदिराच्या एका बाजूला कांहीं मंडळी श्रीगुरुदत्तात्रय अवधूताचें भजन म्हणत होती. कांहीं देवाला प्रदक्षिणा घालीत होती. 'जे जन भजती भक्तीसीं, काम्य होत त्वरितेसीं' ही त्यांची दृढ श्रद्धा त्यांच्या मुखावर दिसत होती.

एक गृहस्थ एका पायानें लंगडत चालले होते, त्यांना आपला पाय गुरुकृपेनें बरा व्हावा अशी इच्छा असेल हें उघड होतें. एक विद्यार्थ्यासारखा मुलगा प्रदक्षिणा घालीत होता, त्याची इच्छा परीक्षेत यश मिळवावें ही असली पाहिजे. एक विधवा स्त्री फेऱ्या घालीत होती. तिचा मुलगा किंवा सून तिच्याशीं नीट वागत नसतील, त्यांना उपरती व्हावी असें तिचें मागणें असेल. किंवा जन्मोजन्मीं आपल्याला आपला दिवंगत पतीच लाभावा असें असेल. किंवा—किंवा कोणी सांगावें—कांहीं झालें तरी मला हा पति देऊं नकोस, असें 'गुरुचरित्रा'च्या शिकवणुकीशीं अत्यंत विसंगत असेंहि तिचें मनांतलें गूढ ईप्सित असेल. पण त्यापैकीं कुणाच्या अंगांत येईल असें दिसेना. मात्र पंधरासोळा वर्षे वयाच्या दोनतीन मुली प्रदक्षिणा घालीत होत्या त्याचा प्रकार थोडा वेगळा दिसला. त्या भराभरा चालत होत्या. ओठ आंवळलेले होते. डोळे नासाग्र होते आणि मुद्रा स्थिर होती. दर प्रदक्षिणेगणिक त्यांची गति वाढत होती. हळूहळू घामाचे थेंब त्यांच्या गालांवरून ओघळूं लागले, त्यांच्या गतींत यांत्रिकता येत चालली. देवळाच्या समोरच्या बाजूला येतांच नमस्कारासाठीं हात उठायचे ते लाकडी-पणानें उठूं लागले. आमची इच्छा सफळ होण्याची वेळ जवळ येत चालली असें आम्हांला वाटलें.

पण घड्याळ आम्हांला आडवें आलें. ज्यासाठीं आम्ही आलों होतों तें पाहायला मिळणार असें वाटत असतांनाच बस सुटायची वेळ झाली, आणि आम्हाला तिथून चरफडत निघावें लागलें. आम्हांला निघतांना पाहून शेजारचे एक गृहस्थ म्हणाले, "आरती, पालखी पाहिल्यावांचून जाऊं नका. तेंच तर इथें पाह्यचं!" मलाहि तसेंच वाटत होतें. पण उपाय नव्हता. तथापि एका अर्थी झालें तेंहि वाईट नाहीं. कारण त्यामुळें पुन्हां संधि मिळाली तर वाडीला जाण्याची उत्सुकता शिल्लक राहिली आहे.

कांठापासून खोल असलेला कृष्णेचा प्रवाह, पलिकडलें अफाट वाळवंट, त्यापलिकडली झाडी, सगळें करडें-काळें झालें होतें. त्यांवरून पुन्हां एकवार दृष्टि फिरवीत आम्ही बाहेर पडलों.

भुतें जातात कशीं? मेलेल्या माणसाला जिवंत करण्याचा चमत्कार श्रीगुरूंनीं कां केला? मेलेला परत उठल्यानें माणसाचें दुःख नाहींसें होईल काय? गुप्त धनाचा अकल्पित लाभ झाल्यानें माणसाचें खरोखर कल्याण होतें काय? असे नामधारकानें सिद्धाला न विचारलेले प्रश्न स्वतःला विचारीत आम्हीं

त्या स्थानाचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशीं आम्हांला गाडींत कळलें कीं, त्या रात्रीं कुणाच्याच अंगांत आलें नाहीं. त्या ज्या मुली एकतानतेनें झराझर फिरत होत्या त्या, त्यांना आरतीच्या आधीं ठराविक प्रदक्षिणा पुऱ्या करायच्या होत्या म्हणून. त्यासाठीं त्यांची एकाग्र घाई चालली होती.

बारा वर्षांनंतर श्रीनृसिंहसरस्वतींना वाटलें, कीं आतां इथें अधिक काल राहूं नये. त्याप्रमाणें ते तिथून गुप्त झाले आणि पूर्वेला भीमा-अमरजा संगमावर गाणगापुरीं प्रकट झाले. त्यांना जातांना पाहून त्यांचें सेवा-स्वागत करणाऱ्या योगिनींना अत्यंत दुःख वाटलें. त्यांचें सांत्वन करतांना श्रीगुरूंनीं त्यांना आश्वासून सांगितलें, कीं "अमरपूर पश्चिम तीर। तुम्हांसहित औदुंबर। आमच्या पादुका मनोहर। प्रख्यात होईल स्थान बहुत ॥" त्याप्रमाणें स्थान बहुत प्रख्यात झालें आहे. महाराष्ट्रांतल्या मध्यम वर्गातल्या असंख्य लोकांचीं मुकीं दुःखें तिथें बोललीं जातात, आणि तिथें गेल्यानें तीं दूर होतात अशी अनेकांची श्रद्धा आहे. नाना प्रकारच्या इच्छा मनांत धरून असंख्य माणसें तिथें जात असतात. ज्यानें पतिव्रता स्त्रीचा मृत पति उठवला, ज्यानें साठ वर्षांच्या वांझ स्त्रीला 'पुत्रजन्माचा आनंद दिला', ज्यानें यवन राजाचा असाध्य रोग बरा केला, ज्यानें भाकड म्हशीला बत्तीस धारांनीं दुधाचा पाझर फोडला, तो आपल्या आर्त भक्तांसाठीं काय करणार नाहीं !

ज्यांना कांहींहि मागायचें नाहीं असेहि कांहीं भाविक असतील. ते "मंदगती प्रदक्षिणा। करितां पावे अनंत पुण्या। पदोपदीं वाजपेय यज्ञा। फळ असें परियेसा ॥" असें जें श्रीगुरूंनीं जातां जातां औदुंबराचें माहात्म्य सांगितलें, त्यानुसार केवळ प्रदक्षिणेसाठीं येत असतील.

* * *

औदुंबर हें क्षेत्राचें नांव जरी भिलवडीजवळच्या स्थानाला मिळालें असलें तरी औदुंबराचें वरप्रमाणें माहात्म्य श्रीनृसिंहसरस्वतींनीं पंचगंगासंगमीं अमरापुरच्या योगिनींना सांगितलें. उंबराचें झाड हें लहानपणापासूनचें परिचयाचें. शिवाशिवी खेळतांना त्याच्याभोंवतीं आम्ही घिरट्या घालीत असूं. जराशी हवा लागतांच केशरी रंग घेणाऱ्या त्याच्या चिकाची आम्हांला गंमत वाटायची. बारीक तांबूस रेषांची जाळीदार नक्षी असलेलीं त्याचीं पिकलेलीं, रसरशीत फळें आम्हीं,

आंतलीं निळीं-जांभळीं पांखरें फुंकून टाकून, अंजीर म्हणून खात असूं. पण हा आपला साधा उंबर कलियुगांतला कल्पवृक्ष आहे, दत्तावताराच्या पादुकांच्या सान्निध्यानें तो पवित्र झाला आहे, हिरण्यकशिपूच्या उदरविदारणानें विषतप्त झालेल्या नृसिंहाच्या नखांना त्याच्या फळांनीं शीत-शांत केलें आहे, "मंदगती प्रदक्षिणा। करतां पावे अनंत पुण्या" असा त्याचा प्रभाव आहे, हें कळल्यापासून माझी दृष्टि एकदम पालटली. आतां जेव्हां जेव्हां मी उंबराकडे पाहतों तेव्हां मला श्रीक्षेत्र औदुंबराची आणि नरसोबाच्या वाडीची आठवण होते. लहानपणीं ज्याच्याशीं आपण बरोबरीच्या नात्यानें सलगी केली तो कोणी तरी अलौकिक योग्यतेचा थोर मनुष्य आहे असें दिसून आलें म्हणजे जसें वाटतें, तसा मला उंबरासंबंधीं आता एक प्रकारचा आदराचा दुरावा वाटूं लागला आहे.

एप्रिल, १९५०